

# आठवणीतील राजाभाऊ

(समर्पित जीवनदर्शन)

# कै. कृष्णाजी गोविंद तथा राजाभाऊ लवळेकर जीवनपट

| | |
|---|---|
| ११.१.१९२९ | चऱ्होली येथे (जिल्हा पुणे) जन्म |
| १९४० | रा. स्व. संघाशी ओळख |
| १९४१ | व्हर्नाक्युलर फायनल उत्तीर्ण (सध्या इयत्ता ७वी) पुढील शिक्षणासाठी पुण्यात दाखल |
| १९४४ | वाडिया कॉलेज प्रयोगशाळेत नोकरी व न्यू पूना एज्यूकेशन सोसायटीच्या रात्रशाळेत प्रवेश |
| १९४७ | मिलिटरी अकाऊंटस (सदर्न कमांड) मध्ये नोकरी |
| १९४८ | संघबंदी विरूद्ध सत्याग्रह आणि तुरूंगवास |
| १९५० | एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण |
| १९५२ | नवीन मराठी शाळेत लेखनिक म्हणून नोकरीस सुरूवात |
| १९५५ | बीए उत्तीर्ण |
| ३१.०३.१९५६ | शांता जोशी (मुंबई) यांचेशी विवाह |
| १९५७ | बी.टी. परीक्षा उत्तीर्ण, रा. स्व. संघ तालुका कार्यकर्ता (मुढवा) म्हणून नियुक्ती |
| १९६० | रमणबाग शाळेत शिक्षकी कारकीर्दीस सुरूवात |
| १२.०७.१९६१ | पानशेतचा पूर, घर पाण्याखाली, पूरग्रस्तांसाठी काम |
| १९६८ | एकता मासिकाचे व्यवस्थापक म्हणून जबाबदारी |
| १९७० | रमणबागेत पर्यवेक्षक |
| ०१.०१.१९७३ | स्वतःच्या वास्तुत (ज्ञानिया, पद्मावती) निवासास प्रारंभ |
| १९७५ | आणीबाणी, सत्याग्रह - पुनश्च तुरूंगवास |
| १९७८ | रा. स्व. संघ पुणे महानगर सहकार्यवाह म्हणून जबाबदारी |
| | एच ए. हायस्कूल, पिंपरी - उपमुख्याध्यापक म्हणून पदग्रहण |
| १९७९ | 'स्व'-रूपवर्धिनीच्या कामास प्रारंभ |
| १९८१ | रमणबागेत पर्यवेक्षक म्हणून पुन्हा रुजू |
| १९८४ | रमणबागेचे मुख्याध्यापक म्हणून पदभार ग्रहण |
| | संस्कार भारती पुणे कामास प्रारंभ |
| | रा. स्व. संघ पुणे महानगर कार्यवाह म्हणून जबाबदारी |
| ०१.०१.१९८७ | रमणबागेचे मुख्याध्यापक पदावरून निवृत्त |
| | राष्ट्रीय विचार प्रसारक मंडळ (तरूण भारत) विश्वस्त म्हणून जबाबदारी |
| १९८८ | ज्ञानदा प्रतिष्ठाण, एरंडवणे याच्या अध्यक्षपदाचे सुत्रग्रहण |
| १९८९ | शिक्षण प्रसारक मंडळी नियामक मंडळ सदस्य आणि उपाध्यक्ष पदाची जबाबदारी |
| १९९० | संपादक, तरूण भारत |
| | संस्कार भारती पुणे महानगर अध्यक्ष म्हणून नियुक्ती |
| २००० | 'स्व'-रूपवर्धिनीची कार्याध्यक्ष पदाची जबाबदारी |
| २००० | अध्यक्ष, संस्कार भारती पश्चिम क्षेत्र, म्हणून नियुक्ती |
| २०१२ | आजारपणामुळे 'स्व'-रूपवर्धिनीच्या आणि संस्कार भारतीच्या जबाबदाऱ्यांमधून मुक्तता |
| २७.१०.२०१३ | राहत्या वास्तुचे (ज्ञानिया, पदमावती) नूतनीकरण पूर्ण, वास्तुत राहावयास प्रारंभ |
| ०८.०६.२०१६ | वृद्धापकाळामुळे निधन |




# आदरणीय राजाभाऊ लवळेकर सर



जन्म : ११ जानेवारी, १९२९

मृत्यु : ८ जून, २०१६



राजाभाऊ आणि कुसुमताई

# आम्ही लवळेकर



कै. गोविंद लवळेकर आणि
कै. अन्नपूर्णा लवळेकर



कै. मधुसूदन लवळेकर आणि
श्रीमती भारती लवळेकर



डावीकडून – राजाभाऊ, उषा असनीकर, अपर्णा कानेटकर, अनुराधा कुलकर्णी

वास्तुदेवते प्रसन्न होऊनी, आशीर्वच द्यावे। मनी योजल्या शुभसंकल्पा, मूर्तरूप यावे।।




मा. राजाभाऊंचे निवासस्थान
ज्ञानिया...
नव्या रूपात, नव्या दिमाखात






नूतनीकरणानंतर वास्तुपूजन करताना
मा. राजाभाऊ आणि कुसुमताई

# नातवंडांच्या गोतावळ्यात आजी-आजोबा











डावीकडून (खालची ओळ) – उजवीकडे – अनघा लवळेकर, प्रसाद लवळेकर, घनश्याम भागवत (ज्येष्ठ जावई)
राजाभाऊ लवळेकर, कुसुमताई लवळेकर, भाग्यश्री भागवत (ज्येष्ठ कन्या) संजीवनी हेजीब (कन्या) रवींद्र हेजीब (जावई)
डावीकडून उजवीकडे (वरील ओळ) – ईशा (नात) अनीष (नातू), आलोक (नातू), प्रज्ञा भागवत (नातसून), गायत्री (नात) वेदांग (नातू)



केशवाय नमः



माधवाय नमः



गोविंदाय नमः
(कै. गोविंद लवळेकर आणि कै. अन्नपूर्णा लवळेकर)

स्व. राजाभाऊ लवळेकरांची प्रेरणास्थानं

# सन्मान समर्पणाचा, विद्वत्तेचा आणि कलेचा!



प.पू. सरसंघचालक राजेंद्रसिंहजी
यांचा सन्मान करताना
स्व. राजाभाऊ



महाराष्ट्रभूषण शिवशाहीर
बाबासाहेब पुरंदरे
राजाभाऊंचा सन्मान करताना




ज्येष्ठ चित्रकार श्री. रवी परांजपे
यांचा सन्मान करताना मा. राजाभाऊ

# शिक्षणसंस्थांचे आधारवड!




अखिल भारतीय कार्यशाळेत
'स्व'-रूपवर्धिनीमागची संकल्पना मांडताना
मा. राजाभाऊ




शिक्षकदिनानिमित्त
शिक्षकांशी संवाद करताना मा. राजाभाऊ




विष्णुशास्त्री चिपळूणकर स्मारक
व्याख्यानमालेत मार्गदर्शन करताना
मा. राजाभाऊ




रमणबाग शाळेतील माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्यात
विख्यात गायक रवींद्र साठे यांच्यासमवेत
मा. राजाभाऊ



संस्कारभारतीचे महाराष्ट्र प्रांतात काम पुण्यातून सुरू झाले.
पुण्यातील कार्यालयाचे उद्घाटन करताना मा. राजाभाऊंबरोबर डॉ. रा. शं. वाळिंबे



ज्येष्ठ नटवर्य कै. चित्तरंजन कोल्हटकर आणि साहित्यिक द.मा. मिरासदार यांचेबरोबर संस्कारभारतीच्या कार्यालयात गप्पा मारताना मा. राजाभाऊ.



पत्रकार परिषदेत संस्कारभारती, पुणे महानगराचे अध्यक्ष पंडित जितेंद्र अभिषेकी, राजाभाऊ लवळेकर आणि रा. शं. वाळिंबे



सं. भारतीचे राष्ट्रीय संघटन मंत्री
मा. योगेंद्रजी यांच्या
अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त
झालेल्या सत्काराचे वेळी
त्यांच्या समवेत
कै. चित्तरंजन कोल्हटकर,
मा. राजदत्त आणि राजाभाऊ




सं. भारती पश्चिम क्षेत्र
नाट्यशिबिराच्या उद्घाटनप्रसंगी
डावीकडून श्री. बिमल लाट,
श्री. चित्तरंजन कोल्हटकर,
श्रीमती दीपा लागू आणि
राजाभाऊ लवळेकर




सं. भारती पुणे महानगराच्या
वर्धापनदिनाला अध्यक्ष
डॉ. गो. बं. देगलूरकर मा. राजाभाऊंचा
सत्कार करताना


# विकसित व्हावे, अर्पित होऊनी जावे!



'स्व'–रूपवर्धिनीच्या
सहविचार बैठकीतील
एका निवांत क्षणी
कार्यकर्त्यांसमवेत
स्व. राजाभाऊ.



'स्व'–रूपवर्धिनीच्या मूलभूत
विचारामागील त्रिमूर्ती –
स्व. किशाभाऊ पटवर्धन,
स्व. राजाभाऊ लवळेकर आणि
श्री. र. ज. नरवणे सर



# आठवणीतील राजाभाऊ

## (समर्पित जीवनदर्शन)

संपादक मंडळ

सौ. भाग्यश्री भागवत
श्री. लक्ष्मीप्रसाद लवळेकर
डॉ. सौ. अनघा लवळेकर
श्री. रवींद्र हेजीब
सौ. संजीवनी हेजीब

श्री. रवींद्र देव
श्री. सूर्यकांत पाठक
श्री. विनायक डंबीर
श्री. शिरीष पटवर्धन
श्री. विश्वास कुलकर्णी

**प्रकाशक**
कौशल्यवर्धन फाऊंडेशन
७, श्रीनिवास अपार्टमेंट, २२/२, मंगळवार पेठ,
पारगे चौक, पुणे ४११ ०११
दूरध्वनी क्र. : ९८२२६७५७६५, ८६००१०१३०७
E-mail - kwfoundation@rediffmail.com

© कौशल्यवर्धन फाऊंडेशन
७, श्रीनिवास अपार्टमेंट, २२/२, मंगळवार पेठ,
पारगे चौक, पुणे ४११ ०११
दूरध्वनी क्र. : ९८२२६७५७६५, ८६००१०१३०७
E-mail - kwfoundation@rediffmail.com

**मुद्रित-शोधन :**
डॉ. रंजना दाते

**मुखपृष्ठ**
जीनियस ॲड-मिशन

**रेखाचित्रे**
श्री. सदानंद चांदेकर

**मुद्रक :**
**प्रबोध उद्योग**
१२४८, शुक्रवार पेठ,
पुणे ४११ ०३०

**प्रकाशन :**
१७ जून २०१७
पुणे

**किंमत रु. :** शंभर फक्त

# स्मरणांजली

गेल्या नव्वद वर्षाहून अधिक काळ कार्यरत असलेल्या आणि सतत वर्धिष्णू असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्याची खरी ताकत जर असेल तर संघटनेच्या मुशीत घडलेल्या आणि खऱ्या अर्थाने समर्पित झालेल्या देवदुर्लभ कार्यकर्त्यांची फळी. हे कार्यकर्तेही असे की प्रचंड काम करूनही प्रसिद्धीपासून दूर राहिलेले. स्व. राजाभाऊ लवळेकर हे त्यातील एक उदाहरण.

माझी व राजाभाऊंची ओळख १९५३-५४ मध्ये संघशिक्षा वर्गामध्ये झाली. त्यांना पाहिले ते संघ गणवेशामध्ये. फारसे बोलणे झाले नाही, परंतु घट्ट मैत्रीची ती शुभ सुरुवात होती.

आदरणीय प्रांत संघचालक श्री. बाबाराव भिडे यांनी मला सांगितले की, ''तुला पुणे महानगराचे संघचालक केले आहे''. प्रांत संघचालकांची आज्ञा मोडणे शक्य नव्हते त्यामुळे मी पुणे महानगराचा संघचालक झालो खरा परंतु मनात धास्ती होती. त्यावेळी श्री. राजाभाऊ लवळेकर हे पुणे महानगराचे कार्यवाह होते. हा माझ्यासाठी एक मोठा आधार होता. मी शाखा स्तरापर्यंतचा बालशिक्षक म्हणूनच काम केले होते. नगर स्तरावर सुद्धा मला काम करण्याचा अनुभव नव्हता म्हणून मी माझ्या स्वतःशीच निर्णय घेतला की, काही अडचण आली की राजाभाऊंचा सल्ला घ्यायचा. कुणाचा सल्ला आवश्यक असेल तर तो राजाभाऊंचाच घ्यायचा. माझा निर्णय मला खूपच लाभदायक झाला.

या स्मृतिग्रंथातील काही लेखांमधून अशीच भावना व्यक्त झालेली आपल्याला जाणवेल. एखाद्या स्वयंसेवकाचे किंवा शाळेतील विद्यार्थ्याचे हित कशात आहे हे लक्षात घेऊन राजाभाऊंनी त्या त्या प्रसंगी तसे मार्गदर्शन केले, सल्ला दिला व पुढे जाऊन तो कसा उपयुक्त ठरला हे लेखातून वाचताना मलाही राजाभाऊ लवळेकरांशी झालेले अनेक अनौपचारिक संवाद आठवले.

राजाभाऊ संघकामात पूर्ण मुरलेले होते. संघ वर्तुळात त्यांना आदराचे स्थान असे. दुसऱ्याला सांभाळून घ्यावयाचे हा त्यांचा स्वभाव होता. कुठल्याही अडचणीवर मात करावयाची, पण असे असताना कुठलाही कडवटपणा निर्माण होऊ द्यावयाचा नाही हे त्यांचे कौशल्य वाखाणण्यासारखे होते. दुसऱ्याशी आपुलकीने वागणे हा त्यांचा स्थायीभाव होता. कुणालाही निपरेक्षपणे मदत करणे हा त्यांच्या कर्तव्याचा भाग आहे असे ते मानत. थोडक्यात ते परिपूर्ण स्वयंसेवक होते. डॉ. अशोकराव कुकडे यांच्या लेखाच्या शीर्षकातच ही भावना अधिक नेमकेपणाने व्यक्त झाली आहे.

अडचणीत आलेल्या दै. तरुण भारतचे व्यवस्थापन आणि पुढे जाऊन प्रसंगी त्याचे संपादक म्हणूनही काम राजाभाऊंना पहावे लागले. या कालावधीसंबंधी अधिक भाष्य करणारे दोन लेख या पुस्तकात आहेत. तरुण भारत बंद करण्याचा निर्णय झाल्यावर सामान्य कर्मचारी असो किंवा संपादक स्तरावरील व्यक्ती, त्यांचे पुढील भवितव्य सुरळीत आणि सुरक्षित होण्यासाठी राजाभाऊंनी केलेली धडपड थक्क करून टाकते.

१९८५ साली पुणे येथील रमणबागेत द्वितीय वर्षाचा महाराष्ट्र व गुजराथ प्रांताचा संघशिक्षा वर्ग होता. मी त्यावेळी वर्गाचा सर्वाधिकारी होतो. त्या काळात आपल्याच स्वयंसेवकांना काही लागले की ते राजाभाऊंकडे पळत व त्यांना भंडावून सोडत. परंतु डोक्यावर बर्फ असल्याप्रमाणे राजाभाऊ शांतपणे सर्वांचे समाधान करीत असत. शेवटी स्वयंसेवकांना सांगावे लागले की ऊठसुट तुम्ही राजाभाऊंना त्रास द्यावयाचा नाही.

काही काळानंतर राजाभाऊंच्यावर दुसरी संघ कामाची जबाबदारी सोपविण्यात आली. मी मात्र त्यानंतर सुद्धा त्यांच्याशी संघ कार्यक्रमांबद्दल सल्लामसलत चालू ठेवली. मी त्यांना काही कल्पना सुचवत असे व त्यावर ते मला त्यांचे

मत मोकळेपणाने सांगत असत. तसेच ते सुद्धा मला अनेक सूचना करीत असत. त्यावर आमची तपशीलवार चर्चा होत असे. विचार व उपक्रम या बाबतीत आमचे दोघांमध्ये जो मोकळेपणा होता त्याचा उपयोग पुण्याच्या संघकामाकरता निश्चितच झाला.

ज्या ज्या संस्था संघटनांशी राजाभाऊंचा संबंध आला त्या त्या संस्था संघटनांच्या कामाशी राजाभाऊ नकळतपणे कायमचे जोडले जायचे. मग ते त्या त्या संस्था संघटनांच्या पदावर असोत किंवा नसोत. कारण एकच होतं की त्या त्या संस्था-संघटनांमधील कार्यकर्त्यांना राजाभाऊ हे हक्काचे पालक वाटायचे. 'स्व'-रूपवर्धिनी असो किंवा संस्कारभारती, ज्ञानदा असो की डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पदावर नसले तरी राजाभाऊंशी बोलल्यावर मला खूप बरं वाटलं, मनातील किल्मिषं दूर झाली अशी भावना व्यक्त करणारे कार्यकर्ते या पुस्तकातील लेखातूनही भेटतील आणि समाजात वावरतानाही.

जो अनुभव कार्यकर्त्यांचा तोच अनुभव विद्यार्थ्यांचा. डॉ. सतीश आळेकर यांच्यासारख्या राजाभाऊंच्या विद्यार्थ्यांचे लेख वाचताना ही अनुभूती पुन्हा पुन्हा येते. शाळा संपून अनेक वर्ष झाल्यावरही एखादा विद्यार्थी भेटल्यावर राजाभाऊ त्याच्याशी असा आत्मियतापूर्वक संवाद करायचे की वाटावे हे किती नियमित संपर्कात आहेत.

एकदा पद्मावती येथील शाखेमध्ये गेलो होतो त्यावेळी शाखेमध्ये राजाभाऊही आलेले होते. शाखेमध्ये शिशु व बालांची संख्या होती. परंतु तरुणांची उपस्थिती केवळ कार्यवाह, मुख्यशिक्षक व अन्य दोन शिक्षकांपुरती मर्यादित होती. तरुणांचा एक गण शाखेवर का असू नये अशी आमचे दोघांच्यामध्ये चर्चा झाली. अनेक अन्य शाखावरची परिस्थितीसुद्धा लक्षात घेतली, तरुणांचा एक गण शाखेवर खेळत असला पाहिजे अशी एक कल्पना पुढे आली. त्यातून चांगली शाखा ही कल्पना जन्माला येऊन त्याचा योग्य परिणाम पुण्यातील शाखांवर झाला. त्याचाच पुढील परिणाम म्हणजे तरुणांचा गण ताकदवान होण्याच्या दृष्टीने शाखा-शाखांमध्ये कबड्डी स्पर्धा व्हाव्यात अशी कल्पना पुढे आली. ती कल्पना प्रामुख्याने राजाभाऊंचीच होती. त्यामुळे पुण्यातील बहुतेक शाखांच्यामध्ये कबड्डीचे सामने झाले व उत्साहाने भरलेले तरुणांचे गण अनेक शाखांवर खेळत असताना दिसू लागले.

पुण्यामध्ये नामवंत शिक्षणसंस्थांचे जाळे आहे. त्यामधील प्रमुख संस्थांपैकी डेक्कन एज्युकेशन सोसायटी ही नामवंत संस्था आहे. त्या संस्थेतील रमणबाग या शाळेचे मुख्याध्यापक म्हणून राजाभाऊंनी अनेक वर्षेकाम केले. त्या शाळेकरिता त्यांनी अथक परिश्रम केले. सर्व विद्यार्थ्यांमध्ये ते अत्यंत लोकप्रिय शिक्षक होते. त्यांच्या गुणवत्तेमुळे विद्यार्थ्यांना यश मिळत असे. शिक्षक व शिक्षकेतर सेवकांचे सहकार्य मिळून शाळेची त्यांनी मोठी प्रगती केली व रमणबाग शाळेला पुण्याच्या शिक्षण क्षेत्रात उच्च स्थान मिळवून दिले. शिक्षण क्षेत्रातील एक प्रथितयश शिक्षणतज्ज्ञ म्हणून त्यांना मान्यता मिळाली. राजाभाऊंनी पुण्याच्या संघशाखेमध्ये जे काम केले ते लक्षणीय होते. त्यांनी व त्यांच्यासारख्या शेकडो ध्येयनिष्ठ कर्तृत्ववान व संघनिष्ठ कार्यकर्त्यांनी संघाचे काम भक्कम पायावर उभे केले.

राजाभाऊंचे वर्णन मी असे करेन की ते उच्च दर्जाचे शिक्षणतज्ञ व संघशरण स्वयंसेवक होते.

**- ॲड. मुरलीधर पं. तथा दादासाहेब बेंद्रे**

❖❖❖

# ऋणनिर्देश

आदरणीय कै. राजाभाऊ लवळेकर हे अनेक संस्था संघटना, हजारो विद्यार्थी आणि संघकार्यकर्त्यांचे आधार, मार्गदर्शक आणि प्रेरक होते. 'स्व'-रूपवर्धिनी संस्थेचे तर ते संस्थापक सदस्य होते. 'स्व'-रूपवर्धिनी हे अर्थपूर्ण, कामाची आणि उद्देशांची नेमकी दिशा स्पष्ट करणारे नावही त्यांनीच सुचविले होते. अशा कामातून संस्कारित होणारे विद्यार्थी हे केवळ रुळलेल्या वाटेवरून चालणारे न होता त्यांनी आपल्या कर्तृत्वाच्या आणि कौशल्याच्या बळावर नव्या पाऊलवाटा रुळवाव्यात अशी वर्धिनीच्या संस्थापकांची, अर्थातच कै. कृष्णाजी लक्ष्मण पटवर्धन आणि कै. कृष्णाजी गोविंद लवळेकर या दोन्ही 'कृष्णां'ची अपेक्षा होती. शिबिरातून तसेच अन्य उपक्रमांतून त्यांनी अशा अनेक अनवट वाटांकडे जाण्यासाठी आवश्यक कौशल्यांचे प्रशिक्षण देण्याचा प्रयत्न केला होता.

'स्व'-रूपवर्धिनीच्या संस्थापकांनी आखलेल्या या ध्येय-धोरणांशी बांधिलकी मानून विद्यमान काळात आवश्यक अशा विविध कौशल्यांच्या विकासासाठी तसेच उद्योजकता व रोजगार निर्मिती याला पूरक ठरतील असे उपक्रम, अभ्यासक्रम चालवण्याच्या हेतूने काम करण्याचा उद्देश डोळ्यासमोर ठेवून कौशल्यवर्धन फाऊंडेशनचे काम वर्ष २०१६ मध्ये सुरू झाले.

८ जून २०१६ या दिवशी राजाभाऊ लवळेकर सरांचे वृद्धापकाळामुळे दुःखद निधन झाले. त्यावेळी झालेल्या श्रद्धांजली सभेत प्रातिनिधिक रुपात तसेच अनौपचारिक संवादात व्यक्त झालेल्या भावना लक्षात घेऊन कौशल्यवर्धन फाऊंडेशनच्या संचालकांनी लवळेकर कुटुंबियांच्या सहाय्याने कै. राजाभाऊ लवळेकर सरांच्या प्रेरक आठवणींचे संकलन करण्याचे ठरविले आणि पहिल्या स्मृतिदिनाच्या दरम्यान हा ग्रंथ प्रकाशित करायचा अशी कालमर्यादाही ठरविली. लवळेकर कुटुंबीय, कै. राजाभाऊ लवळेकर ज्या संस्थांशी अधिक काळ निगडीत होते अशा संस्थांच्या कार्यकर्त्यांशी संवाद साधून एक संपादक मंडळ स्थापन करण्यात आले. 'आठवणीतील राजाभाऊ (समर्पित जीवनदर्शन)' या पुस्तकाच्या रूपाने हे उद्दिष्ट पूर्णत्वास जात आहे याचा आनंद वाटतो.

अर्थात हे घडण्यासाठी अनेकांचे आधाराचे हात लागले आहेत. कै. राजाभाऊ लवळेकर यांच्या आठवणी पाठविण्यासाठी ज्यांना ज्यांना संपर्क केला त्या सर्वांनी त्यांच्या भावना लेख स्वरुपात वेळेवर लिहून दिल्या. संपादक मंडळाने संकलित केलेल्या लेखांचे मुद्रण करण्यासाठी 'प्रबोध उद्योग'ने सहकार्य केले तर मुद्रित शोधनासाठी सौ. सुषमाताई निसळ आणि सौ. रंजनाताई दाते यांनी मदतीचा हात पुढे केला. मुखपृष्ठाची जबाबदारी 'जिनियस ॲड-मिशन'च्या श्री. सतीश कुलकर्णी यांनी स्वीकारली आणि अतिशय देखणे मुखपृष्ठ साकारले. श्री. सदानंद चांदेकर यांनी राजाभाऊंच्या भावमुद्रा रेखाचित्रातून अप्रतिम साकारल्या. या सर्वांच्या सहकार्याबद्दल प्रकाशक म्हणून आमच्या मनात अत्यंत कृतज्ञतेची भावना आहे. या सर्वांव्यतिरिक्त हे पुस्तक प्रकाशित होण्यासाठी ज्यांचा ज्यांचा हातभार लागला आहे त्यांच्याविषयी आम्ही कृतज्ञ आहोत.

**- संचालक मंडळ**
कौशल्यवर्धन फाऊंडेशन

# अनुक्रमणिका


*** राजाभाऊ लवळेकर – व्यक्तित्व आणि व्यक्तिमत्त्व**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | राजाभाऊ लवळेकर सर | श्री. संजय पुरंदरे | ९ |
| २) | स्मरण एका कर्मयोग्याचे | डॉ. शरद कुंटे | ११ |
| ३) | सर लवळेकर ! | डॉ. सतीश आळेकर | १५ |
| ४) | माझ्या आयुष्यातला देवमाणूस !! | श्री. दिगंबर सावरमाळे | १६ |
| ५) | असंख्यांचा प्रेरणास्त्रोत | डॉ. प्रदीप आगाशे | १७ |
| ६) | पितृतुल्य भाऊ | सौ. शैला ब्रह्मे | १७ |
| ७) | 'गुणाधीश' लवळेकर सर | डॉ. शरद अगरखेडकर | १८ |
| ८) | संस्काराचे विद्यापीठ | श्री. प्रसाद सुर्वे | १९ |
| ९) | तपस्वी गुरु | डॉ. राजा दांडेकर | २० |
| १०) | राजाभाऊ – एक आधारवड | सूर्यकांत पाठक | २२ |
| ११) | भाऊंच्या आठवणी | सौ. शोभना भिडे | २४ |
| १२) | आमचे आदर्श व आदरणीय गुरुवर्य | सौ. सुषमा शरद ओक | २५ |
| १३) | घराचीच नव्हे तर विचारांची, मनाची दारे खुली ठेवणारे लवळेकर सर | सौ. सविता काजरेकर | २६ |
| १४) | शिक्षण क्षेत्रातील वटवृक्ष | श्री. मिलिंद सबनीस | २७ |
| १५) | समन्वयक राजाभाऊ | श्री. ज. गं. फगरे | २८ |
| १६) | कृ. ग. लवळेकर सर : ध्यासपर्व – विद्यार्थी जडणघडणीचे | श्री. रवीन्द्र नागेश कानडे | २९ |
| १७) | भाऊ लवळेकर – एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व | सौ. अंजली शिंदीकर | ३० |
| १८) | स्थितप्रज्ञ राजाभाऊ | श्री. प्रकाश माळी | ३१ |
| १९) | कर्मयोगी | श्री. बद्री मूर्ती | ३२ |
| २०) | समजून घेणारे आणि समजावून सांगणारे लवळेकर सर | सौ. विजया बोकील | ३३ |
| २१) | मतभिन्नतेतही आत्मीयता जपणारे राजाभाऊ ! | डॉ. अरविंद भोमे | ३५ |
| २२) | आदर्श व्यक्तिमत्त्व | श्री. नंदकुमार कानडे | ३६ |
| २३) | लवळेकर सर... एक श्रद्धास्थान | श्री. अजय पराड | ३७ |
| २४) | श्री. राजाभाऊ लवळेकर | श्री. सदानंद भागवत | ३८ |

*** कुटुंबियांचे आधारवड**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मनोगत | श्रीमती कुसुम कृष्णाजी लवळेकर | ४० |
| २) | नावाप्रमाणेच मदतीला धावून येणारा आमचा 'भाऊ' | सौ. उषा रा. असनीकर | ४२ |
| ३) | आजच्या युगातील कृष्णावतार... | सौ. भाग्यश्री भागवत | ४४ |
| ४) | आम्ही लवळेकर अर्थात (आम्ही सहा भावंडे) | श्रीमती अपर्णा कानेटकर | ४८ |
| ५) | मार्तंड जे तापहीन | डॉ. अनघा लवळेकर | ४९ |

| | | | |
|---|---|---|---|
| ६) | 'ज्ञानियाचा राजा' | सौ. प्रज्ञा जोशी-भागवत | ५३ |
| ७) | सामान्यातील असामान्य तपस्वी | श्री. रवींद्र बळवंत हेजीब | ५५ |
| ८) | आठवणींचे हिंदोळे... | श्री. दत्ता जोशी | ५९ |
| ९) | धडपडीला प्रोत्साहन देणारे भाऊ | श्री. विवेक जोशी | ६० |
| १०) | आमचा भाऊ | श्रीमती अनुराधा कुलकर्णी | ६१ |
| ११) | त्यागमय जीवनाचा आदर्श | श्री. राजेंद्र कानेटकर | ६६ |
| १२) | विविध भूमिका वठविणारे भाऊ | श्री. प्रसाद लवळेकर | ६८ |
| १३) | कर्मयोगी भाऊ | कै. अच्युत पारखी | ७१ |
| १४) | त्वमेव माता, पिता त्वमेव । | कै. प्रकाश पुराणिक | ७३ |
| १५) | एक आदर्श सेवाव्रती | श्री. नीलकंठ जोशी | ७५ |
| १६) | विचारांना योग्य दिशा देणारे माझे आजोबा | श्री. आलोक भागवत | ७९ |
| १७) | शिक्षकेतरांचे आधारवड | श्री. विनायक कुलकर्णी | ८३ |
| १८) | माणसं जोडणारा माणूस | श्री. सदानंद चांदेकर | ८४ |

*** कार्यकर्ता, कुशल संघटक, मार्गदर्शक आणि पालक भूमिकेतील राजाभाऊ**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | प. पू. डॉ. हेडगेवारांना अभिप्रेत असलेला आदर्श स्वयंसेवक | डॉ. अशोक कुकडे | ८६ |
| २) | मातृहृदयी वडील | श्री. सुहास हिरेमठ | ९० |
| ३) | ऐसी कळवळ्याची जाती... | (कै.) किशाभाऊ पटवर्धन | ९२ |
| ४) | संस्कार भारतीची स्थापना ! राजाभाऊंचे योगदान | श्री. सुहास कुलकर्णी | ९४ |
| ५) | ज्योतीने तेजाची आरती | श्री. श्रीधर देव | ९६ |
| ६) | सार्वजनिक संस्थांचा आधारवड | प्रा. संजय तांबट | ९८ |
| ७) | आनंद स्वर्गीय सुखाचा !! | श्री. शरद तथा बापूराव घाटपांडे | १०० |
| ८) | वाचेचा रसाळ – मनाचा मवाळ | प्राचार्य श्री. अनिरुद्ध देशपांडे | १०२ |
| ९) | स्वयंसेवकांचे पालक | श्री. विनायक डंबीर | १०४ |
| १०) | तव स्मरण सतत स्फूर्तीदायी आम्हा घडो !... | डॉ. गो. बं. देगलूरकर | १०६ |
| ११) | राजाभाऊ आणि तरुण भारत | श्री. मनोहर कुलकर्णी | १०७ |
| १२) | संघसमर्पित राजाभाऊ – माझे एक पालक ! | श्री. आनंद हर्डीकर | ११० |
| १३) | चतुरस्र राजाभाऊ | श्री. रवींद्र देव | ११४ |
| १४) | एक संन्यस्त पारिजात | श्री. जयंत कवठेकर | ११८ |
| १५) | एक चालतं-बोलतं प्रशिक्षण केंद्र ! | सौ. स्वाती रवींद्र देव | १२० |
| १६) | ज्ञानाचे सदावर्त – राजाभाऊ लवळेकर | प्रा. श्री. श्याम जोशी | १२१ |
| १७) | माझ्या स्मरणातील कै. राजाभाऊ लवळेकर | श्री. राज चौधरी | १२४ |
| १८) | संस्थावत्सल राजाभाऊ | श्री. सतीश कुलकर्णी | १२६ |
| १९) | माझ्या गुरुंमधील शिक्षणक्षेत्रातील एक गुरु | श्री. मोहन अळवणी | १२९ |
| २०) | श्री. राजाभाऊ लवळेकर – सामान्यातून असामान्यत्व | श्रीमती अर्चना नलावडे | १३० |
| २१) | आठवणी दाटतात... | कै. हरिभाऊ कुलकर्णी | १३१ |
| २२) | एक कुशल कार्यकर्ता आणि आदर्श शिक्षक | श्री. अनिल माणकीकर | १३३ |


❖❖❖



# राजाभाऊ लवळेकर
# व्यक्तित्व आणि व्यक्तिमत्त्व

# राजाभाऊ लवळेकर सर

**– संजय पुरंदरे**

‘तास कुणाचा?’

‘लवळेकर सरांचा!’

‘चला दप्तर आवरा.’

सरांचा तास असला की दप्तरे आवरून ठेवायची.

कारण ह्या तासाला पुस्तके लागायची नाहीत की लेखन–साहित्य लागायचं नाही. फक्त मंत्रमुग्ध होऊन ऐकायचं!

आज जवळजवळ ४० वर्षे उलटून गेली तरी सरांचे तास जसेच्या तसे लक्षात आहेत. मनावर कोरलेले!

रमणबागेतले चाळीसारखे जुने वर्ग! ८वी क चा वर्ग!

सरांचा हिंदीचा तास. सर वर्गात प्रवेशले की न सांगता येण्यासारखं चैतन्य पसरायचं. आजही आठवतो सरांचा हिंदी धडा : ‘ब्रह्मराक्षसकी आत्मकथा’. ही कथा दोन आठवडे चालली होती. एक मुलगा ज्ञानाच्या शोधात जुनाट वाड्यात प्रवेशतो. समज असा की वाडा भुताचा. निर्मनुष्य. सात मजली भयाण वाडा. मुलगा पहिल्या मजल्यावर पोहोचतो. कोणीही तिथे नव्हतं. दुसऱ्या, तिसऱ्या, चवथ्या... सातव्या !

दमलेला थकलेला पण गुरूची ओढ असलेला मुलगा पायरीवरच झोपतो. जाग येते तो समोर एक वृद्ध, दाढी वाढलेला माणूस. मुलाची चौकशी करतो. ‘इथे कशासाठी आलास?’

‘शिक्षणासाठी!’

शिकण्याची परवानगी मिळते पण एका अटीवर! कोणताही प्रश्न विचारायचा नाही. १२ वर्षे इथंच राहायचं!

मुलगा मान्य करतो. ज्ञान ग्रहण सुरू होतं.

१२ वर्षे कशी जातात कळतही नाही. गुरुजी म्हणतात, ‘आज तुझा शिक्षणाचा शेवटचा दिवस’. दोघेही एकत्र भोजन करतात. गुरू सांगतात, ‘मी ब्रह्मराक्षस आहे’, मुलगा घाबरतो. ‘माझं ज्ञान संपूर्णपणे तुला दिले. आज मी मुक्त झालो.’ गुरू अंतर्धान पावतात.

तब्बल दोन आठवडे रंगलेली गोष्ट पूर्ण झाली. सरांनी पुस्तक टेबलावर ठेवलं. मनाचा ठाव घेणाऱ्या सरांच्या नजरेने सर्व वर्गाकडे बघितलं. सर बोलू लागले –

**‘मुलांनो, तो विद्यार्थी त्या भयाण सात मजली वाड्यावर पोहोचला. ज्ञानसंपन्न झाला. पण हे सात मजले कोणते लक्षात ठेवा. ज्ञानसंपन्न व्हायचे असेल तर जिज्ञासा हा पहिला मजला. उत्सुकता हा दुसरा मजला. चिकाटी हा तिसरा मजला. निर्भयता हा चवथा मजला. सातत्य हा पाचवा मजला. स्वाध्याय हा सहावा मजला आणि गुरूवर नितांत श्रद्धा हा सातवा मजला.**

**ज्याला ज्ञानाच्या क्षेत्रात उत्तुंग कामगिरी करायची असेल त्यांनी हे सात मजले चढले पाहिजेत! आणि हे ज्ञान दुसऱ्याला दिल्याशिवाय मुक्ती नाही!’**

**सरांचं हे निवेदन म्हणजे शिक्षण क्षेत्रातले सात अध्याय आहेत. आजही हे ४० वर्षांनंतरही लक्षात आहेत.**

मुलांची मनं घडवणं हे सरांचं आवडीचं, श्रद्धेचे कार्य! हेच कार्य त्यांनी अखंडपणे केलं.

विषय कोणताही असो, न पुसणारी अक्षरं मुलांच्या मनावर कोरणं हा सरांचा हातखंडा विषय.

सरांनी एक वर्ष गणित विषय शिकविला.

त्या काळात समीकरण सोडवणे म्हणजे पक्षांतर करणे ही क्रिया!

**'मुलीचं लग्न झाल्यावर सासरी गेल्यावर नाव बदलतं ना तसं पक्षांतर केल्यावर धन ऋण होतं, गुणाकाराचा भागाकार होतो.'**

**गणितालासुद्धा जीवनाच्या गणितात आणणारे लवळेकर अनेकांच्या मनात पक्के बसले आहेत.**

एकदा एका वर्गातल्या मुलांनी आईवरून मोठ्यांदा अपशब्द वापरला. सरांच्या कानावर ते शब्द गेले. सर वर्गात आले. वर्गात पूर्ण शांतता पसरली. आता काय होणार? सरांनी फळ्यावर विद्यार्थ्यांनी उच्चारलेल्या सर्व शिव्या लिहून काढल्या. शरमेनं सर्वांच्या माना खाली होत्या. **शब्दांवर प्रभुत्व असणारे सर मुलांना नि:शब्दही करत होते.**

त्या काळात सहली नेण्यावर आजच्यासारखी बंधने नव्हती. पालकांचा शाळांवर पूर्ण विश्वास होता. सरांनी विद्यार्थ्यांना किल्ल्यांवर नेले, सायकल प्रवास घडवला, स्मशानातसुद्धा सहल काढली.

जीवनाचं वास्तव दर्शन सर मुलांना घडवत होते.

सहज पण हृदयाचा ठाव घेणारं त्यांचं बोलणं आजही लक्षात आहे. सरांच्या उतारवयात रमणबागेची कॉलेजची नवीन वास्तू झाली.

सरांना दिसणं कमी झालं होतं. पण सरांना ती नवीन वास्तू बघायची होती. मी सरांना सांगितलं, 'सर दोन जिने चढावे लागतील. पण प्रयोगशाळा तुम्ही कशा बघणार ?'

सर तात्काळ म्हणाले, 'बघण्यासाठी काय फक्त डोळे लागतात का ?

मला घेऊन चल. रमणबागेचं वैभव मला बघायचं आहे.' अनेकांना जगण्याची दृष्टी देणारे लवळेकर सर अनेकांसाठी प्रेरणा देणारेही होते. कोणतीही वेगळी, चांगली गोष्ट केली तर अनेक विद्यार्थी त्यांना भेटायला जायचे. नुसत्या आवाजावरून ते ओळखत.

'ये संजय !'

'सूर्यकांत, कसा आहेस ?'

'दिगंबर, मुलगा काय करतो ?'

'रवि, तेजोनिधी अंक अजून मला मिळाला नाही.'

अनेकांची नावे लक्षात. घरच्यांची आपुलकीने चौकशी करीत. हे सर्व स्मरणशक्तीचं लक्षण नव्हतं. हे होतं खरं प्रेम, आपुलकी, जिव्हाळा !

नुकताच एका शैक्षणिक जबाबदारीमधून मुलांसाठी वेगळा प्रयोग यशस्वीरीत्या केला. खूप गाजावाजा झाला. खूप कौतुक झालं. पण एक गोष्ट नक्की जाणवली हे कार्य सांगण्यासाठी राजाभाऊ आज नाहीत.

अनेकांचं कौतुक करणारे ते हात नाहीत.
अनेकांना दृष्टी देणारे ते तेजस्वी करारी डोळे नाहीत.
अनेकांची आपुलकीने चौकशी करणारे ते मन नाही.
पायांवर डोकं ठेवावं ते चरण नाहीत.
राजाभाऊ नावाचे ऋषी आता नाहीत.
आज आणि उद्या असणार आहेत,
त्यांनी मांडलेले विचार
आणि घडवलेले विद्यार्थी !

– मो. : ९७६७८९२४४०

❖❖❖

# स्मरण एका कर्मयोग्याचे

**– शरद कुंटे**

राजाभाऊ लवळेकरांशी माझा परिचय आणीबाणीपूर्वी म्हणजे ७३–७४ च्या दरम्यान झाला. मी अरण्येश्वर सायं शाखेचा कार्यवाह होतो. आमच्या शाखेच्या वार्षिकोत्सवाला राजाभाऊंना बोलावले होते. त्यांचे बोलणे सर्व कार्यकर्त्यांना आवडले. मुख्यतः कार्यक्रमाला बाल–स्वयंसेवकांचे जे पालक आले होते, त्यांना फार आवडले. आपल्या उत्सवाला संख्या कशी वाढवायची याच्याच कायम शोधात असलेल्या मला ही एक संधी वाटली. लगेचच येणाऱ्या मकरसंक्रांतीच्या उत्सवासही मी राजाभाऊंचेच नाव वक्ता म्हणून निश्चित केले आणि शाखेच्या परिसरात तसा प्रचारही केला. त्यावेळी मला याचे आश्चर्य वाटले की राजाभाऊंचे नाव मला नवीन असले तरी आमच्या ४–५ सोसायटीतल्या बहुतेक घरांत ते आधीपासूनच माहीत होते. बरेचसे लोक पुरापूर्वी शनिवार, नारायण पेठ परिसरात रहात होते व राजाभाऊ खूप जुने कार्यकर्तेअसल्याने ते अनेकांना माहीत होते. स्वाभाविकच आमच्या उत्सवाला चांगल्या संख्येने नागरिक उपस्थित राहिले. मकरसंक्रांतीपुरते राजाभाऊंचे विवेचन थांबले नाही, तर हिंदू परंपरेतील अनेक सण–उत्सवांत ज्या प्रथा पद्धती आहेत, त्यामागचे विज्ञान काय आहे हे राजाभाऊ रोचक पद्धतीने मांडत होते. तो विषय इतका रंगला की सव्वातास राजाभाऊंचे भाषण झाले तरी कोणी हलला नाही. मी शास्त्र शाखेचाच विद्यार्थी असल्याने ही मांडणी मला फार भावली. **आपल्या प्रथा–परंपरा म्हणजे अंधश्रद्धा किंवा उगाच सुरू झालेल्या रुढी नाहीत. हिंदू संस्कृतीही पूर्णपणे विज्ञानाधारित आहे हे माझ्या मनात ठसले राजाभाऊंमुळेच.**

**त्यावेळी सहकारनगर भागात वेगवेगळ्या शाखांवर काम करणाऱ्या आम्हा तरुण कार्यकर्त्यांची २ दैवते होती. आबासाहेब गरवारे कॉलेजातील प्राध्यापक वासुदेवराव देशपांडे व रमणबागेतील शिक्षक राजाभाऊ लवळेकर.** आम्ही सारेजण कॉलेज विद्यार्थीच होतो. ते वय कर्तृत्वपूजनाचे असते. **या दोघांच्याकडे वेळ असेल तेव्हा त्यांच्याकडे जाणे व गप्पा मारत बसणे यात मोठा आनंद असे.** पहिल्या संघबंदीच्या काळात आपल्या कार्यकर्त्यांनी शासनाच्या व समाजाच्या रोषावर कशी मात केली, सत्याग्रह करताना तरुण किती चढाओढीने सहभागी होत, **बंदी काळानंतर श्री. गुरुजींचा प्रवास व गोरक्षा–अभियानातील उत्साहवर्धक किस्से ते अशा काही पद्धतीने सांगत की त्या संघर्षकाळात आपण नव्हतो याचे वैषम्य वाटे.** बाबाराव भिड्यांच्या सूचनेवरून पुण्यातील शेकडो स्वयंसेवक तालुक्याच्या गावी शाखा भरवायला जात असत. त्यासंबंधी कितीतरी आठवणी राजाभाऊ सांगत. ते स्वतः आळंदीजवळच्या एका गावात शाखा–विस्तारासाठी जात असत. त्या गावावर रात्री दरोडा पडला आणि सदंड स्वयंसेवकांनी हिमतीने प्रतिकार करून त्या दरोडेखोरांना कसे पिटाळून लावले याची आठवणही त्यांनी सांगितलेली आठवते.

संघर्षगाथेच्या कथा ऐकणाऱ्या आम्हालाच एका मोठ्या संघर्षपर्वाला सामोरे जावे लागेल हे कधी स्वप्नातही आले नव्हते. इंदिराजींनी आणीबाणी पुकारली आणि पाठोपाठ बंदी आली संघशाखांवर. तो काळ घबराट निर्माण करणाराच होता. कधी कोणाला अटक होईल हे सांगणे कठीण असे. **अशा वेळी आपण काय करावे याची चर्चा करायला पुन्हा आम्हाला हक्काची ठिकाणे हीच दोन होती. वासुदेवराव व राजाभाऊ. संघाचा प्रदीर्घ अनुभव असल्याने कोणत्या परिस्थितीत काय करावे याचे त्या दोघांनाही अचूक निदान असे. कोणाची सूचना यायची अथवा बैठकीतून निरोप मिळायचीही त्यांना गरज नसे.** त्यांनी आम्हाला सांगितले की ध्वज–प्रार्थना बंद ठेवा. शाखेच्या आज्ञा देऊ नका. पण एकत्र खेळायला काही हरकत नाही. त्यानिमित्त तुमचा तरुणांचा संच टिकून राहील. त्यावर्षी गणपती उत्सवातही पुढाकार घेऊन अधिकाधिक नागरिकांशी संपर्क ठेवायची त्यांनी सूचना दिली. त्यावेळी आम्ही सुरू केलेले गणेशोत्सव मंडळ अजून चांगल्या प्रकारे कार्यरत आहे.

आणीबाणीच्या काळात वर्तमानपत्रे, राजकीय पक्ष, कामगार संघटना, न्यायालये देखील पक्षाघात झाल्याप्रमाणे निष्क्रिय झाली होती. पण संघाची भूमिगत-यंत्रणा अद्ययावत होती. संघाच्या गुप्त बैठका नियमितपणे होत होत्या. त्यात देशभरात आणीबाणीने काय-काय उत्पात माजवले आहेत यासंबंधी माहिती मिळत होती. पहिले ३-४ महिने संघाने आपली यंत्रणा ठीकठाक करण्यात घालवले आणि समाजाचे मनोधैर्य वाढवण्यासाठी पत्रके मोठ्या संख्येने छापून घेऊन घराघरात वितरण करण्याचा उपक्रम सुरू केला. अनेक जुन्या कार्यकर्त्यांनी घाबरून ही जबाबदारी घ्यायचे नाकारले. **पण राजाभाऊ हे 'बोले तैसा चाले' अशा बाण्याचे होते. पद्मावती विभागातील पत्रक-वितरणाची जबाबदारी राजाभाऊंनीच उचलली होती.** पुणे-शहर कार्यकर्त्यांची साप्ताहिक बैठक दर आठवड्याला वेगळ्या ठिकाणी होत असे. बैठकीची गुप्तता पाळून सर्व नियोजन करणे ही मोठीच जबाबदारी होती. त्यातली एक बैठक पद्मावती भागात आपल्या एका कार्यकर्त्याच्या घरी आयोजित करण्याची जबाबदारी राजाभाऊंनी पार पाडली होती.

त्या नंतरचा टप्पा होता सत्याग्रहांचा. सत्याग्रहासाठी युवकांना तयार करणे हे मोठे आव्हान होते. माझ्याकडे सहकारनगर, पर्वती भागामध्ये सत्याग्रहांच्या आयोजनाची जबाबदारी होती. मी एकच काम करायचो. १०-१२ तरुणांचा एक गट जमवायचा व त्यांच्यासमोर चर्चा करण्यासाठी एकतर वासुदेवराव देशपांडे किंवा राजाभाऊंना घेऊन यायचो. **या दोघांमध्येही तरुणांना पेटवण्याची विलक्षण ताकद होती. या दोघांच्या प्रयत्नातून शंभराहून अधिक सत्याग्रही तयार झाले. त्यात महिलांचीही एक तुकडी होती.** आणीबाणीचा धसका सर्वांनाच होता. त्यात **पहिल्या संघबंदीत अनेकांच्या नोकऱ्या गेल्या होत्या व अनेक घरांची वाताहत झाली होती. याच्या आठवणी जुन्या कार्यकर्त्यांच्या मनात होत्याच. बाबा महाजनींकडे झालेल्या बैठकीत बाबांनीच हा प्रश्न उपस्थित केला. त्यावेळचा राजाभाऊंचा करारी चेहरा व तेवढेच करारी उत्तर मी विसरूच शकत नाही. 'देशावर संकट आले असताना माझे कसे होईल हा विचार करणेच चूक आहे. 'पतत्वेष कायो नमस्ते नमस्ते' असे रोज म्हणणाऱ्यांनी तरी असा विचार करू नये. मला माहीत आहे, सत्याग्रह केल्याने माझी नोकरी जाणार आहे. तरी मी सत्याग्रह करणार आहे. इतर कोणतेही काम नंतर मिळाले नाही तर बुधवारातील मजूर अड्ड्यावर उभा राहून मी मजुरी करेन व माझे घर सांभाळीन. पण देशावर संकट आले आहे, ते दूर करण्यासाठी संघाने आवाहन केले आहे अशा परिस्थितीत पळून जाण्याचा विचारही मी करणार नाही.'** राजाभाऊंच्या वक्तव्याने सारे वातावरण बदलले. हा प्रश्न विचारणाऱ्या बाबा महाजनींनीही सत्याग्रह केला. सत्याग्रह संघटित करणाऱ्या नेत्यांना वेचून मिसा लावण्याचा सपाटा पोलिसांनी लावला होता. हा **धोका दिसत असूनही राजाभाऊंनी सत्याग्रहाचे नेतृत्व केले.** त्यांनी कार्यकर्त्यांत जी हिंमत निर्माण केली, त्यामुळेच सत्याग्रह-पर्व यशस्वी झाले. या घटनेचा मी साक्षी आहे.

येरवडा कारागृहातही योगायोगाने मी व राजाभाऊ एकाच कोठडीत होतो. कोणी त्यांना सांगायला आले नाही. **कोठडीतल्या साऱ्या राजबंद्यांचे ते आपोआप नेते बनले.** आम्ही मुले रोज भरपूर व्यायाम करायचो. त्यामुळे जाड, न भाजलेल्या पोळ्या आणि बेचव भाजीपण चवीने खाल्ली जायची. इतकेच काय, राजाभाऊंच्या वयाचे जे प्रौढ आमच्याबरोबर असायचे त्यांच्या शेजारी जेवायला बसून त्यांना न लागणाऱ्या पोळ्याही आम्हीच संपवायचो. कोठडीतले जीवन म्हणजे सरकारी खर्चाने चाललेले शिबिरच होते जणू. दिवसभर सारे कार्यक्रम शिस्तीने करायचो आम्ही. वादावादीचे प्रसंग दोनच वेळा यायचे. पहाटे लवकर उठून राजाभाऊ, तळेगावचे कुंभार, विनय हर्डीकर आणि आम्ही ५-७ तरुण काही स्तोत्रे, अभंग वगैरे म्हणायचो. त्यामुळे ज्यांची झोपमोड व्हायची ते जरा चिडचिड करायचे. दुपारी राजाभाऊ सर्व विद्यार्थ्यांना अभ्यासाला बसवायचे. आमच्यामधीलच काही जण शिक्षकाचे काम करायचो. जेलमधून बाहेर आल्यावर विद्यार्थ्यांना लगेच परीक्षा द्यायच्या आहेत आणि सत्याग्रह केल्यामुळे कुणी नापास होऊ नये ही त्यांची तळमळ होती. त्यावेळी दंगा करून विद्यार्थ्यांच्या अभ्यासात व्यत्यय आणणाऱ्यांना राजाभाऊ रागवायचे. तरुणांच्या बरोबर सगळ्या कार्यक्रमांत भाग घ्यायचे. अगदी कोकणी बाबूंसारखे थाळ्या वाजवत खुंटाभोवती फिरून

आम्ही गाणी म्हणायचो. त्यातही ते सहभागी व्हायचे. मिसाबंधूंतला कोणी तरी ज्येष्ठ कार्यकर्ता दुपारच्या बौद्धिक वर्गासाठी यायचा. तो न आला तर राजाभाऊ असायचेच. **बौद्धिक वर्ग झाला की स्वातंत्र्यवीर सावरकरांनी रचलेला 'की घेतले व्रत न हे आम्ही अंधतेने' हा श्लोक राजाभाऊ सांगायचे. तो म्हणतानादेखील त्यांच्या चेहऱ्यावर एक आत्मविश्वास असायचा.** इतर मित्रांबरोबर भावनेच्या भरात सत्याग्रह करून आलेले बरेच तरुण होते. शिक्षा झाल्यावर जेलमध्ये इतके दिवस रहायचे या कल्पनेने अनेक तरुण हळवे होत. **पण राजाभाऊ वडिलांच्या प्रेमाने त्यांच्या पाठीवर हात फिरवून धीर देत, हिंमत वाढवत असत.**

विनय हर्डीकर, रवी देसाई यासारखे अनेकजण सत्याग्रह करून आले होते, ते काही संघाचे स्वयंसेवक नव्हते. किंबहुना त्यांना संघाची विचारधारा, कार्यपद्धती मान्यच नव्हती. पण अशा मंडळींशी राजाभाऊंचा नित्य संवाद चाले. **न चिडता, आपला मुद्दा न सोडता राजाभाऊ ज्या ठामपणाने आपला विषय मांडत असत त्यामुळे हे तरुणही चांगले प्रभावित झाले होते.** आणीबाणी ही हुकूमशाहीच आहे, यातून बाहेर पडण्याचा निवडणूक हा मार्गच नाही असे मांडणारे अनेक जण होते. बाँब, पिस्तुले घेऊनच बाहेर पडल्यावर आपल्याला संघर्ष करावा लागेल असा अतिरेकी विचार मांडणारे काहीजण होतेच. पण इंग्रजांच्या काळातही क्रांतीकारकांच्या कामाला कशा मर्यादा होत्या, जनजागरण घडवणारे उपक्रम व संघटन मोठे करत नेण्याची दूरदृष्टी ही त्यावेळी देखील कशी तर्कसंगत होती हे पटवून देत या हुकुमशाहीपासूनही आपण समाजाला जनजागरण व संघटित बळाच्या आधारावरच बाहेर काढू हे ते गळी उतरवत असत. अनेक संघविरोधक सुद्धा या चर्चांनी प्रभावित झालेले मी पाहिले आहेत. जेलमधून बाहेर आल्यावर यातले अनेकजण वेगवेगळ्या दिशांना विखुरले, पुन्हा संघापासून लांब गेले. **जर ते नंतरही राजाभाऊंच्या संपर्कात राहिले असते तर त्यांच्यातूनही अनेक धडाडीचे कार्यकर्ते राजाभाऊंनी निर्माण करून दाखवले असते हे मी खात्रीने सांगतो.**

आणीबाणीनंतर संघशाखा पुन्हा सुरू झाल्या. राजाभाऊ महानगराचे सहकार्यवाह व नंतर कार्यवाह झाले. माझ्याकडे पूर्व भागातल्या एका नगराचे काम होते. ते सांभाळून पुणे शहराच्या बालविभागाचीही जबाबदारी होतीच. त्यामुळे राजाभाऊंची भेट दर आठवड्याला बैठकीच्या निमित्ताने तरी व्हायचीच. राजाभाऊंचा व्यापक संपर्क संघकामाच्या वाढीला तर उपयुक्त होता, पण संघसंबंधित इतर संस्थाही या संपर्काचा लाभ मिळवण्याच्या प्रयत्नात असत. मला आठवते, किशाभाऊ पटवर्धनांनी मंगळवार पेठेतील वस्ती-विभागात शैक्षणिक सेवाकार्य सुरू केले होते. त्यास पहिल्या दिवसापासून राजाभाऊंचे पाठबळ होते. त्या कार्याला 'स्व'-रूपवर्धिनी हे नाव पण राजाभाऊंनीच सुचवले होते. किशाभाऊंनी संघ-पदाधिकाऱ्यांकडे मागणी केली होती की राजाभाऊंना त्यांच्यासोबत 'स्व'-रूपवर्धिनीच्या कामातच जोडून द्या. संघाने ते नाकारले, तेव्हा किशाभाऊ एका अनौपचारिक गप्पांच्या कार्यक्रमात म्हणाले होते, 'संघालाही दुसरा राजा लवळेकर तयार करता आला नाही.'

त्या काळात इतरही काही निमित्तांनी माझे राजाभाऊंकडे जाणे-येणे वाढले. राजाभाऊ त्यावेळी त्यांच्या विवेक गृहरचना-संस्थेचे अध्यक्ष होते. त्या सोसायटीचे ऑडिट करून घेण्याच्या कामी बऱ्याच काही अडचणी होत्या. मुख्य म्हणजे त्या कामात त्यांचा वेळ फार जायला लागला. सहज गप्पांत हा विषय निघाला तेव्हा मी सुचवले की माझा आतेभाऊ चंदू चोळकर हा कोऑपरेटिव्ह डिपार्टमेंटमध्ये ऑडिटर आहे. तो तुम्हाला मदत करू शकतो. त्याप्रमाणे मी त्या दोघांची गाठ घालून दिली. चंदूने ऑडिटच्या बऱ्याचशा अडचणी सोडवून दिल्या. त्या निमित्ताने मी अनेकदा घरी जातच होतो. राजाभाऊंचा मुलगा प्रसाद माझ्याकडे क्लासला यायचा. राजाभाऊंच्या पत्नी टेलिफोन भवनमध्ये नोकरीला होत्या, तिथेच माझी धाकटी बहीणही नोकरीला लागली होती. नगरातल्या बालांचा एक प्रशिक्षण वर्ग मी पद्मावतीला घेतला होता, त्या वर्गाच्या चहा करणे वगैरे व्यवस्थांसाठी राजाभाऊंची मोठी मुलगी भाग्यश्री हिलाही मी कामाला लावले होते. भाग्यश्री फर्ग्युसन कॉलेजमध्ये शिकत होती. मीही १ वर्ष तिथे रसायनशास्त्राचा प्राध्यापक म्हणून

काम केले. योगायोगाने भाग्यश्री माझ्याच प्रॅक्टिकल बॅचमध्ये होती. अशा एक ना अनेक कारणांनी माझे जाणेयेणे राजाभाऊंकडे चालूच राहिले आणि त्यांच्या बरोबरच्या मनमोकळ्या गप्पांचा आनंद मला घेण्याची संधी मिळाली.

नंतर राजाभाऊ प्रांत बौद्धिक-प्रमुख झाले. काही काळ मीही महानगर बौद्धिक-प्रमुख होतो. त्यावेळी राजाभाऊ रमणबाग शाळेचे मुख्याध्यापक होते. शाळेच्या क्वार्टरमध्येच रहात होते. तिथेही माझे बरेचवेळा जाणेयेणे झाले. विद्यार्थी परिषदेच्या दोन पूर्णवेळ कार्यकर्त्या राजाभाऊंच्या घरीच रहात होत्या. अनेकदा त्यांच्यावर घर सोडून राजाभाऊ प्रवासाला गेलेले मी पाहिलेत. ज्या व्यक्तीला आपण घरातलेच एक मानलेले आहे त्यावर विश्वास ठेवलाच पाहिजे असे ते म्हणायचे. राजाभाऊ एकता मासिकाचे विश्वस्त व्यवस्थापक होते, त्यावेळी संघाने पाठवलेल्या गद्रे नावाच्या व्यवस्थापकांसाठी त्यांनी आपल्या घराचा वरचा मजला बांधून दिला होता. **एकंदरीत संघाचा विषय आला की हातचे काही राखून ठेवायचे नाही हा त्यांचा स्वभावच होता.** एकतामध्ये असताना मी अनेकदा एकता कार्यालयातही त्यांना भेटायला गेलो आहे. माझ्या काही कविता त्यांनी आग्रहपूर्वक मागून घेतल्या व छापल्यादेखील.

हळूहळू आमची कार्यक्षेत्रे वेगवेगळी होत गेली. माझ्याकडे विश्व हिंदू परिषदेचे काम होते. राजाभाऊ संस्कारभारती, तरुणभारत, शिक्षण प्रसारक मंडळी अशा विविध संस्थांमध्ये कार्यरत होते. **जिथे संघाला गरज असेल तिथे राजाभाऊंना पाठवले जायचे आणि राजाभाऊ पूर्ण ताकद लावून, जीव ओतून ते काम करत असत.** महानगराच्या किंवा प्रांताच्या समन्वय समितीच्या बैठकीत राजाभाऊंची भेट व्हायची. त्या-त्या क्षेत्रात काय समस्या आहेत व त्यातून मार्ग काढण्यासाठी आपण काय करतो आहोत याचे अभ्यासपूर्ण विवेचन राजाभाऊ करायचे. राजाभाऊंच्या पाठीमागे जेव्हा आम्ही त्या-त्या संस्थांची चर्चा करायचो तेव्हा बहुतेकांच्या बोलण्यात एक विषय यायचा. राजाभाऊ ज्या संस्थेत असतील त्या ठिकाणी फायर ब्रिगेडचे काम करायचे. **दोन कार्यकर्त्यांमधील भांडणांत मध्यस्थी करावी ती राजाभाऊंनीच. दोघांनाही न दुखावता, मात्र ज्याची-त्याची चूक योग्य प्रकारे दाखवून देऊन ते अशा प्रकारे विवाद सोडवीत की ते दोघेही नंतर कार्यप्रवृत्त होत.**

शरीर थकले, आता फार धावपळ करणे शक्य होईना, तेव्हा निसर्गक्रमानुसार राजाभाऊ हळूहळू सक्रिय कामांतून हळूहळू दूर होत गेले. पण त्यांची बुद्धी, स्मरणशक्ती आणि संघासंबंधीची श्रद्धा सदैव जागृत होती. जेव्हा-केव्हा त्यांच्याबरोबर पूर्वी काम केलेले कार्यकर्ते भेटत तेव्हा जुन्या आठवणींचा धबधबा मुक्तपणे प्रवाहित होई. पण या चर्चांत कधीही विषाद, निराशा अथवा असूयेचा स्पर्श नसायचा. सर्वच कामांत त्यांना यश मिळाले असे नव्हते. सर्वच कार्यकर्त्यांशी त्यांचे सूर जुळले होते असे नाही. विसंवादाचे अनेक प्रसंग येऊनही गेले होते. पण या गप्पांमधून कधीही कटुता डोकावलेली कोणी ऐकली नाही. कारण **राजाभाऊ स्वत:साठी कधी जगलेच नाही. ते खऱ्या अर्थाने कर्मयोगी होते. ते संघासाठीच जगले, संघ सांगेल ते काम करत राहिले व आपले काम संपल्यावर कोणताही विवाद निर्माण न करता शांतपणे बाजूला झाले.** आपल्या आयुष्याची सतार त्यांनी आपल्या नेत्यांकडे सोपवली होती. त्यातून केव्हा व कोणते स्वर काढावेत हा अधिकारही त्यांनी त्या नेत्यांकडेच सोपवला होता. कोणत्याही पुरस्काराची, सन्मानाची अपेक्षा त्यांनी आयुष्यात कधीच बाळगली नाही.

अशा कर्मयोग्याचे स्मरण सदैव प्रेरणादायी असते. कार्यकर्ता म्हणून **माझ्या प्रारंभिक जडणघडणीत ज्यांचे मोठे योगदान होते, त्यातले राजाभाऊ हे एक सन्मान्य स्थान होते.** असे वाटते की काम करताना आपल्या हातून कधी चुकारपणा झालाच तर अजूनही राजाभाऊ पाठीवर थाप टाकून त्यांच्या प्रेमळ व आश्वासक स्वरात थोडे दटावतील. त्यामुळे त्या कल्पनेनेही थबकलेली पाऊले पुन्हा वेगाने चालू लागतील.

- मो. : ९४२३०११८९९

❖❖❖

# सर लवळेकर !

**– सतीश आळेकर**

जन्मापासून संस्कार होत असतातच. ते सगळ्यांच्याच वाट्याला येत असतात. यामधे जगावेगळं काही नाही. तरी शाळेचे संस्कार हे विशेष असतात, कारण ते निर्मम असतात. त्यांच्या आठवणीत निरागसता असते. त्यात तरतम भाव नसतो. तुझं–माझं नसतं. शाळा नेहमी 'आमची' असते, पण परीक्षेत निबंध लिहिताना ती 'माझी शाळा' होते. तसं पाहिलं तर आपण बालवाडीपासून अनेक शिक्षकांना सामोरं गेलेलो असतो. त्यांच्या काही कडू–गोड आठवणी बरोबर असतात. त्यांच्या आणि आपल्या फजितीचे, लकबींचे किस्से असतात. पण काही शिक्षक मात्र शाळा सोडल्यापासून सतत आपल्या मागून नकळत अदृश्य बाउन्सर होवून चालत येतायत की काय या पद्धतीचे असतात. आमची शाळा सोडून आता अर्धं शतक होऊन गेलं. तरी अजून मागून कुणी येतंय की काय ही जाणीव मधूनमधून होतेच. लवळेकर सर म्हटलं की आम्हाला हे असं वाटत राहतं.

शाळेत असताना ते विद्यार्थीप्रिय शिक्षक तर होतेच. शाळेच्या अनेक कार्यक्रमांत त्यांचा पुढाकार असे. उत्तम गोष्टी ते सांगत असत. शाळेच्या व्हरांड्यात भिंतींवर असणाऱ्या मोठ्या फलकांवर ते शाळा सुटल्यावर रकानेच्या रकाने लिहीत. त्यात रामायण, महाभारत, ज्ञानेश्वरी, तुकारामांसंदर्भात भरगच्च पण रसाळ मजकूर असे. वास्तविक त्यांनी शाळा सुटल्यावर घरी जाणं अपेक्षित होतं. ते तेव्हा रहायचे आमच्या शनिवार पेठेतल्या आळेकर वाड्यामागच्या हसबनीस बखळीत. कोणी त्यांना सांगितलं होतं की अशा भरगच्च मजकूरांनी फलक भरून काढा म्हणून ? **शाळेतल्या त्यांच्या अनेक प्रतिमा माझ्या पक्क्या स्मरणात आहेत. म्हणजे वर्गात एकाग्रतेनं शिकवणारे सर, शाखेच्या घोषवृंदात वादन करणारे सर, शाळेच्या गणपती–विसर्जन मिरवणुकीत विद्यार्थ्यांच्याकडून घोषणा म्हणवून घेणारे सर!** एकदा वर्गातील काही विद्यार्थी घाण शिव्या देत होते म्हणून त्यांनी वर्गात आल्यावर फळ्यावर, त्या लिंगवाचक शिव्या लिहिल्या आणि **विद्यार्थ्यांना त्या मोठ्यानं म्हणायला सांगितल्या, तेव्हा वर्गात पसरलेल्या भयाण शांततेची गंमत बघणारे सर ! पण मला सगळ्यात भावलेली प्रतिमा म्हणजे संध्याकाळी शाळा सुटून गेल्यावर, शाळेच्या मैदानातील पश्चिमेच्या बाजूला असलेल्या उंच बुचाच्या झाडांच्या सावल्या मैदानात पसरलेल्या. संध्याकाळच्या तिरप्या उन्हात शाळेच्या पूर्ण भिंतीवर असलेल्या मोठ्या फलकावर सर स्वत:च्या तंद्रीत हातातील कागदावरचा मजकूर विविध रंगाच्या खडूंनी एकाग्रतेनी लिहितायत. त्यांच्या सावळ्या चेहऱ्यावर, दोन्ही हातांवर मजकूर पुसलेल्या खडूंचे रंग लागल्यामुळे सरांचं रंगीत पोर्टेटसारखं दिसणारं कलत्या उन्हातलं ध्यान!**

**त्यामागचं द्रष्टेपण आतून जाणवायला मात्र बराच वेळ गेला. त्यासाठी वय वाढून नाटक क्षेत्रात जरा रेंगाळावं लागलं.** पुढे फर्ग्युसन कॉलेज मध्ये असताना जेव्हा सत्यजित रे यांचा 'पथेर पांचाली' हा चित्रपट बघण्याची संधी मिळाली त्यावेळी आमची ट्यूब पेटली आणि जाणवलं की या चित्रपटाची गोष्ट आपल्याला सरांनी शाळेत आठवीत असताना सांगितली होती आणि मग लिंक लागली की **सत्यकथा या मासिकाची ओळख सुद्धा सरांनीच करून दिली होती. वक्तृत्व स्पर्धेत टिळकांवर बोलण्यासाठी समग्र टिळकवाङ्मय खंडांमधे संदर्भ कसे पहायचे ते ग्रंथालयात नेऊन समजावले होते. प्रत्येक प्रचलित तत्त्वाच्या पायाशी एक समांतर तत्त्व असते आणि कधी ते प्रचलित तत्त्वाविरुद्ध देखील असू शकते याची जाणीव सरांनीच नकळत संस्कारित केली होती,** अशी जाणीव होऊ लागली. का त्यांना पथेर पांचाली गोष्ट वर्गात सांगावीशी वाटली असेल? त्या आधी सायकलवरून पुण्याच्या कँपमध्ये जावून १९५७ मध्ये रविवारी सकाळी हा बंगाली चित्रपट त्यांना का बघावासा वाटला

असेल ? सत्यजित रे यांचा हा पहिलाच चित्रपट. कोणत्या कारणांनी ही ऊर्मी सरांच्यात येत असेल ? सरांच्यावरच्या संस्कारांमुळे ? शिक्षकी पेशामुळे ? माहीत नाही ! हे सगळं त्या वेळी होऊन गेलं हे खरं. **समजा, त्यांनी हे तेव्हा सगळं केलं नसतं तर आज आम्ही जे आहोत ते तसेच असतो की नसतो ? नक्कीच तसे नसतो, हे उत्तर मात्र मला माहिती आहे.**

आज सावित्रीबाई फुले पुणे-विद्यापीठाच्या ललित-कला केंद्राचं नाव सगळीकडे आहे. आमचे अनेक विद्यार्थी करमणुकीच्या क्षेत्रात आज आघाडीवर आहेत. मी तिथे प्राध्यापक म्हणून रुजू झाल्यावर १९९८-९९ दरम्यान सर अचानक दिल्लीच्या काही पाहुण्यांना घेऊन आले. विभागात कोणतीही विशेष सुविधा नसताना संगीत, नृत्य आणि नाटकाचे व्यावसायिक अभ्यासक्रम कसे चालवतो हे पाहुण्यांना दाखवले. माझ्याशी बराच वेळ बोलून हा विभाग पुढे कसा चालवणार याची बारीक चौकशी करून ते गेले. ते माझ्याशी असे बोलत होते की जणू आम्ही दररोज भेटतोय. आमची शाळा सुटली ६५ मधे आणि त्यानंतर सर प्रत्यक्ष भेटत होते ९८-९९ मधे. पण त्यांना आमच्या क्षेत्राची फक्त चोख माहितीच होती असं नव्हे तर त्यावर त्यांचा अभ्यासही होता. सरांची नंतर भेट झाली ती २०१५ च्या जानेवारीत, आमच्या ६५ मॅट्रीकच्या बॅचला ५० वर्षे झाली, त्या निमित्ताने. त्यांचं खूप वय झालेलं. दिसण्याची, ऐकण्याची त्यांना खूप अडचण जाणवत होती. पण आवाज मात्र खणखणीत होता. तेव्हाच आत जाणवलं की कदाचित ही शेवटचीच भेट. दुर्दैवानी झालंही तसंच.

नवीन मराठी शाळेतले कारकून पदावरचे सर माध्यमिक शाळेत शिक्षक झाले, मुख्याधापक झाले, अनेक संस्थांचे पाठीराखे झाले. त्यांचे विद्यार्थी आणि अन्य शिष्यवर्ग आज जगभर आहेत. **आजची परिस्थिती बघून वाटतं की आपल्या तत्त्वांशी एकनिष्ठ राहून आयुष्यभर काम करणाऱ्या व्रतस्थ शिक्षकांच्या परंपरेची व्याख्या ज्यांच्यावरून केली गेली असावी त्या परंपरेचे निष्ठावान वारकरी होते सर राजाभाऊ लवळेकर !**

**तळटीप :** सरांच्या संदर्भात मी यापूर्वीही लिहिलं आहे. ते माझ्या 'गगनिका' या नुकत्याच प्रकाशित पुस्तकात आले आहे. त्यातील 'कबुतरखाना' आणि 'फर्ग्युसनचे दिवस' ही दोन प्रकरणे जरूर वाचावीत.

संदर्भ: गगनिका, ले. सतीश आळेकर, प्रकाशक: राजहंस प्रकाशन, पुणे ४११०३०.

- मो. ९८२२०६९२८४
satish.alekar@gmail.com

❖❖❖

## माझ्या आयुष्यातला देवमाणूस !!

**- दिगंबर सावरमाळे**

माझ्यासारख्या खेड्यातून आलेल्या माणसाला मार्गदर्शन देणारा माणूस ! शहरात कसं वागायचं, मुलांना कसं घडवायचं, घर कसं चालवायचं अशा बऱ्याच प्रश्नांनी सैरभैर झालेल्या माझ्यासारख्या सामान्य माणसाच्या आयुष्याला कलाटणी देणारे मार्गदर्शक म्हणजे लवळेकर सर.

शिपाई पदावरती काम करून न थांबता, पुढे शिका असे फक्त म्हणून ते थांबले नाहीत तर त्यासाठी लागणारी मदतही त्यांनी केली. यामुळे आज प्रयोगशाळा-परिचर म्हणून मी काम करीत आहे.

तसेच आयुष्यामध्ये अजून काहीतरी विशेष गोष्ट असली पाहिजे. म्हणून सरांनी इलेक्ट्रिक कोर्ससाठी मला पाठवले. त्याचा फायदा आजपर्यंत होत आहे. ज्या माणसाला ट्यूब हा जादूचा प्रकार वाटायचा तो माणूस आता ट्यूब दुरुस्त करू शकतो, याचे पूर्ण श्रेय या देवमाणसाला जाते.

स्व. कै. श्री. लवळेकर सर म्हणजे माझ्या आयुष्यात मला भेटलेला देवमाणूसच होय.

## असंख्यांचा प्रेरणास्रोत !

**– डॉ. प्रदीप आगाशे**

कृ. गो. लवळेकर, हे 'राजाभाऊ' या नावानं साऱ्या विद्यार्थीवर्गात परिचित होते. ते फक्त विद्यार्थीवर्गाचेच नव्हे तर शिक्षक, पालक, यांचे मार्गदर्शक होते. शिक्षकांना त्यांनी जसं अपवादात्मक परिस्थितीत संघर्ष करायला शिकवलं. (१९७८ चा राज्यव्यापी संप) त्यापेक्षा कितीतरी पटीनं मुलांच्यासाठी झोकून द्यायला शिकवलं, तेही स्वतःच्या वर्तनातून. शिक्षकाच्या कर्मयोगाचं आदर्श दर्शन म्हणजे राजाभाऊ. **त्यांचं मनोगत हे फक्त मनोगत नव्हतं, तर ते सततसाठीचं चिंतन असे. त्यांच्या भावपूर्ण मार्गदर्शनानंतर अनेक शिक्षक मरगळ झटकून नव्या उमेदीनं कामाला लागलेले मी पाहिले आहेत. त्यांच्या कामात यत्किंचितही देखावा नव्हता. होती ती फक्त विद्यार्थ्यांच्या विषयीची असाधारण तळमळ.**

वास्तविक सर साहित्य विभागाचे. परंतु त्यांचे शास्त्र, गणिताबद्दलचे विचार भल्याभल्यांना चक्राऊन टाकत. **धर्मातील शास्त्र आणि शास्त्रातील धर्म सांगताना त्यांच्या सखोल अभ्यासाचे जसे दर्शन होई, तसेच भारतामध्ये याचा किती बारकाईने अभ्यास केला गेला हे ऐकताना त्यांच्यातील देशभक्तीचं दर्शन घडे.** त्यांच्या या मार्गदर्शनाचा मला शास्त्र आणि पर्यावरण या विषयातील कीर्तन सादर करताना खूपच उपयोग झाला. निसर्गोपचार आणि चुंबक चिकित्सा यातील डॉक्टर होताना मला याचा खूप उपयोग झाला.

राजाभाऊंना चिपळूणकर साहेबांच्याप्रमाणे दुसऱ्यांचं कौतुक करून त्याला प्रेरणा देण्याची भारी हौस. मला माझ्या अडचणीच्या काळात ज्यांनी भक्कम आधार दिला त्याची यादी राजाभाऊंच्या नावाशिवाय पुरी होणार नाही. त्यांच्या स्मृती कायमच असंख्यांना प्रेरणा देत राहतील. – मो. : ९०७५०८९८८२

---

## पितृतुल्य 'भाऊ'

**– सौ. शैला ब्रह्मे**

मी रमणबागेतून निवृत्त होऊन आता १२ वर्षे झालीत. माझ्या शिक्षकी जीवनावर 'भाऊं'च्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव खूपच आहे. ते माझे आदर्श आहेत. प्रत्येक विषयातील त्यांचे सखोल ज्ञान, त्यांचा अनुभव आम्हा शिक्षकांना नेहमीच प्रेरणादायी असे.

माझ्या लहानपणापासून 'भाऊं'ना मी पाहते आहे. कारण शनिवार पेठेतील हसबनीस बखळीत माझे माहेर होते आणि ते पण जवळच्या वाड्यात राहात होते. आमच्या परिसरातील सर्वच मुला-मुलींना त्यांची आदरयुक्त भीती वाटायची. शाळेत नेहमीच ते विद्यार्थ्यांच्या गराड्यात असत. आजपर्यंत त्यांचे हजारो विद्यार्थी उच्चपदस्थ, उद्योजक आहेत.

एच्. ए. पिंपरी येथे ते मुख्याध्यापक होते, तेव्हा आम्ही दहा-बारा जण लोकलने पिंपरीला जायचो. अधिकारी आम्हाला ते म्हणून कधीच वाटायचे नाहीत. अगदी मिळून-मिसळून वागत. गप्पातून त्यांचे ज्ञानामृत आम्हाला सतत मिळायचे. काही काळानंतर ते रमणबागेत मुख्याध्यापक म्हणून आले. मला पुन्हा एकदा त्यांच्या छत्रसावलीत राहण्याची संधी मिळाली. त्यांचे तडफदार व्यक्तिमत्त्व सर्वांनाच आदर्श होते. शिपायांपासून-विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षकांच्या सुख-दुःखाशी ते इतके समरस होत की प्रत्येकाला ते आधारभूत वाटत. मलासुद्धा अनेक अडचणीतून त्यांनी बाहेर काढले आहे आणि आनंदाच्या प्रसंगी कौतुक केले, म्हणून ते माझे वडीलच होते. रमणबागेतल्या बंगल्यात ते राहात होते, तेव्हा कायमच सर्वांना ते आपले घरच वाटायचे. कारण वहिनींचे आदरातिथ्य. सौ. श्री (भाग्यश्री) आणि सौ. संजू (संजीवनी) माझ्या बहिणी आहेत. सौ. अनघा तर त्यांच्या यशाचा कळसच म्हणावा लागेल. समाजसेवेची सफल वेल प्रसादनी गगनावर चढविली आहे.

# 'गुणाधीश' लवळेकर सर

**– शरद अगरखेडकर**

उंचेपुरे सावळे व्यक्तिमत्त्व. करारी तितकीच प्रेमळ दृष्टी व चेहऱ्यावर गोडसे स्मित असे माझ्या गुरूवर्यांचे रूप अजूनही डोळ्यांपुढून हलत नाही. कधीतरी त्यांचा फोन अथवा निरोप येईल अशी क्षीण आशा वाटते.

राजाभाऊ उर्फ कृ. गो. लवळेकर सरांशी माझा सहवास १९६२ सालापासूनचा. मी पाचवी ब ह्या वर्गात प्रवेश घेतला. त्या सुमारास ते पर्यवेक्षक होते. सरांची खूप भीती वाटायची.

करारी, शिस्तप्रिय शिक्षक अशी त्यांची ख्याती होती. हिंदी, मराठी ह्या विषयांवर त्यांचे प्रभुत्व होते. कसबा पेठेतून आलेल्या माझ्यासारख्या गरीब विद्यार्थ्याला सरांचा परीसस्पर्श लाभला व माझा कायापालट झाला. **अष्टावक्रा काळ्या कुब्जेवरील एक कविता शिकविताना सरांनी, कृष्णस्पर्शाने कसे तिचे रूपांतर होते व त्यातील आध्यात्मिक गाभा उलगडून दाखविला व मी स्तिमित झालो. कवितेचा आशय इतक्या तन्मयतेने शिकविणारा दुसरा शिक्षक मला दिसला नाही. नाखून क्यूँ बढते हैं – ह्या लघुनिबंधावर भाष्य करताना, लेखकाच्या डाव्या विचारसरणीवर, जबतक सब चीजें सबको नहीं मिलतीं, तब तक चोरी होती रहेंगी – ह्याचं समर्थन पाहून सरांना सात्त्विक संतापाने थरथरताना आमच्या वर्गाने पाहिले आहे. इतकं तादात्म्य लेऊन शिकविणे फक्त सरांनाच जमायचे.**

शाळेत व शाळेबाहेर सरांचे आपल्या विद्यार्थ्यांवर बारीक लक्ष असायचे. एकदा मेहुणपुऱ्यातून जाताना पायाने बॉल लाथाडत, आरडाओरडा करीत चाललो होतो. एवढ्यात माझ्या खांद्यावर एक हात क्षणभर दाबला गेला, हलक्याच स्वरात – 'शरद, रस्त्याने असे वागू नये', एवढेच बोलून सर पुढे गेले. त्या क्षणापासून आजतागायत माझ्याकडून असं वावगं वागणं झालं नाही व पुढेही होणार नाही.

११ वीत चांगले मार्क मिळवून फर्ग्युसनमध्ये गेलो व पुढे मेडिकलला गेलो. सरांची कृपादृष्टी सदोदित माझ्यावर असायची.

सुदैवाने सर शाळेचे मुख्याध्यापक झाले व मी शनिवारात टांग्याच्या गल्लीत दवाखाना सुरू केला व आमचा संपर्क वाढत गेला. इतका की मी सरांना प्रसाद इतकाच प्रिय झालो. श्री व संजू तर माझ्या सख्या बहिणींपेक्षा जवळच्या होत्या.

सरांच्या आजारपणांचे दोन प्रसंग माझ्या हृदयावर कोरून ठेवले आहेत. मोतीबागेत एका श्रद्धांजली सभेत बोलताना सर अचानक कोसळले. हृदयविकाराचा तीव्र झटका आला होता त्यांना. मोतीबागेतील संघ कार्यकर्त्यांनी त्यांना उचलून फर्ग्युसन रस्त्यावरील इस्पितळात नेले. श्रीचा मला फोन आला व मी आणि सौ. शलाका–माझी पत्नी– पटकन धावलो. त्यांची एकूण अवस्था – रक्तदाब ६०. ओठ निळे पडलेले. सलाईन लावले होते, परंतु कार्डिओग्राम काढलेला नव्हता. माझ्या काळजात चर्रर्र झाले. मी तेथील डॉक्टरांना विचारून कार्डिऑलॉजिस्ट अनिरुद्ध चांदोरकर यांस बोलावले व त्यांच्या सल्ल्याने एन.एम.वाडिया इन्स्टिट्यूट ऑफ कार्डिऑलॉजी इथे हलवायचे ठरले. त्याकाळी ९२ साली–ॲम्ब्युलन्स म्हणजे शववाहिकांसारख्याच होत्या. त्या अंधाऱ्या डुगडुगणाऱ्या ॲम्बुलन्समधून जाताना मी सरांच्या नाडीवर हात ठेवूनच होतो. फर्ग्युसन रस्ता, जुना बाजार, आर.टी.ओ., राजा बहादूर मिल असा अर्धा तासाचा प्रवास मला युगायुगाचा वाटला. रस्त्यावरील खड्ड्यातून गाडी गेली की माझ्या हातून सरांची नाडी सुटायची व भाऊंना हाक मारायचो, 'भाऊ कसे आहात ?' भाऊ उत्तर द्यायचे, 'मी ठीक आहे.' हार्ट ॲटॅक आल्यापासून तीन तासात विशिष्ट उपचार होणे जरुरी होते. सरांना Antero Septal infarction झालं असल्याने, हृदयाचे ठोके अनियमित होते. एन.एम. वाडियात पोहोचल्यावर अनिरुद्धने ताबा घेतला. कधी हृदयाचे ठोके जलद व्हायचे, कधी मंद (Sicle Sinus). हे सर्व प्रकार पहाटे तीनपर्यंत चालले व त्यानंतर सरांचे हृदयाचे ठोके नियमित झाले व आम्ही सुटकेचे निश्वास टाकले. तोपर्यंत मी, घनश्याम, श्री, शलाका, सरांची पत्नी–सौ. कुसुमताई–सगळेच उपाशी होतो. आम्ही सर्वजण कॉफी व पॅस्ट्री

खायला ब्लू डायमंडच्या कॉफी हाऊसमध्ये गेलो व सगळ्यांच्या चेहऱ्यावरचा ताण पळाला व हसू फुटले होते. त्यानंतर त्यांची बायपास डॉ. युजिन फर्नांडिस यांनी केली व सरांना बोनस आयुष्य मिळाले. मधुमेह सरांचे शरीर पोखरतच होता. त्यांच्या दृष्टी व श्रुतीवर परिणाम झाला होता. संवाद करणे अवघड होत गेले.

दोन-तीन वर्षांपूर्वी सरांना एकदा छातीत कफ झाल्याने संजीवनमध्ये अनघाने ॲडमिट केले. त्यावेळेस माझा वर्गमित्र दीपक आगाशे हा संजीवनचा प्रशासक होता. सरांची होणारी हेळसांड पाहून मी रुद्रावतार धारण केला व आगाशेच्या करवी सर्व उपचारात सुसूत्रता आणली. कुकडे काकांनीही आशा सोडली होती पण मी मात्र लढायचं ठरवलं होते. कारण माझं दैवत रुग्णशय्येवर निपचित पडून होतं. सुदैवाने ह्याही आजारातून सर घरी गेले व मला हुश्श झाले.

शेवटच्या वेळी मात्र बहुधा सरांनी ठरवले असावं, मला हुलकावणी दिली व सर गेल्याचीच बातमी श्री. प्रसाद बावडेकरांनी दिली.

विद्यार्थ्यांवर माया करणारे, संस्कार करणारे, आदरयुक्त भीती परंतु तरीही विद्यार्थ्यांशी जवळीक असा अनेक गुणांचा हा गुणाधीश आज आपल्यात नाही. परंतु त्यांच्या आशीर्वचनांची शिदोरी आजही आपल्यात आहे. त्यांच्याबद्दल हे स्मरण मला पुनःप्रत्ययाचा आनंद देऊन गेले. सरांना माझी ही सुमनांजली.

– मो. : ९८२२०३०१२२

❖❖❖

---

## संस्काराचे विद्यापीठ

**– प्रसाद सुर्वे**

तो दिवस अजूनही माझ्या स्मरणात आहे. मोतीबाग नगराचे संघचालक डॉ. श. र. अंबिके यांच्या निधनामुळे मोतीबाग कार्यालयात सरांचे श्रद्धांजलीपर भाषण चालू होते आणि त्यावेळेस सरांना एकदम डॉक्टरांच्या आठवणीने गहिवरून आले आणि त्यावेळेस मी सरांच्या समोरच अग्रेसर म्हणून बसलेलो असताना सरांना चक्कर आली. सरांना सावरून तात्काळ दीनदयाळ हॉस्पिटल येथे हलविले व लवकरात लवकर सरांवर पुढील उपचार सुरू झाले. १५ दिवसांनी सरांना भेटण्यासाठी मी व मोतीबागनगराचे कार्यवाह श्री. विजयराव कानडे आम्ही गेलो असता विजयरावांनी सरांना सांगितले की सर, 'तुम्हाला त्रास सुरू झाला त्यावेळेस प्रसादने प्रसंगावधान राखून धावपळ करून तुम्हाला दवाखान्यात नेले', त्यावेळी सरांनी जे वाक्य उच्चारले ते अजूनही माझ्या स्मरणात आहे. 'आमचा प्रसाद माझ्याजवळ नव्हता परंतु आपला प्रसाद जवळ होता'. सरांच्या ह्या वाक्याने मला आपलेसे करून घेतले.

पावसाच्या थेंबानं धरती सुगंधी होते, सुखावते. तसेच चांगल्या माणसांच्या सान्निध्यात जीवन आनंदी होते आणि नाते घट्ट होते. म्हणूनच चांगली माणसे भेटणे म्हणजे भाग्यच आहे. सर १९८४ ते १९८६ ह्या काळात रमणबागेत असताना मला वेळोवेळी मार्गदर्शन मिळाले. सरांचा शाळेत अनेक विद्यार्थ्यांशी जवळून संपर्क होता.

विद्यार्थी व शिक्षकप्रिय, सच्चे स्वयंसेवक, प्रेमळ कार्यक्षम प्रशासक, आदर्श पिता, उत्तम वक्ते, संघटक व भाषांवर प्रभुत्व अशा विविध भूमिकांमधून सरांना अनुभवत गेलो.

सरांना इतके आजार असतानासुद्धा कायम मन प्रसन्न, हसतमुख चेहरा ह्याचे कारण शोधले तर विद्यार्थी व कार्यकर्ते हेच सरांचे औषध होते असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. आजकालच्या धकाधकीच्या जीवनात सगळीकडे अविश्वासाचे वातावरण असून सरांनी मनावर केलेले सत्य आणि प्रामाणिकपणा ह्याचे संस्कार फार मोलाचे असून, सरांनी दाखवलेल्या मार्गाने आयुष्य क्रमण करणे हीच खरी लवळेकर सरांना श्रद्धांजली आहे.

❖❖❖

# तपस्वी गुरू

**– डॉ. राजा दांडेकर**

**वेदांमध्ये शिक्षकांना उद्देशून तीन विशेष शब्द वापरले आहेत. पहिला 'शचिष्ठ' म्हणजे सर्व शक्तिमान. जगात सर्व शक्तिमान कोण असेल तर तो शिक्षक. शिक्षक कधी साधारण असूच शकत नाही.** तो साम्राज्य उभी करू शकतो आणि साम्राज्य उलथवून टाकू शकतो. एवढे सामर्थ्य जगात केवळ शिक्षकांकडेच असू शकते.

**दुसरा शब्द आहे 'गातुवित्'. पाथ फाइंडर, मार्गदर्शक. आपल्या शिष्यांना सार्थ जीवन जगण्यासाठी सुयोग्य मार्गदर्शन करणारा केवळ गुरूच असतो.**

**आणि तिसरा शब्द आहे 'आचार्य'. स्वत:च्या आचरणातून शिष्यांना आपले आचरण कसे असावे, हे शिकविणारा आचार्य.**

**आदरणीय राजाभाऊंच्या व्यक्तित्वात मला ह्या तीनही शब्दांचे भावार्थ अनुभवाला येत असत.**

खरंतर राजाभाऊ हे माझे दूरस्थ शिक्षक. ते रमणबाग शाळेत अध्यापन करीत. त्यांचा एक जवळचा बुद्धिमान शिष्य डॉ. अरविंद भोमे हा माझा आत्मसखा. १९७४ पर्यंत अरविंदची माझी ओळखही नव्हती.

मल्हारी सायम् ही माझी दैनंदिन सायम् शाखा होती. राजाभाऊ तिचे पालक होते. तिथून आमच्या ओळखीची सुरुवात. माझे सुहृद (कै.) प्रकाश जोशी एक दिवस मला राजाभाऊंकडे घेऊन गेले. त्यांनी माझी ओळख राजाभाऊंना करून दिली आणि सांगितले की 'हा कोथरूडला गांधीभवनच्या मागे दोन किलोमीटरवर एका झोपडीत विपन्नावस्थेत राहत होता. मी त्याला माझ्या घरी गेले तीन महिने राहायला घेऊन आलोय. तो टिळक आयुर्वेद महाविद्यालयात आयुर्वेदाचे शिक्षण घेत आहे. त्याच्या निवासाची कुठेतरी सोय लावणे आवश्यक आहे. तो तसा निष्कांचन आहे. माझ्या घरीही कौटुंबिक अडचणी आहेत.'

सगळं ऐकून घेतल्यावर क्षणात राजाभाऊ म्हणाले, 'चला माझ्याबरोबर' आणि आम्ही रमणबागेतून त्यांचेबरोबर चालू लागलो. पाच मिनिटात आम्ही ५१६ ब, नारायण पेठ, दातेवाडा इथे वाड्यात पोहोचलो. वाड्यात मागील बाजूला एका खोलीच्या दारासमोर आलो. दार उघडेच होते. आत एक तरुण विद्यार्थी बसला होता. त्याला उद्देशून राजाभाऊ म्हणाले 'अरविंद, हा राजा दांडेकर, आयुर्वेदाचा विद्यार्थी आहे. आजपासून हा तुझ्याबरोबर राहील.' ओळख करून देऊन राजाभाऊ निघून गेले. आम्ही प्रकाश जोशींकडे जाऊन आमचे चंबूगबाळे आवरून अरविंदबरोबर खोलीत राहायला आलो.

महिना १२ रु. ५० पैसे भाडे आम्ही दोघे मिळून भरायचो. कोपऱ्यातल्या मोरीत नळ आला की थंड पाण्याने आंघोळ करून कॉलेजला जायचे. मग फुटकळ नोकरीधंदा करून रात्री खोलीवर परतायचे. सायंशाखा रोज व्हायची. रात्री एक वाजेपर्यंत दोघेही अभ्यास करायचो. मग पेरूगेटजवळ ॐ नर्मदेश्वर भुवन या चहाच्या दुकानात जाऊन २० पैशाचा एक चहा दोघांनी घ्यायचा, पुन्हा येऊन अभ्यासाला बसायचे.

**राजाभाऊ मधून-मधून केव्हाही अचानक येऊन आमची फार आस्थेने चौकशी करीत असत, अगदी वडीलकीच्या नात्यांनी. आम्हाला त्यांचा खूप आधार वाटे.**

**प्रथम, द्वितीय संघशिक्षा वर्गात आणि अनेकानेक संघाच्या बैठकांमध्ये राजाभाऊंचे विचारधन आमच्यापुढे बौद्धिक वर्गाच्या रूपात उलगडले जायचे. ती आमच्या भावी जीवनातील जगण्यासाठीची शिदोरी होती.** पुढील जीवनात जरी अनेक गुरू केले तरी **राजाभाऊंचे विचारधन, त्यांच्याबरोबरचा सत्संग हे आमचे बाळकडू होते.**

१९७५ साली आणीबाणी आली आणि संघकार्यालयातील काहीजण याच खोलीत आश्रयाला आले होते. खोली

भरून गेली होती. तसे खोलीत राहून पाच युवक शिक्षण घेऊन संघ-प्रचारक म्हणूनही बाहेर पडले होते. तेही राजाभाऊंच्या आश्रयामुळेच. याच काळात भूमिगत राहून विद्यार्थी परिषदेचे काम करणे, मग प्रत्यक्ष सत्याग्रह करून जेलमध्ये जाणे. बाहेर आल्यावर गावाला घरी येऊन आईची सेवा, आईला देवाज्ञा. पुन्हा पुण्यात, त्याच मठीत, पुन्हा शिक्षण सुरू. आणीबाणी उठली. काही काळ दापोडीजवळ फुगेवाडीला महारोग्यांच्या वस्तीत संघाचा विस्तारक म्हणून काम करण्याची संधी मिळाली. समाजाचं जवळून दर्शन. खूप काही शिकायला मिळालं. आणीबाणी पर्वाने जीवनात खूप काही शिकलो. जगण्याला नवी दिशा मिळाली. काही दिवस १९७७ च्या निवडणुकांमध्ये राजकीय क्षेत्रातही कामाचा अनुभव घेतला. पण मन तिथे रमले नाही आणि निर्णय झाला. यापुढे राजकीय क्षेत्रात काम करायचे नाही. शहर सोडून खेड्यात जाऊन जिथं आणि समाजाची जी गरज असेल त्याप्रमाणे सामाजिक कामामध्ये जीवन व्यतीत करायचं. तसं सर्व आदरणीयांना सांगून टाकलं.

अरविंद एम.डी. झाला. मी बी.ए.एम.एस. झालो. तो पुण्यातच स्थाईक झाला आणि मी ठरल्याप्रमाणे कोकणात येऊन लोकमान्य टिळकांच्या जन्मगावी चिखलगावला ओसाड कातळ माळावर माझी व्हिजिट बॅग घेऊन तळ ठोकला तो आजपर्यंत. १९८२ ते २०१७ आजपर्यंत पूर्ण वेळ सामाजिक कार्यकर्ता म्हणून कार्यरत आहे.

मे १९७९ साली संघाचा तृतीय वर्ष शिक्षित स्वयंसेवक झालो. १९८० साली पुढील २५ वर्षांसाठी सामाजिक क्षेत्रातील कार्यासाठी दिशा ठरवून आखणी केली. अनेकानेक ज्येष्ठ आणि श्रेष्ठांजवळ भेटी घेऊन मनातलं बोललो. त्यांना वंदन करून त्यांचे आशीर्वाद घेतले. याच काळात विवाह ठरला. प्राध्यापक प्रतिमा केसकर आजची सौ. रेणू दांडेकर तिला सोबत घेऊन माझ्या गुरूंचे दोघांनी आशीर्वाद घेतले आणि कामाला लागलो. संघ-प्रचारक म्हणून जाणार नाही पण प्रचारकीय वृत्तीने पुढील किमान २५ वर्षे सामाजिक कार्याला वाहून घेईन असा निश्चय करून १९८२ ला पुणे सोडून चिखलगावला दोघेही लोकसाधनेला आलो. त्याला आता तीन तपं झाली. **या सगळ्या अद्‌भुत वाटचालीत माझ्या जडणघडणीत मोलाचा वाटा होता तो आचार्य राजाभाऊ लवळेकर या तपस्वी गुरूचा. आज हे लिहिताना त्यांचं स्मरण ठेवून त्यांना विनम्र आदरांजली अर्पण करतो.**

– मो. ९४२२४३१२७५
rajadandekar@yahoo.com

❖❖❖

मी तसा रमणबाग शाळेत उशीरा म्हणजे दहावीत प्रवेश घेतला. फलटणसारख्या ग्रामीण भागातून आल्यामुळे या शाळेचे वातावरण मला नवीन होते आणि तसा कोणत्या शिक्षकाचा 'आवडता विद्यार्थी' वगैरे नव्हतो. बोर्डाच्या परीक्षेत गुणवत्ता यादीत मी चमकलो आणि ही गोष्ट रमणबाग शाळेसाठी मोठ्या पराक्रमाची होती.

अर्थात या काळात उत्तम शिकवणारे शिक्षक रमणबाग शाळेमध्ये होते. त्यांच्यातील लक्षात राहिलेलं व्यक्तिमत्त्व म्हणजे राजाभाऊ लवळेकर सर. वर्णानी काळेसावळे असलेल्या लवळेकर सरांच्या डोळ्यात एक वेगळीच चमक असायची. त्यांचे हस्ताक्षरही देखणे होते. शुभ्र धोतर आणि झब्बा घालून येणारे सर कायम डोळ्यासमोर आहेत. ते आम्हाला हिंदी विषय शिकवायचे. लवळेकर सरांमुळेच मला हिंदी भाषेची गोडी लागली आणि आज जेव्हा-जेव्हा हिंदीतून संवाद करण्याची वेळ येते त्यावेळेला लवळेकर सरांनी त्यावेळी ज्या तन्मयतेने आम्हाला शिकविले त्याचे मोल लक्षात येते. सरांच्या स्मृतीला विनम्र अभिवादन.

**– प्रमोद चौधरी**
कार्यकारी अध्यक्ष, प्राज इंडस्ट्रीज लिमिटेड

## राजाभाऊ – एक आधारवड

**– सूर्यकांत पाठक**

‘संस्कारांचं चालतं बोलतं विद्यापीठ’, ‘ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व’ अशी शेकडो विशेषणे ज्यांच्या कार्यवर्णनासाठी अपुरी आहेत, **ज्यांनी केवळ एकाच क्षेत्रात नाही, तर ‘कमी तिथे आम्ही’ अशा भावनेने प्रत्येक क्षेत्रात पायापासून ते अगदी कळसापर्यंत भक्कम उभारणीचे आणि उत्तम नागरिक घडविण्याचे काम केले, ते माझे आवडते शिक्षक आणि मार्गदर्शक होते राजाभाऊ लवळेकर.** रमणबागेमध्ये १९६५–६६ च्या सुमारास मी शिकत असताना **‘कर’** सरांची खूप गर्दी होती. बावडेकर, कोल्हटकर, पाटणकर, अभ्यंकर, येवलेकर, वाडेकर, जोगळेकर आणि आमचे आवडते लवळेकर. प्रत्येकाचे व्यक्तिमत्त्व आणि कार्य वेगळे होते. परंतु **संघसंस्काराने समर्पित असे आमचे राजाभाऊ हे तत्त्वनिष्ठ गुरुवर्य होते.**

माझे पहिली ते सातवीचे शिक्षण महानगरपालिकेच्या शाळेमध्ये झाले. इयत्ता आठवी मध्ये मी न्यू इंग्लिश स्कूल रमणबागेमध्ये प्रवेश घेतला. त्यावेळी राजाभाऊ आम्हाला हिंदी शिकवित असत. त्यांच्यामुळे मराठी माध्यमाच्या शाळेत असून देखील माझ्यासारख्या शेकडो विद्यार्थ्यांना हिंदी भाषेची गोडी लागली. **त्यांनी केवळ हिंदी भाषेचे शिक्षण त्यावेळी दिले नाही, तर जीवन कसं जगावं याचे धडे देखील आम्हाला दिले.**

राजाभाऊंसोबत शाळेच्या वर्गामध्ये शिक्षणाचे धडे घेण्याबरोबरच आम्ही बिनभिंतींच्या शाळेतही अनेक धडे घेतले. एकदा रमणबाग शाळेची सहल विठ्ठलवाडीला आणि तीही शाळेपासून चालत निघाली होती. रामकृष्ण आश्रम, सह्याद्री डायस्टफ हा रंगाचा कारखाना सोडला, तर १०–१५ फुटी सडकेच्या डावीकडे पाच फुटानंतर तसे जंगलच होते. कधीतरी एखादी पानशेतची एसटी येत–जात असे. विठ्ठलाच्या देवळाचा नयनरम्य परिसर आणि आतली दगडी फरसबंदी आजही डोळ्यासमोर येते. **त्यावेळी रस्त्याच्या कडेला, झाडाच्या सावलीत बसून राजाभाऊंनी ऐकविलेली चंद्रशेखर आझाद यांची गोष्ट माझ्या जीवनात संस्काररूपाने सावलीसारखी जवळ आहे.**

**विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी जाणून घेणे व त्यातून मार्ग काढणे,** हा त्यांचा स्थायीभाव होता. असाच काहीसा प्रसंग माझ्याबाबत घडला. मी आणि माझा शालेय मित्र मुरलीधर वैद्य नववी मध्ये शिकत असताना वर्तमानपत्राची लाईन टाकत असू. परीक्षेच्या काळात एका शनिवारी सकाळी वर्तमानपत्राची लाईन टाकून येताना मला शाळेत परीक्षेला यायला उशीर झाला. त्यामुळे राहिलेली वर्तमानपत्रे अर्धवट टाकायचे ठेवून मी घाईघाईने शाळेत गेलो. शाळेच्या प्रवेशद्वाराजवळच सरांनी आम्हाला अडविले आणि उशीर झाल्याबद्दल छड्याही मारल्या. परंतु त्याच दिवशी त्यांनी पेपर संपल्यानंतर शिक्षक खोलीमध्ये भेटायला देखील सांगितले. पेपर कसा गेला ? ही चौकशी करीत असतानाच मी कुठे राहतो, घरी कोणकोण असते, वर्तमानपत्र कधीपासून टाकतो याची चौकशीदेखील केली. दोन–चार दिवसातच आमच्या कसब्यातील चाळीतल्या घरी माझी चौकशी करीत ते आले. तत्पूर्वी माझ्या घरातील कोणाचाही रा. स्व. संघाशी फारसा संबंध नव्हता, त्यामुळे माझ्या घरच्यांना सांगून मला बुधवार पेठेतील अभिमन्यू शाखेत जायला सांगितले. त्यावेळी त्या शाखेचे कार्यवाह मधुकर रिसवडकर होते. ते इंग्रजी व गणिताचे क्लासेसही घ्यायचे. राजाभाऊंनी त्यांना सांगून मला क्लासमध्ये जाण्यास उद्युक्त केले. त्या दिवसापासून कळत–नकळत सर माझे पालक बनले.

गुरुपोर्णिमा, संक्रांत, रक्षाबंधन इत्यादी **संघाच्या उत्सवात आणि बौद्धिक वर्गात केवळ कथा किंवा गोष्टी न सांगता, चालू गोष्टींवरील ज्ञान आणि त्याविषयीची उदाहरणे देऊन ते स्वयंसेवकांशी संवाद साधत असत.** त्यामुळे त्यांचे **हिंदी आणि मराठी भाषेवरील प्रभुत्व व बोलण्यातील सहजपणा प्रत्येकाच्या मनाला स्पर्श करीत असे.** संघपरिवारात राजाभाऊंनी अनेक पदांवर काम केले. त्यामध्ये १९७५–७६ च्या सुमारास आणीबाणीच्या वेळी ते पुणे महानगराचे सहकार्यवाह असतानाच्या एका प्रसंगाची आठवण आजही माझ्या मनात ताजी आहे.

आणीबाणीच्या विरोधात ठिकठिकाणी सत्याग्रह करावे आणि आणीबाणीला विरोध करावा, यासंदर्भात संघस्वयंसेवकांच्या बैठका राजाभाऊ लवळेकर घेत होते. आमच्या भागाच्या बैठकीत त्यांनी सत्याग्रहाचे स्वरूप समजावून सांगितले. शक्यतो हे सत्याग्रह गर्दीच्या ठिकाणी करावे, सत्याग्रहाची ठिकाणे काय असावीत, अशी चर्चा सुरू असताना मी एक सूचना दिली. बॅरिस्टर गाडगीळ त्यावेळी केंद्रीय मंत्री होते आणि लक्ष्मी रस्त्यालगत असलेल्या गोखले हॉलमध्ये त्यांचा एक जाहीर कार्यक्रम चार-पाच दिवसांनी होणार होता. त्या कार्यक्रमाला विरोध करीत आपण कार्यक्रम बंद पाडू, असे मी राजाभाऊंना सुचविले. खरंतर त्या ठिकाणी असलेल्या पोलिस बंदोबस्तामुळे त्याचे परिणाम काय होणार याची मला थोडीफार कल्पना होती. **मी सूचना केल्यानंतर त्यांनी क्षणभर माझ्याकडे पाहिले, त्या करारी नजरेने मी पण थोडा थबकलो. क्षणार्धात ते म्हणाले, 'तू सुचविले आहेस ना ? तूच त्या ठिकाणी सत्याग्रहाचे नेतृत्व कर.'**

**सरांचा शब्द पडू द्यायचा नाही आणि काहीतरी वेगळे करायचे म्हणून काही सहकाऱ्यांसह आम्ही सत्याग्रह केला. परिणाम व्हायचा तो झाला, पोलिसांचा मार खाल्ला आणि आमची रवानगी विसापूरच्या जेलमध्ये झाली. तो प्रसंग माझ्या आयुष्याला कलाटणी देणारा ठरला.** त्यावेळी मी बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये नोकरी करीत होतो. त्यानंतर ग्राहक चळवळीच्या कामाची जबाबदारी माझ्यावर देण्यात आली. त्यासाठी पूर्णवेळ काम करावे व बँकेची नोकरी सोडावी, असे बिंदुमाधव जोशींचे मत होते. सरांचा सल्ला घ्यायला गेलो, त्यावेळी **त्यांनी असे सांगितले की 'एखाद्या मोठ्या रेल्वे गाडीचा डबा होऊन आयुष्य काढायचे का छोट्या रेल्वे गाडीचे इंजिन व्हायचे, हा निर्णय तू घे. ग्राहक चळवळीत काम करीत असताना तुला इंजिनाची भूमिका पार पाडता येईल. एखाद्या गोष्टीविषयी समोरच्याच्या मनात आत्मविश्वास निर्माण करण्याची राजाभाऊंची पद्धत काहीशी निराळीच होती. परंतु समोरच्यावर सोपविलेली जबाबदारी तो तितक्याच ताकदीने पार पाडेल, असा विश्वासही त्यांना असायचा.**

संघपरिवारातील अनेक संस्था-संघटनांशी त्यांचा जवळचा संबंध होता. 'स्व'-रूपवर्धिनी, ज्ञानदा प्रशाला, विद्या भारती, संस्कार भारती अशा अनेक संस्थांशी त्यांचा संबंध आला आणि त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना त्या संस्थांशी जोडले. त्यामुळे माझ्यासारखे अनेकजण कळत-नकळत त्या संस्कारांनी घडत गेले. **जे करायचं ते नेटकं आणि साक्षेपी वृत्तीने, यामुळे घरातील कामांपासून ते अगदी तरुण भारतसारख्या वृत्तपत्रात दिलेले काम अगदी निरपेक्ष वृत्तीने लीलया सांभाळले.** शिक्षणाबद्दलचे मूलभूत चिंतन, विद्यार्थी आणि स्वयंसेवकांप्रती प्रेम आणि स्नेह यामुळे त्यांनी शेकडो लोकांना जोडले.

**आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर राजाभाऊंचा आणि माझा संबंध आला,** असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. डेक्कन एज्युकेशन सोसायटीचा सदस्य होण्यासाठी अर्ज भर, असे राजाभाऊंनी मला सांगितले. त्यानुसार मी अर्जही भरला. पुढे त्या मंडळावर सदस्य म्हणून नियुक्तही झालो, कालांतराने अध्यक्षपदही भूषविले. **ज्या रमणबाग शाळेत मी शिकलो, त्या शाळेच्या संस्थेचा अध्यक्ष होण्याचा बहुमान मला मिळाला, तो केवळ त्यांच्यामुळेच.** माझ्यासाठी कळत-नकळत केलेल्या मदतीबद्दल राजाभाऊंनी कधीही अवाक्षर देखील काढले नाही. माझे आणि त्यांचे संबंध अतिशय जिव्हाळ्याचे होते. आमची कुटुंबे एकमेकांशी जोडलेली होती. त्यामुळे **माझ्या आयुष्यात राजाभाऊ लवळेकर केवळ एक शिक्षक, एक मार्गदर्शक म्हणूनच नव्हे, तर आधारवड म्हणूनही त्यांचे स्थान कायम राहील.**

- मो. : ९४२२०१६८९५

❖❖❖

# भाऊंच्या आठवणी

**– सौ. शोभना भिडे**

१९८४ चा जून महिना. पुण्यात मी विद्यार्थी–परिषदेचं पूर्णवेळ काम करायला सुरुवात करून एक वर्ष झालं होतं. तेव्हा देशपांडे सरांनी सांगितलं की राजाभाऊ लवळेकर हे संघाचे शहर सहकार्यवाह आहेत; न्यू इंग्लिश स्कूल, रमणबागचे मुख्याध्यापक आहेत; त्यांच्या घरी तुझी राहण्याची व्यवस्था केली आहे. तेव्हा त्यांचा निवास रमणबागेच्या प्रांगणात होता. मी त्यांच्या घरी बॅग घेऊन गेले तेव्हा एका खोलीतील एक कपाट माझ्या सामानासाठी आधीच मोकळं केलेलं होतं. हे घर मला सामावून घ्यायला तयार आहे, याची ती पहिली खूण होती. सामाजिक काम करणारी एक पूर्णवेळ विद्यार्थिनी आपल्याकडे राहणार आहे याचा किती बारकाईने विचार त्यांनी केला होता, हे नंतरच्या दीड वर्षाच्या तेथील वास्तव्यात मला पदोपदी जाणवले. यापुढे मी जे काही अनुभव लिहिणार आहे त्यात भाऊंइतकाच मावशींचाही वाटा आहे याचा कधीही विसर पडणे शक्य नाही.

आपल्याकडे राहायला आलेली मुलगी ही घराचा भाग व्हायला आलेली आहे पण तसं पूर्णांशाने होणार नाही. कारण ती सामाजिक कामासाठी आलेली असल्याने तिचा बराच वेळ घराबाहेर जाणार, अनेकदा ती रात्री उशीरा घरी येणार, विद्यार्थी कार्यकर्त्यांबरोबरही काम करणार (३०–३५ वर्षांपूर्वी), सुट्टीच्या दिवशी तर जास्तच काळ बाहेर असणार अशी त्या काळी घरच्या मुलीलाही न मिळणारी मोकळीक या दुसऱ्याच्या मुलीला द्यायची आणि तिची पूर्ण जबाबदारीही घ्यायची अशी दुधारी तलवार बाळगणं किती अवघड असतं हे मी विद्यार्थी परिषदेच्या मुलींची पालक झाल्यावरच मला समजलं. सकाळचा अर्धा तास मी स्वयंपाकघरात लुडबुड करत असे ते व एकदा भाऊंच्या पायाच्या बोटाचे सतत दहा दिवस केलेले ड्रेसिंग याव्यतिरिक्त फारशी कामं घरात केल्याची माझी आठवण नाही. पण याविषयी तक्रार तर सोडाच, या दोघांचं काही म्हणणंही नव्हतं. एक वर्ष या घरात पूर्ण झाल्यावर प्रथेप्रमाणे विद्यार्थी परिषदेच्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी चौकशी केली, 'मुलगी काय करते ?' तेव्हा संजूच्या (भाऊंची धाकटी मुलगी) लग्नाची चर्चा घरात चालायची. भाऊंनी प्रश्नाला उत्तर दिलं, 'तिचं छान चाललंय, फक्त लग्नाच्या चर्चेत ती काही मत देत नाही.' **घरातलं एक होणं म्हणजे काय ते मला या उत्तराने सांगितलं.** संजूचं कोणतंही केळवण माझ्या अनुपस्थितीत झालं नाही. मला कायमच उशीर व्हायचा, पण लांब जायचं असेल तर माझ्यासाठी कोणी ना कोणी थांबलेलं असायचं.

भाऊ हाडाचे शिक्षक. शिक्षकाचे कर्तव्य, कामाप्रती निष्ठा, विषयाची तयारी व पोषाख या सर्वांबद्दल त्यांची आग्रही मते होती. 'आधी केले मग सांगितले' अशी वृत्ती असल्याने त्यांचं स्वतःचं वर्तन हेच त्यांच्या शिक्षकांपुढील चालता–बोलता आदर्श होतं. मी पूर्णवेळ काम करायला सुरुवात केली तेव्हा बी.एड. केलं नव्हतं. पण आज शिक्षक म्हणून वावरताना त्यांच्या त्या मतांची आठवण झाल्याशिवाय रहात नाही.

**त्या घरालाच भाऊ, मावशी यांच्या मायेची ऊब होती. काम करताना निराशेचे, अडचणीचे प्रसंग आलेच नाहीत असे नाही पण घरात येताक्षणीच त्यांचं सावट कुठच्या–कुठे निघून जायचं.** तसे कामातील काही प्रश्न घरीही नेलेच. विद्यार्थी–परिषद विद्यापीठाच्या छात्रसंघाच्या निवडणुका लढवत होती. स. प. महाविद्यालयाची सविता फडणीस महाविद्यालयातून जिंकून आली होती. पुढच्या विद्यापीठाच्या निवडणुकांसाठी इतर संघटनांकडून तिच्यावर दबाव होता. तिला तिच्या घरी ठेवणं धोक्याचं होतं. मग तिला मी घेऊन आले घरी. निवडणुका पार पडेपर्यंत ती भाऊंकडे राहिली. **आपणच आधी दुसरीकडे रहातोय त्यात ही आणखी जबाबदारी कशाला ?–असे ना मला वाटले, ना घरच्यांना. भाऊंनी संघ खऱ्या अर्थाने घरात झिरपवला होता.** मावशी तेव्हा MTNL मध्ये नोकरी करीत व मजदूर संघाचे कामही. प्रसाद संघाच्या कामात होता आणि इंजिनिअरिंग पूर्ण करून तेव्हाच तो प्रचारक म्हणून नगरला गेला. भाऊंची तीच इच्छा असावी. कारण घरात परवानगीचं नाट्य रंगलेलं मला तरी आठवत नाही.

भाऊंकडे असताना एकदा अण्णा (माझे वडील) आले होते पुण्याला. रात्री आम्ही गप्पा मारून उशिरा झोपलो.

सरत्या थंडीचे दिवस होते. पहाटे चांगलं गार व्हायचं. सकाळी उठले तेव्हा अण्णांच्या अंगावर जाड पांघरुण होतं जे भाऊंनी त्यांना पहाटे कधीतरी पांघरवलं होतं. त्याच वर्षी मी घरून कामासाठी मागून घेतलेली मुदत संपली. पुण्यात येऊन दोन वर्ष झाली होती. पण माझ्या मनात अजून एक वर्ष वाढवावं असं होतं. कारण ८५-८६ या वर्षात विद्यार्थी-परिषदेचे शिल्पकार मा. यशवंतराव केळकर यांच्या एकसष्टीचे कार्यक्रम होणार होते. **मी माझी इच्छा भाऊंना सांगितली होती. ते म्हणाले, 'मी बोलतो अण्णांशी.' त्यांनी सांगितले, 'तुम्हाला तिच्या लग्नाचीच चिंता आहे ना, मग आजपासून ही जबाबदारी माझी.' हे नुसतं आश्वासन नव्हतं तर एका वडिलांनी दुसऱ्या वडिलांना दिलेला शब्द होता.**

ह्या अत्यंत वैयक्तिक संस्कारांच्या जशा आठवणी आहेत तशा सामाजिक संस्कारांच्याही आहेत. भारतीय स्त्री शक्ती जागरणाची सुरुवात भाऊंच्या रमणबागेतील घरात व त्यांच्या सहभागाने झाली आहे. स्व. मा. नाना ढोबळे, त्या वेळेचे पुणे शहर संघचालक मा. दादासाहेब बेंद्रे आणि राजाभाऊ लवळेकर यांच्या अनेकदा झालेल्या चर्चेतून या कामाचा शुभारंभ झाला आहे. स्त्रीप्रश्नांचा संमिश्र पट लक्षात येण्याचं ते वय नव्हतं पण यासाठी झालेल्या मोठ्या (जास्त संख्येच्या) बैठकांमध्ये मलाही सहभागी करून घेतलं होतं हे मात्र चांगलं आठवतंय.

**भाऊ गेले हे खरंच वाटत नाही. कारण त्यांचं अचेतन रूप मी पाहिलंच नाही. पण ते गेलेत कुठे ? ते आहेतच, आमच्या स्मृतीत, विचारात व कार्यवारशात. त्याबाबत तर आम्ही नक्कीच ठरवू शकतो- 'आम्ही चालवू हा पुढे वारसा'.**

-मो. : ९३२६१८०३६८

---

## आमचे आदर्श व आदरणीय गुरुवर्य

**- सुषमा शरद ओक**

दर बुधवारी आमच्या शाळेत 'मास पी.टी.'चा तास असे. सर्व वर्गांना शाळेच्या मैदानावर जमवून क्रीडाशिक्षक काही कवायतीचे प्रकार घेत असत. मी बहुधा सहावीत असेन. त्या दिवशी स्पीकरवरून 'एकसाथ सावधान- विश्राम' अशा वेगळ्या आवाजातल्या सूचना ऐकल्यावर साहजिकच समोर लक्ष गेले - धोतर, झब्बा, त्यावर जाकीट, दोन भुवयांमध्ये गंधाचा ठिपका, चष्म्याआडचे भेदक डोळे - असे नवीन सर दिसले. पी.टी. संपल्यावर वर्गात जाताजाता मागून कुणीतरी बोललं - 'हे नवीन सर आहेत - लवळेकर सर- जाम कडक आहेत.'

आमच्या शाळेत लवळेकर सर पर्यवेक्षक म्हणून रुजू झाले होते. तसा त्यांच्याशी आमचा रोजचा संबंध येत नसे. प्रार्थनेनंतर शाळेतील सर्व वर्गांसमोरून त्यांची एक फेरी असे. केवळ नजरेतील जरबेने शाळेतील उनाड मुलेही त्यांना घाबरून असत. थोड्याच अवधीत ते शाळेचे उपमुख्याध्यापक झाले. सरांचा असा दुरून परिचय बरेच दिवस होत होता.

एक दिवस मराठी विषयाच्या मराठे बाई रजेवर होत्या. आम्ही ऑफ तासाच्या मूडमध्ये होतो. बहुधा आमचा आवाज सरांच्या कानावर गेला असावा. ते लगेच वर्गावर आले. आनंदीबाई शिर्क्यांचा 'सांजवात' हा धडा शिकवायला त्यांनी सुरुवात केली आणि **तो पाऊण तास माझ्या मनावर कायमचा कोरला गेला. 'सांजवात'चा अर्थ, त्यामागचं कारण, त्याचं महत्त्व ऐकताना 'सांजवेळे'चं वातावरण सगळ्या वर्गावर पसरलं होतं. सगळा वर्ग अक्षरशः मंत्रमुग्ध होऊन ऐकत होता. त्यावेळी सरांचं भाषेवरचं प्रभुत्व, प्रसंगानुरूप आवाजातील चढ-उतार, विषय सोपा करून समजावण्याची हातोटी हे विशेषत्वाने जाणवले.**

हळुहळू गॅदरिंग किंवा अन्य उपक्रमातील आमच्या सहभागामुळे सरांशी जास्त परिचय झाला. **शाळेतील स्पर्धा, शिबिरे, स्काऊट गाईड कॅम्पच्या निमित्ताने त्यांची अफाट स्मरणशक्ती, विविध विषयांचं ज्ञान आणि प्रासंगिक मिश्किलपणाही बघायला मिळाला.** त्यांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वामुळे, तसेच वागण्या-बोलण्यातील शिस्त व नेटकेपणामुळे ते आमच्यासाठी आदर्श व आदरणीय ठरले.

-मो. : ९७६७१०३२४०

# घराचीच नव्हे तर विचारांची, मनाची दारे खुली ठेवणारे लवळेकर सर

**– सविता काजरेकर**

काही कारणांनी आपण आपल्या घरापासून काही दिवसांसाठी बाहेर असलो की घरी जाण्याची ओढ लागते. 'आपल्या घरी आल्यावर अगदी मोकळं मस्त वाटतंय आता' 'कधी एकदा घरी येतीये असं झालं होतं' अशा प्रकारच्या प्रतिक्रिया 'घर' या संकल्पनेचं आपल्या जीवनातलं महत्त्व अधोरेखित करतात. घरातल्या प्रत्येकाला आपलं घर हा आपला 'कम्फर्ट झोन' वाटणं म्हणजेच त्या घराला 'घरपण' असणं असं मला वाटतं. राजाभाऊ लवळेकरांचं घर हे अशा प्रकारचं घर आहे.

नेहमी घरातील सदस्य असणाऱ्या आई-बाबा, काका-काकी, आजी-आजोबा, मुलं.... अशा साऱ्यांना हे 'घरपण' जाणवणं एका अर्थाने स्वाभाविक आहे. परंतु काही दिवसांसाठी, एखाद्या वर्षासाठी त्या घरात राहायला आलेल्या व्यक्तीलाही ते घर आपलं वाटणं, हक्काचं वाटणं आणि मी घेतलेला निर्णय या घरातल्यांना मान्य होईलच याची खात्री वाटणं, हे खरं तर दुर्मिळ आहे. परंतु लवळेकर सरांचं घर हे असंच अनेकांना आपलंच वाटेल असं होतं आणि असं मला म्हणावंसं वाटतं, कारण मी स्वतः याचा अनुभव घेतला आहे.

त्यावेळी लवळेकरसर न्यू इंग्लिश स्कूल, रमणबाग या शाळेत मुख्याध्यापक होते आणि शाळेच्या आवारातील निवासस्थानात राहात होते. मी स.प. महाविद्यालयात बी.ए. अभ्यासक्रमाचे शिक्षण घेत होते. तेव्हा अत्यंत चुरशीच्या अशा विद्यार्थी-प्रतिनिधींच्या निवडणुका होत असत. अखिल भारतीय विद्यार्थी-परिषदेची उमेदवार या नात्याने मी निवडणूक लढत होते. प्रतिस्पर्धी उमेदवारास माघार घ्यायला लागावी म्हणून काहीजणांकडून विविध मार्ग अवलंबिले जायचे. ''कुठे राहतेस गं तू?'' असं वर्गातील मुलीने विचारल्यावर मी अगदी मोकळेपणाने जवळच्या खुणेसह घरचा पत्ता सांगितला आणि संध्याकाळी उशिरा बारा-पंधरा आडदांड मुले आमच्या घरी हजर झाली. मी या निवडणुकीला उभे राहू नये, हे त्यांच्या भाषेत आणि त्यांच्या पद्धतीने समजावून सांगण्यासाठी ते आले होते. वाड्याचा दरवाजा धाडकन् ढकलून एका वेळी एवढ्या मुलांनी घरात येणं आणि उच्च स्वरात धमकावणं अगदीच अनपेक्षित आणि धक्कादायक होतं. अशा वेळी मी माझ्या घरी थांबणं हे घरातला ताण-तणाव वाढवणारं आणि विद्यार्थी-परिषदेच्या कार्यकर्त्यांची चिंता वाढविण्यासारखंच होतं. तेव्हा शोभना मला तिच्याबरोबर घेऊन गेली. शोभना म्हणजे शोभना जोगळेकर- त्यावेळी ती पुणे शहरात विद्यार्थी-परिषदेचं पूर्ण वेळ काम करत होती आणि राजाभाऊ लवळेकरसरांकडे राहत होती. **आजच्या या डिजिटल युगात आपण फोन केल्याशिवाय कोणाकडेही जात नाही. पण शोभना त्या रात्रीच्या वेळी तडक मला तिच्या घरी म्हणजेच लवळेकर सरांच्या घरी अगदी सहजपणे घेऊन गेली. तिने कोणाची परवानगी घेतली नाही की आम्ही दोघी येत आहोत असे फोनवरून कळविले देखील नाही. तिला पूर्ण खात्री होती की 'आपल्या घरात' सविताचं स्वागतच होईल. खरंच माझं स्वागतच झालं. ते घर माझ्यासाठीदेखील 'कम्फर्ट झोन' झालं. मी मोकळेपणानं सुरक्षिततरीत्या त्या घरी राहिले. 'कॉलेजची निवडणूक' ही फार छोटी गोष्ट आहे. मला तर जीवनाच्या या लढाईला निर्भीडपणे सामोरं जाण्याचंच बळ मिळालं आहे. अशी माझी भावना होती त्या घरातून बाहेर पडताना. लवळेकर सरांच्या घराचीच नव्हे तर मनाची, विचारांची दारे ही सर्वांसाठी नेहमीच खुली होती.** म्हणूनच ते अत्यंत विद्यार्थीप्रिय असे शिक्षक होते. मुख्याध्यापक या नात्याने उत्तम नेतृत्त्व कसं असावं याचाही आदर्श त्यांनी घालून दिला. 'मी लवळेकर सरांचा विद्यार्थी आहे' असं अभिमानाने सांगणारे अनेक विद्यार्थी भेटतात. सर, तुम्ही माझ्यासारख्या असंख्य कार्यकर्त्यांच्या पाठीवर हात ठेवून 'लढ' म्हणाला आहात. म्हणून आम्ही आपापल्या परीने लढत आहोत.

– मो. : ९१५८८६५७७७

❖❖❖

# शिक्षण क्षेत्रातील वटवृक्ष

**– मिलिंद सबनीस**

**राजाभाऊ लवळेकर हे एक बहुपेडी व्यक्तिमत्त्व. शिक्षणक्षेत्रातला वटवृक्ष. यांच्या सावलीला कोणीही यावं, श्रममुक्त व्हावं आणि नवीन ऊर्जा घेऊन पुन्हा कामाला उभं राहावं.** पण केवळ शिक्षणक्षेत्रच नव्हे, तर सांस्कृतिक, पत्रकारिता, क्रीडा आणि संघाच्या अनेक क्षेत्रांमध्ये त्यांनी मुक्त संचार केला. **उत्तम विद्यार्थी घडवणाऱ्या राजाभाऊंनी पुढच्या काळात उत्तम शिक्षक आणि संघटकही घडवले.** 'आपणासारिखे करिती तात्काळ', हे तुकाराम महाराजांचे शब्द राजाभाऊंनी यथार्थ ठरविले.

खरं तर मी त्यांचा रमणबागेतला विद्यार्थी. इ. सातवीत (१९७९) ते मला शिकवायलाही होते. शाळेतील अनेक शिक्षकांची मुले आमच्या वर्गात होती. त्यावेळी राजाभाऊ बहुधा पर्यवेक्षक होते. तत्कालीन मुख्याध्यापक सौम्य प्रकृतीचे, पण राजाभाऊंनी सर्वच गोष्टींना एक शिस्त आणली. त्यावेळी आम्ही वयाने लहान असूनही एक शिक्षक म्हणून राजाभाऊंचं वेगळेपण जाणवत होतं. पुढे त्यांची बदली झाली व त्यानंतर पुढे चार-पाच वर्षांनी ते पुन्हा रमणबागेत मुख्याध्यापक म्हणून आले. त्यावेळी माझी दहावी पूर्ण होऊन मी चित्रकला महाविद्यालयात प्रवेश घेतला होता. जी.डी. आर्टस् होताहोताच मला संघ विचाराच्याच लोकांनी चालवलेल्या ज्ञानदा शाळेत शिक्षक म्हणून काम करण्याची संधी मिळाली. माझं वय जेमतेम २०-२२ वर्षांचं. लवळेकर सर ज्ञानदा प्रतिष्ठानचेही कार्यकारिणी सदस्य होते. विनाअनुदानित माध्यमिक विभागाला लवळेकर सरांनी फार मोठा आधार दिला. शाळेच्या अनेक कठीण काळात लवळेकर सर भक्कमपणे उभे राहिले. शाळा अगदी लहान. ग्रंथालयासाठी लागणारी पुस्तके, कपाटे जवळजवळ नव्हतीच. **राजाभाऊंचे अनेक बारीक-सारीक गोष्टींवर किती लक्ष असे, त्याचे हे उदाहरण. पुण्याच्या 'तरुण भारत'चे शेवटचे संपादक राजाभाऊ होते आणि 'तरुण भारत' बंद झाल्यावर तेथील लाकडी सामान, कपाटे, टेबले, त्यांच्या ग्रंथालयातील पुस्तके नाममात्र दरात विक्रीला काढली गेली. त्यावेळी आमच्या शाळेत मुलांना बसायलाही सतरंज्याच होत्या. शिक्षकांनाही टेबल-खुर्च्या नव्हत्या. लवळेकर सरांमुळे उत्तम स्थितीतली टेबल व कपाटे शाळेकडे आलीच; पण 'तरुण-भारत'मधून आलेल्या पुस्तकांमुळेच ज्ञानदाच्या ग्रंथालयाचा पाया घातला गेला.** तरुण भारतच्या ग्रंथालयातील पुस्तके ज्ञानदाप्रमाणेच 'स्व'रूपवर्धिनीसारख्या नव्याने उभ्या राहणाऱ्या संस्थांपर्यंत राजाभाऊंमुळेच पोहोचली. ही दूरदृष्टी राजाभाऊंना होतीच. **ज्या-ज्या संस्थांसाठी राजाभाऊ काम करीत त्या सगळ्या संस्थांमध्ये एकात्मता भावना असेल व त्या संस्थांचा एकमेकांना कसा उपयोग होईल याकडे राजाभाऊंचे लक्ष असे. अशा संस्थाचा राजाभाऊ हे एक चालता-बोलता इतिहास होते,** याचा प्रत्यय मला २००४ मध्ये आला. २००४ मध्ये ज्ञानदा प्रतिष्ठानला २५ वर्षेपूर्ण होत होती. या रौप्यमहोत्सवा निमित्तानी जी स्मरणिका तयार होत होती, त्यात संस्थेचा इतिहास लिहायचा होता. अगदी स्थापनेपासून २५ वर्षे सलग काम करणारी मंडळी अगदीच कमी होती. माध्यमिकच्या मुख्याध्यापिका अर्चनाताई नलावडे या त्यापैकी एक होत्या. त्यांनी संस्थेच्या वाटचालीबद्दल टिपणे, मुद्दे लिहून काढले आणि मग **राजाभाऊंनी या सगळ्या मुद्द्यांना एक अभिनव असे शब्दरूप दिले. राजाभाऊंमधला संपादक आणि लेखक याचं अद्‌भुत दर्शन आम्हाला त्यावेळी झालं. या प्रदीर्घ लेखामध्ये प्रत्येक टप्प्याच्या परिच्छेदाला त्यांनी दिलेली नावं अत्यंत समर्पक व त्यांच्या भाषावैभवाची जाण दाखवणारी होती.** राजाभाऊंचं ओघवतं वक्तृत्व आम्ही विद्यार्थी असल्यापासून अनुभवलं होतं. पण प्रत्येक वक्ता उत्तम लेखक असेलच असे सांगता येत नाही. राजाभाऊंची लेखनशैलीची वेगळी ओळख यानिमित्ताने आम्हाला झाली. राजाभाऊ ज्या-ज्या सांस्कृतिक तसेच शैक्षणिक विषयावर बोलत ती काही ध्वनिमुद्रित असतील तर त्याचे पुस्तक व्हायला हवे. राजाभाऊंचा लेखन हा पैलू पुन्हा सर्वांसमोर आला तर ते विचार पुढील

पिढ्यांसाठी मार्गदर्शक असतील यात शंकाच नाही.

राजाभाऊंची तब्येत बिघडल्यानंतर ते घराबाहेर पडत नसत. तरीही संस्थेच्या कामकाजाशी, तिथल्या कार्यकर्त्यांशी त्यांचा सतत संपर्क असे. प्रकृती-अस्वास्थ्यातही त्यांनी अनेक कठीण प्रसंगांत संस्थेला मार्गदर्शन केले. ज्ञानदामध्येही संस्थेच्या एका अत्यंत तळमळीच्या ज्येष्ठ सदस्यांचा अवमान आणि राजीनामा प्रकरणात सरांनी जाणीवपूर्वक लक्ष घालून परिस्थिती हाताबाहेर जाऊ दिली नाही. अशा वेळी सरांच्या शब्दाला असलेलं महत्त्व पुन्हा एकदा दिसलं.

'गोष्टी सांगेन युक्तीच्या चार' अशी योगेश्वर श्रीकृष्णाची भूमिका त्यांनी पार पाडली. आजही ज्ञानदाच्या वास्तूत सरांचं चैतन्यमयी अस्तित्व आहे, अशी आम्हा सर्वांची खात्री आहे.

- मो. : ९४२२८८१७८३

❖❖❖

## समन्वयक राजाभाऊ

**- ज.गं.फगरे**

पुणे माध्यमिक शिक्षक संघ - ही माध्यमिक शिक्षकांची संघटना. पुण्यामध्ये माध्यमिक शिक्षक संघटनेची स्थापना झाल्याचा इतिहास तसा फार जुना आहे. परंतु मा. मुकुंदराव कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली संघटनेचे काम १९५६ पासून विशेष प्रकर्षानं उभं राहिलं. या कामामध्ये प्रथमपासून संघ विचारानं एकत्र आलेल्या शिक्षकांना (म्हणजे मी..., पंचनदीकर, ठाकूर, माताडे, साठे, पाळंदे, शरद घाटपांडे या कार्यकर्त्यांना) संघ विचारातून शिक्षक संघ कसा असावा याचं मार्गदर्शन समन्वयकाच्या भूमिकेतून, सर्वांना एकत्र बांधून ठेवण्याचं अत्यंत महत्त्वाचं काम राजाभाऊ लवळेकर यांनी केलं. शिक्षकांना आर्थिक स्वास्थ्य मिळवून देण्यासाठी आंदोलने, चळवळी करायला लागल्या. मजूर संघटना, सरकारी सेवक संघटना, गिरणी कामगार संघटना - या संघटनेचे ध्येय-धोरण वेगळे व शिक्षक संघटनेचे ध्येय, धोरण यामध्ये मूलतः फरक आहे. शिक्षक मुलांचे भवितव्य घडविणारा, संस्कार देणारा, मनुष्य घडविणारा, खऱ्या अर्थानं पालक असतो. घरात कमी वेळ परंतु शाळेत अधिक वेळ वावरणाऱ्या विद्यार्थ्यांशी शिक्षकाचं नातं अधिक जवळचं म्हणूनच शिक्षकाचं आचरण, वर्तणूक, अतिशय पारदर्शी असणं गरजेचं. नाईलाजास्तव धरणं, आंदोलनं, चळवळीच्या माध्यमातून शिक्षकाला हे करावं लागतं. शिक्षक घटकाकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलण्यासाठी हे मार्ग अवलंबवावे लागतात. विद्यार्थ्यांना नागरिक म्हणून कसं वागावं याची शिकवण शिक्षक देत असतो.

अशा विचारांचं उद्बोधन वारंवार एक जबाबदार शालाप्रमुख, प्रथम शिक्षक म्हणून शिक्षक वर्गाला देणारे राजाभाऊ लवळेकर होते. त्यांच्या बोलण्यात, वागण्यात, मार्दवता, नम्रता असायची. ते खऱ्या अर्थाने राजा होते. 'राजा कालस्य कारणम्' म्हणतात. सर्व प्रजाजनांचे हित, कल्याण चिंतणारा व आचरण करणारा तो राजा. भाऊ हाही शब्द-नातं जोडणारा, भावासारखा वाटणारा. म्हणूनच राजाभाऊ हे त्यांचं संबोधन यथार्थ वाटायचं.

सामान्यात वावरणारा, संघटनेत एकजिनसीपणा आणणारा आमचा भाऊ सदैव स्मरणात राहील. शिक्षकांचे प्रशिक्षण वर्ग घेण्यासाठी राजाभाऊंना प्राधान्यानं आमंत्रित केलं जायचं. शिक्षण-विभागात शिक्षणतज्ज्ञ म्हणून राजाभाऊंचा विशेष आदर व्हायचा.

शिक्षक संघाच्या बैठकीत वादविवाद, संघर्ष व्हायचे. परंतु सुसंवादानं राजाभाऊ वातावरणातील कटुता दूर करीत असत. एक मुख्याध्यापक म्हणून त्यांचा कार्यकाळ विशेष नावाजला गेला. शिक्षक-बंधू-भगिनी आपला कुटुंबकर्ता म्हणूनच राजाभाऊंना मानीत.

त्यांना सर्व शिक्षक घटकांतर्फे सादर भावपूर्ण श्रद्धांजली.

- मो. ९७६३६२९२४३

❖❖❖

# कृ. ग. लवळेकर सर : ध्यासपर्व – विद्यार्थी जडणघडणीचे

**– रवीन्द्र नागेश कानडे**

आदरणीय लवळेकर सरांचा आणि माझा परिचय १९७७ पासूनचा. रमणबाग प्रशालेतील माझा पहिला दिवस. पांढरा स्वच्छ सदरा. पांढरे स्वच्छ धोतर नेसलेले, उंचेपुरे, प्रसन्न स्मितहास्य असलेले व्यक्तिमत्त्व, हे लवळेकर सरांचे प्रथम दर्शन. त्यानंतर संवाद घडत गेला आणि मी सरांचा भक्त केव्हा झालो हे मलाही कळले नाही. **विद्यार्थीप्रिय शिक्षक, शिक्षकप्रिय शिक्षक, आदर्श पिता, आदर्श गृहस्थाश्रमी, कुशल वक्ता, उत्तम संघटक, प्रेमळ श्वशुर, सच्चा स्वयंसेवक, कार्यक्षम प्रशासक, मराठी आणि हिन्दी या दोन्ही भाषांवर विलक्षण प्रभुत्व लाभलेले शिक्षक अशा विविध भूमिकांमधून सरांना मी अनुभवीत गेलो.**

१९७७ ते १९८० या रमणबागेतील कालावधीत मी शिक्षक म्हणून काम करीत असतानाच लवळेकर सर उपमुख्याध्यापक म्हणून एच्.ए. स्कूल पिंपरी येथे रुजू झाले. पहिल्या अडीच तीन वर्षात डी.एड. श्रेणीवर काम करीत असताना पदवीधर श्रेणी मिळविण्यासाठी मी एच.ए.स्कूल जॉईन करावे असे सरांनी सुचविले. सरांची आज्ञा म्हणजे प्रेमाज्ञा आहे हे लक्षात घेऊन पिंपरीच्या एच्.ए. स्कूलमध्ये मी रुजू झालो. तेथे त्यांच्या मार्गदर्शनानुसार शिक्षकाची भूमिका पार पाडीत राहिलो. लवकरच त्यांच्या प्रेरणेतून व आशीर्वादातून पुनश्च रमणबागेत आलो. सरही रमणबागेत मुख्याध्यापक म्हणून आले. सरांशी माझा कौटुंबिक स्नेहही जडला. माझ्या विवाहानंतर माझी पत्नी विज्ञान व गणित विषयांची पदवीधर व प्रशिक्षित असल्याचे लक्षात आल्यानंतर तिला त्यांनी रजेच्या मुदतीत सेवेची संधी दिली. तिनेही ती संधी स्वीकारली.

मध्यंतरीच्या काळात आदरणीय किशाभाऊ पटवर्धन व लवळेकर सरांनी मंगळवार पेठेतील आर्थिक व सामाजिकदृष्ट्या दुर्लक्षित विद्यार्थ्यांसाठी 'स्व'–रूपवर्धिनीची स्थापना केली. या शाळेत शाळा सुटल्यानंतर आम्ही उभयतांनी शिक्षकांची भूमिका पार पाडावी असे सुचविले. पुनश्च एकवार ही प्रेमाज्ञा स्वीकारून उभयतांनी सायंकालीन वर्गांची 'स्व'–रूपवर्धिनीची जबाबदारी स्वीकारली. 'स्व'–रूपवर्धिनीत शिरीष पटवर्धन, किशाभाऊ पटवर्धन यांच्याशी अगदी सहजरीत्या स्नेहबंध जुळला.

'स्व'–रूपवर्धिनीत काम करताना आम्हा दोघांनाही किशाभाऊ पटवर्धन, लवळेकर सर यांचे अपूर्व मार्गदर्शन लाभले. दोघेही आमच्या घरी येत असत. कौटुंबिक, सामाजिक उत्तरदायित्व (होय, उत्तरदायित्व हा सरांचा आवडता शब्द) कसे पार पाडावे हे आम्ही बऱ्याच अंशी किशाभाऊ, राजाभाऊंकडून शिकलो. खूप अडचणी असायच्या. 'स्व'–रूपवर्धिनीला स्वतःची वास्तू नव्हती. कधी महानगरपालिकेची शाळा; कधी अगदी कमालीची साधी वास्तू असे करीत अखेर 'स्व'–रूपवर्धिनीची स्वतःची वास्तू उभी राहिली. किशाभाऊंनी अक्षरशः जिवाचे रान करून अनेक मान्यवर धनिकांचे सहकार्य मिळवून ही वास्तू उभी केली. रमणबागेचे, 'स्व'–रूपवर्धिनीचे अनेकानेक विद्यार्थी आज देशापरदेशात कार्यरत आहेत. आजही प्रत्यक्ष–अप्रत्यक्षरीत्या भेटल्यानंतर लवळेकर, किशाभाऊ यांचा जागर झाल्याशिवाय ते पुढे जातच नाहीत.

**पर्यटन हा लवळेकर सरांचा जिव्हाळ्याचा विषय. रमणबाग परिवारातील अनेक विद्यार्थी व शिक्षकांना त्यांनी राज्यात व इतरत्र सहलींच्या निमित्ताने निसर्ग, दुर्ग यांचे दर्शन घडविले.** एच्.ए. स्कूलमध्ये असताना मला आठवते ती सकाळ – प्रतापगडावरील शिवप्रभूंच्या पुतळ्यावर कोवळे ऊन पडले होते. सहलीत सहभागी झालेले विद्यार्थी, शिक्षक शिवप्रभूंच्या पुतळ्याजवळ लवळेकर सरांचा शब्दनूशब्द कर्णपुटांमध्ये साठवत होते. **त्या सोनेरी सकाळी सरांनी प्रतापगडावरचा रणसंग्राम असा काही मांडला की ऐकणारे आम्ही सर्व स्तिमित झालो. दुर्गांवर सरांचे अफाट प्रेम. तिथे गेल्यानंतर त्या–त्या ठिकाणचा इतिहास अप्रतिम शब्दांमध्ये ते मांडत असत.**

सरांचा आणखी एक आवडीचा विषय म्हणजे सणवार, व्रतवैकल्ये यांचे तत्कालीन संदर्भ आणि त्यांमागील

वैज्ञानिक सत्य उलगडून दाखविणे. दीप-अमावस्या कशासाठी हे सांगताना आजच्या काळात नेमके काय करायला हवे हेही ते आवर्जून सांगत. 'दीपज्योति नमोस्तुते' म्हणताना आपल्या घरातील विजेची कनेक्शन्स तपासली जावीत, ट्यूब, बल्ब स्वच्छ केले जावेत, वेळच्या वेळी दुरुस्त्या केल्या जाव्यात हेही ते आवर्जून सांगत.

त्यांनी रमणबागेत विद्यार्थी व शिक्षकांसाठी विविध विभाग नव्याने सुरू केले. आर्थिकदृष्ट्या मागे असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका सुरू केली. रमणबाग शिक्षक संघाला नवा आयाम दिला. विविध वक्त्यांना, कलाकारांना शिक्षक संघाच्या माध्यमातून निमंत्रित केले. त्यांचे विचार, त्यांची कला यांचे सादरीकरण केले. स्नेहसंमेलनाच्या काळात तर त्यांचा उत्साह शिगेला पोहोचलेला असायचा. स्नेहभोजनाच्या वेळी विद्यार्थी व शिक्षकांना आग्रहाने खाऊ घालणे त्यांना मनापासून आवडायचे.

रमणबागेचा संगीत विभाग समृद्ध व्हावा यासाठी त्यांनी कसून प्रयत्न केले. अजय पराडांसारख्या गुणवंत संगीतशिक्षकाची नेमणूक करून रमणबागेला एक नवीन संगीतायाम दिला. रमणबागेचा संगीत विभाग अमर केला.

अजून काय काय सांगू ? किती लिहू ? **लवळेकर सर ही न संपणारी सत्यकथा आहे.** ती माझ्या हृदयाच्या कुपीत तशीच राहू देत. सरांच्या स्मृतींना माझे व माझ्या कुटुंबियांचे साष्टांग दंडवत !

– मो. : ९४२०८६००२८

---

## भाऊ लवळेकर – एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व

**– सौ. अंजली शिंदीकर**

आम्ही जेव्हा १९७२-७३ मध्ये पुण्यात पद्मावतीला राहायला आलो, तेव्हा आम्हाला पुणे नवीन व खूप मोठे शहर वाटले होते. वडिलांच्या नोकरीमुळे आम्ही नाशिकहून पुण्याला आलो होतो. पद्मावतीला राहायला लागल्यावर हळूहळू ओळखी व्हायला लागल्या व त्यात लवळेकर परिवाराशी जरा जास्तच जवळीक वाढली. त्यांच्या दोन्ही मुली माझ्या अगदी जिवाभावाच्या मैत्रिणी असल्याने मी त्यांच्याच घरी जास्त असे. त्यावेळी जर भाऊ घरात असतील तर दरारा घरात पण जाणवायचा, पण कधीकधी भाऊसुद्धा आमच्या गप्पांमध्ये सहभागी होत असत.

रमणबाग शाळेमध्ये ते मुख्याध्यापक असताना गरीब मुलांसाठी त्यांनी रात्रीची अभ्यासिका सुरू केली होती. त्याचा लाभ त्या भागात राहणाऱ्या गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना झाला होता. रमणबाग शाळेचे नाव नावारूपाला येण्यात भाऊंचा खूप मोठा वाटा होता असेच मला वाटते. काही काळानंतर घरातील आम्ही सर्वजण '१० वी फ' हा सिनेमा पाहायला गेलो होतो. तेव्हा मला सतत भाऊच डोळ्यापुढे येत होते. त्यांच्याप्रमाणेच आपल्या सहकार नगर भागात राहणारे कै. ती. भिलवडकर सरांची पण सतत आठवण येत होती. हे सर्व आपल्या भाऊंनी पण केलेले प्रत्यक्षपणे आम्ही पाहिले होते. किंबहुना हा सिनेमा भाऊ किंवा भिलवडकर सरांसारख्या आदर्श शिक्षकांना डोळ्यापुढे ठेवूनच तयार केला आहे असे सारखे वाटत होते. त्यानंतर मी लवळेकर मावशींना भेटून त्यांना '१० वी फ' बद्दल सांगितले. त्यांनी पण 'आपल्या भाऊंनी असेच तर काम केले आहे' असे आवर्जून सांगितले तेव्हा खूप आनंद वाटला.

आता अगदी मजेशीर आठवण माझ्या मुलाबद्दल सांगाविशी वाटते आहे जेव्हा माझा मुलगा प्रसाद १२ वीला होता तेव्हा सतत सायन्स व गणिताचा क्लास व अभ्यास चालू असायचा. त्याने मराठी उच्च पातळीचा विषय घेतला होता. मी त्याला सारखी म्हणत असे की 'प्रसाद गणित व शास्त्रामध्ये उत्तम मार्क व इतर विषयांमध्ये नापास अशी वेळ येईल.' तेव्हा न राहवून मीच डिसेंबरमध्ये भाऊंकडे गेले तर मला पाहताच त्यांनी विचारले, 'प्रसादची १२ वी म्हणून आली आहेस का?' मी माझी तक्रार केली की, 'मराठी विषय घेऊ नकोस असे सांगितले तरी त्याने ऐकले नाही' असे सांगितल्यावर भाऊंनी माझीच कानउघाडणी केली व मग 'मी त्याचा अभ्यास करून घेईन, काळजी करू नकोस' असे सांगितले व फक्त ४-५ दिवस प्रसादला घरी अभ्यासाला बोलावले. खरोखर हाडाचा शिक्षक कसा असतो त्याचे मनोज्ञ दर्शन मला झाले. असे शिक्षक आमच्या आजूबाजूला होते हे मी माझे सद्भाग्य समजते.

# स्थितप्रज्ञ राजाभाऊ

**– प्रकाश माळी**

मी १९७९–८० साली टिळक कॉलेज ऑफ एज्युकेशन येथे B.Ed. चा अभ्यासक्रम पूर्ण करीत होतो. राहायला मी 'पुणे विद्यार्थी गृह', सदाशिव पेठ येथे सदाचार वसतिगृहात होतो. मी आठवड्यातून चार दिवस संध्याकाळी मंगळवार पेठेत रवीन्द्रनाथ टागोर विद्यानिकेतन येथे 'स्व'–रूपवर्धिनीत येत असे. तेव्हा मा. किशाभाऊ पटवर्धनांनी राजाभाऊंची ओळख करून दिली. मी सांगितले, 'माझे मूळ गाव तळोदे (जि. धुळे – तेव्हाचा; आता नंदुरबार). आदिवासी भाग. मातृभाषा अहिराणी – बहिणाबाई चौधरींची. मी शिक्षणासाठी घरून पळून आलो व पुणे विद्यार्थीगृहात राहून B.Ed. चा अभ्यासक्रम पूर्ण करीत आहे.'

राजाभाऊ मला म्हणाले, 'माळी, B.Ed. ची परीक्षा संपल्यानंतर मला भेटा. मे महिन्याच्या सुटीत शाळांमध्ये शिक्षक भरती होईल. तुमचा एक अर्ज व बायोडेटा – फोटोसहित मला आणून द्या. म्हणजे तुम्हाला मुलाखतीसाठी बोलावता येईल. मी पिंपरी येथे पेनिसिलीन फॅक्टरीच्या सेवक आवारात H.A.School येथे उपमुख्याध्यापक आहे. तुमचा इंग्रजी विषय असल्यामुळे मला विचार करता येईल.' मी अतिशय आनंदाने सर्व पूर्तता केली. काही दिवसांनी मला गव्हर्नमेंट लोन स्कॉलरशिप रु. ८५०/– मंजूर झाली व मला हिमालयात बद्रीनाथ–केदारनाथ येथे जाण्याची संधी मिळाली. राजाभाऊंना भेटल्यावर बद्रीनाथला जाण्याची माझी तीव्र इच्छा मी व्यक्त केली. ते शांतपणे म्हणाले, 'जा, खुशाल जा, आपण नोकरीचे आल्यावर बघू.' मी दीड महिना हिमालयात होतो. सर्वत्र नवीन शिक्षक भरून शाळा सुरू झाल्या होत्या. मी परत आल्यावर राजाभाऊंच्या शाळेत पार्ट–टाईम शिक्षक म्हणून रुजू झालो. शिक्षकांच्या सभेत राजाभाऊ बोलायचे. ते उत्तम वक्ते होते. 'साधी राहणी व उच्च विचारसरणी' हे त्यांच्या जीवनाचे सूत्र होते. राजाभाऊंच्या सहवासात त्यांचा मानसिक आधार वाटायचा व राजाभाऊ आपल्या पाठीशी कायम आहेत असा विश्वास वाटायचा. नंतर मी H.A.School, पिंपरी येथेच डी.एड. स्केलवर फुलटाईम शिक्षक झालो. मी १९८१ ते १९८३ अशी तीन वर्षे त्या शाळेत काम केले. B.Ed. स्केल मिळण्याची आशा धूसर होती. मी कायम शिक्षक झालो होतो. पुण्यात एका शाळेत B.Ed. स्केल मिळत होते. राजाभाऊंनी लगेच सांगितले, 'तुम्ही येथे राजीनामा देऊन जाऊ शकता, तुम्हाला पूर्ण स्वातंत्र्य आहे, तुम्ही बांधील नाही.'

एके दिवशी १९८३ साली शाळेत मला एक पत्र आले. ते राजाभाऊंच्या टेबलावर होते. त्यांनी ते मला दिले. माझ्या वडिलांच्या दुःखद निधनाची बातमी त्यात होती. त्यांनी माझ्या पाठीवर हात ठेवला. मी एका वर्गात जाऊन रिझल्टचे काम करीत बसलो. ते आले व मला म्हणाले, 'हातातील काम बाजूला ठेवा व ताबडतोब गावी जा' मी शाळेत रडलो नाही, पण गावी आल्यावर नातेवाईकांना भेटल्यावर अश्रूंना वाट मोकळी केली.

'स्व'–रूपवर्धिनीचे एक उन्हाळी शिबिर लोणावळ्याला आय.एन.एस.शिवाजीजवळ बालग्राममध्ये होते. तेथेही राजाभाऊंनी दोन दिवस उत्तम मार्गदर्शन केले. त्यांचा सहवास आनंददायी व अनुभवसंपन्न होता. त्यांनी म्हटलेले गीत अजूनही स्मरणात आहे. 'आम्ही बि (बी) घडलो तुम्ही बि (बी) घडाना'. त्यांचे निरोपाचे भाषण अतिशय अभ्यासू व भावनाप्रधान होते. वक्तशीरपणा, शिक्षकी पेशावर असीम निष्ठा, निर्भयपणा, प्रामाणिकपणा, शांत मनोवृत्ती हे सर्व एका स्थितप्रज्ञ योग्याचे सद्गुण त्यांच्या अंगी होते. राजाभाऊंच्या पुण्यस्मृतीस माझे शतशः प्रणाम ! त्यांच्या अंगी असलेले थोडे जरी गुण आपल्यात आले तरी आपलेही जीवन कृतार्थ होईल.

– मो. : ९७३०२३३३२४

❖❖❖

# कर्मयोगी

**– बद्री मूर्ती**

खरं म्हणजे माझा आणि राजाभाऊंचा परिचय संघपरिवारात फार उशिरा झाला. मी आधी पुणे जिल्हाच्या आणि नंतर पुणे महानगरच्या संघाच्या कामात आल्यामुळे महानगरातील कार्यक्रमात त्यांच्याशी बोलणे होत असे व त्यातूनच मार्गदर्शन मिळत असे.

मला अनेकदा राजाभाऊंच्या स्मित हास्यामधून रामदासजी कळसकरांचे दर्शन होत असे. असाध्य अशा रोगांनी पीडित असतानादेखील मी रामदासजींचे हास्य कधी लोप पावलेले पाहिले नाही. तशीच काहीशी परिस्थिती राजाभाऊंच्या बाबतीत होती. बरेच वर्ष मधुमेहानी पीडित असूनदेखील राजाभाऊंनी संघकामात कधी विश्रांती घेतली नाही. त्यांच्या चेहऱ्यावरचे स्मितहास्य ढळलेले आणि चेहरा चिंतित झाल्याचे मी कधी पाहिले नाही.

कुठल्याही कार्यक्रमात आल्यानंतर ओळख असो वा नसो, सर्व स्वयंसेवकांबरोबर मोकळेपणाने बोलणे, त्यांचा परिचय करून घेणे व त्यांची विचारपूस करणे ह्यात थोडासाही कृत्रिमपणा नव्हता. **अनेक स्वयंसेवकांना संघयात्रेपासून दूर जाऊ न देता या आनंदयात्रेत सहभागी करून घेण्यात त्यांचा हातखंडा होता.**

काही कारणांनी संघापासून दूर गेलेल्या स्वयंसेवकांसाठी त्यांच्या बौद्धिक वर्गात ते एक अप्रतिम उदाहरण देत असत. ते या निमित्ताने येथे विदित केलेच पाहिजे– 'आमच्या घरी देवघरामध्ये सतत एक नंदादीप तेवत असे. त्या नंदादीपाजवळच एक खडीसाखरेचा खडा ठेवलेला असे. नंदादीप विझायला लागला की आमची आजी त्या खडीसाखरेच्या खड्याने ती वात नीट करीत असे आणि मग परत तो नंदादीप पूर्वीसारखा तेवत असे.' मी माझ्या आजीला विचारीत असे, 'आजी तो दिवा खडिसाखरेच्या खड्याने का नीट करायचा? हाताने का नाही?' त्यावर आजीचे उत्तर असे, 'बाळा, तो देवाजवळ लावलेला दिवा आहे, त्यामुळे आपल्या हाताने करण्यापेक्षा खडीसाखरेच्या माधुर्याने हळुवार नीट केला तर देवालाही बरे वाटते आणि दिवाही नीट पेटता राहतो.' मलाही आजीचे उत्तर पटत असे आणि मीही प्रश्न विचारणे थांबवत असे. संघापासून काहीसे दूर गेलेल्या संघस्वयंसेवकांच्या मनातील नंदादीप तेवण्यासाठी प्रचारक आणि असंख्य कार्यकर्त्यांच्या रूपातील खडीसाखरेचे खडे अव्याहत कार्य करताहेत असे वाटते. अशा छोट्या–छोट्या गोष्टीरूप उदाहरणांनी राजाभाऊंचा बौद्धिक वर्ग भरलेला असे.

कार्यकर्त्यांशी हृदयाने बोलणारा मार्गदर्शक हा राजाभाऊंचा समर्पक परिचय होईल. एखादी गोष्ट पटली नाही तरी ती मांडत असताना आपण कोणाचे मन दुखावत नाही ना याचा त्यांच्या बोलण्यात वारंवार प्रत्यय येत असे. **'मतभेद झाले तरी चालतील पण मनभेद होता कामा नये' याचं चालतं–बोलतं उदाहरण म्हणजे राजाभाऊ होते.**

एक विद्यार्थीप्रिय शिक्षक, एक शिक्षकप्रिय प्राचार्य, एका शिक्षण संस्थेचे संचालक, 'स्व'–रूपवर्धिनीसारख्या एका नामवंत संस्थेचे पालक, मार्गदर्शक आणि शेवटच्या क्षणापर्यंत 'स्व'–रूपवर्धिनीवर अतोनात प्रेम करणारे असे हाडाचे कार्यकर्ते. अशा अनेक जबाबदाऱ्या राजाभाऊंनी अतिशय लीलया सांभाळल्या आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे हे सगळे करत असताना त्यांचे पाय जमिनीवरच राहिले.

संघाच्या आदर्श स्वयंसेवकाचे जीवन कसे असावे आणि विविध जबाबदाऱ्या सांभाळीत असताना आपल्या मूळ नीतीमूल्यांचे आणि आपल्यातील नम्र व चारित्र्यवान स्वयंसेवकत्वाचे भान कसे ठेवले पाहिजे याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे राजाभाऊ होते.

राजाभाऊंमधील त्या कर्मयोग्याला शतश: प्रणाम!

– मो. : ९८२२८४१२२५

❖❖❖

## समजून घेणारे आणि समजावून सांगणारे लवळेकर सर

**– सौ. विजया बोकील**

काही व्यक्ती आपल्या आयुष्यात अशा असतात की, त्यांच्याबद्दलच्या भावना किंवा आठवणी शब्दात व्यक्त करणे अवघड असते. कारण त्या आपल्या मनात कायमच घर करून राहिलेल्या असतात. लवळेकर सरांच्या बाबत असेच म्हणावे लागेल.

माझी शाळेत (रमणबागेत) नोकरीसाठी मुलाखत झाली व लगेच रुजू होण्याबाबत सांगण्यात आले. त्यावेळी शाळेत B.Ed. व D.Ed. झालेल्या शिक्षकांचा निश्चित रेशो होता. तो योग्य तऱ्हेने पूर्ण न झाल्याने मला D.Ed. स्केलवर नोकरी स्वीकारावी लागली. दुसऱ्याच दिवशी दुसऱ्या शाळेत मला B.Sc. B.Ed. च्या स्केलवर बोलावणे आले. तेव्हा मी सरांना विचारले. परंतु त्या शाळेतील वातावरण योग्य नसल्याने भाऊंनी मला इथेच राहावे, थोडे नुकसान झाले तरी चालेल, इथले वातावरण चांगले आहे; त्यामुळे मी कोणत्याही दडपणाशिवाय व शांतपणे इथे नोकरी करू शकेन असे समजावले व मी पण आनंदाने ते स्वीकारले. त्यावेळचे रमणबागेतील वातावरण खरोखर खूपच चांगले होते.

पहिल्याच दिवशी पहिलाच तास जुन्या ११वी फ च्या वर्गावर होता. ती जुन्या ११ वी ची शेवटचीच बॅच होती. वर्गातील मुले वयाने बरीच मोठी होती आणि पहिलाच तास शास्त्राचा. त्यामुळे मला थोडे दडपण आले होते. परंतु वर्गात जाऊन थोडी धाकधूक मनात ठेवूनच शिकवण्यास सुरुवात केली. पण वर्ग अगदी शांत. कोणाचाही आवाज नाही. त्यामुळे मी स्वत:वरच खूष होऊन तास संपल्यावर बाहेर पडले. पाहिले तेव्हा सर खिडकीजवळ उभे होते. त्यामुळे वर्ग जास्तच शांत होता. ह्यानंतर वर्गात शिकवताना कधीच अडचण आली नाही. **अशा प्रकारे सर नकळत प्रत्येकाला मदत करत असत.**

शाळेत लागल्यावर सुरुवातीलाच शासकीय कर्मचाऱ्यांचा ७० दिवसांचा संप झाला होता. सुरुवातीला आम्ही नवीन लागलेले सर्व शिक्षक संपात सामील झालो. पण जेव्हा असे लक्षात आले की आम्हाला संपात सामील न होता शाळेत जाणे आवश्यक आहे, तेव्हा त्यांनी घरी निरोप पाठवून दुसऱ्या दिवसापासून आम्हाला शाळेत रुजू व्हावयास सांगितले व जर मुख्याध्यापकांनी सांगितले तर तुमचे विषय तुम्ही १०वीचे तास घेऊन शिकवा, असा निरोप पण दिला. अशा तऱ्हेने आमची काळजी घेतली गेली.

माझ्या मुलाला B.A.M.&S. च्या प्रवेशासाठी नाशिकला बोलावल्याचा फोन शाळेत आला होता. सरांनी लगेच वर्गावरून बोलावून घेतले; फोनचा निरोप दिला व ऑफीसमधूनच मिस्टरांना फोन करून सांगावयास लावले आणि 'उद्यापासून तुमची तीन दिवसांची रजा मंजूर केली आहे. तुम्ही जाऊन या, कोणतीही अडचण आली तर फोन करा आणि आत्ता ताबडतोब घरी जाऊन पुढची तयारी करा' असे सांगितले.

शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये पण सरांच्याबद्दल आदरयुक्त भीती व आत्मीयता होती. विद्यार्थ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना मदत करण्याची पद्धत पण खूपच चांगली होती. चांगले गुण मिळवल्यानंतर त्यांचे भरपूर कौतुक करतील; पण म्हणून त्यांना बेशिस्तीने वागण्याची परवानगी नव्हती. तसे झाले तर शांतपणे त्यांना समज देत असत. **कमी गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना न रागावता, त्यांना कमी न लेखता, त्यांच्या अडचणी समजून घेऊन त्या सोडवण्याचा प्रयत्न करणे व अभ्यास करण्याचे महत्त्व पटवून सांगण्याची त्यांची हातोटी काही वेगळीच होती.**

**शिक्षकांना तर त्यांनी कधीच आपण सुपरवायझर आहोत किंवा मुख्याध्यापक आहोत म्हणून वागणूक दिली नाही.** सर्वांशीच ते आपुलकीने वागत व घरातीलच एक घटक आहे अशी वागणूक देत असत. भले कोणाचे काही चुकले तर आपण सर्वांनीच त्यांना समजून घेतले पाहिजे असे सांगणार आणि त्या व्यक्तीला अत्यंत शांतपणे त्यांची चूक

समजावून सांगून चूक कशी सुधारावी हे सुचवणार. मग तो शिकविण्याचा गोंधळ असो, पेपर तपासण्यातला असो, वह्या तपासण्यातला असो, प्रयोगाविषयीचा असो, कॅटलॉगचा हिशोब असो, नाहीतर हजेरीच्या दिवसांचा गोंधळ असो ! तो त्या व्यक्तीला समजावून सांगणार आणि दुरुस्ती करवून घेणार. पण कोठेही त्या व्यक्तीला त्याबद्दल कमीपणा वाटेल अशी वागणूक त्यांनी कधीच दिली नाही. हे केवळ सरांनीच करावे. कारण **त्यासाठी लागणारा मनाचा मोठेपणा, एकमेकांना सांभाळून घेण्याची पद्धत ही फक्त त्यांच्याजवळच होती. म्हणूनच तर 'रमणबाग' हे एक कुटुंब आहे असे वाटायचे.** त्यावेळचे सर्वच शिक्षक खरोखरच एकमेकांची मने सांभाळत असत.

त्यांनी एक दिवस शाळा सुटल्यावर ऑफिसमध्ये बोलावून माझ्यापुढे एक सातवीचा गणिताचा पेपरचा तपासलेला गठ्ठा ठेवला व 'मला हा उद्या सकाळपर्यंत हवा आहे' असे सांगितले. 'ह्याविषयी कोणालाही कळता कामा नये.' असंही सांगितलं. रात्रभर जागून मी गठ्ठा दुरुस्त करून दिला. ज्यांनी गठ्ठा तपासला त्यात खूपच चुका होत्या. त्यामुळे सर्वच गठ्ठा पुन्हा तपासल्यासारखाच तपासावा लागला. **पण ज्यांचा गठ्ठा होता त्यांना व मलाही यासंबंधात काहीच माहीत नव्हते. एखाद्याची समस्या त्याला न दुखावता कशी सोडवावी हे सरांकडून शिकण्यासारखे होते.**

**असे होते समजून घेणारे आणि (कृतीने) समजावून सांगणारे लवळेकर सर !**

❖❖❖

---

प्रिय प्रसाद व सौ. अनघा,

रमणबागेचे मुख्याध्यापक म्हणून काम करीत असतानाच संघकार्यातील मोठी मोठी दायित्व राजाभाऊंनी सांभाळली. निवृत्तीनंतर तर मनाला दुसरे व्यवधानच नव्हते. आयुष्याचं उत्तरायणही त्यांनी संघसमर्पित केलं. अशी कितीतरी व्यक्तिमत्त्व आणि जीवनं आहेत म्हणून संपूर्ण जगात, अनेक देशात संघकार्य वर्धिष्णू आहे. तुम्ही दोघेही त्यांचा वारसा आपापल्या पद्धतीने पुढे नेत आहात याचं समाधान त्यांना खात्रीने असेल. आदरणीय राजाभाऊंना सप्रेम श्रद्धांजली

**– व. सी. ताम्हनकर**

लवळेकर सर आज जरी आपल्यात नसले तरी त्यांनी देलेले संस्कार, लावलेली शिस्त यातून आपण घडलो. त्यांच्या या देणगीतूनच आपले जीवन आकाराला आले याची जाणीव सदैव राहील. लवळेकर सरांचे त्यागाधिष्ठीत व्यक्तिमत्त्व चिरंतन स्मरणात राहील. ईश्वर त्यांना सद्गती देवो.

**– विश्वनाथ मिराशी**

लवळेकर सर खरोखरीच आदर्श शिक्षक होते. **मराठी हिंदी विषयांचे क्रमिक पुस्तक शिकवता शिकवता लवळेकर सरांनी आयुष्याला वळण लावणाऱ्या अनेक गोष्टी शिकविल्या. व्यक्तिगत माझ्या बाबतीत तर लवळेकर सरांमुळे माझा आत्मविश्वास वाढला.** सरांनी एकदा वर्गामध्ये परीक्षेच्या पेपरमध्ये मी लिहिलेला 'क्रिकेटचे वेड' हा निबंध सर्वांसमोर वाचून दाखवला आणि माझे कौतुक करीत म्हणाले की 'परीक्षेसारख्या ताण वाटणाऱ्या वातावरणातही निबंध किती छान लिहिता येतो याचे हे उत्तम उदाहरण आहे.' **ही घटना तशी खूप छोटी होती पण त्या एका गोष्टीमुळे माझा आत्मविश्वास वाढला.**

**– श्रीरंग गोखले**

## मतभिन्नतेतही आत्मीयता जपणारे राजाभाऊ !

**– डॉ. अरविंद भोमे**

मी रमणबागेचा विद्यार्थी म्हणून १९६५ ते १९७२ मध्ये राजाभाऊ लवळेकर सरांच्या संपर्कात आलो. त्यातही शेवटची तीन–चार वर्षे ते हिंदीचे शिक्षक म्हणून आमच्या वर्गाला शिकवत होते.

'नाखून क्यों बढते हैं ।' हा त्यांनी शिकवलेला धडा (मैथिलीशरण गुप्त किंवा हजारीप्रसाद द्विवेदी – नक्की आठवत नाही) – मुन्शी प्रेमचंदची चुरस कथा – दो बांके हे अविस्मरणीय शिक्षण होते. शिक्षक म्हणून त्यांची समरसता, हिंदीची सौंदर्यस्थळे दाखवण्याची मार्मिकता, रसिकता आजही सुखद वाटते.

व्यक्तिगत पातळीवर राजाभाऊंनी मला भरघोस मदत केली. एका स्नेह्याच्या खोलीत अभ्यासासाठी राहण्याची सोय काही वर्षे करून दिली. याच काळात आज चिखलगावात 'लोकसाधना प्रतिष्ठानचे' काम करणारा राजा दांडेकर राजाभाऊंच्यामुळेच नंतर दाखल झाला. आयुष्यभराचा मित्र झाला.

**माणूस म्हणून घडण्याचे काही विशिष्ट दिवस असतात. माझ्या अशा काळात राजाभाऊ लवळेकर यांनी मला मार्गदर्शन केले असे म्हटले तर वावगे होणार नाही.** मी तसा बंडखोर विचारसरणीचा होतो आणि शिक्षक–विद्यार्थी नाते असताना व संपल्यानंतरसुद्धा – वयातील अंतर लक्षात घेऊनही – राजाभाऊंशी कधी मतभिन्नता असली तरी चर्चा, संवाद अगदी वादही घालताना मी संकोचत नसे. **कारण वरून कितीही करारी दिसले, भासले तरी त्यांची आत्मीयता सहज जाणवणारी होती. विसंवादी सूरही संयमाने ऐकण्याची त्यांची हातोटी आम्हाला आजही पुरेशी शिकता आलेली नाही ह्यातच त्यांचं मोठेपण सामावलेलं आहे.**

राजाभाऊंनी कित्येकांना रांगेला लावलं. कित्येकांना अडीअडचणीला मदत केली हे मी भरपूर ऐकलं आहे, प्रत्यक्ष पाहिलं आहे आणि हे करताना त्यांचा निरपेक्ष, निखळ स्वभाव इतरांनीही दाखवून दिला आहे. मीही प्रत्यक्ष अनुभवला आहे.

त्यांच्या एका दूरस्थ नातेवाईकासाठी त्यांनी केलेली जुळवाजुळवही पाहिली आहे व त्यांच्या अनेक शिक्षक सहकाऱ्यांसाठी त्यांनी केलेली धडपडही मी पाहिली आहे.

मी वैद्यकीय शिक्षणात गुरफटल्यानंतर आमची भेट दुरापास्तच झाली होती. पण जेव्हा कधी ती झाली तेव्हा मधली अनेक वर्षे लीलया विरघळून जाऊन जणू काही **आपण नेहमीच भेटतो अशा आत्मीयतेने बोलणे, वागणे आणि त्यात कुठलाही आविर्भाव नाही, कृत्रिमता नाही – हे राजाभाऊ लवळेकरांचे वैशिष्ट्य होते.**

मधुमेहाने दृष्टी पूर्णपणे गेल्यावर जेव्हा एका शिक्षकांच्या स्नेहमेळाव्यात ते आले तेव्हा फार न बोलताही बरेच काही बोलून गेले. ती माझी त्यांची शेवटची भेट.

आजही प्रेमचंदच्या दो बांकेमधला लठैत खांद्यावर काठी टाकून 'मुल्ला बहुत स्वांग भरयो...' असे म्हणतोय असा कधीतरी भास होतो आणि मग 'नाखून मनुष्यकी स्वाभाविक सुप्त पशुताकी निशानी है' असं खणखणीत आवाजात सांगणारे आमचे कृ. गो. लवळेकर सर आणि अनेकांचे राजाभाऊ – धारदार नाक, थोडेसे उभे राहणारे पांढरे केस, चष्म्यामागून डोकावणारे भेदक डोळे, पांढरे स्वच्छ धोतर, हातातला गंडा, मलमलचा नेहरु शर्ट–ही मूर्ती नजरेसमोर येते आणि पुन्हा एकदा शाळकरी बनून समोरच्या बाकड्यावर बसावेसे वाटते.

निवृत्तीनंतर तरुण भारत, 'स्व'–रूपवर्धिनी इत्यादी संस्थांमधील त्यांचे काम कर्णोपकर्णी समजत होतेच. क्वचित अकस्मात उभ्या–उभ्या भेटही होत होती. एकाच वेळी दरारा, आत्मीयता, निखळ स्नेह, मोजका परखड सवाल अशा अनेक गोष्टी मोजक्या क्षणात अनुभवणे हे मला वाटते राजाभाऊंच्या संपर्कात आलेल्या बहुतेकांना जाणवले असणार.

राजाभाऊंच्या स्मृतिग्रंथासाठी माझी ही आठवण – आदरांजली व 'स्व'–रूपवर्धिनी व कौशल्यवर्धन फौंडेशनला शुभेच्छा.

– मो. : ९३७१०२६२१६, arvindbhome@yahoo.com

## आदर्श व्यक्तिमत्त्व

**– नंदकुमार नारायण कानडे**

**'मान ताठ छाती पुढे'**

साधारणपणे १९६४–६५ मधील गोष्ट आहे. मी वडिलांच्याबरोबर बाहेर फिरतीवर असल्यामुळे वर्षातील एखादा महिना पुण्यात असायचो. अशाच एका सुट्टीत वरील वर्षात मी घरी असताना एक पायजमा झब्यामधील उंच गृहस्थ आमच्याकडे आले आणि माझ्याकडे पाहून त्यांनी वरील वाक्य उच्चारले. मला काहीच कळेना. कारण मी त्यांना ओळखत नव्हतो. मी फक्त त्यांच्याकडे पहात राहिलो. 'अरे असा पाहतोस काय ? तुझे वडील संघात शारीरिक शिक्षण प्रमुख असताना ही त्यांची आवडती आज्ञा होती.' ही माझी राजाभाऊंची पहिली भेट. **त्यानंतर त्यांनी ज्या आस्थेने आणि आपुलकीने माझी चौकशी केली त्यामुळे ते नेहमी माझ्या लक्षात राहिले.**

यानंतरची माझी आणि राजाभाऊंची भेट रमणबाग शाळेमध्ये झाली. माझा मामेभाऊ रमणबागेत शिकत असल्यामुळे एकदा त्याच्याबरोबर सरांच्या तासाला बसलो होतो. त्यावेळी सहजपणे दुसऱ्या शाळेत वर्गात जाऊन बसणे शिष्टसंमत नव्हते म्हणून सरांनी चौकशी करून 'आधी परवानगी न घेता कसा काय आलास ?' असे विचारून मला घाबरवून टाकले होते. परंतु वर्गात पूर्णवेळ बसून देऊन नंतर काय कळले याचीही त्यांनी खातरजमा करून घेतली आणि जे कळले ते दुसऱ्या दिवशी लिहून आण असेही बजावले. **यामुळे नियम मोडला म्हणून रागावूनसुद्धा शिकवण्याची त्यांची तळमळ आणि हातोटी मला अनुभवाला मिळाली.**

**एका मित्राकडून ऐकलेली एक हकीगतसुद्धा राजाभाऊंची शिक्षणासाठी मदत करण्याची वृत्तीही दर्शविते.** राजाभाऊंच्या एका स्नेह्याच्या पत्नीला कॉलेजमध्ये शिक्षण घेण्याची इच्छा होती. त्या काळात महिलांनी फार शिकण्याची आवश्यकता आणि पद्धतही नव्हती आणि घरूनच शिक्षणाला विरोध असल्यामुळे वहिनींची फारच कुचंबणा होत आहे हे राजाभाऊंच्या लक्षात आले. यावर राजाभाऊंनी वहिनींना विचारले, 'तुम्ही माझ्या बहिणीबरोबर शिकण्यासाठी का जात नाही ?' असे सगळ्यांसमोर विचारून त्यांच्या पुढील शिक्षणाची व्यवस्था करून दिली आणि त्याबरोबरच त्यांना पुढेही काही अडचण येत नाही ना अशी काळजी घेतली. यावरून प्रत्येकानी शिक्षण घेतलेच पाहिजे असा त्यांचा आग्रह दिसून येतो. असाच आणखी एक प्रसंग माझ्या मनावर कोरला गेलेला आहे ज्यामध्ये त्यांची विनम्रता आणि मनाचा मोठेपणा जाणवतो. साधारणपणे १९९० मधील हकीगत. आमच्या घरी नानांनी– म्हणजे माझे वडील नारायणराव कानडे यांनी–३०–३५ प्रचारकांना बोलाविले होते. त्यांच्याबरोबर चर्चा/गप्पागोष्टी चालू असतानाच राजाभाऊ लवळेकर आले आणि त्यांनीही गप्पागोष्टींमध्ये भाग घेतला. प्रचारकांमध्ये निम्म्याहून जास्त जण राजाभाऊंच्यापेक्षा वयाने बरेच लहान होते. नंतर अल्पोपहार/चहाच्या वेळी माझ्याबरोबर स्वतः राजाभाऊंनी डिशेस आणि कपबश्या द्यावयास सुरुवात केली. बहुतेकांनी 'आम्ही घेतो' असे म्हटले, पण राजाभाऊंनी त्यांना सांगितले, 'जे मला काम करता आले नाही ते तुम्ही करता आहात त्यामुळे तुमच्यासाठी काही करायला मिळाले तर मला आनंदच आहे.' किती हा मनाचा मोठेपणा !

राजाभाऊंच्या बरोबर ज्ञान प्रबोधिनीबद्दल एकदा/दोनदाच बोलायचा प्रसंग आला. परंतु मला राजाभाऊ अनुभवायला मिळाले ते आमच्या घरी होणाऱ्या बैठकींच्या मार्फतच. **एखादा विषय घेतला की तडीला नेईपर्यंत त्याचा पाठपुरावा करावयाचा ही त्यांची खासियत होती.** कामाची जबाबदारी दुसऱ्या कोणाकडे दिलेली असली तरी त्याचा मागोवा घेत राहणे आणि ते काम पूर्ण करण्यासाठी येणाऱ्या अडचणी सोडवत, काम यशस्वी झाल्यावर थांबणे ही त्यांची कार्यशैली मला भावली. अशा ऋषीतुल्य व्यक्तीला ही माझी आदरांजली.

– मो. : ९९२२९४४९७५

❖❖❖

# लवळेकर सर.... एक श्रद्धास्थान

**– अजय पराड**

साल १९८५ – या वर्षीच्या १ ऑगस्टला माझी नाळ रमणबागेशी जोडली गेली. संगीतशिक्षकच व्हायचे ठरविले होते आणि मनासारखे विद्यार्थी, सहकारी शिक्षक आणि मुख्याध्यापक म्हणून लवळेकर सर मिळाले होते.

दोन महिने व्यवस्थित चालू होते. सरांनी मला मुख्याध्यापक खोलीत बोलावून घेतलं आणि सांगितलं, 'तुमच्या संगीतशिक्षक पदाकरिता जिल्हा परिषदेकडून अर्धवेळ मान्यता आली आहे. पण तुम्ही बी.कॉम आहात म्हणून जनता सह. बँकेत तुमच्याकरिता एक वर्षासाठी सेवेत रुजू करून घेण्याची मंजुरी आणली आहे. सकाळ-संध्याकाळ बँकेत व दुपारी अर्धवेळ रमणबागेत संगीत शिक्षक म्हणून एक वर्ष काम करा आणि एक वर्षानंतर पूर्णवेळ संगीत शिक्षकाची मान्यता मिळेल. वर्षानंतर बँक की शाळा हेही तुम्ही ठरवून सांगा.' मी सरांना तिथेच सांगितले, 'मला बँक नको.' एक वर्ष अर्धवेळ संगीतशिक्षक म्हणून काम करीन. माझं कशाही परिस्थितीत नुकसान होऊ द्यायचं नाही म्हणून त्यांनी मला दोन पर्याय दिले. पण माझ्या निर्णयामुळे आमचं नातं खूप दृढ झालं.

मला काही महिन्यांनी कळले की मी शाळेत मुलाखतीसाठी आलो होतो तेव्हा सरांची नात्यातली जवळची मुलगीदेखील माझ्याबरोबर मुलाखतीसाठी आली होती. पण तरीही त्यांनी माझी निवड केली होती. तोपर्यंत सरांशी मोकळेपणाचे नाते निर्माण झाले होते. मीच त्यांना विचारले तेव्हा ते म्हणाले, 'कला विषयासाठी मुलांमध्ये मोकळेपणाने वावरणारा, रमणारा तसेच गरजेशिवाय अधिक वेळ देण्यासाठी पुरुष शिक्षकच योग्य असे वाटले म्हणून निवड केली'. खरंच, त्यांनी माझे विद्यार्थ्यांबरोबर कायमचे मैत्रीचे नाते जोडून दिले होते.

कधी-कधी वह्या आणल्या नाहीत म्हणून काही मुलांना मी वर्गाबाहेर उभे करायचो. सर राऊंड घेत असताना त्या मुलांना शांतपणे वर्गात पाठवायचे. 'संगीत विषय हा मुलांना निखळ आनंद देण्याचा विषय आहे. त्यासाठी तांत्रिक बाबी मधे आणून त्यांना त्यापासून वंचित करू नका.' हा त्यांचा सल्ला मला आयुष्यभर मार्गदर्शक ठरला. शालेय उपक्रमात तसेच अनेक स्पर्धांसाठी विद्यार्थ्यांचा सहभाग असे आणि विद्यार्थी भरपूर यशही मिळवत असत. **कित्येक वेळा सर प्रेरणादायी कविता मला देत असत. त्या जास्तीत-जास्त समूहामध्ये म्हटल्या जाव्यात याचा आग्रहदेखील करीत. कवितांकडे बघण्याचा साहित्यिक दृष्टिकोन व त्यातून शब्दांची आशयघनता लक्षात घेण्याची मला खूप चांगली सवय लागली.** कवितांना स्वर-साज चढविताना, कविता समजून घेतल्याने एक चांगली पार्श्वभूमी तयार होत असे.

रमणबागेमध्ये दिनविशेष कार्यक्रमांतर्गत अनेक मान्यवर वक्ते बोलावले जात. सर्वच कार्यक्रमांमध्ये (ईशस्तवन वा स्वागतगीतापेक्षा) विषयसंदर्भातील एखाद्या गीताने कार्यक्रमाची सुरुवात व्हायची. पुढील कार्यक्रमासाठी गीत पूरक असे आणि मग त्याच गीतातील एखादी ओळ घेऊन सर प्रस्तावना करण्यास सुरुवात करीत. त्यांची अनेक प्रास्ताविक निवेदने आम्हाला ऐकायला मिळाली, खूप अर्थपूर्ण असत ती. प्रमुख वक्त्यांना बोलावलेले असायचे पण सरांच्या प्रस्तावनेत इतकी पूरक माहिती असे की वक्त्यांच्या भाषणाचे विद्यार्थ्यांना पूर्ण आकलन होत असे. १९८५ व ८६ या दोन वर्षातील कालावधीत मला त्यांचा मुख्याध्यापक नात्याने दीड वर्ष सहवास मिळाला. परंतु ही एक सुरुवात होती. रमणबागेअगोदर मी वेगवेगळ्या शाळांमधून तात्पुरत्या स्वरूपाची खूप कामे केली होती. तसेच हार्मोनियमवादक व संगीतकार या नात्याने बाहेरील संगीतक्षेत्रात मला अनेक नवनवीन संधी व अनुभव मिळत होते. त्यामुळे रमणबागेतील विद्यार्थ्यांवर वैयक्तिक, सामूहिक अशा विविध स्तरांवर प्रयोग करता आले. यात लवळेकर सरांनी वेळोवेळी प्रशासक, मार्गदर्शक नात्याने प्रोत्साहन दिले, तसेच **माझ्या खाजगी आयुष्यातदेखील वडीलकीच्या नात्याने सल्ले दिले, मार्गदर्शन केले.**

२००० साली वंदेमातरम् गीताला १२५ वर्षेपूर्ण झाली. त्यानिमित्ताने नेहरु स्टेडियमवर मोठा सोहळा झाला. ६५ शाळांमधील ११००० विद्यार्थ्यांचे, संपूर्ण वंदेमातरमूला नवीन चाल देऊन, मी हे गीत सादर केले होते. त्यावेळी

लवळेकर सरांनी या राष्ट्रीय कार्याला भरभरून आशीर्वाद दिले. त्यांना माझी निवड सार्थकी झाल्यासारखे निश्चितच वाटले असेल.

प्रत्येकाने स्वतःच्या कार्यात प्रामाणिक व सातत्यपूर्ण असावे ह्यासाठी सर स्वतःबरोबर समाजालाही घेत असत. त्यांची शैक्षणिक, सामाजिक कार्याची तळमळ मला पुढे कितीतरी वर्षे भावत राहिली. स्वतःच्या कृतीवर, कार्यावर विश्वास ठेवून त्यात सातत्य राखले पाहिजे, त्यामुळे सर्व गोष्टी सकारात्मकच घडून येतात. **कवी नीरजांची एक कविता मला या आशयाजवळ नेऊन ठेवते,** आँधियाँ चाहे उठाओ, बिजलियाँ चाहे गिराओ ।

जल गया है दीप तो अंधियार ढलकरही रहेगा । दीप कैसा भी हो, कहीं भी हो, सूर्यका अवतार है वो ।

**लवळेकर सर समईतल्या सातत्यपूर्ण जळणाऱ्या दीपासारखेच होते, पण सूर्याचे अवतारही होते.** माझा त्यांना श्रद्धापूर्वक नमस्कार ! मो. : ९९२२०६२२५३

❖❖❖

## श्री. राजाभाऊ लवळेकर

**– सदानंद भागवत**

१९५४ सालच्या नाताळच्या सुट्टीत पुणे शहरातील तरुण बालांचे हिवाळी शिबिर होते. त्या शिबिराची तयारी आमच्या हरिहरेश्वर सायम् शाखेत राजाभाऊ करून घेत होते. सर्व बालांचा गणवेश पूर्ण आहे की नाही, तो उत्तम प्रकारे कसा घालायचा, शर्ट, पँटची इस्त्री, बालांचा त्या वेळचा कापडी लाल पट्टा, कॅनव्हासचे बूट, काळी टोपी कशी घालायची याची माहिती देत होते. चर्तुव्युह, युगव्युह, गणसमतेचा शाखेवर सराव करून घेत होते. शिबिरातील सूर्यनमस्कार, खेळांच्या स्पर्धा, पद्याचा सराव करून घेत होते. शिबिरातील रात्रीच्या रंजनाच्या कार्यक्रमासाठी आम्हा बालांकडून एक शिवाजी महाराजांच्या जीवनावरील छोटीशी नाटुकली करून घेत होते. शिवाजी महाराज आणि मावळ्यांसाठी त्यांनी थोडीशी ड्रेपरीही आणली होती. रात्री १० ते १२ च्या रक्षणाबद्दलही सांगत होते. एवढ्यावर न थांबता संघाच्या शिबिराच्या प्रतिकृतीचा किल्ला, मोतीबागेतील जुन्या छोट्या शेडमध्ये बालांकडून, तरुणांकडून त्यांनी तयार करून घेतला होता. दिवाळीच्या वेळेस असा किल्ला केला होता. त्याच्यात शाडू मातीतून स्वयंसेवक, अधिकारी, घोष विभाग, ध्वज आदि गोष्टी करवून घेतल्या होत्या. त्या किल्ल्यांचे, प्रतिकृतीचे वर्णन करायला शाखेतील एका तरुणाकडे काम दिले होते. या किल्ल्यातील चित्रे तयार करण्याचे शिक्षण एका मातीकाम/मूर्तीकाम करणाऱ्या शिक्षकामार्फत केले होते. शाखेचे एक छोटेसे मासिक बालांकडून करवून घेतले होते. त्यावर काही बालांनी चित्रे काढली होती. अन्य बालांनी छोटे छोटे लेखही लिहिले होते. **या शिबिराच्या निमित्ताने शाखेवर शिकवलेल्या आट्यापाट्या, लगोरी अशा निरनिराळ्या खेळांमुळे तसेच त्यांनी सांगितलेल्या गोष्टींमुळे, आम्हाला सर्वप्रथम शाखेचे वेड लावण्याचे काम राजाभाऊंनी केले.** आमच्या शाखेत राजाभाऊ एकच वर्ष होते. पण ते वर्ष कधीही विसरता येणार नाही.

कोणतेही अवघड काम, एका प्रकारचे आव्हान असावे आणि ते राजाभाऊंनी स्वीकारावे असेच घडत होते. दै. तरुण भारतच्या अत्यंत अवघड परिस्थितीत, आर्थिक अडचणी, बँकांची कर्ज, कामगार युनियनचा त्रास, वाढती स्पर्धा असे असताना राजाभाऊंनी काही वर्षे व्यवस्थापनात राहून आणि शेवटी शेवटी संपादकाची जबाबदारी घेऊनही परिस्थितीशी टक्कर देण्याचा प्रयत्न केला. पण दुर्दैवाने यश मिळू शकले नाही. तरुण भारत बंद झाल्यावर अंदाजे १४–१५ वर्षांनी तरुण भारतचे कर्ज संपूर्ण व्याजासह फिटले गेले हे सांगायला मी जेव्हा राजाभाऊंकडे गेलो तेव्हा त्यांच्यावरील मानसिक दडपण दूर झाले. खरे म्हणजे कर्ज राजाभाऊंचे वैयक्तिक नव्हते, तरीपण त्याचे दडपण त्यांनी घेतले होते. त्यांना सांगितल्यावर, त्यांनी लगेच कै. वसंतराव कानिटकरांनाही जाऊन सांग असे सांगितले. त्या दोघांकडे बँकेमार्फत No dues cetificate दिल्यावर दोघांना खूप हायसे वाटले.



# कुटुंबियांचे आधारवड

## मनोगत

**– कुसुम कृष्णाजी लवळेकर**

माझं लग्न ठरलं आणि भाऊंबरोबर पहिली गाठ पुण्यात भाऊमहाराजांच्या बोळात पडली. मी जात असताना भाऊंनीच मागून हाक मारून थांबवलं ! थोडी गडबडले पण सावरलं स्वतःला !

'तुला मी खरोखर पसंत आहे ना ! दबाव नाही ना कुणाचा !'

'कुणाचाही दबाव नाही. पसंती झाली आहे. पण माझ्या दोन अटी आहेत. आम्ही हुंडा अजिबात देणार नाही. आमची परिस्थितीच नाही आणि दुसरी – मी नोकरी अजिबात सोडणार नाही. चांगली सरकारी नोकरी आहे. पेन्शन आहे. संसाराला हातभार लागेल. उद्या काही झालं तर मला माझ्या पायावर उभं राहता आलं पाहिजे !'

दोन्ही अटी त्यांना मान्य होत्या. माझी नोकरी होती मुंबईला, पुण्याला बदली करून घ्यावी लागली असती. ती झाली असती. लग्नाची तयारी सुरू झाली. पत्रिका छापायला दिल्या. तेवढ्यात कुणीतरी बातमी आणली, 'नवऱ्या मुलाला नोकरीच नाही !' पहायच्या कार्यक्रमात तर सांगितलं होतं नोकरी आहे म्हणून ! घरात रडारड सुरू झाली. 'असला मुलगा काय कामाचा, मी सांगून येतो लग्न मोडलं म्हणून' म्हणत वाळिंबे तावातावाने उठले. **मी त्यांना खाली बसवलं. ठामपणे सांगितलं, 'मला नोकरी आहे, मी पोशीन मुलाला ! पण हे लग्न मोडायचं नाही. नोकरी काय आज ना उद्या लागेल ! मला चालेल !'** ३१ मार्च १९५६ ला सकाळी १०.१० च्या मुहूर्तावर, कन्याशाळेसमोरच्या नातू मंगल कार्यालयात आमचं लग्न लागलं !

**आज इतक्या वर्षांनी जाणवतंय – तेव्हा आपण ठाम राहिलो ते कसं योग्य होतं** ! संसारात चढउतार येत असतात, सुखदुःखं असतात, रागलोभ, रुसवेफुगवे–सारं असतं. पण ते त्या–त्या वेळी सहन करण्याची ताकदही असते. ४२४ शनिवार पेठेत आमचा संसार सुरू झाला. घरात सातआठ माणसं ! येणारीजाणारी खूप ! सासऱ्यांची मित्रमंडळी, नातेवाईक, नागूशास्त्री पूरकर गुरुजींसारखे हितचिंतक ! दिवस कसा जायचा कळायचं नाही. माझी शिफ्ट–ड्यूटी ! रात्री उशीरा असली की भाऊ सोडायला, न्यायला येत. कधी–कधी लक्ष देता येत नसे त्यामुळे मुलांकडे ! **सकाळी सातच्या ड्युटीच्या वेळी तर मुलींच्या वेण्या घालणं, आंघोळी घालणं, शाळेत पाठवणं ही कामं भाऊंनी मन लावून केली आहेत. भाऊंनी घातलेल्या वेण्या मुलींना जास्त आवडायच्या** ! कधीतरी माझी चिडचिड व्हायची! मुलींवर राग निघायचा ! भाऊ मात्र शांत असत. मुलींची समजूत काढत. सगळीकडे आपण मोठेपणा दाखवावा ! **सीनियर शुड ऑलवेज ॲडजस्ट – असं भाऊंचं धोरण असे. मला ते मान्य करावं लागे** ! आज सगळ्यांच्याकडून मिळणारा मान, आदर पाहिला की भाऊंची दूरदृष्टी जाणवते. ते सगळ्यांचं सगळं करत ! मला राग येई कधीतरी ! मी विचारी, 'माझ्यासाठी काय करता ?' मग ते म्हणत, 'तू आहेस म्हणून माझी धडपड आहे. नाही तर मला काम करणं शक्य नसतं झालं !' खूप बरं वाटायचं ! नवरा आपल्यामागे घट्ट उभा आहे हे प्रत्येक स्त्रीला विश्वास देणारं असतं. पुढे 'ज्ञानिया'मध्ये गेल्यावर याची प्रचीती येत राहिली.

भाऊंची व्यवधानं खूप होती बाहेर ! हरिभाऊ कुलकर्णी त्यांच्या जवळच्यांपैकी एक होते. हरिभाऊंची बायको व मी – दोघींची दुःखं, तक्रारी एकसारख्या होत्या. आम्ही दोघी जवळ आलो या दुव्यातून ! भाऊंची रमणबागेतील नोकरी, मोतीबागेतल्या बैठका, 'स्व'–रूपवर्धिनीच्या फेऱ्या, घरी भेटायला येणाऱ्यांचा राबता – यांतून आमच्यासाठी फार थोडा वेळ मिळे. पण त्यातही मुलांकडे दुर्लक्ष झालं नाही. त्यांची शिक्षणं, त्यांची बौद्धिक, सांस्कृतिक, शारीरिक वाढ याकडे बारीक लक्ष असे. **त्यांच्या यशस्वी आयुष्यात माझा थोडाफार वाटा असेल पण मुलांना वळण लावण्यात, संस्कारक्षम बनवण्यात, बाहेरच्या जगात वावरण्यासाठी घासून–पुसून लख्ख करण्यात त्यांचा वाटा महत्त्वाचा हे मी मान्य करते. न बोलता, नजरेनं त्यांनी अनेक कामं केली आहेत; करून घेतली आहेत.**

दरारा होता त्यांचा घरात ! पण ते शांतही होते, प्रेमळही होते. मुलांशी इतक्या गोडीगुलाबीनं बोलत – मला कधी जमलं नाही ते !

त्र्याहत्तरच्या जानेवारी महिन्यात आम्ही 'ज्ञानिया'मध्ये आमच्या स्वतःच्या बंगल्यात – वास्तू म्हणायला हवं खरं तर – रहायला गेलो. पद्मावतीला ! सगळ्या गोष्टी लांब-लांब वाटू लागल्या ! शाळा, कॉलेज, ऑफिस, बँक, बस! रिक्षावाचून कुठे जाता येईना. मग स्वतःची स्कूटर आली. या वास्तूत वर्दळ वाढली. भाऊंचा जनसंपर्क दांडगा ! शाळेव्यतिरिक्त अनेक संस्थांचे पदाधिकारी होते ते ! अनेक समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून त्यांना बोलावणं असे. घरी येणाऱ्या पुष्पगुच्छांवरून समजायचं ! कधीतरी मीही जात असे एखाद्या समारंभाला ! निमंत्रितांसाठी राखीव असलेल्या गुबगुबीत कोचावर बसताना मला संकोच वाटे ! टाळ्यांच्या कडकडाटांनी त्यांचं भाषण गाजत असे. **एवढ्या मोठ्या व्यक्तीच्या आपण पत्नी आहोत याचा अभिमान वाटायचा. घरी आल्यावर त्यांच्याबद्दलचा आदर दुणावत असे.** 'ज्ञानिया'मध्ये मात्र प्रगती वेगानं होत गेली. सुरुवातीला तिथे लाईटही नव्हते. ते आले ! मग रस्ते झाले. घराभोवती कुंपण आलं. फुलझाडं लागली. वर मजला झाला. तिथल्या हॉलमध्ये बैठकी होऊ लागल्या. राष्ट्रसेविका समितीची शाखा भरू लागली. सुसंस्कृतपणाचा शिडकावा झालेली ही वास्तू सर्वांना प्रसन्न करू लागली. भाऊंच्या परिवारातल्या सज्जन, विद्वान, बुद्धिमान आणि मान्यवर मंडळींनी ती वास्तू, आपल्या सहवासाने सुगंधित करून ठेवली. सुरुवातीच्या काळात संघकार्य, नोकरी अन् कौटुंबिक जबाबदाऱ्या यामुळे आमचे बरोबर प्रवास थोडे झाले. परंतु निवृत्तीनंतर मात्र ती सगळी कसर भरून निघाली. महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, आंध्र प्रदेश अगदी अमरनाथ वैष्णौदेवीपर्यंत आमचा प्रवास झाला. स्वतःच्या घराचं माझं स्वप्न पूर्ण झालं. संसारात केलेल्या कष्टांचं चीज झालं !

कधी-कधी त्यांच्या बाहेर राहण्याचा मनस्ताप व्हायचा ! माझ्या सुटीचा वार अधलामधला असे. तेव्हा त्यांची शाळा! मुली हट्ट करत. भाऊ घरी नसत. पण मी घरात नसताना ते मुलींची समजूत कशी काढत असतील याचा विचार माझ्या मनात कधी येत नसे. मुलांना समजावणं, सतत त्यांच्याशी चर्चा करणं यातून मुलं जाणती झाली. जबाबदाऱ्या पेलण्यास सक्षम झाली. मुली मोठ्या झाल्या, लग्न झाली त्यांची ! सून घरात आली. सारे सोहळे-समारंभ थाटामाटात पार पडले. आमच्या आजारपणात मुलांनी जे केलं आमच्याकरता – त्यानं आम्ही त्यांच्याकरता जे केलं ते फळाला आलं असं वाटलं. आमच्या दोघांच्या आजारातली हॉस्पिटल्स पाहिली – मला हैद्राबादहून पुण्याला विमानानं आणलं- एअरपोर्टवरून थेट हॉस्पिटलमध्ये नेलं – मुलं नसती तर जमलं असतं का मला हा विचार मनात येतो कधीतरी ! माझ्यापेक्षा त्यांनीच मुलांवर जास्त प्रेम केलं असं मला वाटतं कधीकधी !

**बाहेर भाऊंनी मोठा परिवार जमवला होता. पण त्याहीपेक्षा त्यांनी मोठं काम केलं ते – आमच्या मोठ्या कुटुंबाला एकत्र बांधून ठेवण्याचं ! मुली, जावई, बहिणी, भाऊ, त्यांचा परिवार, माझ्या माहेरची माणसं – सर्वांना एका छत्राखाली आणण्याचं काम त्यांनी केलं. आमच्या घरचं कार्य म्हणजे या सर्वांचं संमेलन असे.** अनेक ठिकाणी कुरबुरी, प्रॉपर्टीचे वाद, वडिलांशी न पटण्यानं विभक्त झालेली मुले, आईवडीलांना इथंच सोडून परदेशी गायब झालेली मुले – अनेक उदाहरणं माझ्या डोळ्यासमोर आहेत. पण आमच्या कुटुंबात भाऊंना मानणारे, त्यांचा शब्द झेलणारे सारेच होते. घरचे राहू द्या – त्यांच्या आजारपणात त्यांचे डॉक्टर विद्यार्थी आस्थेने चौकशीला येत. **'लवळेकर सर' हा अनेकांचा अमूल्य ठेवा होता. गोड आठवण होती. केवळ निरिच्छ, स्वच्छ, सर्वांशी सलोख्याची आणि समान वागणूक ठेवणाऱ्यालाच हे शक्य होतं.** यातल्या कित्येकांच्या अडीअडचणीला भाऊ धावून गेले आहेत. कुणाला ॲडमिशन, कुणाची फी, कुणाची रहायची सोय, कुणाची शिष्यवृत्ती – **ते जाऊ द्या, धीराचे चार शब्द, सांत्वन, सल्ला, कौतुकाचे चार शब्द यावर कितीतरी माणसं त्यांनी उभी केली. आपण काय केलं ते भाऊ विसरले पण या मंडळींनी कृतज्ञता जपली. या साऱ्यांचे आशीर्वाद आमचं आयुष्य सुगंधी आणि चैतन्यमय करून गेले.**

भाऊंचं बाहेर जाणं बंद झालं. नजर अधू झाली. 'समोर आकृती दिसते – कोण आहे ते उमजत नाही.' म्हणायचे ! आवाजावरून ओळखायचे ! प्रत्येकाची चौकशी व्हायची. इतकं कर्तृत्व गाजवलं पण त्याबद्दल अवाक्षर नाही. कर्तृत्वाची सारी पुस्तकं, वह्या मिटून ठेवल्या होत्या. भेटायला येणारे येत होते. अनेकांचे फोन यायचे ! मुली भेटून घरी निघाल्या की 'पोचल्यावर फोन कर' सांगायचे ! त्यांच्या अस्तित्वाचा केवढा आधार वाटायचा ! या वयात या अवस्थेतही त्यांची प्रेमळ, समाधानी वृत्ती जराही कमी झाली नव्हती. आवाज दिवसेंदिवस क्षीण होत चालला होता. **जन्म–मृत्यू आपल्या हातात नाही पण या दोन टोकांमधला आपला व आपल्या सुहृदांचा प्रवास जास्तीत जास्त सुखाचा कसा होईल यासाठी त्यांनी आटोकाट प्रयत्न केले. देवळात फारसे गेले नाहीत पण सकाळची देवपूजा चुकली नाही. देवापेक्षा त्यांचा माणसांवर जास्त विश्वास !** प्राणांवर बेतलेल्या दोन दुखण्यातून बरे होऊन त्यांना नवं आयुष्य मिळालं. त्यांचा सहवास आणखी काही वर्षे मिळाला म्हणून मी देवाचे आभार मानले. त्यांचं जाणं अजून खरं वाटत नाही. हॉलमधला त्यांचा तो स्मितहास्य असलेला फोटो पाहिला की अजून 'कुसुम, जाऊन येतो ग, सतीश आहे बरोबर' असं म्हणत बाहेर येतील असं वाटतं. सत्य समोर येतं – एकटेपण जाणवतं ! मुली, मुलगा, सून, जावई काही कमी पडू देत नाहीत !

**'मुलाला नोकरी नसली तरी चालेल ! आज ना उद्या लागेल ! पण हे लग्न मोडायचं नाही !' या निर्धाराने केवढं मोठं जग उभं केलं ! आज सारं आठवलं की कृतकृत्य वाटतं !**

– शब्दांकन : नीलकंठ जोशी

मो. : ९८२०४०२८३९

❖❖❖

## नावाप्रमाणेच मदतीला धावून येणारा आमचा 'भाऊ'

**– सौ. उषा रा. असनीकर**

देवाच्या आळंदीजवळचे चऱ्होली बुद्रुक गाव. वेशीबाहेर डोंगरावर वाघेश्वराचे मंदिर. गावात प्रवेश करताच मारुतीचे व भैरवानाथाचे देऊळ. रामाच्या देवळावरून नदीकडे जाणाऱ्या उतारानंतर मधल्या आळीत नदीकाठी ज्ञानोबा बुधले–लवळेकर यांचे घर. त्यांनी श्रीरामाची व वाघेश्वराची पूजा कधी चुकवली नाही. आमचे वडील कै. गोविंद ज्ञा. लवळेकर शिक्षक होते. आई दहाव्या वर्षी या घरी आली. आत्याबरोबर पाण्याला जाई. ती आत्याकडून वाळूत मुळाक्षरे शिकली. मुलांची क्रमिक पुस्तके वाचून तिने वाचन वाढविले. वाचनाने रामायण–महाभारत तसेच कथा–कादंबऱ्या, वर्तमानपत्रे वाचून तिचे विचार प्रगल्भ झाले. वडील आदर्श शिक्षक, दिलदार वृत्तीचे व सामाजिक जाणीवेचे होते. त्यांनी शिक्षणासाठी अनेक आप्तसुहृदांना सांभाळले. आईना या सर्वांचे पोट भरून आपले अन्नपूर्णा नाव सार्थ केले. भाऊने हा वसा शेवटपर्यंत चालवला.

मला भाऊ आठवतो मुंजीतला. अंधुकसा. त्याचे सातवीपर्यंतचे आणि माझे चौथीपर्यंतचे शिक्षण चऱ्होलीच्या प्राथमिक शाळेत झाले. एकदा वरच्या आळीत जोशींच्या माडीवर भजनाचा कार्यक्रम होता. गावात नुकतेच एक गायक आले होते. 'हे शाम धीरा... जगत् भ्रांती नाशा' हे त्यांनी शिकविलेले गाणे भाऊने पेटीवर वाजवून म्हटले व वाहवा मिळविली. त्यावेळी त्याचे वय १२ वर्षेअसावे.

सन १९४०–४२ चा काळ असावा. कै. श्री. भाऊ लोंढे संघाच्या कामासाठी चऱ्होलीस आले होते. त्यांचा मुक्काम आमच्या माडीवर असे. त्यांच्या मार्गदर्शनाने भाऊ नदीकाठी संघशाखा घेत असे. सातवीनंतर शिक्षणाची सोय गावात नसल्याने त्यास पुण्यास आत्याकडे राहावे लागले. पण मुदतीच्या तापामुळे ते पूर्ण झाले नाही. दुसरा भाऊ–तोही सातवी झाला. मग १९४४ साली आमचे कुटुंब पुण्यास राहावयास आले.

साधारण सन १९४२-४३ दरम्यान अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक - संघाचा पहिलाच संप सुरू झाला. माझे वडील पुणे जिल्हा प्राथमिक शिक्षक - संघाचे कार्याध्यक्ष होते. दीर्घकाळ पगार झाला नव्हता. या काळात सर्व जातीधर्माचे प्राथ. शिक्षक चौकशीसाठी घरी येत. वडिलांनी भेदभाव न करता येणारास जेवण घालूनच पाठवले. अशा वातावरणात भाऊची संघशाखा, नोकरी व रात्रशाळा सुरू होती. सन १९४८-४९ मध्ये तो मॅट्रिक झाला. नवीन मराठी शाळेत लेखनिक म्हणून रुजू झाला.

यापुढील शिक्षण त्याने बहिस्थ विद्यार्थी म्हणून केले. बी. ए. परीक्षेत ऑनर्स मिळवला. दिवसा नोकरी, संध्याकाळी मुंढवा येथे संघशाखा, रात्री अभ्यास या चक्रात पाठदुखी सुरू झाली. रोज सायकलवर जाणे म्हणून आईने भाऊच्या जवळच्या मित्रास (स्वयंसेवकास) सांगितले. तो म्हणाला, 'राजाची आई, मी जर वरिष्ठांना राजास जवळची शाखा द्या म्हटले तर मलाच जावे लागेल'. भाऊने काम अविरत चालू ठेवले.

**हे सामाजिक कामाचे बाळकडू माझ्या वडिलांकडून मिळाले.** सन १९४८ मधे भाऊ संघाच्या सत्याग्रहात येरवडा येथे होता. एकदा मी त्यास भेटावयास गेले. मला साडी नेसलेली पाहून म्हणाला, 'अग, तुला साडी कोणी आणली ?' **आई घरी नसताना तो मला घरातील कामात मदत करीत असे. अशा छोट्या-छोट्या प्रसंगात त्याची कौटुंबिक जबाबदारीची जाणीव दिसून येई.**

नवीन मराठी शाळेत त्याच्याबरोबर मी नोकरी केली. **या थोड्या दिवसात त्याचा व्यवस्थितपणा, टापटीप, कामाचा उरक मी जवळून अनुभवला. आमच्या शिक्षणाच्या काळातही तो एकदम कागदाचे रीम आणीत असे. ते रोलिंग करून त्याच्या सुरेख वह्या आम्हाला करून देत असे व सुवाच्य अक्षरात नाव घालून देत असे.**

नोकरी चालू असताना त्याने हिंदी विषयात पदवी मिळविली व B.T. झाला. पाठाची टाचणे काढताना तो वडिलांशीही चर्चा करीत असे. पुढे रमणबाग प्रशालेत शिक्षक म्हणून विद्यार्थीप्रियता मिळविली व मुख्याध्यापकपद सांभाळले.

आमच्या परिवारात प्रत्येकास त्याचा आधार वाटत असे. वयाने लहान असल्यापासूनच त्याला मोठ्यांच्या बैठकीत मान असे. त्याला माणसाची अचूक पारख होती. **प्रत्येकाच्या अडीअडचणीचे वेळी तो नावाप्रमाणेच कृष्णाप्रमाणेच हजर असे. आई व तो अडचण दूर करी.**

एवढ्या मोठ्या दीर्घ आजारात त्याने केवळ आम्हा बहिणींनाच नव्हे तर सर्वांना माया दिली. विचारपूस करताना स्वतःची वेदना त्याने कधीच प्रकट केली नाही. **निर्मोही वृत्तीने सर्व भावंडांना सहभागी केले. पूर्वजांचे धन प्रसाद म्हणून सर्वांना वाटले व निर्लोभीपणे त्याने परमेश्वराच्या प्रासादात प्रस्थान ठेवले.**

❖❖❖

आमच्या प्रिय लवळेकर सरांच्या निधनाची बातमी ऐकून खूप दुःख झाले. आमच्या भाग्याने आम्हाला हे असे शिक्षक लाभले होते की ज्यांनी केवळ हिंदी/मराठी विषयाची क्रमिक पुस्तके शिकवली नाहीत तर माणुसकीचे धडे दिले. 'पत्थर की आँख' शिकवताना समरस झालेल्या लवळेकर सरांची मूर्ती डोळ्यासमोर आजही जशीच्या तशी आहे. उपस्थिती नोंदवताना किंवा शिकवताना लवळेकर सर कधीही खुर्चीवर बसत नसत. **आम्ही खरोखरीच भाग्यवान आहोत की आयुष्याचा खरा अर्थ समजावून सांगणारे, शिकवणारे लवळेकर सर आम्हाला शिक्षक लाभले होते.** त्यांच्या पवित्र आत्म्यास मनःपूर्वक श्रद्धांजली.

**- दिलीप परदेशी**

# आजच्या युगातील कृष्णावतार...

**– सौ. भाग्यश्री भागवत**

कृष्णाजी गोविंद ऊर्फ राजाभाऊ लवळेकर ...जन्मदाते पिता ! पण त्यापलीकडे आमचे शिक्षक, गुरु, मार्गदर्शक, समुपदेशक... एक सर्जनशील सहृदय व्यक्ती... एक संवेदनाशील विचारवंत... एक कुटुंबवत्सल आणि प्रेमळ व्यक्तिमत्त्व. एक परिपूर्ण शिक्षक... एक सच्चा समाजसेवक... एक उत्तम संघटक... एक बुजुर्ग शिक्षणतज्ज्ञ.

किती ही रूपं अन् किती ह्या व्यक्तिमत्त्वाच्या छटा ! भौतिकदृष्ट्या सामान्य घरात जन्मलेला माणूस पण एक बहुरंगी... बहुढंगी... बहुआयामी व्यक्तिमत्त्व ! परंतु ध्यास एकच... जगाचा उद्धार... दुसऱ्यांसाठी, समाजासाठी पर्यायाने राष्ट्रासाठी सतत काम करीत राहणं !

भगवान श्रीकृष्णांच्या बाबतीत असं म्हटलं जातं –

एका छोट्या करंगळीवर गोवर्धन पर्वत उचलणारे भगवान श्रीकृष्ण बासरी मात्र दोन्ही हातात पकडत ! पराक्रम व प्रेम यातील हे अंतर !

**भाऊंच्या बाबतीतही असंच काहीसं म्हणता येईल. कर्तृत्व आणि ममत्व तितक्याच प्रभावीपणे पेलणारे अन् अनेक परस्परविरोधी भूमिका प्रसंगानुरूप निभावणारे भाऊ...**

'संपर्कात आलेल्या प्रत्येकाला सतत काही तरी देत राहा... त्याचे कल्याण करा.' ....अशी जणू धर्माज्ञा झाल्यासारखे शेवटपर्यंत कार्य करतच राहिले. असं म्हटलं जातं.

Great people don't do different things... They do things differently !

**भाऊंच्या बाबतीत हे तंतोतंत खरं आहे. भाऊंची विचारसरणीच वेगळी ! सर्वसामान्य सहिष्णुतेच्या पलीकडची !** इतरांचं ऐकून घेणं, त्यांना समजून घेणं, त्यांना संधी देणं, त्यांना आयुष्यात खऱ्या अर्थानं उभं करणं, स्वावलंबी बनवणं, सक्षम बनवणं, माणूस बनवणं हे सगळं भाऊंना अगदी सहज जमत असे. किंबहुना त्यांच्या जीवनप्रणालीचा तो एक भाग होता. **मला नेहमी त्यांच्यात संतत्वाचा वास जाणवे.**

आमचं लहानपण एकत्र कुटुंबात गेलं. घरात कुटुंबातील माणसांबरोबर इतर माणसांचाही राबता असे. घरी, भाऊंच्या सल्ल्यानुसार शिक्षणासाठी, नोकरीसाठी राहिलेले कोणी–कोणी असायचे. पाहुणेरावळे सतत ! येणारे जाणारेही कितीक ! घरात नेहमी माणसांची वर्दळ असायची. आमच्या घराला माणसांची पहिल्यापासूनच सवय होती. आमच्या आजीआजोबांनी. भाऊंच्या आईवडिलांनी – दिलेला माणसं जोडण्याचा हा वसा भाऊंनी तसाच पुढे चालू ठेवला. किंबहुना त्यात वृद्धीच झाली. त्यांना आईनंही तितकीच साथ दिली. सतत माणसांनी भरलेल्या आमच्या घरात 'भाऊ' हा एक मोठा व महत्त्वाचा दुवा होता. खरंतर वेगवेगळ्या नात्यांनुसार भाऊंची नावं अनेक... राजाभाऊ, राजामामा, राजाकाका, राजा, भाऊमामा, भाऊराया, राजाभावोजी, कृ.गो., भाऊ... वगैरे–वगैरे. पण सगळ्यांना सर्वात जवळचं वाटणारं नाव म्हणजे भाऊ. **आमच्या कुटुंबात 'भाऊ' या नावात एक जादू होती. ...वजन होतं.. वेगळी आपुलकी होती. ...प्रेम होतं... आत्मीयता होती. ...आदर होता. ...विश्वास होता. ...धाकही होता.** घरात भाऊ जे म्हणतील ते प्रमाण होतं. कुटुंबातील सर्व महत्त्वाचे निर्णय हे भाऊंच्या सल्ल्यानेच होत असत. जवळच्याच नव्हे तर दूरच्या नात्यातील, गोतावळ्यातील लग्नाच्या बैठका भाऊंशिवाय होत नसत. शिक्षण, नोकरी, लग्न, घर या नेहमीच्या विषयांखेरीज इतर कित्येक विषयांवर, प्रश्नांवर सल्ला, मार्गदर्शन घेण्यासाठी नात्याबाहेरचेही अनेकजण येत अन् भाऊ सर्वांच्या पाठीशी भावासारखे उभे राहात.

आई त्यावेळी Telephone Exchange मधे नोकरी करत असल्याने तिला shift duties असत. त्यामुळे तिच्या घरी असण्याच्या वेळा त्यानुसार बदलत. **तेव्हा आमच्या वेण्या घालण्यापासून आजीला स्वयंपाकघरात मदत करण्यापर्यंत कोणतेही काम भाऊ मनोभावे करत अन् हे सगळं स्वतःची नोकरी व संघकार्य सांभाळून ! एकत्र**

**कुटुंबपद्धतीत असणाऱ्या प्रापंचिक जबाबदाऱ्या पेलताना, सामाजिक जाणिवांचे भान ठेवून, प्रसंगानुरूप आई व भाऊ यांनी सक्षमपणे निभावलेल्या भूमिकांमुळे लहानपणापासूनच आमच्यापुढे आदर्श निर्माण होत गेले.** भाऊंचं जगणं हे स्वार्थापलीकडचं होतं. स्वतःपुरता, स्वतःच्या कुटुंबापुरता विचार ते कधीच करू शकले नाहीत. उलट दुसऱ्यांच्यासाठी काम करत राहाणं, त्यांना सतत काही तरी देत रहाणं हा त्यांचा सहज स्वभाव होता. दातृत्व हे काही आर्थिक बाबीतच असतं असं नाही. **आपल्या घासातला घास काय किंवा आपल्या जवळच्या फुलांचा वास काय ...तो दुसऱ्याला देण्याची वृत्ती लागते ...दानत लागते ...मोठं मन लागतं अन् ते भाऊंच्याकडे होतं** ! भेटणारा माणूस बुद्धिमान आहे की सामान्य, धनिक आहे की गरीब हे न पाहाता त्यांचं आयुष्य सुखद व समृद्ध करण्यासाठी ते अंतःकरणपूर्वक प्रयत्न करीत.

खरं तर कोणतीही वलयांकित पार्श्वभूमी नसलेल्या कुटुंबात भाऊ लहानाचे मोठे झाले. पण त्यांच्यात अनन्यसाधारण गुणवत्ता होती. **भाऊ म्हणजे ज्ञान, विचार आणि संस्कार यांचं चैतन्यमय गुरुकुल** ! आयुष्य जसं समोर आलं तसं त्यांनी ते स्वीकारलं ! कौटुंबिक जबाबदाऱ्या, प्रापंचिक अडचणी, कित्येक समरप्रसंग ह्या सगळ्याला ते हसत-खेळत सामोरं गेले. ते म्हणायचे, 'आयुष्य म्हणजे काही पाठ्यपुस्तकातला अभ्यासक्रम नव्हे ! आयुष्यातले प्रश्न हे काही कुठल्या ठराविक Theory ने नाही सोडवता येत. त्याला काही साचेबंद नियमावली नसते !' काळानुरूप रीतीरिवाजांचा प्रभाव जरी भाऊंवर असला तरी त्यांचा दृष्टिकोन डोळस असे.

आयुष्यात स्वतःची जीवनमूल्ये जपून पुढे-पुढे जाताना आपल्याबरोबर इतरांचं जगणंही अर्थपूर्ण बनवण्याचं काम ते अगदी कळत-नकळत करत. भाऊंची स्वतःची मूल्यनिष्ठा अतुलनीय होती. व्यक्तिगत मूल्यांशी ठाम राहाताना स्वतःशीच होणारा संघर्ष आधी टाळता आला पाहिजे असं ते आवर्जून सांगत. त्यासाठी लागणारं मनोधैर्य, निश्चय व संयम हे अंगी बाणवलं पाहिजे असं त्यांच्याकडे बघून आम्हाला वाटत असे. त्यांना अभिप्रेत असलेली जीवनमूल्यं नेहमी त्यांच्या उक्ती व कृतीतून प्रतिबिंबित होत असत.

भाऊ शिस्तप्रिय होते. त्यांचं प्रत्येक काम हे पूर्वनियोजित व शिस्तबद्ध असे. **स्वयंशिस्त ही एक नुसती चांगली सवय नसून ती एक साधना आहे असं त्यांच्याकडे बघून वाटे. त्यासाठी लागणारी मानसिकता, एकाग्रता, निर्धार हे सारं भाऊंच्या नसानसांत होतं.** संघाचे प्रबोधन संस्कार व विचार यांचा भाऊंवर प्रचंड प्रभाव होता. किंबहुना त्या मुशीतूनच ते घडले. त्यांचे विचार सुसंस्कृत व प्रगल्भ होते. बुद्धिवादाच्या बरोबरीने भाऊंचा दृष्टिकोन वैज्ञानिकही असे. श्रद्धा हा भाऊंच्या विचारसरणीचा गाभा होता. मग ती देवावरील असो, त्यांच्यावर उपचार करणाऱ्या डॉक्टरांवरील असो, स्वतःच्या आदर्शांवरील असो की करत असलेल्या कामावरील ! देवपूजा, घरातील कुळधर्म, विद्यार्थ्यांना शिकवणं, संघस्थानावरील संस्कारवर्ग हे सारं ते तितक्याच तन्मयतेने करीत.

भाऊ अंधश्रद्ध तर नव्हतेच, पण ज्योतिष, पत्रिका यांच्याही मागे कधी नव्हते. **'मन व मनगट' आपलं भविष्य ठरवतं असा त्यांचा दावा असे.** पण त्यांच्या आयुष्यात आलेल्या, ज्योतिषशास्त्राचा अभ्यास असणाऱ्या अनेक व्यक्तींबद्दल त्यांना आदर होता. किंबहुना त्या संदर्भात स्वतःच्या आयुष्यात आलेले विस्मयकारी अनुभव ते आम्हाला नेहमी सांगत.

भाऊ जेव्हा आमच्यामध्ये गप्पा मारायला बसायचे तेव्हा वातावरण अक्षरशः मंतरलेलं असे. वेगळीच मैफल असायची ती. वेळ, काळ, स्थळ, विषय कुठलंच बंधन नसे. मग ते कधी 'पथेर पांचाली' चित्रपटाचं समीक्षण असेल किंवा ज्ञानेश्वरीतील ओव्यांचं निरूपण ! वि. स. खांडेकरांची 'अमृतवेल' असो वा पु.लं.चे चितळेमास्तर ! कधी त्यांच्या लहानपणाच्या आठवणी असोत की प्रत्यक्ष जीवनात आलेले अनुभव ! कधी राजकीय घडामोडींचा परामर्श असो की शाळेत घडलेला एखादा प्रसंग! कधी संघस्थानावरील एखादी घटना असो की त्यांना भेटलेल्या अनेकविध व्यक्तींचे किस्से ! **भाऊ नेहमी जीवनाकडे बघण्याची वेगळी दृष्टी द्यायचे. मनाची खिडक्या-दारं उघडायचे !**

१९७३-७४ सालची गोष्ट ! मी तेव्हा ११ वीत होते. त्यावेळची SSC... आमच्यावेळचं हिंदीचं पाठ्यपुस्तक हे भाऊंच्या अत्यंत आवडीचं ! हरिवंशराय बच्चन, कवी नीरज, प्रेमचंद, महादेवी वर्मा, सुमित्रानंदन पंत ह्या भाऊंच्या आवडीच्या कवी-लेखकांचं साहित्य ! भाऊ खूप तन्मयतेनं अन् एकाग्रतेनं शिकवायचे. त्यांचं तल्लीन होऊन ओघवत्या भाषेत शिकवणं आजही स्मरतंय... जसंच्या तसं !

त्याचं पाठ्यपुस्तकातील – है अंधेरी रात पर दीप जलाना कब मना है । ही हरिवंशराय बच्चन यांची कविता व जल गया है दीप तो अंधियार ढलकर ही रहेगा । ही कवी नीरज यांची कविता, ह्या भाऊंच्या विशेष आवडीच्या रचना ! **ह्या कविता म्हणजे भाऊंचं जीवनविषयक तत्त्वज्ञान होतं. किंबहुना त्यांचं जीवनसूत्रच होतं ! आयुष्यात येणाऱ्या अडचणी आणि संकटांना सामोरं जाताना भाऊ ह्या कवितांच्या ओळींचे सतत संदर्भ द्यायचे** – अगदी आता आतापर्यंत ! ह्या कविता भाऊंच्या सतत ओठांवरच असायच्या !

भाऊंचं शिकवणं म्हणजे एक चैतन्यमय अनुभव असायचा. विषयाचा गाढा अभ्यास, भाषेवरील प्रभुत्व, बोलण्याचा अविरत ओघ, सोदाहरण स्पष्टीकरण, सुयोग्य शंकानिरसन अन् मुख्य म्हणजे विषयाकडे बघण्याची आगळीवेगळी अन् स्वतंत्र दृष्टी ! ही त्यांच्या शिकवण्याची काही वैशिष्ट्ये होती. भाऊंचं वाचन अफाट होतं. तो वारसा त्यांना त्यांच्या आईकडून मिळाला होता. **वाचणं-पाहाणं-ऐकणं हे सारं ते अगदी डोळसपणे करीत.** आम्हाला, त्यांच्या विद्यार्थ्यांना, सहकाऱ्यांना त्यांच्याकडून एक वेगळीच ऊर्जा मिळत असे. **कोणत्याही गोष्टी आयत्या न देता त्या मिळवण्याची क्षमता निर्माण करणं, विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनवणं हा त्यांचा कटाक्ष असे.** शाळेत-शाळेबाहेर, शाळेच्या वेळेत-वेळेनंतर – २४ x ७ x ३६५ दिवस शिकवणारे, संस्कार करणारे खरे शिक्षक होते ते ! हे करताना त्यांची नाळ अगदी सहजच केवळ विद्यार्थ्यांशी नव्हे तर त्यांच्या पालकांशीही जोडली जायची. ऋणानुबंध जुळायचे ! चारपाच वर्षांपूर्वीची गोष्ट. आईभाऊंचा मुक्काम त्यावेळी आमच्याकडे होता. तेव्हा श्री. सुभाष ठाकूर हा भाऊंचा, अमेरिकेत स्थायिक असलेला विद्यार्थी-पासष्ठीचे गृहस्थ... खास भाऊंना भेटायला येणार असं समजल्यामुळे भाऊ अगदी खुशीत होते. सुभाष ठाकूर यांचा उल्लेख एरवीसुद्धा भाऊंच्या बोलण्यात अनेकदा होत असे. त्यात अभिमान-मिश्रित कौतुक असे. सुभाष ठाकूर म्हणजे भाऊंचा पन्नास वर्षांच्याही आधीचा विद्यार्थी. गेली कित्येक वर्षेअमेरिकेत स्थित... उच्चपदस्थ ! पण इतक्या काळानंतर, ज्या ओढीनं, आदरानं, आपुलकीनं, त्याला शाळेतल्या एका शिक्षकांच्या भेटीला जावंसं वाटणं आणि इतका जुना, विद्यार्थी भेटायला येणार म्हटल्यावर भाऊंनाही तितकाच आनंद होणं, हे गुरुशिष्याच्या नितळ, निर्मळ अन् आगळ्यावेगळ्या नात्याचं निदर्शक नाही का ? ठरल्याप्रमाणे सुभाष ठाकूर आले. भाऊंना वाकून नमस्कार केला, गळाभेट झाली. बरोबर आणखी एक विद्यार्थी श्री. नूलकरही होते. वर्तमानकाळातील चौकशी झाली. गप्पा झाल्या. पाच तपांच्या आधीच्या गप्पाही तितक्याच ताजेपणानं झाल्या. जुन्या स्मृती जागवल्या. बरोबर फोटो काढून झाले. जी आत्मीयता, जो जिव्हाळा गुरुशिष्यांच्या भेटीतून, बोलण्यातून जाणवला तो खरंच शब्दांच्या पलीकडचा ! गुरुजनांचा सर्रास एकेरी उल्लेख होत असलेल्या आजच्या काळात पाहायला मिळतं का असं नातं ? जपलं जातं का असं नातं ?

अशी अनेक नाती भाऊंनी अगदी सहज जोडली आयुष्यभर ! विद्यार्थी, पालक, सहकारी, शेजारी, मित्र, नातेवाईक... कित्येकजण ! **आत्मीयता हा त्यांचा स्थायी भाव होता. इतरांना समजून घेणं, त्यांना व्यक्त होण्याची संधी देणं, वाव देणं, अन् सान्निध्यात येणाऱ्या प्रत्येकावर वैचारिक संस्कार करणं हे भाऊंना अगदी सहज जमत असे. भाऊ सगळ्यांशी जमवून घेत, त्यांना सामावून घेत.** त्यामुळे कोणत्याही वयाचं, नात्याचं कोणीही आपली समस्या घेऊन त्यांच्याकडे येत असे. मग तो प्रश्न मुलाच्या शिक्षणाचा असेल की घरातील वादाचा ! पण भाऊ त्यांना योग्य मार्गदर्शन करीत. पती-पत्नीमधील वाद खरं तर किती व्यक्तिगत ! पण भाऊंच्या एका जवळच्या मित्राची बायको स्वतःच्या नवऱ्याच्या – भाऊंच्या मित्राच्या-तक्रारी घेऊन मार्गदर्शनासाठी भाऊंकडे येत असे. तिला

विश्वास अन् आधार वाटे भाऊंचा !

**भाऊंची जीवनशैलीच वेगळी होती. श्रीमंतीचा हव्यास नाही, प्रसिद्धीचा ध्यास नाही, दिमाख नाही, दिखावा नाही. कमालीचा साधेपणा– निर्मळ मन, शुद्ध आचरण, खुलं अंतःकरण, निर्मोही व्यक्तिमत्त्व, वागण्याबोलण्यात विलक्षण विनम्रता. माणसं आकर्षित व्हायची त्यांच्याकडे, कायमची जोडली जायची.** भाऊंचा जनसंपर्क अन् लोकसंग्रह अफाट होता. भाऊंच्याबरोबर जेव्हा बाहेर जायची वेळ यायची... लग्नकार्यात, दवाखान्यात, बँकेत, सार्वजनिक कार्यक्रमात... अनेक माणसं भेटायची भाऊंना. आस्थेनं चौकशी करायची, विद्यार्थी भेटायचे. स्थळाकाळाचं भान न ठेवता कुठेही पाया पडायचे आदरानं ! नेहमी जाणवायचं... जेव्हा मनात आदर असतो तेव्हाच माणूस वाकतो, हात जोडतो. आपल्या पूर्ण कारकीर्दीत भाऊंनी स्वयंसेवक, संघटक, संचालक अशा विविध जबाबदाऱ्या लीलया उचलल्या अन् सक्षमपणे पेलल्या. काळाची आव्हाने झेलली. प्रसंगानुरूप त्यांचे विचार कधी क्रांतिकारक असत तर कधी साधेच पण प्रेरक ! एक मात्र नक्की की जे विचार मांडत त्यावर इतरांनी विचार केलाच पाहिजे ! त्यांच्यात जिद्द तर होतीच पण खिलाडू वृत्तीही होती. संकटात संधी शोधण्याची त्यांची सहज प्रवृत्ती होती. कोणत्या गोष्टीत स्वतःला पूर्ण झोकून द्यायचं आणि कधी अलगद अलिप्त व्हायचं याचं त्यांना सदैव भान असे.

रंगुनी रंगात साऱ्या रंग माझा वेगळा
गुंतुनी गुंत्यात साऱ्या पाय माझा मोकळा ।

**कवी सुरेश भटांच्या या ओळींचं, भाऊ म्हणजे मूर्तीमंत प्रतीक !** भाऊंच्या अंगी कमालीची सहनशक्ती व सोशिकता होती. अलीकडच्या काही वर्षात भाऊंची अनेक गंभीर आजारपणं आम्ही पाहिली आहेत. पण असह्य वेदना व यातना होत असूनसुद्धा त्यांनी प्रत्येकवेळी दाखवलेला संयम थक्क करणारा असे. कित्येकदा त्यांची स्थिती ही शरशय्येवरच्या भीष्मासारखी असे पण कधीही तोंडून निराशेचे शब्द बाहेर पडले नाहीत. त्याही स्थितीत ते इतरांचाच विचार करीत. मला आठवतो तो प्रसंग १९९३ सालचा. जहांगीर हॉस्पीटलमध्ये भाऊंवर हृदयशस्त्रक्रिया करायची होती. तेव्हा ही शस्त्रक्रिया आजच्याइतकी सोपी व सहज नसे. रुग्णाला व त्याच्या नातेवाईकांना त्याबद्दल भीती व ताण असे. ही भीती व ताण हलका करण्यासाठी रुग्णालयातर्फे शस्त्रक्रियेपूर्वी एक-दोन दिवस आधी रुग्णाचे समुपदेशन करण्यासाठी समुपदेशक येत असे. भाऊंचे समुपदेशन करण्यासाठी आलेल्या समुपदेशकाशी भाऊंनी इतक्या सखोल आणि समंजस गप्पा मारल्या की त्यांनी वेगळे समुपदेशन करण्याची गरजच भासली नाही. उलट एका आगळ्यावेगळ्या पेशंटला भेटल्याचे समाधान मिळाले.

भाऊ नव्या पिढीशी अगदी सहज व उत्तम प्रकारे नाळ जोडत असत. ते ताज्या दमाच्या, तरुण पिढीचा आदरच करत. **पण भाऊंमध्ये एक विद्यार्थी असे. नव्या गोष्टी, नवे शोध, नवे तंत्रज्ञान याबद्दल ते जागरूक होते. त्यांना उत्कंठा असे.** त्यांची वृत्ती अभ्यासू व दृष्टिकोन वैज्ञानिक असल्यामुळे नव्या पिढीकडून अद्ययावत गोष्टींचे ज्ञान मिळवण्याची, नवे तंत्रज्ञान समजून घेण्याची त्यांना जिज्ञासा असे. तीन-चार वर्षांपूर्वीची गोष्ट. आईभाऊंचा मुक्काम त्यावेळी आमच्याकडे होता. त्यावेळी वेदांग-माझा धाकटा मुलगा-सतत Laptop वर काहीतरी काम करीत असे. भाऊंनी अनेकदा त्याला विचारलं की 'सतत Laptop वर काय करतोस ?' तो हेच सांगायचा की 'ऑफिसचं काम करतो.' भाऊंना जिज्ञासा वाटे की हा घरात बसून रोज ऑफिसचं काम कसं करतो आणि नेमकं काय करतो. अखेरीस एक दिवस, न राहवून भाऊंनी वेदांगला सविस्तर विचारलंच. जेव्हा वेदांगने त्यांना Computer, email, Internet ह्याबद्दल थोडीशी माहिती दिली तेव्हा भाऊंमधील Technocrat जागा झाला व भाऊंनी त्याच्याशी Computer Technology, Software, Hardware, Digitization याबद्दल असंख्य तांत्रिक प्रश्न विचारून माहिती घेतली. स्वतःचं समाधान करून घेतलं. आपल्या अवतीभोवती असलेल्या नवीन तंत्रज्ञानाबद्दलची भाऊंची उत्सुकता, जाणून, समजून घेण्याची जिज्ञासा बघून आम्ही सगळे थक्कच झालो. एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली की आजची Technology जर भाऊंच्यावेळेस उपलब्ध

असती तर भाऊंनी त्याचा सुयोग्य वापर करून ती आत्मसात करून, आतापेक्षा शंभरपट अधिक काम केलं असतं.

**भाऊंच्या आवडीचं आणखी एक क्षेत्र म्हणजे बागकाम ! भाऊ निसर्गप्रेमी होते. त्यांचं मन आणि हात दोन्ही हिरवं होतं. भाऊंनी लावलेलं झाड जगलं नाही असं कधी झालं नाही.** वेळात वेळ काढून बागेत– मातीत काम करणं हा त्यांचा आवडता छंद होता. ते नेहमी म्हणायचे **'या जगात सर्वात प्रामाणिक माती ।' आपण जे पेरतो–जसं पेरतो तसं उगवतं–तसंच माती आपल्याला परत देते !**

भाऊ रसिक होते–कलाकार होते. भाऊंचं सुंदर, सुवाच्य अक्षर हे त्यांच्या नीटनेटक्या व निर्मळ स्वभावाचं निदर्शक होतं. **भाऊ हार, गजरा सुंदर करायचे. शेवटी–शेवटी शारीरिक हालचालींवर मर्यादा आल्यानंतर, दारातल्या जाईजुईच्या फुलांचे सुंदर गजरे करणं हा त्यांचा विरंगुळा असे. भाऊ रांगोळी खूप छान काढायचे. भाऊ कविता करत असत.** भाऊंना सूर, लय, ताल याची उत्तम जाण होती.

आकाशीच्या चंदा रे, ये रे ये धावत । पुरवी लवकरी श्रीरामाचा हट्ट...

हे भाऊंचेच शब्द... भाऊंच्याच ओळी. त्याला भाऊंनीच लावलेली चाल.. माझ्या लहानपणीची ही भाऊंची रचना. आमच्या पिढीला दिलेला एक सुरेख नजराणा... छोट्यांच्या भावविश्वातलं एक सुरेख सुरेल गीत. ज्यानं आमच्या पुढच्या पिढीलाही वेड लावलं – झुलवलं. आलोक (माझा मोठा मुलगा) तान्हा असताना, कितीतरी दिवस–रात्री भाऊंनी हे गीत गाऊन हातावर झुलवून झोपवल्याशिवाय झोपत नसे अन् आता सारा... माझी नात... वय वर्षेअडीच–तिसरी पिढी ! – हेच गीत स्वतःच्या बोबड्या बोलात जेव्हा संपूर्ण म्हणते – आमच्याहीकडून हट्टाने म्हणवून घेते तेव्हा जाणवतं – भाऊ याही पिढीपर्यंत पोचलेत. ...आमच्यातच आहेत ! त्यांच्या शब्दातून... विचारातून...संस्कारातून. ते सदैव आपल्यातच रहातील... तेच त्यांचं मृत्यूनंतरचं जगणं असेल.

– मो. : ९८२२४४०५४६

❖❖❖

---

## आम्ही लवळेकर अर्थात (आम्ही सहा भावंडे)

**– लवळेकर प्रमिला**
**(कानेटकर अपर्णा)**

काय पुसता आम्ही कोण ?
लवळेकर आम्ही आडनावाचे
(प्रेम) लव लेकर आलो आशीर्वाद वडिलांचे ।।
गेली आक्का देवाघरी भावंडात नंबर एक
ठेवून गेली देव्हाऱ्याशी तो एक नंदादीप
सोन्यासारखी तेवत होती ती आमुची हेमा
जतन करीत भाई तिजला देशपांड्याचा ठेवा ।।
वयाने वडील असे आमुचा भाऊ मोठा
होता पाठीशी तो मनानेही मोठा
राजा म्हणती कोणी त्याला हाक मारिती राजा
अनभिषिक्त राजा घराण्याचा तो झळके तेजा ।
घेऊ त्याचा आदर्श अन् गुण ठेवू गाठीशी
बंधू उभा कृष्ण सदा आमुच्या पाठीशी ।।

तिसरा नंबर मधू राही देवाघरी बंधू तो आमुचा
नाही घरात काही कमी आदर्श घ्या त्याचा ।
कधी वास्तुशांती, कधी साठीशांती करितसे ग्रहशांती
मेळवी उषा आनंद, सुख मनःशांती ।।
झाली तृप्त जीवनी निमा उर्फ निर्मला
सहभागी ती आनंदाने जमवी भाचे–भाच्यांचा मेळा ।
प्रमिला मी, मिळाली मला मायाममता मातेची
तो रचले उदंड मनसुबे ।
ताट घेऊनी सुखशांतीचे त्रिपुत्र मजपुढे उभे ।।
व्रत जिचे महान, माता ती अन्नपूर्णा
करिता वर्णन महानतेचे अपर्णा राही अपूर्णा ।।

❖❖❖

# मार्तंड जे तापहीन

**– डॉ. अनघा लवळेकर**

सुमारे १९४५ चा काळ असेल. त्या वेळच्या पुण्यातल्या एका रात्रशाळेत, रात्र–महाविद्यालयात शिकायला आलेला, आळंदीजवळच्या चऱ्होली गावात मूळ वास्तव्य असणारा एक काळासावळा पण तेज विद्यार्थी. शिकता–शिकता एकीकडे वाडिया कॉलेजमध्ये शिपाई म्हणून, नंतर डी.ई. सोसायटीत कारकून म्हणून नोकरी करतो आणि पुढच्या पाच तपांमध्ये शिक्षणक्षेत्रात–संघटनक्षेत्रात 'ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व' अशी स्वतःची ओळख उभी करतो, हे किती विस्मयकारक पण तितकंच प्रेरणादायी आहे, नाही का ?

कै.ती. राजाभाऊ लवळेकरांबद्दल लिहायचं, तर प्रथम डोळ्यासमोर येतो तो त्यांचा हा अद्भुत प्रवास. प्रश्न असा पडतो की मी त्यांच्याविषयी सांगायचं ते कुठल्या भूमिकेतून? पंचवीस वर्षं त्यांचा स्नेहमय सहवास आणि आधारछत्र मिळालेली सून म्हणून? **ज्ञान प्रबोधिनीच्या शैक्षणिक विचारांवर काम करताना त्यांच्याशी झालेल्या गप्पांमधून दिसलेल्या व्यापक शिक्षणतज्ज्ञाबद्दल? लहानपणापासून जो संघसंस्कार मी अवतीभोवती बघितला** (आणि 'लोक इतके निर्मोही, समर्पित असू शकतात' याबद्दल वाटलेलं आश्चर्य !) **तो कै. भाऊंच्या प्रत्येक विचार–कृतीतून मला दिसत आला, त्याबद्दल? इतक्या संस्था–संघटनांमध्ये ताज्या दमाच्या कार्यकर्त्यांपासून मुरलेल्या–अनुभवी–प्रतिष्ठित पदाधिकाऱ्यांना ते ज्या सहजसंवादातून जिंकून घेत त्याविषयी ? कुठल्याही झगझगाटात कधीच न रमलेले भाऊ किती जणांच्या मनात प्रकाशत होते ते मोजताच येत नाही त्याबद्दल ?**

एखाद्या लोलकावर प्रकाशकिरण पडावा आणि त्यातून रंगांच्या शेकडो छटा दिसाव्यात, तसं भाऊंचं जगणं! प्रत्येक रंग अस्सल आणि परिपूर्ण. या छोट्याशा लेखात त्यांच्या स्मरणांच्या अनंत छटांपैकी काही पकडण्याचा प्रयत्न करणार आहे.

ती. भाऊ तसं पाहिलं तर भावंडांमधले थोरले. (आक्का त्यांच्याहून वडील, पण भाऊ शाळेत असतानाच आक्कांचं लग्न झालं होतं.) त्यामुळे अगदी युवावस्थेपासूनच कुटुंबाची मोठी जबाबदारी त्यांच्या खांद्यावर येऊन पडली. चऱ्होली सोडून पुण्याला यावं लागलं. वाडिया कॉलेजमध्ये शिपाई म्हणून काम करता–करता एकीकडे रात्र–विद्यालयात शिक्षण चालू होतं. भाऊ एक गमतीची गोष्ट नेहमी सांगत. ते आणि त्यांचे दोन निकटचे मित्र (हे अगदी खात्यापित्या घरचे सुस्थितीतले) एका तत्कालीन ज्योतिषाकडे मुद्दाम गेले. तिघांच्या पत्रिका नाव खोडून एकत्र करून त्यांना दिल्या आणि विचारलं की 'काय रिझल्ट लागणार एस.एस.सी.चा, ते सांगा.' ते ज्योतिषी पत्रिका अभ्यासून भाऊंच्या पत्रिकेवर बोट ठेवून म्हणाले, 'हा मुलगा नक्की पास होणार', दुसऱ्या पत्रिकेवर बोट ठेवू म्हणाले, 'हा पास होणार नाही.' यावर भाऊ म्हणाले, 'अहो असं कसं होईल? हा चांगल्या घरचा आहे, घरून खूप मदत आहे ह्याला आणि पहिल्या पत्रिकेमधील मुलाला काहीच मदत नाही हो. तो रात्रशाळेत शिकतोय. तुमची काहीतरी गफलत होत आहे.' नंतर ते ही गोष्ट विसरूनही गेले. पण खरोखरच निकाल लागला, तेव्हा भाऊ व्यवस्थित उत्तीर्ण झाले आणि मित्राला पुन्हा परीक्षा द्यावी लागली. हे दोघं मित्र आणि भाऊ पुढचं सर्व आयुष्य, अंतिम श्वासापर्यंत सख्खे मित्र म्हणून जगले. **पण त्या प्रसंगातून दिसते कै. भाऊंची जिद्द आणि लढाऊ वृत्ती.** एकीकडे पदवीचं शिक्षण घेता–घेता नवीन मराठी शाळेत कारकून म्हणून केलेलं काम, बी.एड. करून निभावलेलं अंतर्बाह्य शिक्षकपण, मुलांच्या सर्वंकष हितासाठी झटलेले त्यांच्यातले मुख्याध्यापक आणि निवृत्तीनंतरही असंख्य विद्यार्थ्यांना मिळालेलं त्यांचं पितृतुल्य प्रेम आणि मानसिक–भावनिक आधार ! केवढा मोठा पल्ला होता हा !

**त्यांचं 'आधारवड' असणं काही विलक्षणच होतं. रक्ताच्या नात्याचं त्याला बंधन नव्हतं.** त्यांच्या नात्यातल्या कितीतरी जणांना त्यांचं घर हक्काचं होतंच, तसंच **इतरही कित्येकांना अडचणींच्या वेळी "Problem Solving" ला भाऊच लागायचे. त्यांच्या घराचा आणि मनाचा दरवाजा खरोखर सदैव सताड उघडा असे.** माझं

लग्न होऊन मी 'नवी-नवी सून' बनून लवळेकरांच्या घरात आले. माहेरी माणसांचं येणं-जाणं होतं, पण इथली बातच निराळी होती. चहाचं पातेलं सदैव गॅसवर चढलेलंच असायचं! येणाऱ्या-जाणाऱ्या प्रत्येकाचं अगत्याने स्वागत! त्याच्या/तिच्या आवडीनिवडीप्रमाणे आतिथ्य! सुरुवातीला मला वाटलेलं दडपण घरात भाऊंनी-आईंनी जोपासलेल्या मोकळ्या वातावरणामुळे केव्हाच पळून गेलं आणि रात्री बारा-बारापर्यंत हात वाळवत गप्पा मारण्यात मीही तरबेज झाले.

**न बोलता, न विचारता दुसऱ्याची गरज समजून घेण्याची भाऊंची सवय !** १९९५ मध्ये एक मित्र नुकतेच सहकार नगरातल्या घरात राहायला आले, तेव्हाची गोष्ट. काकूंना गुडघ्याचा खूप त्रास होता. भाऊ आणि आई त्यांचं घर पाहायला गेले होते. अजून घरात काहीच सामान-फर्निचर नव्हतं. घरी परतल्याबरोबर भाऊंनी 'वहिनींसाठी' लोखंडी पलंग आणि जेवणाचं टेबल पाठवून दिलं. अशी मायेची पाखर त्यांनी अनेकानेक स्नेही-सोबती-विद्यार्थ्यांवर धरली. मी ज्ञान प्रबोधिनीत काम करते - मला शनिवारी सकाळी लौकर जावं लागे, तेव्हा कितीतरी वेळा आई नसताना मी घरी येईपर्यंत कुकर होऊन, स्वयंपाक तयार असे. माझ्यासाठी ओट्यावर चिठ्ठी असे, 'मी बैठकीला जातो. जेवून घे बरं का!' **भाऊंच्या विशाल परिवारात कुठलाही छोटा-मोठा समरप्रसंग उद्‌भवला, तर तो सोडवायला भाऊंच्या कोर्टाशिवाय पर्यायच नसे. हे कोर्टसुद्धा कसं, तर थेट निवाडा न करता सगळ्यांनाच** 'आपण काय प्रकारे विचार केला तर हा प्रश्न सुटेल?' **हे अत्यंत मार्दवी पण ठाम शब्दात समजावून सांगणारे** (खरं तर भाऊ २००% समुपदेशक पिंडाचे होते. जातिवंत आणि अंतर्बाह्य) कितीतरी वेळा अशी माणसं चर्चेला बसली की **गमतीने आम्ही 'भाऊंचा दरबार बसला' असं म्हणायचो. पण ह्या दरबारातून प्रगल्भतेचं लेणं घेऊन किती जण आपल्याला आयुष्यात समाधानाच्या वाटेवर चालले असतील, ते आज प्रकर्षाने जाणवतं.**

संघाचा, अन्य संस्था-संघटनांचा संसार करताना भाऊंनी कुटुंब व्यवहाराला आणि संसाराला कधी कमी लेखलं नाही. ती. आई टेलिफोन्समध्ये नोकरी करत असल्याने शिफ्ट्स असायच्या. दिवसभराचं सर्व काम संपवून रात्री बारा वाजता कित्येक वर्षं भाऊ त्यांना आणायला कँपमध्ये जायचे. **मुलगा-जावई, मुलगी-सून हा भेद त्यांच्या शब्दकोशातच नव्हता. वरवर करारी, शिस्तीचे, अलिप्त वाटणारे भाऊ नातवंडांसोबत रमताना इतके 'मऊ मेणाहूनि' व्हायचे! त्यांच्या चुकांना 'अढीतला आंबा आहे ग अजून' असं म्हणून पोटात घालायचे. त्यांच्यासाठी गाणी रचायचे आणि म्हणायचेही!** तरुणपणी कदाचित ते खूप वेळ देऊ शकले नसतील, पण ज्या आत्मीय भावनेतून आणि पूर्ण जबाबदारीतून त्यांनी सर्व नाती सांभाळली, त्यांचा परिपोष केला, त्यामुळे स्नेहमय नात्यांचा एक अक्षय कोषच तयार झाला, जो आज आमच्यासाठी अनमोल ठेव बनला आहे.

**संघ आणि भाऊ हे तर अद्वैतच म्हणावं लागेल.** वयाच्या तेराव्या-चौदाव्या वर्षी जडलेलं संघाचं-संघकार्याचं वेड अंतिम श्वासापर्यंत तितकंच कट्टर होतं. सुरुवातीच्या खडतर प्रवासातसुद्धा संघाच्या अनेक जबाबदाऱ्या त्यांनी पेलल्या. पंचविशीत असताना जेव्हा घरच्या जबाबदाऱ्यांमुळे पूर्ण वेळ प्रचारक होणं केवळ अशक्य होतं, तेव्हा त्यांच्या मनाची घालमेल बघून त्यांच्या आईनं त्यांना सांगितलं, 'तुला एवढं वाटतंय ना, मग नोकरीचे आठ तास सोडून बाकीचा सगळा वेळ संघाला दे. घरात तुला आम्ही अडकवणार नाही.'' आणि खरोखरच पुढची कैक वर्षं भाऊंनी रात्रीची पाच-सहा तासांची झोप आणि आवरणं सोडलं, तर सर्व वेळ पूर्ण समर्पिततेने संघातल्या विविध दायित्वांना निभावलं. इतकंच नाही, तर संघाने जी-जी अवघड-गुंतागुंतीची कामं सोपवली, त्यांना 'माझं हे काम कसं असेल?' असा प्रश्न मनातही न आणता शेवटापर्यंत पूर्ण केली. मग त्यात संघर्ष आले, अनेक ताणतणाव आले, कायद्याच्या किचकट गोष्टी आल्या...! पुण्यातील 'तरुण भारत' दैनिकाचं काम थांबवणं आणि त्याचे सर्व व्यवहार गुंडाळणं हे असंच आव्हानात्मक काम आणि तेसुद्धा निवृत्तीनंतर - अत्यंत चिकाटीने, संवादाचं सर्व कौशल्य पणाला लावून भाऊंनी शेवटाला नेलं ! त्या वेळच्या कर्मचाऱ्यांच्या अनेक कुटुंबामध्ये 'भाऊंचा शब्द अखेरचा' इतका स्नेह जोपासून !

पूर्व भागामध्ये काम करत असताना एका ज्येष्ठ कार्यकर्त्यांशी भाऊंची चर्चा झाली. तिथल्या शाखेबद्दल बोलताना त्यांनी विचारलं,

'कशी चालू आहे शाखा?'

'छान! जेव्हा-जेव्हा मी जातो, तेव्हा भरपूर संख्या असते.'

भाऊ म्हणाले 'आणि एरवी?'

'एरवीचं फार माहीत नाही.'

'मग काय उपयोग अशा शाखेचा, जी तुमच्यावर अवलंबून आहे? तिथले स्थानिक लोक तयार व्हायला हवेत. तू नसतानाही शाखा चालायला हवी.' भाऊ हा प्रसंग बऱ्याचदा सांगत आणि **खरोखरच त्यांनी जे-जे दायित्व घेतलं, तिथे नवे-नवे कार्यकर्ते- स्वयंसेवक घडावेत, इतकंच नाही, तर त्यांनीच वेगवेगळ्या जबाबदाऱ्या घ्याव्यात यासाठीच सदैव प्रयत्न केले. त्यांचा व्यक्तिसंपर्क तर अफाट होताच, त्याचबरोबर समोरच्याच्या मनात उतरून मग विचारांचा खुराक देण्याचं त्यांचं कौशल्य संघटन-क्षेत्रात धडपडणाऱ्या माझ्यासारख्या कितीतरी नवशिक्यांना जिवंत Role Model वाटतं.** 'असू आम्ही सुखाने पत्थर पायातील' या संघगीतातील भूमिकेशी ते खऱ्या अर्थाने एकरूप झालेले होते. **लौकिक अर्थाने ते 'प्रकाशझोतात'** (थोडक्यात प्रसारमाध्यमे-पुरस्कार-चमचमीत बातम्यांचे केंद्रबिंदू) **कधीही नव्हते आणि तरीही त्यांच्या सहवासाच्या प्रकाशात जे-जे आले, त्यांची अंतरं आपसूक उजळून गेली !** अशा 'आत्मविलोपी' कार्यकर्त्यांची संघात वाण नाही, म्हणूनच तर हे काम अथकपणे सर्व अडथळे पार करत वाढत आहे. भाऊंचं संघाशी तादात्म्य असं स्वरूपमय होतं. त्यांची हृदयशस्त्रक्रिया झाल्यावर जेव्हा त्यांनी कमी दगदग करावी असं घरच्यांनी सुचवलं, तेव्हा ते जरा वैतागले. त्यांचं डॉक्टरांशी काय बोलणं झालं माहीत नाही, पण डॉक्टरांनी आम्हा सर्वांना बजावलं, 'त्यांना काम करता यावं म्हणूनच ही शस्त्रक्रिया केलेली आहे. तेव्हा त्यांना जे हवं ते करू द्या!' आमची बोलती बंद! तळागाळातल्या स्तरावर दशकानुदशके काम करणारा संघ-कार्यकर्ता हा संघकामाचा आधार. ती. भाऊंनी पुणे महानगर कार्यवाह या नात्याने केलेले अफाट काम याची प्रचीती आहे.

भाऊ म्हणजे संस्काराचं चालतं बोलतं विद्यापीठच. नुसत्या सहज संवादांतून छोट्या-छोट्या कृतींतून, एखाद्या समर्पक टिप्पणीतून, कधी इतिहासाचं मार्मिक दर्शन घडवून त्यांनी अनेकांना 'जीवनदायी शिक्षण' कसं असतं ते दाखवलं. इतकंच नाही, तर त्याचा अमिट ठसा समोरच्याच्या मनावर उमटवला. मला आठवतं, मी एखाद्या सामाजिक/सार्वजनिक कार्यक्रमात गेले आणि तिथे 'भाऊंचा' एखाद्या विद्यार्थी सापडला नाही असं घडलेलंच नाही. बरं, हे सर्व विद्यार्थी, 'लवळेकर सरांचे कुणीतरी' विद्यार्थी नसायचे. त्या प्रत्येकाकडे भाऊंची 'त्याची' अशी एखादी तरी खास आठवण असायची.

भाऊंचे घरातले, कार्यक्षेत्रातले संस्कार असे होते. यातील काहीही त्यांच्या तोंडून कधीच ऐकायला मिळायचं नाही. पण त्यांच्या सहवासात आलेल्या जवळजवळ प्रत्येकाकडून असे अगणित अनुभव-संस्कार एकमेकांपर्यंत पोहोचत असत.

त्यांनी विद्यार्थ्यांच्या मनात जे अढळ स्थान मिळवलं, त्याबद्दल त्यांच्याशी कधी बोललं तर ते शांतपणे हसून सोडून द्यायचे. पण एकदा मात्र गप्पा मारताना त्यांनी आम्हाला जुनी आठवण सांगितली. 'सोसायटीचे जुने कागदपत्र पाहताना सोसायटीच्या इतिहासाचं एक बाड मिळालं. त्यात टिळक, आगरकर, चिपळूणकर या संस्थापक सदस्यांनी ही शाळा कशी उभारली, ते तपशिलात दिलं होतं. त्यात असं वर्णन होतं की **मुलांना शिकायला बसल्यावर जमीन टोचू नये, म्हणून विष्णुशास्त्री चिपळूणकर रोज सकाळी शेण गोळा करून वर्ग स्वत: सारवत असत. विद्यार्थ्यांसाठी - देशासाठी त्या पिढीने जे केलं, त्याची तुलनाच नाही. आमचं काम त्यापुढे किती क्षुल्लक आहे!' असं म्हणताना त्यांचे भरून आलेले डोळे, रुद्ध झालेला गळा आठवला की जाणवतं, त्यांची Role Models कशी होती आणि**

**ते (आणि त्यांच्यासारखे अनेक जण) शिक्षक म्हणून कशी 'तपश्चर्या' करत होते ते!**

**भाऊंच्या आयुष्यात आदर्श आणि व्यवहार याची उत्तम सांगड – तीही कुठल्याही गाभ्याच्या तत्त्वांशी तडजोड न करता–त्यांना कशी घालता आली, याचा मला खूप विस्मय वाटतो आणि त्यामुळेच तसं करत राहण्याच्या इच्छेला पाठबळही मिळतं.** ('व्यवहार' याचा अर्थ इथे आदर्शांच्या स्वप्नरंजनात न रमता वस्तुस्थिती नीट लक्षात घेऊन आयुष्याचे निर्णय घेणं आणि तरीही स्वत:शी कायम प्रामाणिक, पारदर्शक राहणं असा आहे.) त्याच भूमिकेतून त्यांनी स्वत:चं अर्थकारण केलं, विविध संस्थांच्या पदांवरून काम करताना त्यांचं हित सांभाळायचा तत्त्वनिष्ठ प्रयत्न केला. मात्र ज्या क्षणी कुठे विरोधाभास वाटला किंवा स्वत:ची वयाची/स्वास्थ्याची मर्यादा लक्षात आली, त्या वेळी अतिशय सहजपणे गुंतलेला पाय हलकेच काढूनही घेतला. पूर्ण आस्था ठेवून, लागेल त्या मदतीचं वचन देऊन! माझ्या मते 'परमार्थ' आहे तो हा! तो भाऊंनी अखेरपर्यंत निष्ठेने निभावला.

संघपरिवारातील अनेक संस्था–संघटनांना त्यांची जी पारख मिळाली, त्यामुळे अनेक जण अक्षरश: 'घडले'. संस्कार भारती, विद्या भारती, स्वरूप वर्धिनी, ज्ञानदा प्रशाला... अशी अनंत खाती त्यांच्या डोक्यात भिरभिरत असायची. **प्रत्येक ठिकाणच्या प्रत्येक कार्यकर्त्याला वाटे, 'मी भाऊंशी केव्हाही बोलू शकतो, कधीही भेटू शकतो, माझ्या अडचणी भाऊंना नक्की कळतील, माझा आनंद भाऊंबरोबर वाटून घेतलाच पाहिजे...'**

**भाऊ हे अशा सर्व रचनांमधले खऱ्या अर्थाने Catalyst Leader होते. प्रक्रिया सुरू करून देण्यात महत्त्वाचा वाटा उचलायचा आणि स्वत: अलगद बाजूला व्हायचं!** (अर्थात जबाबदारी डोक्यात ठेवून मगच.) त्यामुळे अडलेले निर्णय, धोरणांतील सुसंगती, व्यक्तीव्यक्तींमधील ताणे–बाणे असे असंख्य विषय त्यांच्याकडे यायचे. क्वचितच असं कधी झालं की या सगळ्या ऊहापोहानंतर भाऊंविषयी कुणाच्या मनात काही नाराजी किंवा कटुता राहिली! जी कधी राहिली, तीसुद्धा त्यांच्या एखाद्या फोनवरच्या ऋजू, मार्दवपूर्ण हाकेने धुतली जाई.

संस्कार भारतीमध्ये एकदा मोठा पेच उद्‌भवला. दोन प्रसिद्ध कलाकार व्यक्तींची वादावादी झाली. त्यातील एकाने 'मी आता या व्यासपीठावर येणार नाही' असं जाहीर केलं. भाऊंमधल्या संघटकाला स्वस्थ बसवेना. दुसऱ्या कलाकार महोदयांना सांगून, सोबत घेऊन ते थेट नाराज झालेल्या महनीयांच्या घरी गेले, तेही त्यांच्या वाढदिवशी! अशा दिवशी प्रात:काळी, वाद मिटवायच्या तयारीने समोर आलेल्या माणसांवर कसं रागवायचं? त्यांचा राग वितळून स्नेहाने त्याची जागा घेतली आणि शिवाय 'संस्कार भारती'च्या व्यासपीठाला त्यांचा कायमचा लोभ मिळाला! **भाऊंची conflict resolution skills ही अशी होती.**

**असं म्हणतात की कर्तृत्व सिद्ध करणाऱ्या छोट्या–छोट्या गोष्टींतून आधी व्यक्तित्व (individuality) घडतं आणि मग जेव्हा स्वत:पलीकडे आपण इतरांचाही विचार करायला लागतो, तेव्हा 'व्यक्तिमत्त्व' (Persenality) विकसित होतं. भाऊंच्या बाबतीत हे दोन्ही कायम हातात–हात घालूनच झालं असणार.** अत्यंत खडतर परिस्थितीला तोंड देत स्वत:ची क्षमता सिद्ध करतानाच त्यांचं समाजभान तितकंच प्रखर जागं राहिलं. घरातली कुटुंबप्रमुखाची भूमिका निभावतानाही प्रत्येकाला स्वत:चा अवकाश (Space) मिळावा, याकडे त्यांचं बारीक लक्ष असे. त्यामुळे कुठलाही विषय त्यांच्याशी बोलायचा संकोच वाटायचा नाही. २०१३ मध्ये त्यांचं एक गंभीर आजारपण झालं. त्यातून ते बरे होण्याच्या मार्गावर असताना मला एका दीर्घ अभ्यासदौऱ्यासाठी बाहेर जाण्याची वेळ आली.

मला ठरवता येत नव्हतं काय करावं ? कामातील निकड म्हणून जाणं आवश्यक होतं, पण नुकत्याच आजारातून उठलेल्या भाऊंसाठी घरी थांबावं, असंही वाटत होतं. मदतीची व्यवस्था होती, पण तरीही निर्णय होत नव्हता. शेवटी त्यांना सर्व परिस्थिती सांगितली आणि म्हटलं, 'काय करू?' भाऊ म्हणाले, 'निश्चिंतपणे जा. चांगल्या कामासाठी मी कधीतरी आडकाठी केली आहे का? छान दौरा पूर्ण करून ये.' त्यांच्या त्या आश्वस्त शब्दांचं मोल ते नसताना आज

आणखीनच तीव्रपणे जाणवतं. असा unconditional support – सहज–विनाअट आधार – किती जणांना मिळत असेल?

भाऊ श्रद्धावान होते. परमेश्वरी शक्तीला – निसर्गातील देवत्वाला–मानणारे होते. घरच्या देवाची पूजा करणं त्यांच्या आनंदाचा, तादात्म्यतेचा भाग होता. पण कुठलंही कर्मकांड त्यांनी कधीच मानलं नाही. जे त्यांना पटे, तेवढंच ते करत; पण दुसऱ्या कुणाला पटत नसेल, तर त्याचा तितक्याच औदार्याने आदर करत. किंबहुना भारतीय संस्कृतीमधील छोट्या–मोठ्या उत्सव/सणांतील आणि पूजाविधींमागील शास्त्रीयता शोधण्याची आणि आधुनिक विज्ञानाच्या परिभाषेत त्याचा अर्थ लावायचा, तो सुंदर, ओघवत्या भाषेत मांडायचा ही त्यांची आवडती गोष्ट होती. वटसावित्रीची कथा, चातुर्मासातील सणांचं पर्यावरणाशी असलेलं नातं, विविध दैवतांचं मानवी वृत्तीशी असलेलं साधर्म्य असे कितीतरी विषय त्यांच्या नित्य चिंतनाचे होते.

**जे करायचं ते नेटकं, साक्षेपी वृत्तीने – मग ते कपड्यांच्या घड्या करणं असो की निवासी गृहसंकुलाचे हिशोब काटेकोरपणे देखण्या अक्षरात लिहिणं असो. रसिकतेने 'पाकिजा'सारखा चित्रपट पाहून त्यावर चर्चा करणं असो किंवा नातवंडांसाठी छंदोबद्ध, सुंदर शब्दांत जोजवणारं गीत लिहिणं असो! प्रत्येक क्षणात त्यांची समरसता असे आणि तरीही पूर्ण अलिप्तपण कायम जागं असे!**

**त्यांच्या सर्वच गंभीर आजारपणात त्यांच्यातील 'मार्तंड जे तापहीन' वृत्तीला जवळून बघायला मिळालं आणि एखादी कणखर पण अत्यंत स्नेहल व्यक्ती निकटच्या लोकांना अशा परिस्थितीतही किती शांतपणे समजून घेऊ शकते, ते कळलं.** जवळच्या–लांबच्या स्नेह्यांना स्वत:च्या उदाहरणातून–संवादातून दिलेलं मूल्यांचं देणं, प्रखर राष्ट्रनिष्ठा, शिक्षणाबद्दलचं मूलभूत चिंतन, विद्यार्थी–कार्यकर्त्यांप्रती असलेला अपार स्नेह, संघकार्यामधील पूर्ण तद्रूपता असलेले कै. भाऊ आता आपल्यात नाहीत. **त्यांचं जगण्यातील हे तेज त्यांच्यातील 'मार्तंड'रूपाचं दर्शन देतं. पण त्या तेजाची कधी कुणाला झळ बसली नाही, उलट त्यातूनच शेकडो, हजारो जणांची जगणी उजळत गेली.** त्यांच्या या स्मृती मनात जपून त्या आधारे आपलं जगणं अजून समृद्ध करणं, राष्ट्रकार्यी लावणं यातूनच त्यांच्यातील चैतन्याला खरी आदरांजली होईल असं वाटतं. –मो.: ९८२२५०२९९२

---

## 'ज्ञानियाचा राजा'

**– प्रज्ञा जोशी–भागवत**

विवेक सोसायटी, पुणे मधील दोन घरे– प्रणव ते ज्ञानिया–ह्यांच्यात इनमीन पाच मिनिटांचे अंतर. पण २०१४ साली रोज संध्याकाळी पाच वाजता ते अंतर कधी एकदा काटून मी प्रणवमधून ज्ञानियात पोहोचते आहे असं मला व्हायचं. मी सांगणार आहे भाऊंविषयी त्यांच्या नातसुनेचं गूज. आयुष्यभर कायमच प्रचंड व्यस्त असणाऱ्या भाऊंचा Exclusive वेळ मला तेव्हा मिळाला. निमित्त होतं ज्ञानेश्वरीवरील डॉ. रविन थत्ते ह्यांचं आणि शिवाजी महाराजांवरील अनिल दवे ह्यांची पुस्तके भाऊंना वाचून दाखवणे. परंतु **माझ्यासाठी ही sessions म्हणजे जीवनशिक्षणाचे वर्गच ठरले.**

पुस्तकातील लेख वाचताना वाक्यावाक्यातील मुद्द्यांसंदर्भात भाऊंकडे अनुभव, किस्से असत. **त्यांचा थक्क करणारा व्यासंग, नवीन कल्पना/तंत्रज्ञान ह्यांप्रती असलेली आणि ह्या वयातही उसळणारी जिज्ञासा, प्रखर ज्ञानपिपासा आणि ज्ञानाप्रती त्यांच्या पोटी असलेली नम्रता पाहून, अवाक् होऊन मी अनुभवत होते.** त्यांच्या अनुभवांची शिदोरी ते माझ्यासमोर अत्यंत सहजतेने उलगडत होते. त्यांच्या कार्याची व्याप्ती माहीत असल्याने त्या सहजभावात किती विनम्रता प्रकट होत होती, जी माझ्यासारख्या क:पदार्थ असलेल्या व्यक्तीच्या मनातही घर करून बसलेल्या अहंकाराला पदोपदी उद्ध्वस्त करीत होती. आमच्या संवादाचे स्वरूप मी प्रश्न विचारायचे आणि त्यांनी उत्तर

द्यायचे असे साधारणपणे असले तरी कधीकधी विषयांतून विषय निघायचे आणि क्वचित generation-gap मधून निर्माण होणारी मतभिन्नता पुढे ठाकायची. **जर माझा दृष्टिकोन रास्त वाटला तर भाऊ तो कोणत्याही अस्वस्थतेशिवाय मान्य करीत. इतके वयोवृद्ध, तपोवृद्ध असूनसुद्धा एका कालच्या पोरटीचे मत मान्य करण्याचा मोठेपणा आणि तसे प्रकटपणे सांगण्याची खिलाडूवृत्ती भाऊंच्या ठायी होती.** कित्येक विषयांसंबंधी गप्पा मारताना भाऊ माझ्या शंकांचे सोदाहरण निरसन करीत. माझ्या मनातील गोंधळाला कोणत्याही प्रकारे 'judge' न करता एकेक गाठ हळुवारपणे सोडवीत. कुणाला कधीही न सांगाव्याशा वाटलेल्या, अगदी मनाच्या आतल्या कुपीत कोंडलेल्या काही गोष्टीही मी भाऊंना सांगितल्या होत्या. चर्चमधील confession-box मध्ये पाद्रीबुवांनी ऐकाव्या तितक्या निर्विकल्पपणे त्या भाऊंनी ऐकल्या; नव्हे, त्यांच्याबद्दल मला समजावून शांतही केले. कोणास खरे वाटेल की, एका नातसुनेला आपल्या आजेसासऱ्यांविषयी इतका विश्वास वाटावा? पण ह्यात श्रेय सर्वस्वी त्यांचंच आहे.

**माझी स्वत:शी, माझा मूळ पिंड आणि संस्कृतीशी काहीशी कमकुवत होत चाललेली नाळ भाऊंनी नव्याने जोडली. मला आपल्या संस्कृतीचा खराखुरा अर्थ उलगडून दाखवत तिचा सखोल अभ्यास करण्याची ऊर्मी दिली.** त्यांनी उभ्या करून वृद्धिंगत केलेल्या संस्थांप्रमाणेच त्यांचं कुटुंबही एखाद्या वटवृक्षासारखे त्यांच्या छायेत फुलले आहे. परंतु स्वत:च्या वागणुकीतून भाऊंनी त्यांच्या ठायींच्या सकारात्मक मूल्यांचा वारसा त्यांच्या पुढील पिढ्यांकडे इतक्या परिणामकारकरीत्या सुपूर्द केला आहे; की ह्या वटवृक्षाच्या पारंब्यासुद्धा स्वत: वटवृक्ष बनतील. नैराश्यजनक तडाखे बसूनही ही मूल्ये अचल आहेत. **'जिथे घरातली प्रत्येक जबाबदारी माझीच आहे असे समजून घरातील प्रत्येक सदस्य वागतो, ते म्हणजे कुटुंब' अशी भाऊंची कुटुंबाची व्याख्या कोणत्याही context मध्ये खरी ठरेल अशीच आहे.** 'समानतेपेक्षा समरसता हवी.' हे भाऊंनी समजावलेलं तत्त्व समानतेच्या सगळ्या थोतांड कल्पनांना छेद देऊन समरसतेचा पुरस्कार करण्यास भाग पाडतं. कारण तत्त्वं नुसती शिकवणीत न ठेवता ती कशी जगावी ह्याचं मूर्तिमंत उदाहरण भाऊ होते.

२०१४ साली देशावर दुष्काळाचं सावट होतं. चिंताक्रांत सुरात मी भाऊंना म्हटलं, 'दुष्काळ पडणारसं दिसतंय हो भाऊ... आता काय करायचं?' क्षणभराच्या विलंबाशिवाय भाऊंनी अत्यंत शांतपणे उत्तर दिलं. 'काय करायचं म्हणजे? तोंड द्यायचं!' ...नैराश्य नाही; भीती नाही; अनिश्चिततेची चिंता नाही. स्वत:वर, स्वत:च्या तत्त्वांवर आणि **स्वत:च्या ईश्वरावर असलेला डोळस विश्वास हाच ह्या लवळेकर 'सरांचा' 'कणा' होता. ह्याच धीरोदात्तपणे त्यांनी त्यांच्या आयुष्यातील नाना वैयक्तिक, कौटुंबिक आणि सामाजिक कार्यातील आपदांना तोंड दिले...** नव्हे, नेस्तनाबूत केलं आणि तेच धीराचं वाण ते मला देऊ करत होते. ते वाण पचवण्याची कदाचित माझी क्षमताही नाही. पण माझ्या फाटक्या झोळीत वेचलेले भाऊंबरोबरचे ते क्षण मात्र केवळ माझे आहेत.

भाऊंचा अजून सहवास, त्यांच्या मायेची ऊब, त्यांच्या जाणिवांचा परिसस्पर्श आणि प्रगल्भतेचे काही अंश अजून थोडे तरी वाट्याला यायला हवे होते अशी रुखरुख कायमच राहील. तरीसुद्धा ह्या ज्ञानियाच्या राजाभाऊंची मी सखखी नसले तरी परकी राहिले नाही; हे समाधान मला आयुष्यभर पुरणार हे नक्की!

– मो. : ९६६६०६७९२४

❖❖❖

अहो वर्धिष्णुतरः उत्साहः । प्रेरणापरं भाषणम् ।। मार्गदर्शको संवादः ।।।
निराश्रिताः बालकाः निराधाराः संस्थाः विषण्णाः भगिन्यः निर्वाचनार्थम् उत्सुकाः, कार्यकर्तारः एतेषां, सर्वेषां जनानां सः आधारस्तंम्भः एव अस्ति ।

**– श्रीधर देव**

# सामान्यातील असामान्य तपस्वी

**– रवींद्र बळवंत हेजीब**

ती. भाऊ (श्री राजाभाऊ लवळेकर) माझे सासरे, एक आदर्श शिक्षक, आदर्श समाजसेवक, देशसेवक, स्वयंसेवक, कुशल संघटक, संपादक, उत्कृष्ट वक्ते, एक आदर्श पिता, पती, सासरे, आजोबा आणि एक आदर्श नागरिक. खरोखरीच अनेकांना लाजवेल असेच त्यांचे वागणे, बोलणे, चालणे आणि भरीव व ठोस कार्य ! **त्यांचे जीवन ही एक अखंड अशी सेवेची, त्यागाची तपश्चर्याच आहे, ती ज्ञानदानाबरोबरच शेवटपर्यंत चालू राहिली.**

**विशेषणांचे कितीही रंग वापरले तरी पूर्णांशाने चित्रित करता येणार नाही असे निष्कलंक, निर्मळ, त्यागमय, अष्टपैलू, भारदस्त व रुबाबदार व्यक्तिमत्त्व म्हणजेच आमचे भाऊ** राजाभाऊ, माझे सासरे. 'नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते' या तत्त्वाचा लामणदिवा आयुष्यभर तेवत ठेवून अनेकांची जीवनं फुलवणारा एक जागरूक दीपस्तंभ ! 'जे जे आपणासी ठावे, ते ते दुसऱ्यांसी सांगावे, शहाणे करून सोडावे सकळजन' हे संतवचन शिरोधार्य मानून त्याबरहुकूम बिनचूक आचरण ठेवणारे ध्येयनिष्ठ शिक्षक. **ज्ञानदानाबरोबरच 'ज्ञानिया'त राहूनही स्वत:ही ज्ञानार्जनात गढलेले विनम्र विद्यार्थी. इतिहास, कला, साहित्य व संस्कृती या विषयांचा गाढा व्यासंग जोपासणारे व त्याचा यथायोग्य उपयोग करून घेणारे परिश्रमी. बांधिलकीने भारून टाकणारे तपस्वी.** ११ जानेवारी १९२९ या दिवशी पुण्याजवळील चऱ्होली येथे जन्मलेल्या भाऊंनी आज पुण्यासारख्या शहरात स्वत:चा असा ठसा निर्माण केला. यावरूनच त्यांनी केलेल्या अथक परिश्रमांची कल्पना येते. त्यांचे वडील कै. बापू हे पण चऱ्होलीच्या शाळेत आदर्श शिक्षक होते. त्यामुळे शिक्षकी पेशाचे बाळकडू आपोआपच त्यांना लाभले. घरची परिस्थिती तशी बेताचीच. लहानपणीच शिक्षणाच्या निमित्ताने पुण्यात आल्यावर दिवसा काम आणि रात्री शिक्षण नाईट स्कूलमध्ये. अशा प्रकारे 'कमवा आणि शिका' या पद्धतीने जीवनाचा आरंभ केला. याच वेळी त्यांचा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंध आला. **संघाचे त्यांच्यावर झालेले संस्कार व त्यातूनच उमगलेली सामाजिक बांधिलकीची जाणीव यामुळे पुढील मार्गाची दिशा आपोआपच ठरली. B.A. B.Ed. करून संघकार्याचाच एक भाग म्हणून भाऊंनी शिक्षकीपेशा स्वीकारला. हा त्यामागील उदात्त हेतू. अनेक पिढ्या त्यांनी घडविल्या.**

विद्यार्थ्यांबद्दल ती. भाऊंना अपार प्रेम, आत्मीयता व सहानुभूती. विद्यार्थ्यांचा नैसर्गिक कल, त्यांची आकलन शक्ती, ग्रहणशक्ती ओळखून ते त्यांना सुयोग्य मार्गदर्शन व प्रोत्साहन देत असत आणि त्यांनी शेवटपर्यंत त्यात खंड पडू दिला नाही. भाऊंची राहणी अतिशय साधी पण विचारसरणी उच्च. बौद्धिक उंची उत्तुंग, उंचीपुरी कमवलेली शरीरयष्टी, पॅण्ट व बुशशर्ट परिधान केलेली व चेहऱ्यावर विद्वत्तेचे तेज झळाळणारी प्रतिमा व पारदर्शक स्वभाव यांची सर्वांवर प्रथमदर्शनीच छाप पडे. त्यांनी मनावर घेतले असते तर प्रसिद्धी, पैसा व सन्मानपदे मिळविणे त्यांना मुळीच कठीण नव्हते. पण **अनामिकतेकडे झुकवलेली प्रसिद्धीपराङ्मुखता व अर्थव्यवहारासंबंधीची उदासीनता पत्करून व्रतस्थपणे वाटचाल करणारे भाऊ हे कायमच ध्येयवादी शिक्षक राहिले.** त्यांनी आपली उभी हयात विद्यादानात, समाजकार्यात घालविली. रमणबागेतून मुख्याध्यापक म्हणून निवृत्त झाल्यावरही माजी विद्यार्थ्यांनी अर्पण केलेल्या गौरवनिधीमध्ये स्वत:चे पैसे टाकून शाळेला निधी परत दिला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व सर्वांगीण विकासासाठी त्याचा उपयोग व्हावा हीच त्यांची इच्छा, तळमळ. विद्यार्थ्यांबरोबरच शिक्षकांना सुद्धा न्याय व हक्क मिळवून देण्यासाठी ते कायम तत्पर राहिले. माणसाची जडण-घडण होत असते ती त्याच्यावर बालपणी झालेल्या संस्कारांमुळे. बालपण म्हणजे सुरुवातीची विद्यार्थीदशा व या काळात मातापित्यांबरोबरच विद्यार्थी त्याच्या शिक्षकाच्या सान्निध्यात अधिक असतो व हा शिक्षकच त्याच्यावर संस्कार करीत असतो. भाऊंनी त्यांच्या प्रत्येक विद्यार्थ्यावर सुसंस्कार केले, त्याला

घडविले, नावारूपाला आणले 'हे तो प्रचीतीचे बोलणे' हा भाऊंचा दंडक.

हे सर्व करीत असताना घरच्या जबाबदाऱ्या, संघकार्य यांकडे कधीही दुर्लक्ष होऊ दिलं नाही. त्यांनी घरामध्ये लावलेली शिस्त, केलेले संस्कार आजही मला ह्या घरात वावरताना स्पष्टपणे जाणवतात. मुख्याध्यापकाच्या पदानंतर, निवृत्तीनंतर मात्र त्यांनी संपूर्ण वाहून घेतले संघकार्यात. त्याचबरोबर तरुण भारतची संपादक पदाची जबाबदारी, शि. प्र. मंडळी अशा अनेक संस्थांमध्ये त्यांनी काम केले. या जबाबदाऱ्या सांभाळताना आलेले अनेक अडथळे पण त्यांनी सहजपणे पार पाडले. संस्कारभारती, 'स्व'-रूपवर्धिनी, ज्ञानदा प्रतिष्ठान इ. अशा संस्थांची जबाबदारी न थकता त्यांनी पार पाडली. त्यांच्यावर १९९२ मध्ये झालेली बायपास शस्त्रक्रिया व मधुमेहासारखे चिवट आजारसुद्धा त्यांचे हे कार्य, धावपळ रोखू शकले नाहीत.

**भाऊंनी अध्यात्म कधीही कोणाला सांगितले नाही पण आचरणात मात्र आणलं.** ''ॐ आप्पासाई भक्तमंडल, अंधेरी'' मंडळातर्फे काढलेल्या धार्मिक मासिकांच्या 'आनंदकंदच्या'' संपादनाची परमपूज्य गुरूंनी (धुरीबाबा) सोपविलेली जबाबदारी कुशलतेने, कल्पकतेने पार पाडली. कारण ज्या भक्तांनी आजपावेतो कुठल्याही प्रकारचे लिखाण केले नाही अशा सर्वांच्या श्रद्धापूर्ण लेखांच्या संपादनाचे कार्य, मूळ अर्थ व भावनांना धक्का न लावता भाऊंनी सहजपणे पार पाडले. त्यासाठी त्यांनी न थकता, न कंटाळता पुणे-मुंबई प्रवास ७२ व्या वर्षीही अनेकदा केला. **अध्यात्म म्हणजे काय हे भाऊंच्या कृतीतून, चालण्या-बोलण्यातून प्रतीत होताना दिसायचं.**

एक प्रसंग मला आवर्जून सांगावासा वाटतो:-

**पं. गंगाधरपंत पिंपळखरे गुरुजींकडे मी १९८२-८५ च्या सुमारास पुण्याला असताना शास्त्रीय संगीत शिकावयास जात असे. शास्त्रीय संगीताचे माझ्यावर पूर्वसंस्कार न झाल्यामुळे माझे व पंडितजींचे नाते म्हणावे तसे घट्ट होत नव्हते. पण त्यांना जेव्हा कळले की मी राजाभाऊ लवळेकर सरांचा जावई आहे, तेव्हा या गुरुशिष्यांच्या नात्यात आमूलाग्र फरक पडला. भाऊंविषयी पंडितजींना फारच आदर. आमचे गुरू शिष्याचे नाते अशा रीतीने अधिकच स्निग्ध होत गेले ते केवळ भाऊंच्या फक्त नावामुळे. भाऊंनी सेवा कोणाकडूनच करून घेतली नाही. परंतु सेवाव्रत मात्र अखंड सुरूच ठेवले.** संपत्ती व सत्ता यांचा मोह त्यांना कधीच शिवला नाही. त्यांना मोह सज्जन माणसांचा, त्याच्या उन्नत्तीचा व त्याप्रमाणे त्यांनी माणसं जोडलीदेखील. भाऊंवर बायपास सर्जरी करावयाच्या वेळी त्यांना fresh blood ची आवश्यकता होती. हे कळताच शेकडो विद्यार्थी व हितचिंतक पुढे सरसावून आले रक्त देण्यासाठी. हे पाहून हॉस्पिटलमधील बऱ्याच लोकांनी विचारलं की लवळेकर साहेब कोणी 'VIP' आहेत का? आणि शस्त्रक्रिया करणाऱ्या सर्जनांनी जे अमेरिकेत १० वर्षे प्रॅक्टिस करून पुण्यात आले होते- स्वत:ची फीही घेतली नाही, विशेष म्हणजे त्यांचा काहीही पूर्व परिचय नसताना! ८६ व्या वर्षापर्यंत भाऊ स्वावलंबी, स्वाभिमानी आणि कार्यरत होते. दुसऱ्यांसाठी काहीतरी करण्याची त्यांची धडपड चालूच होती. संत एकनाथ महाराजांच्या पत्नी गिरिजाबाईंप्रमाणे सौ. आई या माऊलीच्या पाठिंब्यानेच भाऊ संघाचे इतर सेवाभावी संस्थांचे काम झोकून देऊन करू शकले. त्या सदैव भाऊंच्या कार्यात सावलीसारख्या वावरल्या.

**भाऊंनी सांगितलेले देवांच्या आरत्यांचे अर्थ :**

देवांच्या आरत्या, हा आपला अमूल्य पारंपरिक ठेवा आहे, पण त्या सर्व आरत्यांचा भावपूर्ण अर्थ, त्यातील क्लिष्ट असे शब्द व त्याचे अर्थ भाऊंनी मला समजावून सांगितले. त्यामुळे या अमूल्य ठेव्याची मला नव्याने उमज आली. भाऊंबरोबर आरत्यांचे अर्थ समजावून घेत असताना चार तास कसे गेले कळलेच नाही. तिन्हीसांजचे दिवेसुद्धा लावण्याचे भान मला राहिले नाही. ते चार तासांचे हिप्नॉटिझम् ही एक सुखकारक आणि अत्यंत आनंददायी अशी माझ्या आयुष्यातील परीस घटना होती. सर्व आरत्यांचे अर्थ वैशिष्ट्यपूर्ण होते. विशेष करून महालक्ष्मीच्या आरतीचा अर्थ तर, मला फारच भावला होता.

जय देवी जय देवी जय महालक्ष्मी ।
वससी व्यापकरूपी तू स्थूलसूक्ष्मी ।।

लक्ष्मी स्थूल आहे, ती सूक्ष्म आहे. स्थूल म्हणजे डोळ्यांना दिसणारी, सूक्ष्म म्हणजे न दिसणारी. पण हवेसारखी जाणवणारी. एक गैरसमज आहे. भाऊ सांगत होते–लक्ष्मी म्हणजे पैसा. लक्ष्मीपूजन म्हणजे पैशांचे पूजन असे नाहीये. भाऊंनी श्रीसूक्ताचा संदर्भ देऊन मला सांगितले की, लक्ष्मी अश्वदायी आहे, गोदायी आहे, जनदायी आहे. घरात, दारात, गाई, घोडे असणे हेसुद्धा लक्ष्मीचेच रूप आहे. घरातील केरसुणी जी आपले घर स्वच्छ ठेवण्यास मदत करून घरातील सर्वांच्या आरोग्याची काळजी घेते, अशी ही केरसुणी आरोग्यदायी आहे आणि तीसुद्धा लक्ष्मीचेच रूप आहे.

माणिकरसना सुरंगवसना, मृगनयनी
शशीधरवदना राजस मदनाची जननी
तारा शक्ती अगम्या शिव भजका गौरी
सांख्य म्हणती प्रकृती निर्गुण निर्धारी
गायत्री निजबीजा निगमागम सारी

सुरंगवसना म्हणजे रंगीत वस्त्रे धारण केलेली, हरणासारखे जिचे डोळे आहेत, चंद्रासारखा जिचा शीतल आणि सुंदर चेहरा आहे अशी ही तेजस्वी, प्रकाशमान आणि आल्हाददायक लक्ष्मी आहे. तिचे वर्णन सहस्रवेळा जरी केले तरी ते अपुरेच. सांख्य म्हणजे संख्या नव्हे, सांख्य म्हणजे तत्त्वज्ञान. गीतेच्या दुसऱ्या अध्यायात 'सांख्ययोग' आहे. ही लक्ष्मी निर्गुण आहे. गायत्रीचा अर्थ तर मला फार आवडला.

गायत्री म्हणजे सूर्यमंडल. त्यात सूर्य आहे, आकाश आहे, अवकाश आहे, तारांगण आहे, नक्षत्रे आहेत, आकाशगंगा आहे. अनंत आकाशगंगा आहेत, तेजोमंडळ आहे अशी ही गायत्री. निगमागम म्हणजे निगम आगम ही वेदांची रूपे, अंगं आहेत, सांगोपांग आहेत.

चतुरानन कुश्चित कर्माच्या ओळी
लिहिल्या असतील माते माझे निजभाळी
पुसोनि चरणातळी पद सुमने क्षाळी
मुक्तेश्वर नागर क्षीरसागर बाळी

चतुरानन म्हणजे ब्रह्मदेव, त्याने माझ्या कपाळी ज्या कर्माच्या कुश्चित गोष्टी लिहिल्या आहेत त्या, हे देवी, तू पुसून टाक. अशी विनवणी मुक्तेश्वर नागर क्षीरसागर महाराजांनी केली आहे, आणि महालक्ष्मीची आरती इथे संपते.

आता महालक्ष्मीची आरती म्हणताना मला ती जास्त अर्थपूर्ण, भावपूर्ण, भक्तियुक्त आणि हृदयाला भावणारी अशीच वाटते. भाऊंनी प्रत्यक्ष महालक्ष्मीचीच (आमचे कुलदैवत) माझी नव्याने ओळख करून दिली, अगदी सहजपणे.

**भाऊंचा चाळीस वर्षांचा जिवलग मित्र : डायबेटीस/मधुमेह**

या चिवट मित्राने भाऊंना चाळीस वर्ष विळखा घातला होता. पण भाऊंनी त्याला कधीच जुमानले नाही. त्यांचे रमणबागेतील ज्ञानार्जनाचे कार्य असो की, संघाचे आणि इतर सेवाभावी संस्थांचे काम असो ! 'स्व'रूपवर्धिनी, ज्ञानदा प्रतिष्ठान, संस्कार भारती इ. तसेच तरुण भारतचे संपादक, आणि संघाने टाकलेल्या अनेक महत्त्वाच्या आणि कठीण अशा जबाबदाऱ्या त्यांनी झोकून आणि यथार्थपणे पेलल्या. मधुमेहाने भाऊंचा एक एक अवयव कमकुवत करण्याचे काम अगदी प्रामाणिकपणे केले. कानांनी ऐकू न येणे, दृष्टी अधू होणे, बसल्याजागी झोप येणे, पायावर सूज असणे, डोळ्यांवर तर शेवटी इतका परिणाम होऊ लागला की समोरच्या माणसाला मी कोण आहे हे भाऊंना सांगावे लागे (म्हणजे घरातील सर्वच माणसे सोडून). दृष्टी जरी अधू झाली तरी भाऊ डगमगले नाहीत, भ्यायले नाहीत, घाबरले

नाहीत, आत्मविश्वास गमावून बसले नाहीत. या गोष्टींचा त्यांनी कधीच बाऊ केला नाही. मला एक गोष्ट आठवली. आमच्या बँकेतील एक निवृत्त सहकारी, मुंबईवासी, हेवी डायबेटीक असे. त्यांची एक दिवस अचानक दृष्टी गेली आणि त्यांनी अगदी लहान मुलासारखा टाहो फोडला. मला दिसत नाही, आता मी काय करू? बायको, मुलं, नातवंडांचे चेहरे पाहता येत नाहीत, अगदी बिथरून गेले बिचारे. मी त्यांना देवीदास कांबळेचे नाव सुचविले. देवीदास आमच्या ऑफिसमध्ये एक Visually Impaired टेलिफोन ऑपरेटर होता. पण त्याचे कधीच, कुठेही काहीही अडले नाही. तोच सर्वांत डोळस होता. त्याला जाँ (Jaw) पॅकेजच्या आधारे Computer operate करता यायचा, तो e-mail पाठवू/वाचू/ऐकू शकत होता. SMS, cell phone वगैरेमध्ये त्याला कधीच अडचण आली नाही. या सगळ्या गोष्टी तो सहजपणे हँडल करत होता. आणि कौतुकाची बाब म्हणजे तो इंटरनॅशनल बुद्धिबळ चँपियनही होता. लंडनमध्ये आपल्या बुद्धीची झलक त्याने दाखविली होती आणि बुद्धिबळाची स्पर्धा जिंकली होती. असा हा देवीदास सर्व अंध बंधूंचे जॉचे क्लासेस घेत असे- मोफत. देवीदास त्यांचा मेंटार (Mentor) झाला. त्या सहकाऱ्यांना त्यानं धीर दिला. 'साहेब, तुम्हाला काहीही झालेले नाही. तुम्ही Computer Operate करू शकाल, e-mail पाठवू शकाल, वाचू शकाल, मोबाईल तुम्हाला मी शिकवतो. काठीच्या आधारे स्टेशनवर (Local) कसे जायचे मी तुम्हाला शिकवीन. फक्त तुम्ही एकच करा की, तुमचा आत्मविश्वास गमावू नका. तुम्हाला काहीही झाले नाही' आणि चार महिन्यात रोज घरी येऊन देवीदासने त्यांना सर्व गोष्टी शिकवल्या आणि त्यांचा अशा प्रकारे पुनर्जन्म झाला. नवसंजीवनीच देवीदासने त्यांना बहाल केली होती. भाऊंना घाबरलेले, अस्वस्थ असे आम्ही कधीच पाहिले नाही, ते मनाने खंबीर होते, त्यांनी अध्यात्म हृदयात रुजवले होते, मनाने ते स्थिर होते आणि येईल त्या परिस्थितीचा अगदी आनंदाने स्वीकार करणारे होते. दृष्टी अधू झाली, ऐकू येईना, चालताना काठीचा आधार घ्यावा लागला, पायावर सूज वगैरे असतानाही भाऊंनी कधी टाहो फोडला नाही, आरडाओरडा केला नाही, कुणालाही त्रास दिला नाही आणि स्वतःचा आणि घरातील इतरांचा आत्मविश्वास ढळू दिला नाही. नाहीतर साधी पाच मिनिटे (Minutes) घरातील लाईट गेल्यावर मेणबत्ती/बॅटरी शोधण्यासाठी लागणाऱ्या पाच मिनिटांमध्ये आपली अवस्था कशी कावरीबावरी होते हे सर्वांनीच अनुभवले आहे. असे राजा (भाऊ) असलेले आमचे भाऊ, माझे सासरे.

भाऊंनी माणुसकीची उंची आपल्या उभ्या आयुष्यात कधीच कमी होऊ दिली नाही. मूल्यांची घसरण कधीच होऊ दिली नाही. बाहेरची टेन्शन्स घरात कधीच जाणवू दिली नाहीत.

माझ्या आयुष्यात मी बोटावर मोजता येतील अशी जी सज्जन आणि मोठं मन असणारी माणसं पाहिली आहेत, त्यात भाऊंचं स्थान अग्रगण्य आहे, आणि याचा मला अभिमान आहे त्यांचे माझ्याशी असलेले वडीलकीचे नाते हे माझे पूर्वजन्मीचे पुण्य आहे, सुकृत आहे, ह्यात शंका नाही. ८ जून २०१६ ला जरी त्यांनी या जगाचा निरोप घेतला तरी आम्ही भाऊमय कधी झालो हे कळलेच नाही. भाऊंनी हजारो विद्यार्थ्यांसोबत आम्हालाही घडवलं, अगदी मनापासून, प्रेमाने, कळकळीने, आत्मीयतेने. एखाद्या योगी पुरुषाप्रमाणे, अगदी निरपेक्षपणे 'तपस्वी' होऊन. आजही भाऊ माझ्या हृदयात, आचारात, विचारात सातत्याने सदा डोकावतात आणि मला जीवनाचा नवा मार्ग दाखवतात. ती. भाऊंना माझी प्रेमपूर्वक आदरांजली.

– मो. : ९८१९६९४४३३

❖❖❖

* संघकार्य – संस्थाकार्य – संसार या सर्व ठिकाणी भाऊंची भूमिका स्थितप्रज्ञाची राहिली आहे.
* आपल्या व्यथा व त्यावरील उपायांची मोकळेपणाने चर्चा करण्याचे स्थान म्हणजे भाऊ हा सर्वांचा अनुभव.

**– डॉ. अशोक कुकडे**

# आठवणींचे हिंदोळे...

**– दत्ता जोशी**

स्व. राजाभाऊंची स्मरणिका काढावयाची आहे तेव्हा त्यांच्यासंबंधी आठवणी पाठविण्यासाठी त्यांच्या कन्येचा (भाग्यश्री भागवत) निरोप आल्यावर माझ्या मनात भाऊंच्या विषयी अनेक आठवणी जाग्या झाल्या व मी सद्‌गदित झालो. माझा भूतकाळ माझ्यासमोर उभा राहिला.

त्याला कारणही तसेच आहे. राजाभाऊंचे व माझे बालपण एकाच ठिकाणी (म्हणजे माझ्या गावी) गेले. ते माझ्यापेक्षा तीन वर्षांनी मोठे होते. तरी आम्ही एकत्र खेळलो, वाढलो. स्व. भाऊ, त्यांचा धाकटा भाऊ स्व. मधुसूदन व मी असे त्रिकूट कायम एकत्र असायचे.

शिक्षणासाठी स्व. भाऊंचे कुटुंब पुण्यास आले. भाऊंचे वडील म्हणजे माझे मामा आदर्श शिक्षक होते. ते शिक्षण संघटनेचेही काम करीत व त्यांच्या शिक्षण सहकाऱ्यांच्या अडचणी दूर करीत व मदत करीत. स्व. भाऊंच्यामध्येही वडिलांचे हे दोन्ही गुण अनुवंशाने आले व त्याप्रमाणे भाऊंनीही शिक्षण–क्षेत्रात तसेच संघटन–क्षेत्रात (राष्ट्रीय स्व. संघात) नेत्रदीपक काम केले व यशस्वी झाले.

आमच्या मामांचे कुटुंब पुण्यात आले. त्यावेळी त्यांच्या कुटुंबात मामा, मामी, भाऊ, त्यांचे भाऊ व चार मुली असे मोठे कुटुंब होते. माझी मामी (स्व. भाऊंची आई) म्हणजे प्रत्यक्ष अन्नपूर्णा होती. या कुटुंबाचे सामाजिक व नातेवाईक संबंध मोठे असल्याने, कुणीना कुणी त्यांचे पाव्हणे जेवायला असायचे. हे कुटुंब म्हणजे गोकुळ होते. संस्कार उत्तम होते. शिक्षणानिमित्त मीही या कुटुंबात तीन–चार वर्षे उत्तम संस्कारात व आनंदात वाढलो आहे. हे त्यांचे माझ्यावर मोठे ऋण आहे.

स्व. राजाभाऊंचे सर्वांवर प्रेम होते. कोणीही भेटले किंवा त्यांच्या घरी गेले तरी त्यांची व त्यांच्या कुटुंबियांची आस्थेने व प्रेमाने चौकशी करीत. त्यांना मार्गदर्शन करून अडीअडचणी सोडविण्यासाठी निष्ठेने मदत करीत.

**राजाभाऊंचा स्वभाव जिद्दी व स्वाभिमानी होता.** त्यांनी स्वतः नोकरी करून शिक्षण व पदवी संपादन केली. त्यांच्यावर संघाच्या संस्कारांचा प्रभाव पडला. त्यांच्याबद्दल सर्वांना आदर व प्रेम वाटे. मी नोकरीनिमित्त ग्रामीण भागात असल्याने त्यांचा संपर्क कमी होत गेला. तरीही कधी भेटल्यावर ते सर्वांची आस्थेने चौकशी व मार्गदर्शन करीत.

**राजाभाऊंचा स्वभाव प्रेमळ व दिलदार होता. ते कोणाहीबद्दल चांगलेच बोलत.** त्यांनी निरनिराळ्या सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात निष्ठेने व प्रामाणिकपणे उत्तम कार्य करून स्वतःचा ठसा उमटविला व आयुष्यभर चांगली माणसे जोडून ते कृतार्थ जीवन जगले.

स्व. भाऊंच्या मागे श्रीमती कुसुमवहिनी भक्कम उभ्या होत्या. त्यामुळे भाऊंना सामाजिक क्षेत्रात भरपूर काम करण्यास वेळ मिळाला. भाऊंच्या यशात त्यांचाही मोलाचा वाटा आहे. आणीबाणीच्या काळात त्यांच्यावरील जबाबदारी त्यांनी यशस्वीपणे पार पाडली. भाऊंनी आयुष्यभर केलेल्या प्रामाणिक कष्टाचे फळ त्यांना मिळाले. त्यांचे जीवन सर्व दृष्टीने पूर्ण कृतार्थ झाले. त्याचप्रमाणे त्यांची सून सौ. अनघा एका उत्तम शैक्षणिक व सामाजिक संस्थेत यशस्वीपणे काम करीत आहे. तिनेही भाऊंच्याप्रमाणे यशस्वी व्हावे व लवळेकर घराण्याचा वारसा पुढे न्यावा. त्यांनी व त्यांच्या सर्व कुटुंबियांनी व्यक्तिगत माझ्यावर व माझ्या कुटुंबावर जे अनंत उपकार केले ते मी या जन्मी फेडू शकणार नाही.

– मो. : ९८६०७९६४३८

❖❖❖

## धडपडीला प्रोत्साहन देणारे भाऊ

**– विवेक जोशी**

कै. भाऊ हे माझ्या वडिलांचे मामे भाऊ. माझे वडील व आजोबा हेही चऱ्होलीत राहात असल्याने दोन्ही कुटुंबात घरोबा होता. सन १९४२ च्या सुमारास शिक्षणाचे निमित्ताने लवळेकर कुटुंबीय हे पुण्यात स्थायिक झाले. त्यामुळे रोजच्या भेटी जरी कमी झाल्या तरी लग्न, मुंज, कार्याच्या निमित्ताने, तसेच पुण्यात आल्यानंतर जोशी कुटुंबीयांचा मुक्काम हा लवळेकरांकडेच हे ठरलेले होते.

मला आठवतंय साधारणतः सन १९६९–७० च्या सुमारास माझा चुलत भाऊ गंगाधर याचे शिक्षण चालू होते. त्याला मदत व्हावी म्हणून त्याने चऱ्होलीस गणपतीच्या मूर्तीचे मोल्डचे शिक्षण घेऊन गणपतीच्या मूर्ती तयार करून विकण्याचे ठरविले. त्याप्रमाणे विविध आकारातील गणपतीच्या मूर्ती करून, काही गणपतीच्या मूर्ती चऱ्होलीस विकून, काही मूर्ती पुण्यास विकावयाचे ठरविले. परंतु **पुण्यात मूर्ती कोठे विकणार तर हक्काचे ठिकाण म्हणजे भाऊंचे घर. त्यामुळे तो पाच–दहा मूर्ती घेऊन भाऊंना दाखवायला गेला. पुण्यामध्ये विक्रीस असलेल्या अन्य मूर्तींच्या पार्श्वभूमीवर श्री. गंगाधरने विक्रीस आणलेल्या मूर्ती या दुय्यम प्रतीच्या असूनही भाऊंनी मूर्ती तर विकत घेतलीच पण अन्य मूर्तींची विक्री करण्यास मदत केली. त्यावेळेस कै. भाऊंचे म्हणणे होते की एखादा तरुण स्वतःच्या शिक्षणासाठी असा काही प्रयत्न करीत असेल तर त्याच्या प्रयत्नात आपण मदतच केली पाहिजे.**

माझे नववी पर्यंतचे शिक्षण हे गावीच म्हणजे चऱ्होलीत झाले. माझ्या इ. सातवी नंतर आम्ही शिक्षणाच्या निमित्ताने पुण्यास यावे यासाठी कै. भाऊंचा आग्रह सतत आईवडिलांकडे असे. त्यामुळे इ. नववी नंतर इ. दहावी व अकरावीकरिता पुण्यात येण्याचे ठरले. परंतु कोणत्या शाळेत प्रवेश मिळणार हा प्रश्न होता. तो. कै. भाऊंनी सहजपणे सोडविला. कै.भाऊ त्यावेळेस न्यू इंग्लिश स्कूल रमणबागेत पर्यवेक्षक होते. त्यामुळे माझा प्रवेश हा रमणबागेत सुरळीतपणे झाला.

माझे पहिल्यापासून शिक्षण हे ग्रामीण भागात झाल्याने सर्व उच्चार हे ग्रामीण ढंगाचे होते. त्यामुळे रमणबागेत प्रवेश घेतल्यानंतर वर्गामध्ये बोलताना अत्यंत संकोचल्यासारखे होई. **त्यामुळे मनामध्ये थोडासा न्यूनगंड निर्माण झाला. ही गोष्ट भाऊंच्या ध्यानात आली असावी. परंतु कै. भाऊंनी त्यासंदर्भात कोणतीही जाणीव न होऊ देता माझ्याशी अनेक वेळा बोलून, विविध उदाहरणे देऊन, माझ्यातील न्यूनगंड दूर केला.**

मी दहावी व अकरावी अशी दोन वर्षे रमणबागेत होतो. या दोन वर्षांत मला जाणवलेली एक गोष्ट म्हणजे कै. भाऊंचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांशी असलेले अनौपचारिक संबंध. ते सर्वांशी अत्यंत सहजतेने संवाद साधत असत. विद्यार्थीवर्गामध्ये त्यांच्याविषयी आदरयुक्त भीती होती.

इ. अकरावी करिता ते मला हिंदीचे शिक्षक होते. वर्षभरात त्यांनी एकदाही हिंदीचे पुस्तक हातात धरून शिकवलेले मला आठवत नाही. वर्गात येताना विषयाची पूर्ण तयारी करूनच ते वर्गात येत असत. त्यामुळे ते शिकवित असताना वर्गात पूर्ण शांतता असे.

महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना सुद्धा अनेक वेळा भाऊंचे मार्गदर्शन मिळत असे. प्रत्येक भेटीमध्ये ते आपुलकीने विचारपूस करून शिक्षणातील प्रगतीबाबत जाणून घेत असत.

महाविद्यालयीन शिक्षणानंतर मी आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण व्हावे याकरिता कै. भाऊंनी खूप मदत केली. आज जो मी काही आहे तो केवळ भाऊंमुळे आहे हे मला सांगायला अजिबात कमीपणा वाटत नाही. कै. भाऊंच्या स्मृतीस शतशः नमन.

– मो. : ९९६०८००९०५

❖❖❖

# आमचा भाऊ

**– अनुराधा कुलकर्णी**

भाऊच्या शेवटच्या दुखण्यामध्ये बाहेर पडणे त्याला अवघड झाले होते. तरी त्याआधीच्या दिवाळीला मी त्याला बोलावणे करायला गेले होते. नेहमीप्रमाणे सौ. वहिनींना घेऊन यायचे निमंत्रण केले. भाऊबीजेच्या दिवशी चि. अद्वैत त्याला घेऊन आला. पण भाऊ एकटाच आला. मी 'वहिनी का नाही आल्या ?' म्हणून विचारले. तो म्हणाला, 'अग तिला ऊठबस करायला आणि चालायला खूप त्रास होतो आहे. कशी येणार ती ?' असा विचार सर्वांच्याच बाबतीत तो करत असे. त्याची स्वतःची प्रकृतीसुद्धा फारशी चांगली नव्हती. पण कोणाला 'नाही' म्हणून तो निराश करीत नसे. उभे राहताना किंवा पायात बूट घालताना त्याला खरं खूप त्रास होत असे पण तो कधीही कोणाची मदत घेत नसे. ती आम्हा बहिणींची शेवटचीच भाऊबीज ठरली. ईश्वरेच्छा बलीयसी ! दुसरं काय म्हणणार !

त्याला अगदीच बाहेर पडता येईनासं झालं म्हणून त्याच्याशी गप्पा मारायला मी दुपारी अधूनमधून जाऊ लागले. त्यावेळी आमचा परिवार, आमचं गाव चऱ्होली, त्याचं शिक्षण, संघजीवन, त्याची शाळा, त्याची नोकरी अशा कितीतरी गोष्टी त्याने सांगितल्या. संघ आणि त्याचे विद्यार्थी हे त्याचे अत्यंत जिव्हाळ्याचे विषय. तो तरुण असताना भवानी पेठ शाखेमध्ये जात असे. एखादा स्वयंसेवक जर शाखेत आला नाही तर चौकशी करून त्याच्याशी, विशेषकरून त्याच्या घराशी संपर्क साधण्याच्या रीतीनुसार एका स्वयंसेवकाच्या गैरहजेरीबद्दल त्याने चौकशी केली. तो आजारी आहे कळले. पण असेही सांगण्यात आले की 'तो बरा झाला की येईल शाखेत, पण त्याला भेटायला येऊ नका.' बरेच दिवस तो मुलगा शाखेत येईना. भाऊला फार काळजी वाटायला लागली. शेजारी राहणाऱ्या दोन स्वयंसेवकांना घेऊन भाऊ त्या मुलाला भेटायला गेला. त्याचं घर म्हणजे लहानशी झोपडी होती. नावाला दार म्हणावं अशी फळी होती. कोपऱ्यात चूल व थोडी भांडी होती. त्यापलीकडे आजारी असलेल्या त्या स्वयंसेवकाचं अंथरुण होतं. झोपडीच्या एका भागात पडदा सोडलेला होता. सगळं बोलणं झालं, चौकशा झाल्या पण पडद्याबद्दल काही खुलासा होईना. शेवटी न राहवून भाऊने विचारले की 'हा पडदा का लावला आहे ?' काही वेळ शांततेत गेला अन् मुलाच्या आईने उत्तर दिले, 'तिथे माझी सवत 'धंदा' करते. म्हणून मी घरी भेटायला येऊ नका असं कळवलं होतं.' भाऊने ही कथा मला सांगितली. क्षणभर मस्तक सुन्न झालं. अशी अनेक वेगवेगळ्या समस्यांशी झुंजणारी, दारिद्र्याचे चटके खाणारी मुले भाऊंनी पाहिली. त्यामुळेच 'स्व'–रूपवर्धिनी मनात रुजली असेल. **तळागाळातल्या मुलांची मनःस्थिती, त्यांचे आरोग्य, त्यांची शिक्षणाची आबाळ त्याला स्वस्थ बसू देत नव्हती.** पिंपरी भागात तो रात्र–अभ्यासिका चालवत असे. गरीब, शेतकऱ्यांची मुलं रात्री अभ्यासाला बसायची. अभ्यासाला आलेली मुलं झोपल्यावर भाऊला रात्री परत येणे एकदा अशक्य झालं. पण एका मुलाच्या वडिलांच्या ही गोष्ट लक्षात आली. ते म्हणाले, 'थांबा सर, मी तुमची झोपायची वेवस्था करतो. अवो एवढ्या लांबून तुम्ही आमच्या लेकरांच्यासाठी येता. थांबा वाईच' असं म्हणून त्यांनी बैलगाडीमध्ये गवत पसरले. त्यावर एक धोतर अंथरले. एक धोतर पांघरायला दिले आणि म्हणाले, 'आता झोपा निवांत.' केवढी ही कृतज्ञता !

**'जे का रंजले गांजले' त्यांना 'आपुले' म्हणणारा भाऊ खरा कर्मयोगी होता.** आमच्या परिवारातच नाही तर भोवताली समाजातही काही मदतीची गरज असली तर 'कमी तिथं आम्ही' या त्याच्या ब्रीदानुसार तो धावून जात असे. त्याचे विद्यार्थी सवड झाली की त्याला भेटून जात असत.

भाऊचे एक मित्र होते कै. बाबुराव गद्रे. विक्रोळी येथील गोदरेज कंपनीच्या शाळेमध्ये पती–पत्नी दोघेही शिक्षक म्हणून काम करत होते. त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर त्यांची पुण्यात स्थायिक होण्याची इच्छा होती. पण पुण्यात राहायचे कुठे? असा प्रश्न निर्माण झाला. प्रथम काही दिवस त्यांनी भाऊच्या कुटुंबासह भाऊच्या घरातच निवास केला. मग भाऊ म्हणाला, 'मी वरच्या मजल्याचे बांधकाम करतो. तुम्ही तिथे रहा' बांधकाम पूर्ण होईपर्यंत भाऊच्या घरातच मागच्या खोलीत त्यांनी बिऱ्हाड केलं. या कामात भाऊने असा विचार केला की ते एकतर विनापत्य आहेत. त्यांना काही

दिवसांनी वृद्धत्वाचा त्रास सुरू होईल. तेव्हा त्यांना आधार देणे आवश्यक आहे. तसेच इथल्या मुलाबाळांमध्ये ते रमतीलही. या बांधकामाबरोबर भाऊने एक हॉलही बांधून घेतला. तिथे राष्ट्रसेविका समितीची एक शाखाही भरत असे. संघाच्या काही बैठकाही होत असत. गद्रेंनाही संघातील कार्यातही भाग घेता येईल असा विचार भाऊने केला. गद्रे कुटुंब काही दिवस छान राहिले. त्यांचा (गद्रे यांचा) संपर्क फक्त गद्रे वहिनींच्या भावाशीच होता. त्या माहेरी असताना एक दिवस अचानक त्यांचे निधन झाले. बाबूराव त्यानंतर परत भाऊकडे आले. पण त्यांना अल्झायमर (स्मृतिभ्रंश) या विकाराचा त्रास होऊ लागला. त्यासाठी त्यांचे बंधू डॉ. गद्रे यांचे औषध सुरू केले. पण पुढे त्यांचा विकार इतका बळावला की अचानक त्यांचे नाहीसे होणे हा प्रकार वाढू लागला. इतके दिवस दूर-दूर राहणाऱ्या ह्या काकाला, त्यांचा पुतण्या चि. मोरेश्वर आस्थेने आपल्या घरी घेऊन गेला.

या भाऊच्या समाजकार्यात भाऊ, आपले आईवडील, भावंडे, परिवार यांना कधीही विसरत नव्हता. माझे वडील म्हणजे बापू यांना शेवटचे दुखणे झाले कॅन्सरचे. ते मुक्कामाला होते माझा धाकटा भाऊ कै. मधूकडे. कारण मधूची मुलगी लहान असल्यामुळे त्याला आई, बापूंची गरज होती. भाऊ दिवसभर शाळा करून मधूकडे जात असे. त्यानंतर त्यांची सेवा करून रात्री घरी जात असे. काही दिवसांनी त्याच खोलीत पडून-पडून बापूंना कंटाळा आला. मग माझी बहीण प्रमिला हिने त्यांना तिच्या घरी नेले. पण तेथेही भाऊ रात्री झोपायला जात असे. बापूंना भाऊचा खूप आधार वाटत असे. तो येईपर्यंत, 'अजून राजा नाही आला का ?' असे ते सारखे विचारत असत. बापूंची शेवटपर्यंत भाऊने सेवा केली. भाऊने आईचीही खूप सेवा केली. तिला शेवटी अर्धांगवायूने ग्रासले होते. डॉक्टरांची औषधे चालू होतीच. भाऊवर बंधुवत् प्रेम करणारे कै. नागूशास्त्री कुलकर्णी हे आयुर्वेदिक सल्लाही देत असत. त्यांनी भाऊला तुळशी लावायचा सल्ला दिला. भाऊने तर तुळशीचे बनच आईसाठी तयार केले. नागूशास्त्री यांनी आईला तुळशीपाने तोडण्याचा व्यायाम सांगितला होता. ऑक्सिजनचा पुरवठा व तुळशीचा सहवास यामुळे आईची हालचाल सुधारली होती. त्यानंतर ती स्वतःच्या - स्वतः काही वैयक्तिक गोष्टी करायला लागली होती. एवढंच नव्हे तर त्यानंतर मधूकडे गेल्यावर दुपारी भारतीवहिनी शाळेतून परत यावयाच्या वेळी त्यांच्यासाठी अन्न गरम करून ठेवीत असे. असो.

भाऊची आम्हा सर्व भावंडांवर, भाचरांवर खूप माया होती. भाचरांच्या लहानपणी जसा दरारा होता तसेच मोठेपणी प्रेमही होते. जेव्हा आम्ही सर्व भावंडे व आमचे परिवार एकत्र येत असू तेव्हा त्याला फार आनंद होत असे. आमची मुले दसरा आणि संक्रांत या दिवशी हमखास भाऊकडे जात असत. भाऊच्या पश्चात ती आमच्या वहिनींच्याकडेही जातात. सर्व नातवंडांचेही भाऊला अतिशय कौतुक होते. प्रत्येक नातवंडाच्या सर्व नोंदी त्याच्याकडे असत. त्याच्या स्मरणशक्तीचे एक उदाहरण सांगते. माझी नात चि. हिमाली हिच्याविषयी चर्चा चालली होती. तिने जपानी आणि जर्मन भाषेच्या परीक्षा दिल्या आहेत. भाऊ म्हणाला, 'तिने F. Y. B. A. ला आणखी तिसरी भाषा घेतली होती.' मला तर काही आठवेना. तेव्हा तो म्हणाला, 'अग, तिने फ्रेंच घेतले होते.' त्याला आम्हा भावंडांचा, नातवंडांचा फार अभिमान होता. त्याची स्वतःची नातवंडे, विशेषतः त्याची पणती तर फारच कौतुकाची !

भाऊचे एक वैशिष्ट्य होते. तो लहान मुलांना विशिष्ट पद्धतीने हातांवर घेऊन झुलवत - झुलवत त्याने रचलेले अंगाईगीत म्हणत असे. झुलणारे मूल थोड्या वेळातच झोपून जात असे. हे अंगाईगीत त्याने त्याच्या मोठ्या लेकीच्या म्हणजे चि. श्रीच्या तान्हेपणी रचलेले होते. त्याचा हा अनुभव त्याच्या पणतीला म्हणजे चि. सारालासुद्धा चाखायला मिळाला.

नातवंडे तर त्याची जीव की प्राण होती. त्याच्या मोठ्या लेकीच्या तान्हेपणी त्याने स्वतः तयार केलेले अंगाईगीत ऐकत त्याच्या पणतीपर्यंत सर्वांनी मस्त झोप घेतली.

ते गीत खालीलप्रमाणे-

आकाशीच्या चंदा रे ये रे ये धावत । पुरवी लवकरी श्रीरामाचा हट्ट ।। धृ.।।

समजावी कौसल्या आली, चिऊ काऊ । हम्मा आली आली रे भू भू आणि माऊ
बालहट्टापुढे माय टेकी हात । रामबाळ बोले चंद्र द्या हातात ।।१।।
बाळाचे रडणे आवरेना कोणा । मातेला पित्याला कोणाला ऐकेना
वाढला-वाढला बाळाचा आकांत । रामबाळ बोले चंद्र द्या हातात ।।२।।
आणा-आणा रे सजवा रे रथ । रामाला जायाचे वाजत गर्जत
वाजतो चौघडा वाजते नौबत । रामबाळ बोले चंद्र द्या हातात ।।३।।
धावती-धावती दासी लाख-लाख । हजर सेवेला कित्येक सेवक
धावली अयोध्या धावला सुमंत । रामबाळ बोले चंद्र द्या हातात ।।४।।
सुमंत योजील उपाय छानसा । रामाला देईल सोन्याचा आरसा
रामही पाहाता त्या छोट्या आरशात । वेड्या तू चंदा रे होशील फजित
आता तरी वेड्या रे ये रे ये धावत । पुरवी लवकरी श्रीरामाचा हट्ट ।।५।।

भाऊकडे छान काव्यप्रतिभा होती. त्याचा त्याच्या अध्यापनात, काव्यस्पर्धांमध्येही उपयोग झाला असणार. मी एकदा भाऊकडे गेले होते. तेव्हा एक विद्यार्थी त्याला एक हिंदी कविता म्हणून दाखवत होता. मला वाटतं 'चुन्नू आया, मुन्नू आया' अशा काहीतरी ओळी होत्या. त्या कवितेला सुंदर लय होती. सुंदर गेयता होती. बहुतेक स्पर्धेसाठी सराव चालू होता. त्याच्या कवितांच्या हस्तलिखितांचा संग्रह पानशेतच्या पुरात इतर कागदपत्रांबरोबर वाहून गेला. विशेष म्हणजे त्याच्या स्वतःच्या विवाहप्रसंगी त्याने लोकाग्रहास्तव घेतलेले नावाचे उखाणे काव्यात घेतलेले होते. **प्रसिद्धीपराङ्मुखता असल्यामुळे त्याने स्वतःच्या कविता प्रसिद्ध केल्या नाहीत.** त्याची बौद्धिके, त्याचे लेखन अतिशय अभ्यासपूर्वक असत. त्यामुळे त्यात सर्वस्पर्शिता होती. त्याचे अक्षर तर अतिशय सुंदर, सुबक होतेच; विशेषतः त्याचे फलकलेखन तर अतिशय सुबक होते. जेव्हा त्याच्यावर माहिती-फलकाच्या लेखनाची जबाबदारी होती तेव्हा कित्येक पालक ती माहिती आवर्जून लिहून घेत असत. **हा सुबकपणा त्याच्या प्रत्येक कामात असे. साधी अंथरुणाची घडीसुद्धा टोकाला-टोके जुळवून अतिशय रेखीवपणे घातलेली असे. इतर काही लेखकांच्या कादंबऱ्यांचे काही भाग त्याने लिहून दिले आहेत. पण त्याचा उल्लेखही त्याने कधी केला नाही. त्याने लिहिलेला भाग इतक्या काळजीपूर्वक लिहिला की तो त्या कादंबरीशी सहज एकरूप झाला.**

**'वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि ।' असं त्याचं व्यक्तिमत्त्व होते. काही कठोर निर्णय त्याला घ्यावे लागले. पण ते कुटिलपणे, दुष्टवृत्तीने नव्हते. पण अत्यंत दूरदृष्टीने, विचारपूर्वक घेतलेले होते.** त्याच्यावर चिखलफेक करणाऱ्या लोकांचा अर्थातच पर्दाफाश झालाच ना! शि. प्र. मंडळीमध्ये तर कित्येक लोकांना त्याचा उत्कर्ष सहन न झाल्यामुळे त्याला बदनाम करण्याचा प्रयत्न झाला. त्याच्या स्थितप्रज्ञ वृत्तीमुळे त्याचे कार्य व्यवस्थित शांतपणे चालूच होते. सेवानिवृत्ती घेण्याच्या वेळी शैक्षणिक वर्ष पूर्ण होईपर्यंत तरी शाळेत काम करावे असा भोवतालच्या मंडळींचा आग्रह होता. अगदी शिक्षणाधिकाऱ्यांचीसुद्धा अपेक्षा होती. कारण घडी बसलेली ही शैक्षणिक वर्षाच्या अखेरपर्यंत टिकावी. पण भाऊने सांगितले, 'घडी विस्कटणे हा माझा पराभव आहे. माझ्यापुढेही माझी परंपरा अशीच सुरळीत चालू राहील. नियमानुसार मला सेवानिवृत्तीचा स्वीकार केलाच पाहिजे.' **भाऊची तत्त्वनिष्ठता, गैरफायदा न घेण्याची वृत्ती, सचोटी किती-किती म्हणून सांगू त्याचे गुण ?** त्याच्यावर एक कादंबरी होऊ शकेल.

इ. स. १९५० च्या आसपासचा काळ. शनिवार पेठेतील मेहुणपुऱ्यात नातूंच्या चाळीतलं आमचं घर. घरामध्ये आईवडिलांच्या इतकंच महत्त्वाचं आणखी एक व्यक्तिमत्त्व म्हणजे आमचा भाऊ. खरं म्हणजे माऊलींच्या सावलीतून म्हणजे आळंदीशेजारील चऱ्होली बु. मधून विस्थापित झालेलं आमचं कुटुंब. अगदी बेताचं उत्पन्न असणारं आमचं घर. अर्थात 'थोरला' या बिरुदामुळे वडिलांबरोबरीने कुटुंब, चरितार्थासाठी हातभार लावणं भाऊला आवश्यक वाटलं.

त्यामुळे मिळेल ती नोकरी करत सरस्वती मंदिर रात्रप्रशालेतून एस.एस.सी. परीक्षा दिली. खरं म्हणजे त्याला एस.एस.सी. परीक्षेला संस्कृत विषय घ्यायचा होता. पण शाळेत संस्कृत शिकविण्याची सोय झाली नाही. त्यामुळे शेवटच्या काही थोड्या दिवसांत अर्धमागधीचा अभ्यास करून त्याने यश मिळवलं. चिकाटी आणि जिद्द या गुणांमुळे त्याला हे यश मिळालं.

**संघाचे बाळकडू**

नोकरी, शिक्षण याबरोबर संघशाखा चालूच होती. ती आयुष्यात कधीच चुकली नाही. चऱ्होलीमध्ये लहानपणापासून त्याचं संघकार्य चालू होतं. तिथं श्री. लोंढे यांनी त्याला संघाचं बाळकडू पाजलं होतं. विशेषतः जातीय समता त्याच्या मनावर बिंबली होती. चऱ्होलीला आमच्या रामाच्या देवळात संघाचा उसाच्या रसपानाचा कार्यक्रम होत असे. त्यात समाजाच्या सर्व घटकांमधील स्वयंसेवक असायचे. आमच्या घरातसुद्धा माझ्या वडिलांनी कधीही जातीभेद मानला नाही. त्यांच्याकडे येणारे सर्व जातीधर्माचे शिक्षक आमच्या माजघरात वडिलांच्या पंक्तीला बसत असत. हा रिवाज आमच्या परिवारामध्ये ठसवला गेला आहे. सुरुवातीला वडिलांना – म्हणजे बापूंना –त्याचं संघात जाणं आवडत नसे. पण आईचा मात्र त्याच्या संघकार्याला पाठिंबा असायचा. अगदी लहानपणापासून त्याने लोकसेवेचे व्रत अंगीकारले होते. त्याचे संघकार्य केवळ शनिवार, नारायण, सदाशिव पेठेत नव्हते तर पुण्याच्या पूर्व भागात नाना पेठ, भवानी पेठ, कँप, हडपसर, मुंढवा या भागात होते. त्याचे मित्रही त्याच्यासारखेच. 'जिथं कमी तिथं आम्ही' असं ब्रीद असणारे. फक्त परिवारातीलच नव्हे तर समाजातील कितीतरी गोष्टी या मित्रमंडळाने सांभाळल्या.

आमचं घर म्हणजेसुद्धा समाजाचं एक लहान चित्र होतं. माझी आई आणि भाऊ यांनी कितीतरी मंडळींना आमच्या घरात आधार दिला होता. अगदी आमच्या गावाकडची निराधार माणसंसुद्धा आमच्या घरात राहात होती. आमच्या खोल्या तीन आणि घरातील माणसांची संख्या पंधराच्या वर. आमचे फॅमिली डॉक्टर शहा म्हणून होते. ते आळंदी येथे राहात होते. त्यांचा मुलगा एस.एस.सी. पास झाल्यावर त्याने पुण्यातील कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. पण त्या आधीच त्यांनी सांगितलं, 'माझा मुलगा तुमच्या घरी राहील.' हे व्रत चि. प्रसादच्या घरी अजूनही चालू आहे.

**आदरयुक्त धाक**

माझं भाग्य म्हणजे मी अशा कुटुंबात जन्मले आणि भाऊसारखा पाठीराखा मिळाला. खरं म्हणजे त्याच्या आणि माझ्या वयात खूप अंतर होतं. त्यामुळे म्हणा किंवा त्याच्या कर्तृत्वाच्या उंचीमुळे म्हणा–त्याचा जरा धाकच वाटायचा. मलाच काय सर्व मोठ्यांनासुद्धा त्याचा आदरयुक्त धाक वाटत असे. माझा मावसभाऊ शेजारीच राहात होता. त्या वहिनीसुद्धा मुलांना अंतिम धाक दाखविण्यासाठी म्हणत, 'बघ हं, नाही तर राजाभाऊजींना नाव सांगेन.' त्याच काय पण आमच्या चाळीतील समस्त बच्चे मंडळीसुद्धा त्याला भिऊन असायची. पण तो कधीही कोणावर ओरडला नाही. हो! सांगायचंच राहिले, आमच्या परिवारात सर्व ज्येष्ठ मंडळी त्याला 'राजा' म्हणत. मजेमध्ये मात्र आदराने 'राजाभाऊ' संबोधत. त्याच्या दराऱ्यामुळे  आमचीच काय, आमची पुढची पिढीही अगदी बिनबोभाट सरळ राहिली. मला मात्र त्याच्याशी संपर्क साधणं जरा जडच जायचं. पण त्याची माझ्यावर अपार माया होती. मी पी.डी.ला होते. सहामाही परीक्षा चालू होती. त्यावेळी आई तीर्थयात्रेला गेली होती आणि वहिनीही बहुतेक कामावर गेल्या होत्या. सकाळी मी पेपरला निघाले. तो मला म्हणाला, 'मी शिरा केला आहे. तो खाऊन जा. पेपर नीट शांतपणे लिहिण्यासाठी पोट शांत असले पाहिजे.' त्याने सतत आम्हा सर्व कुटुंबियांची काळजी घेतली. आमच्या कोणाच्याही घरी सुखदुःखाच्या सर्व प्रसंगी तो पाठीशी उभा असे.

आमच्या नातेवाईकांमध्ये काही विशेष घटना किंवा काही निर्णय घ्यायचा असेल, उदा. – लग्नाची बैठक, तेव्हा ती ज्येष्ठ मंडळींची एक कमिटी बसे. त्यात मोठ्या मामांचे ज्येष्ठ जावई, धाकट्या मामांचा मुलगा ती. आप्पा, मावशीचा मुलगा ती. दादा आणि आमचा भाऊ. खरं तर भाऊ त्या सर्वांच्या मानाने लहान होता. पण त्याच्या

नीरक्षीरविवेकबुद्धीमुळे व परिपक्वतेमुळे त्याला त्या कमिटीत स्थान मिळाले. त्याचे गुण, चौफेर वाचन, वैचारिक चिंतन यांमुळे आणि उत्तम वक्तृत्वामुळे त्याला संघामध्ये बौद्धिकप्रमुखपदाची जबाबदारी सोपविली गेली. **त्याचे असे अनेक गुण स्तिमित करणारे होते. आट्यापाट्या, हुतूतू यांसारखे भारतीय खेळ तो उत्तम खेळतच असे; पण कॅरम, बॅडमिंटन यासारख्या परदेशी खेळांमध्येही तो निपुण होता.** माझ्या शालेय आयुष्यात एकदा मे महिन्यात मला खूप कंटाळा वाटू लागला. भाऊच्या ते लक्षात आल्यावर त्याने एक नवा उशीचा अभ्रा घेतला. त्यावर सहजपणे एक सुंदर चित्र काढलं आणि मला भरायला दिलं. **त्याचं सर्व काम चित्रकलेसारखं सहज, सुंदर आणि रेखीव असे. त्याला संगीतही खूप आवडे.** त्याला स्वतःला ते जरी शिकता आलं नाही माझ्या गोड गळ्याच्या बहिणीला त्याने संगीत शिकायला क्लासला पाठवले. तसे तो उत्तम गातही असे. **तो शीघ्रकवी होता. अर्थपूर्ण, भावपूर्ण अशा त्याच्या कविता असत.** अध्यापनात त्याच्या वाचिक अभिनयामुळे कित्येकांना अभिनयात रुची उत्पन्न झाली. घरी तो कितीतरी गोष्टी स्वतः बनवत असे. **कर्मकांडावर त्याचा विश्वास नव्हता. भारतीय सणवार, रीतिरिवाज यांकडे तो वैज्ञानिक दृष्टिकोनातून बघत असे. देवावर त्याची श्रद्धा होती पण अंधश्रद्धा नव्हती. तो संयमी आणि स्थितप्रज्ञ होता. त्याला जसे अनेक मित्र होते तसेच त्याचा उत्कर्ष पाहून जळणारे अनेक शत्रूही होते. पण कोणाविषयी राग, आकस मनात न ठेवता त्यांच्यासाठीही वेळप्रसंगी त्यांच्या पाठीशी भाऊ उभा राहिला.**

**ध्येयसाधना**

त्याने आयुष्याची लढाई अत्यंत नेटाने आणि जिद्दीने लढली. नवीन मराठी शाळेतील लेखनिकाची नोकरी करत त्याने पदवी मिळविली. अध्यापनासाठी B. Ed. पदवी मिळवून तो द्विपदवीधारक बनला. प्रथम शिक्षक म्हणून रमणबागेत रुजू झाला. त्याचे उत्तम आणि प्रभावी अध्यापन, अप्रतिम सुवाच्य फलकलेखन, अभ्यासेतर उपक्रमांबद्दल मार्गदर्शन, त्याने आयोजित केलेल्या आणि यशस्वीरीत्या पार पाडलेल्या सहली, शिस्त अशा अनेक गुणांमुळे त्याला विद्यार्थीप्रिय शिक्षक असं ओळखलं जाऊ लागलं. विशेष म्हणजे शाळेतील 'Problem Child' असा विचार कराव्या लागणाऱ्या मुलांची जबाबदारी त्याच्यावर सोपविली गेली. केवळ मुलेच नव्हेत तर त्यांच्या हतबल पालकांचाही त्याला विचार करावा लागत होता. मानसशास्त्रीय आधाराने त्याने ती जबाबदारीही उत्तमरीत्या पार पाडली. त्याच्या शिक्षक, पर्यवेक्षक, मुख्याध्यापक अशा तिन्ही कारकीर्दींमध्ये विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास आणि शाळेची, शिक्षकांची प्रगती हा केंद्रबिंदू होता.

त्याचं व्यवस्थापन-कौशल्य, शाळेची प्रगती, त्याची निःस्पृह वृत्ती ही लक्षात आल्यावर प्रत्यक्ष शिक्षणाधिकाऱ्यांनी त्याला सेवानिवृत्ती न घेण्याचा सल्ला दिला होता. पण ते त्याच्या तत्त्वात बसत नव्हतं. कारण 'स्व'-रूपवर्धिनी, संस्कारभारती, ज्ञानदा प्रतिष्ठान, रा. स्व. संघ, अनेक मोठ्या, छोट्या संस्था त्याची वाट पहात होत्या. कुटुंबातील 'थोरल्याची' जागा त्याने समाजामध्येही थोरपणाने भूषविली होती. त्याच्या सर्व कार्यामध्ये त्याच्या पत्नीची म्हणजे आमच्या वहिनींची सक्रिय साथ होती. कौटुंबिक परिवाराच्या सुखदुःखाच्या प्रसंगी त्या भाऊच्या बरोबरीने उभ्या असत. विशेषतः भाऊच्या आणीबाणीच्या कारावासावेळी त्यांनी नोकरी सांभाळून धीराने तोंड दिले.

समाजसेवा हीच ईश्वरसेवा मानल्यामुळे भाऊला जे पुण्य मिळालं ते त्याच्या गुणी मुली, जावई, नातवंडं यांच्या रूपात उभं राहिलं. विशेषतः चि. अनघासारखी सून म्हणजे तर मणीकांचन योग. गोकुळासारखं त्याचं घर नांदतं होतं पण वाढत्या वयामुळे येणारं वृद्धत्व ! त्यामुळे शरीराची साथ कमी-कमी होत गेली. अहोरात्र सगळेजण त्याला बरं वाटावं म्हणून झुंजत होते. पण 'ईश्वरेच्छा बलीयसी' असं म्हणणं प्राप्त होतं.

असो. परमेश्वराजवळ एकच प्रार्थना, 'अफाट कष्ट केलेल्या माझ्या भाऊला तुझ्या चरणी शांत चिरविश्रांती मिळू दे.'

- मो. : ९८५०६१०५६१

# त्यागमय जीवनाचा आदर्श

**– राजेंद्र कानेटकर**

'... जे दिव्य, दाहक म्हणोनी असावयाचे,
बुद्धयाच वाण धरिले करि हे सतीचे!'

स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या या ओळी अगदी बालपणापासून मनात खोल रुजल्या आहेत. परंतु त्यातील शब्दांचा अर्थ समजण्यासाठी असंख्य अनुभव घ्यावे लागले. आयुष्यात भेटलेल्या अनेक व्यक्तींनी वेगवेगळी शिकवण दिली. त्यातून जीवनातील प्रत्येक कप्प्याचा नवा अर्थ उलगडला. लहानपणापासून आज वृद्धावस्थेच्या पहिल्या पायरीवर पाऊल टाकेपर्यंत सुदैवाने अनेक थोरांचा सहवास लाभला. त्यातील काहींचे मार्गदर्शनही मिळाले आणि या सर्वांचा माझ्या व्यक्तिमत्त्वावर, जीवनावर, विचारसरणीवर त्या-त्या वेळी कमी-अधिक प्रमाणात प्रभावही पडला.

**आज मागे वळून पाहताना जेव्हा मी असा विचार करतो, की माझ्या आयुष्यावर सर्वांत जास्त प्रभाव असणाऱ्या कोणत्या व्यक्ती होत्या? तर त्यात राजाभाऊ लवळेकर यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल.** सुदैवाने ते नात्याने माझे मामा होते, परंतु त्याहीपेक्षा अधिक सुदैव म्हणजे माझे जवळजवळ संपूर्ण बालपण त्यांच्या सहवासात, इतकेच नव्हे तर त्यांच्या घरात व्यतीत करण्याचे भाग्य मला लाभले. त्यामुळेच इतर अनेकांनी राजाभाऊंना वेगवेगळ्या कालखंडात, वेगवेगळ्या भूमिकांमध्ये पाहिले असले, तरी गेल्या सुमारे पन्नास वर्षांच्या काळात राजाभाऊंना अगदी जवळून पाहण्याची, त्यांच्या कर्तृत्वाचे तटस्थपणे निरीक्षण करण्याची संधीही मला मिळाली.

राजाभाऊंच्या व्यक्तिमत्त्वाचे वर्णन एका वाक्यात करता येणार नाही. त्यांनी अक्षरशः असंख्य नात्यांनी आणि अनेकविध भूमिकांमधून इतक्या जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या, की एका माणसाला एकाच जन्मात हे करता येणे कसे शक्य आहे, असाच विचार मनात येतो. **अर्थात माणसे जोडणे आणि त्यातून विविध संघटना उभारणे हा राजाभाऊंचा छंदच होता, किंबहुना त्यांच्यासाठी तेच एकमेव व्यसन होते म्हणा ना ! पण त्याहून कमाल म्हणजे या प्रत्येक संघटनेत त्यांनी विविध जबाबदाऱ्या लीलया पार पाडल्या आणि नंतर त्यातून ते जितक्या अलिप्तपणे बाजूला झाले, ते क्वचितच कोणाला जमते.** अगदी कौटुंबिक स्तरापासून पाहायचे झाल्यास एक मातृभक्त पुत्र या नात्यापासून बहिणींच्या पाठीशी आयुष्यभर उभा राहणारा समर्थ भाऊ, एक आदर्श पिता, परिवारातील प्रत्येकाच्या अडीअडचणीला उभा राहणारा खराखुरा मित्र या खासगी पातळीपासून जीवनातील वेगवेगळ्या टप्प्यांवर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे निष्ठावान स्वयंसेवक, मग संघाच्या वेगवेगळ्या संघटनांमधील जबाबदाऱ्या पेलणारे पदाधिकारी, अत्यंत विद्यार्थिप्रिय असे आदर्श शिक्षक, मुख्याध्यापक आणि अखेरच्या सत्रात एक निष्पक्ष संपादक व पत्रकार या भूमिका राजाभाऊंनी समर्थपणे आणि निष्ठेने पेलल्या आणि **हे सारे करताना एक व्रतस्थ जीवन ते जगले. वागण्याबोलण्यातील मर्यादांचे कसे पालन करावे, हे राजाभाऊंकडून मलाच नव्हे, तर त्यांच्या सहवासात आलेल्या अनेकांना शिकायला मिळाले. किंबहुना राजाभाऊ म्हणजे संस्कारांची पाठशाळाच होती.** आपल्या विशुद्ध आचरणातून आणि अमोघ वाणीतून आदर्श उभा करणारे त्यांचे व्यक्तिमत्त्व आजच्या काळात अपवादात्मक असेच होते. **कोणाच्याही अडचणीला धावून जाणे हे तर त्यांच्यासाठी व्रतच होते.** राजाभाऊंनी मदत केलेल्यांची यादी करणे अशक्यच आहे.

'शिवरायांचे कैसे बोलणे, शिवरायांचे कैसे चालणे,
शिवरायांचे सलगी देणे, कैसे असे...!'

या समर्थांच्या ओळी आजच्या काळातही लागू पडाव्यात असे राजाभाऊंचे वागणे होते आणि ही अतिशयोक्ती नाही. एका बाजूला अतिशय प्रेमळ असे राजाभाऊ शिस्तीच्या बाबतीत तितकेच कठोर होत. पण **त्यांच्याच नजरेच्या धाकात लागलेली शिस्तच आजपर्यंत जीवनाचा तोल सांभाळण्यास आम्हा सर्वांना मदत करत आली आहे.**

शुद्ध चारित्र्य आणि निःस्वार्थी व्यक्तिमत्त्वामुळे त्यांचा धाक भल्याभल्यांना वाटत असे आणि केवळ वैयक्तिक किंवा कौटुंबिक जीवनातच नव्हे, तर सार्वजनिक जीवनातही त्यांनी या निकषांची जपणूक केली.

**सुस्पष्ट विचार आणि त्या विचारांची तितकीच सोपी मांडणी करणे हे त्यांचे वैशिष्ट्य होते.** 'वक्ता दशसहस्रेषु' म्हणजे काय हे राजाभाऊंना ऐकणाऱ्याला सहजच पटावे. कदाचित म्हणूनच त्यांनी एक उत्कृष्ट शिक्षक म्हणून ख्याती मिळविली. परंतु समोरच्या माणसाला प्रभावित करून स्वार्थ साधण्यासाठी ते आपल्या वक्तृत्वाचा वापर करीत नसत. त्यांनी आपल्या गुणांचा वापर केला तो असंख्य विद्यार्थी घडविण्यासाठी, अगणित स्वयंसेवक निर्माण करण्यासाठी आणि अनेक संघटना उभ्या करण्यासाठी.

स्वार्थाचा किंवा अहंकाराचा लवलेशही नसलेले राजाभाऊ एखाद्या विषयावर तर्कशुद्ध विचार मांडू लागले, की समोरचा एक तर मंत्रमुग्ध होऊन जाई किंवा निरुत्तर तरी. योग्य त्याच बाजूचे समर्थन करताना ते कोणाचाही मुलाहिजा बाळगत नसत. परंतु अत्यंत आग्रहीपणे आपला मुद्दा पटवून देतानाही समोरच्या व्यक्तीला कोणत्याही प्रकारे अवमान वाटू नये याची काळजी ते घेत. राजाभाऊंच्या तोंडून वावगा शब्द कोणीही ऐकला नसेल.

एक असामान्य संघटक म्हणून राजाभाऊंनी किती संघटना घडविल्या, हे पाहिले की थक्क व्हायला होते. संघाचे तर ते निष्ठावान स्वयंसेवक होतेच. परंतु स्वरूपवर्धिनी, संस्कारभारती अशा संस्थांना एकहाती आकार देताना त्यांनी लोकसंग्रहाचे आगळे उदाहरण प्रस्थापित केले. 'तरुण भारत'च्या संपादकपदाची जबाबदारी, त्या क्षेत्राचा कसलाही अनुभव नसताना, त्यांनी ज्या दक्षतेने सांभाळली, त्यामुळे त्यांच्यातील नव्या क्षमतेचे दर्शन घडले. न्यू इंग्लिश स्कूल रमणबागसारख्या संस्थेवर तर त्यांच्या कर्तृत्वाचा अमिट असा ठसा आजही दिसतो. आणीबाणीच्या काळात संघावर आलेल्या संकटसमयी त्यांनी आपल्या नेतृत्वगुणांचे आणखी-एक दर्शन घडविले.

मला अगदी बालपणापासून राजाभाऊंच्या स्वभावातील आणखी एका गुणाचे फार आकर्षण वाटत आले आहे. तो म्हणजे बाहेरून अतिशय कडक आणि शिस्तबद्ध अशा या माणसाचे अंतरंग इतके प्रेमळ होते, की आजूबाजूची माणसे चुंबकाप्रमाणे त्यांच्याकडे खेचली जात. आपल्या संपर्कात येणाऱ्या प्रत्येकाबद्दल त्यांना सविस्तर माहिती होती आणि सर्वांची ते अत्यंत आस्थेवाईकपणे चौकशीही करीत. मी लोकसत्तासारख्या वृत्तपत्रात रुजू झालो, याचे त्यांना कोण कौतुक होते. पण त्यांच्या सहवासातील प्रत्येकालाच त्यांच्या या कौतुकमिश्रित प्रेमळपणाचे प्रचंड आकर्षण वाटत असे.

समाजातील विविध स्तरांमधील नामवंतांनाही राजाभाऊंचा शब्द मोडण्याचे धाडस झाले नाही. **कठोर परिश्रम, कमालीचा साधेपणा, प्रचंड देशभक्ती, हिंदू धर्माचा कडवा अभिमान, तरीही अत्यंत उदारमतवादी शालीन स्वभाव, अमोघ वक्तृत्व, अंगीकृत कार्यावर अजोड निष्ठा, अभ्यासूपणा, कोणतेही कार्य तडीला नेण्याचा निर्धार आणि त्यासाठी कितीही कष्ट करण्याची तयारी, आज्ञाधारकपणा आणि कडवी शिस्त यांचा आश्चर्यकारक मिलाफ या गुणांबरोबरच निगर्वी आणि निर्लोभीपणाचा आगळा संगम राजाभाऊ लवळेकर या माणसात मला पाहायला मिळाला.**

आयुष्यातील अखेरच्या टप्प्यात मधुमेहासारख्या दुखण्याचाही त्यांनी ज्या शांतपणे स्वीकार केला, त्यातून राजाभाऊंच्या महानपणाचे आगळे दर्शन सर्वांनाच झाले. आजही राजाभाऊंबाबत काहीही बोलताना, लिहिताना ते आपल्यात नाहीत, यावर विश्वास बसत नाही आणि का बसावा? राजाभाऊंसारखी माणसे त्यांच्या गुणांनी, संस्कारांनी आणि कर्तृत्वाने आपल्या जीवनात कायमचेच स्थान मिळवून असतात. त्यांची स्मृती आपल्याला नेहमीच प्रेरणा देत असते.

राजाभाऊंच्या पवित्र आत्म्याला वंदन करून इथेच थांबतो.

- मो. : ९३७१०४८६४५, ८८०६२७५६८९

❖❖❖

# विविध भूमिका वठविणारे भाऊ

**– प्रसाद लवळेकर**

घटना १९७४–७५ सालातली आहे. शनिवार पेठेतील भाड्याच्या घरातून सर्वजण सहकारनगरमध्ये स्वतःच्या घरात रहायला आलो होतो. काका, आत्या सर्वांचीच घरे बांधून होत असल्याने शनिवार पेठेतील घराचा ताबा चाळीच्या मालकांना देण्याचा विषय सुरू होता. एकाने (कै.) भाऊंना सुचवले, 'राजाभाऊ, घराचे भाडे नाममात्र आहे, कशाला ताबा देतोस ? सर्वजण शहरात येता, वापरता येईल ! शिवाय घरमालक लवकरच नवीन बांधकाम करेल, तेव्हा तुला काही जागा मिळेलच !!'

**भाऊंनी विलंब न करता दिलेले उत्तर मला आजही आठवतंय – 'नाही, आपण नाही ठेवायचा ताबा ! चऱ्होलीहून पुण्यात आल्यावर ज्या विश्वासानी घरमालकांनी घर भाड्याने दिले, जवळपास तीन दशकं ज्या विश्वासाने एकत्र राहिलो... त्याला मी तडा जाऊ देणार नाही** ! आपले बांधलेले घर आता पुरेसे आहे ! **अशा जादाच्या घरापेक्षा आपली नाती, विश्वास जास्त मोलाचा आहे !!' भाऊंनी घराच्या किल्ल्या मालकांना दिल्या त्यावेळी घरमालकांनी घरात आम्ही मधल्या काळात बसवलेल्या फरशा पद्मावतीला स्वखर्चाने पोहोचवल्या !...**

वयाच्या अकराव्या वर्षी अनुभवलेले भाऊ मला आजही जसेच्या तसे आठवतात. भाऊंना विविध भूमिकांमधून अनुभवण्याचा योग आला. सुरुवातीला वडील, कुटुंबप्रमुख... नंतर शिक्षक... संघकामात आधी कार्यकर्ता, अधिकारी... विविध संघटनांचे प्रमुख, पालक... मार्गदर्शक... आणि शेवटच्या काही काळात बरोबरीच्या नात्याने मित्रसुद्धा !...

जाणवते की या सर्व भूमिका अनुभवताना प्रकर्षाने **भाऊंची तत्त्वं, मूल्यं आणि व्यवहार यांची सांगड कधीच सुटली नाही. प्रसंगी संघर्ष करावा लागला, सहकाऱ्यांशी मतभेद झाले तरी मूल्यांशी, विचारांशी तडजोड केली नाही...** मग पुण्यातील प्रख्यात शिक्षणसंस्थेत उपाध्यक्ष असताना असो, शाळेत प्रवेश देताना पालकांकडून अवास्तव देणगी घ्यायला विरोध करून सहकाऱ्यांचा रोष पत्करण्याची घटना असो किंवा भाड्याच्या घराचा ताबा देण्याचा प्रसंग असो !...

घरात वडील, कुटुंबप्रमुख म्हणून भाऊंना पाहात असतानाच शाळेत भाऊ मला शिक्षक, पर्यवेक्षकही होते. **घरात व शाळेत अतिशय शिस्तप्रिय, कडक व करारी असा दबदबा अनुभवला त्याच वेळी एक प्रेमळ, हळवे शिक्षकही पाहिले. शाळेत शिक्षा करताना एका विद्यार्थ्याला फटके दिले तर संध्याकाळी त्याच्या घरी जाऊन पालकांना 'त्याला जास्त लागले नाही ना ?' असं विचारणारे भाऊही पाहिले.** घरी आम्हाला त्यांनी जबरदस्तीने अभ्यासाला बसवले किंवा स्वतःहून अभ्यास घेतला असे कधी झाले नाही. पण काही विचारले की तास–दोन तास सहज समजावून द्यायचे. शाळेच्या अभ्यासाबरोबर अनेक कथा, कविता सांगायचे... समजावून द्यायचे. जेवणाच्या ताटावर, हात वाळवत जुन्या मॅट्रिकच्या हिंदीतील 'ब्रह्मराक्षस'चा धडा असो किंवा कुसुमाग्रजांच्या 'पृथ्वीचं प्रेमगीत' कवितेचं रसग्रहण... आजही तसंच आठवतंय...

संघकाम आणि शाळेतल्या जबाबदाऱ्या यामुळे घरासाठी पुरेसा वेळ त्यांना देता आला नाही याची जाणीव अनेकदा व्यवहारातून दिसायची. मग आईला रात्री उशिरा ऑफिसमध्ये आणायला जाणे असो... श्री–संजूच्या (माझ्या बहिणींच्या) वेण्या घालण्यापासून स्वयंपाकघरात कुकर लावणे इ. कामे करणे असो... सौ. अनघाला (माझ्या पत्नीला) अभ्यास दौऱ्यासाठी – 'तू निर्धास्तपणे जा – अनीश, ईशाला आम्ही सांभाळतो' असे आश्वस्त करणे असो... किंवा मी रात्री उशिरा बैठकीहून आल्यावर माझे जेवण होईस्तोवर बरोबर बसून चौकशी करणे असो... सर्वांमधून ही जाणीव व्यक्त व्हायची !...

**स्वतःच्या घरातल्या जबाबदाऱ्या पार पाडतानाच मोठ्या परिवारातल्या सर्वांनाच भाऊंचा आधार वाटायचा.** मग घरातील मंगलकार्य करताना सुरुवातीच्या तयारीपासून मांडवपरतणीपर्यंत भाऊंनी उभे राहायचा विषय असो किंवा घरातील मुलांचा शाळा-कॉलेजातील प्रवेश करणे असो - सर्वांना भाऊंचा आधार वाटायचा. जी गोष्ट परिवारात तीच शाळेतल्या शिक्षक, सेवक, विद्यार्थी... संघ कार्यकर्ते... सोसायटीतील, चाळीतील शेजारी सर्वांच्या बाबतीत लागू होती.

भाऊंनी 'कुटुंब-प्रमुख' भूमिका जशी घरात साकारली तशीच शाळेत, संघात आणि अन्य सामाजिक संस्थांमध्ये सुद्धा ! 'पुणे तरुण भारत'ची आवरासावर करताना तेथील गरजू कर्मचारी दुसऱ्या ठिकाणी कामाला रुजू होतील, देणी परत होतील, हिशोब पूर्ण होतील, वस्तू व वास्तूची व्यवस्था लागेल यासाठी केलेला आटापिटा मी पाहिला आहे. 'स्व'-रूपवर्धिनी, संस्कार भारती, ज्ञानदा प्रतिष्ठान या संस्थांच्या उभारणीत वडीलकीच्या नात्याने त्यांनी केलेले योगदान सामाजिक संस्थेतल्या 'कुटुंब-प्रमुखा'चे आहे.

**सामाजिक व कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळताना व्यक्तिगत उत्कर्ष, संधीपेक्षा संघटनेचे, संस्थेचे हित आणि जपलेली तत्त्वं, मूल्ये यालाच भाऊंनी प्राधान्य दिले.** रमणबागेतून सेवानिवृत्त झाल्यावर त्याच संस्थेमध्ये पदाधिकारी म्हणून काम करण्यास - 'ज्या संस्थेत नोकरी केली तेथेच पदाधिकारी म्हणून काम करताना पूर्वीच्या घटनांमुळे पूर्वग्रहदूषित व्यवहार होऊ शकतो' म्हणून नकार देणारे..., आणीबाणीत सत्याग्रहापूर्वी स्पष्टपणे कारण सांगून मुख्याध्यापकांना रजा मागणारे... आणीबाणीनंतर निवडणुकीसाठी सहकाऱ्यांनी मांडलेला प्रस्ताव नाकारणारे... रमणबागेत त्यांच्यापेक्षा ज्येष्ठ शिक्षकांनी उपमुख्याध्यापकपदाचा प्रस्ताव नाकारला आणि भाऊंनी संधी मिळत असतानासुद्धा त्या शिक्षकांच्या घरी जाऊन 'तुम्ही केवळ बदलीसाठी पदोन्नती नका नाकारू !' असे सांगणारे भाऊ कायम स्मरणात राहतील... **जी गोष्ट सार्वजनिक जीवनात तीच व्यक्तिगत जीवनात ! वडिलोपार्जित जमिनीचा व्यवहार करताना 'कायदा काहीही सांगो... भावांबरोबर बहिणींना समान वाटा मिळावा' याचा आग्रह त्यांनी धरला ! व्यवहारात अत्यंत शिस्तप्रिय, करारी वाटणारे भाऊ अतिशय भावनाशील, श्रद्धावान आणि संवेदनाशील होते.** त्यांच्या जडण-घडणीत वाटा असणाऱ्यांबद्दलचा - त्यांचे आईवडील- कै. आजी व कै. बापू, रमणबागेतील त्यांच्या शिक्षकी पेशाच्या सुरुवातीच्या काळातील मुख्याध्यापक कै. प्र. शं. जोशी, संघातील अधिकारी कै. मोरोपंत पिंगळे, कै. बाबा भिडे यांच्याबद्दल बोलताना भाऊ हळवे झाल्याचे आम्ही अनुभवले आहे. **२०१३ सालच्या गंभीर आजारपणानंतर काही कार्यकर्त्यांना घरी भेटण्यास बोलावण्याचा आग्रह त्यांनी माझ्याकडे धरला. 'संघटनेत काम करताना कठोर निर्णय घेतले त्यामुळे ते दुखावले गेले. त्यांची मला क्षमा मागायची आहे !...' ही कै. भाऊंची भेटीला बोलावण्यामागची भूमिका !...**

घरातील जबाबदारीमुळे भाऊंना नोकरी करून, नाईट स्कूलमध्ये शिकून शिक्षण करावे लागले, **राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक (पूर्णवेळ कार्यकर्ता) म्हणून काम करण्याची इच्छा असूनही वेळ देता आला नव्हता. त्याची कसर भाऊंनी गृहस्थी - व्यवसायी जीवनात अनेक पटींनी भरून काढली.** कुटुंबातील, परिचितांपैकी अनेकांनी शिक्षण घ्यावे यासाठी उद्युक्त केले, साधने उपलब्ध करून दिली... अनेक विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी स्वतःची खोली दिली; उच्च शिक्षणासाठी त्यांच्या पालकांकडे घरी जाऊन आग्रह धरला... घरात काम करणाऱ्या महिलांची मुले चांगली शिकावीत - व्यवसायाला लागावीत याकडे स्वतः लक्ष दिले. पद्मावतीला रहायला गेल्यावर आमच्याकडे कामाला आलेल्या बाईंची मुले व भाऊ रमणबागेत शिकले, नोकरी/व्यवसायाला लागले याचा भाऊंना झालेला आनंद मी अनुभवला आहे. रमणबागेत त्यांच्याबरोबर काम करणारे शिपाई शिकावेत म्हणून आग्रह धरणारे... त्यांनी electrician चा अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर पद्मावतीच्या घरात नूतनीकरण करताना त्यांना वायरिंगचे काम देणारे भाऊ मी पाहिले... त्यांची मुले शिकून अभियंता झाली याचा अभिमान, कौतुक असणारे भाऊही आम्ही

पाहिले !...

मी संघाचा प्रचारक म्हणून जाण्याचा प्रस्ताव घरात एका मिनिटात पास झाला ! त्यावेळेस भाऊ रमणबागेत मुख्याध्यापक होते. रमणबागेतील मुख्याध्यापक निवासात राहात असताना, माझ्या Final परीक्षेच्या दरम्यान मी भाऊंशी बोललो. **होकाराबरोबर छोटी सूचना आली, 'आईशी सविस्तर बोल. संघकाम करताना घरातल्यांचे सहकार्य मिळण्यासाठी विश्वासात घे !...' हे सांगताना 'अरे मला नाही जमले. तू जातोयस... आशीर्वाद आहे !' असे समाधानाचे डोळ्यातील भाव आजही आठवतात...**

संघकामात, सामाजिक संस्थांमध्ये पदाधिकारी, प्रमुख म्हणून भूमिका करताना भाऊंचे वेगळेपण जाणवायचं त्यांच्या व्यापक दृष्टिकोनांमधून. अनेक नवीन विषय सुरू करताना - 'स्व'-रूपवर्धिनी, सामाजिक समरसता मंच, भारतीय स्त्री-शक्ती जागरण, पुण्यातील संस्कार-भारतीचे काम यांची वैचारिक भूमिका कार्यकर्त्यांना समजावून सांगताना, कार्यक्रमांची योजना करताना भाऊंचं वेगळेपण जाणवायचं. **'संघ शाखांबरोबरच सेवा-वस्तीतील हुशार मुलांचा विकास होण्यासाठी 'स्व'-रूपवर्धिनीची शाखा पण तितकीच महत्त्वाची आहे; ते पण संघकामच आहे' असे ठासून प्रतिपादन करणारे पुणे महानगराचे कार्यवाह भाऊ मी पाहिले आहेत...**

जसा व्यापक दृष्टिकोन सामाजिक जीवनात होता तसाच कौटुंबिक जीवनातही ! **कै. भाऊ धार्मिक होते, पण कर्मठ नव्हते. श्रद्धा असावी पण व्यवहार डोळस, वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवून करावा हा त्यांचा जिव्हाळ्याचा विषय होता !** अनीशची मुंज आठव्या वर्षी पारंपरिक पद्धतीने न करता 'विद्याव्रत संस्कार' त्याला समजेल अशा वेळी सर्वांना बोलावून संस्कारामागची भूमिका सर्वांना समजावून करण्याचा प्रस्ताव त्यांनी सहज स्वीकारला, इतरांनाही सांगितला. **पारंपरिक कर्मकांडांचा आग्रह कधीच धरला नाही पण डोळस श्रद्धेने सर्वांनी राहावे यासाठीचे अनेकांबरोबरच्या संवादाचा मी साक्षीदार राहिलो... ठळक आठवणारी सौ. अनघाबरोबरची चर्चा - पुनर्जन्माबद्दलची !...**

आमचे सर्वांचे पालक म्हणून भूमिका वठवताना त्यांचं वेगळेपण भावतं ते त्यांनी आम्हाला दिलेल्या सामाजिक जाणिवेचं, दृष्टिकोनांचं ! **व्यक्तिगत करिअर घडवताना सामाजिक बांधिलकी जपावी यासाठी आमच्याकडे धरलेला आग्रह हा शब्दांपेक्षा त्यांच्या कृतीने अधिक व्यक्त होत होता. 'तुझी पत्नी सामाजिक काम करणारी असावी, दोघांनाही वैवाहिक जीवनात सामाजिक दायित्व उत्तमपणे निभावता येईल.. यशस्वी व्यावसायिक जीवनाबरोबरच उत्तम सामाजिक दायित्व निभावलं पाहिजे' हा माझ्या लग्नापूर्वीचा आमचा संवाद आजही आठवतोय !...**

**शेवटच्या काही दिवसांत भाऊंची भूमिका वडीलकीपेक्षा बरोबरीची अधिक राहिली. घडणाऱ्या घटना, घरातील व्यवस्था याबाबतीत सल्ला, सूचना देण्यापेक्षा आमचे मत विचारणे, चौकशी करणे असा व्यवहार त्यांनी केला.** घरात येणाऱ्या-जाणाऱ्या सर्वांचे स्वागत, चौकशी व दैनंदिन कामात शक्य असेल तशी मदत ही भूमिका त्यांनी सहज वाटावी अशी पण जाणीवपूर्वक वठवली. संध्याकाळी मी घरी वेळेवर आलो तर बरोबर चहा घेताना दिवसभराच्या घडामोडींचे निवेदन, माझ्या कार्यक्रमाची चौकशी हा नियम दोन-अडीच वर्ष नियमित होता. घरी येणारे सर्व विषय आमच्याकडे निर्देश करून त्यांनी एका प्रकारे निवृत्ती घेतली. त्याचवेळी सभोवती घडणाऱ्या घटना, येणारे पै-पाहुणे, सौ. अनघाचे आई-बाबा, विवेकानंद रुग्णालय, यांचा परामर्श आस्थापूर्वक होत राहिला. गेल्या दहा-बारा वर्षांत तीन-चार वेळा तरी भाऊंना दीर्घ आणि गंभीर आजारपणांचा सामना करावा लागला. **मधुमेह तर गेली अनेक दशकं शरीरात वस्ती करून राहिलेला. पण भाऊंची झगडण्याची जिद्द एवढी प्रखर की प्रत्येक वेळी जिवावरच्या दुखण्यातून ते बाहेर पडले. इतकंच नाही तर कृतिशीलही राहिले. २०१३ च्या अतिगंभीर आजारपणानंतरही स्वत:चा सर्व दिनक्रम स्वावलंबी करण्याइतकं ते स्वत:ला उभवू शकले.** पण शरीरात दीर्घ

काळ वसलेल्या मधुमेहानं डाव साधला. पायाची छोटीशी जखम उपचार करूनही चिघळत गेली. त्यामुळे होणाऱ्या जंतुसंसर्गानं आणि प्रतिकाराची पराकाष्ठा कमी झाल्यानं शेवटच्या काही महिन्यात ते हळूहळू हतबल होत गेले. पण त्या अवस्थेतही त्यांचं 'पालकपण' जागं असायचं. पाळीपाळीनं शुश्रुषेला असलेल्या विवेकानंद रुग्णालयातील प्रत्येक कर्मचाऱ्याला वैयक्तिक माहिती विचारणं, आपुलकीनं हवं-नको विचारणं, त्यांच्याशी गप्पा मारणं चालूच होतं. कितीही वेदना होत असल्या तरी जखमेवरचे उपचार सहन करणं त्यांना कसं जमायचं कोण जाणे ! आम्हा सगळ्यांना वाटणारी चिंता जोपर्यंत त्यांना कळत होती तोपर्यंत आणि त्यानंतरही ते आमचे 'भाऊ'च राहिले, काळजी घेणारे, काळजी वाहणारे ! भाऊंच्या अशा अनेक भूमिका आम्ही पाहिल्या, अनुभवल्या. अनेक प्रसंगांचा, चर्चांचा साक्षीदार झालो... अनेकदा संवादांत सहभागी झालो.. त्याचा **आनंद, अभिमान, कृतार्थता अनुभवताना जाणवतं की 'खरंच... भाऊंच्या किती भूमिका समजल्या?...'**

...दोन महिन्यांपूर्वी एका सद्‌गृहस्थांची भेट झाली. वयाने माझ्या बरोबरीचे - कदाचित वर्षा-दोन वर्षांनी मोठे असतील. परिचय झाल्यावर मला वाकून नमस्कार केला व म्हणाले, **'आज सरांच्या जागी तुम्हाला नमस्कार करतो... माझ्या आयुष्यात त्यांची मोठी भूमिका आहे !...'**

**- अजूनही कै. भाऊंच्या अशा आम्हाला माहीत नसलेल्या अनेक भूमिका असतील...!!!**

- मो. : ९८९०५००२०८

---

## कर्मयोगी भाऊ

**- कै. अच्युत पारखी**

श्रीयुत राजाभाऊंचे आणि माझे एकत्र राहण्याचे दिवस इंग्रजी चौथ्या-पाचवीच्या शिक्षणापासून ते अगदी आमची लग्ने झाली तोपर्यंतचे. पुण्याच्या नातूंच्या चाळीतील जीवन म्हणजे आमच्या आयुष्यातील जणू मंतरलेले दिवस. ती. मावशी आणि माझी आई ह्या दोघी सख्ख्या बहिणी, शरीराने दोन व्यक्ती, पण जणू काही एकच व्यक्तित्व. मला स्वतःला अजूनही त्यांच्यात काही वेगळेपणा होता हे जाणवत नाही. त्या काळात कितीतरी गोष्टी घडल्या; ती. मावशी ही मला मावशी नसून आई होती आणि माझ्याशीच काय सर्वांनाच वागविण्याची तिची हातोटी अशी की ती साऱ्या जगाची आई होती. मला असे वाटते की आमच्या राजाभाऊंच्या स्वभावाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या सहवासात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला जो आपलेपणा त्यांच्याकडून मिळायचा-त्याचे बाळकडूच त्यांना मिळाले होते. **भाऊंच्या स्वभावात अतिशय गोडपणा होता. आंब्याची गोडी वेगळी, फणसाची वेगळी आणि चिक्कूची वेगळी. पण ही सर्वही एकाच वेळी त्यांच्या सहवासात आलेल्या प्रत्येक व्यक्तीस अनुभवास येते. त्यांचे व्यक्तित्व नारळाच्या पाण्याप्रमाणे शुद्ध आणि औषधी.**

**पण त्यांची जीवनशैली कर्मप्रधान होती.** प्रत्येक काम कसे व्यवस्थित, अचूकपणे केलेले. लहानपणी आम्ही एकत्र खेळलो आहोत. विटीदांडूच्या खेळात किंवा कोणत्याही खेळात त्यांचे ते कसब जाणवायचे. झाडावरून आंबा पाडावयाचा असेल तर त्यांचा नेम वाया जाणार नाही. कोणत्याही खेळात आमचे भांडण झाले नाही. त्या काळी घरामध्ये लाकडे वापरीत असू. वखारीतून लाकडे आणल्यानंतर लहान-लहान तुकडे बंबफोड म्हणून काढावयाचे. **भाऊंचे कुऱ्हाड चालविणे पहात रहावे; एकही घाव फुकट जाणार नाही.** पोहावयास त्यांचे तेच शिकले. **अभ्यासात, ज्ञानसंपादनाच्या कलांत अगदी अव्वल दर्जाचे. त्यांचे प्रत्येक कामच अगदी व्यवस्थित. बोलणे, वागणे सगळे सुयोग्य.**

**भाऊ कर्मयोगी होते.** 'योगः कर्मसु कौशलम्' त्यांनी फार मोठमोठी कामे केली. पण **लहानसहान कामांतही त्यांचे वैशिष्ट्य दिसून यायचे.** चऱ्होलीला शाखेचे प्रमुख म्हणून वावरत असलेली त्यांची बालमूर्ती अजून

डोळ्यांसमोर येते.

पुण्यात बिऱ्हाड केले त्याआधी इंग्रजी शिक्षणासाठी कसबा गणपतीजवळ श्री. अकूत यांचेकडे ते राहिले होते. तेथे टायफाईडच्या दुखण्याने त्यांची कसोटी पाहिली. राजाभाऊंना आपल्या जीवनामध्ये खूप संघर्ष करावा लागला. शिक्षण करीत असताना त्यांना घरकामाची वगैरे जबाबदारी घ्यावी लागली. त्यानंतर पुष्कळ दिवसानंतरचे, ती. मावशीने एक तळमळीने काढलेले उद्गार 'माझा भाऊ लौकर म्हातारा झाला' माझ्या भावविश्वांत साठविलेले आहेत.

त्यांचं माणसं जोडण्याचं कौशल्य असंच विशेष होतं. ती. बापू आणि ती. मावशी दोघेही ह्या बाबतीत तज्ज्ञ होते. त्या काळातील प्राथमिक शिक्षक म्हणजे गरीब ब्राह्मणाच्या घरची गाय. त्यांना एकत्र आणून त्यांची संघटना बांधून, सेक्रेटरी म्हणून (अप्रत्यक्ष परंतु वास्तविकतेने) काम करून त्यांनी महाराष्ट्राच्या इतिहासात पहिला आणि यशस्वी असा प्राथमिक शिक्षकांचा संप घडवून आणला. ही श्री. बापूंची कामगिरी कदाचित आज कोणाला माहीत नसेल; पण त्यामागे त्यांच्या घरच्यांचे योगदान – एक वेळ मुले तशीच झोपून जातील पण त्यांनी बरोबर आणलेल्या शिक्षकमंडळींचे रात्रीचे जेवण झाले पाहिजे – असे योगदान आम्ही जवळून पाहिले आहे. त्यावेळचे राजाभाऊ लहान वयाचे पण त्यांनी दाखविलेला दमदारपणा अद्वितीय होता.

आम्ही दोघेच उन्हाळ्याच्या सुट्टीत आमच्या मामांच्या गावाला सायकलवरून जात असू. आम्ही दोघे ती. आबामामांचे लाडके भाचे. ते दिवस आठवले की मन आजही बेभान होते.

भाऊंचे चऱ्होली गाव आळंदीच्या जवळच. भाग्यवंत माणसांनाच त्या 'ज्ञानियांच्या राजा'चे सान्निध्य लाभते ! सुट्टीत किंवा मुंजीसारख्या कार्यक्रमासाठी तेथे घालविलेले बालपणातील दिवस आजही मला आठवतात आणि चऱ्होलीचे ते प्रशस्त घर, नदीकाठचा परिसर, गावाला लागून असलेला डोंगर वगैरे वातावरण डोळ्यांसमोर उभे राहते. राजाभाऊ माझ्यापेक्षा दीड–दोन वर्षांनी लहान, पण ते मला माझ्यापेक्षा सर्वच बाबतींत मोठे वाटतात.

(कै. राजाभाऊंच्या अमृतमहोत्सवाच्या कार्यक्रमावेळी व्यक्त केलेल्या भावना त्यांच्याच शब्दात)

❖❖❖

सुखदुःखांची सांगड घालत, नाती जपत, मुलांचे भवितव्य घडवणारे वडीलच असतात. अर्थात या सर्वात आईही समर्पित असतेच. माझ्या मते 'अशा' वडिलाचे स्वरुप असे असते –

**उदार पादपापरी** (संघ प्रवृत्ती) **कठोर त्या हिऱ्यापरी** (वेळ प्रसंगी निर्णायक भूमिका) **प्रसन्न पंकाजासम** (नेहमी समाधानी) **क्षमी वसुन्धरेसम** (मनाचा मोठेपणा)

ह्या सर्व गुणांचा समावेश भाऊंमध्ये होता. असे व्यक्तित्त्व आपल्याला सोडून गेले आहे. त्यांच्या दिव्य आत्म्यास शांती मिळो अशी परमेश्वराच्या चरणी प्रार्थना.

**– सौ. मालती लपालीकर**

श्री. लवळेकर सरांच्या दुःखद निधनाची बातमी ऐकून मन विषण्ण झाले. नवीन मराठी शाळेत मी व माझा थोरला भाऊ आम्ही स्कूल बसने यायचो. दर महिन्याच्या बसच्या पावत्या लवळेकर सर रेखीव अक्षरात लिहून आम्हाला समक्ष बोलावून देत असत. तिथून त्यांनी त्यांचा शिक्षण प्रवास सुरू करून रमणबागेत ते विद्यार्थीप्रिय शिक्षक झाले. भूतकाळातील या गोष्टी आणि सामाजिक वातावरण आठवताच डोळे पाणावतात. लवळेकर सरांच्या दिव्य आत्म्यास शांती मिळो अशी परमेश्वराच्या चरणी प्रार्थना.

**– श्रीकांत नाडपुरोहित**

# त्वमेव माता, पिता त्वमेव ।

**– कै. प्रकाश पुराणिक**

प्रिय मामा,

पंचाहत्तरीच्या वाढदिवसाला 'अमृत महोत्सव' का म्हणतात हे मला माहीत नाही. पण 'अमृत' शब्दाचा अभिप्रेत असलेला अर्थ म्हणजे संजीवनी लाभणे. ही संजीवनी मला तू सुमारे पन्नासहून अधिक वर्षांपूर्वी पाजलीस. त्या अमृतकणांची आठवण आजही ताजी आहे.

त्यावेळी १६–१७ वर्षांचा असलेला, पितृच्छाया हरपलेला, त्यामुळे भेदरलेला हा तुझा भाचा, ज्याला तू जवळ केलेस, गोंजारलेस, आधार दिलास, आकार दिलास. **तू माझ्यासाठी काय केले नाहीस ? देव भक्तासाठी काय करीत नाही ?** श्रीखंड्या बनून भगवंतांनी नाथांच्या घरी कावडी वाहिल्या. पण तेथे नाथांसारखा थोर परमभक्त होता. नाथांची अलोट परमभक्ती देवाने पाहिली होती. मी कोण होतो ? एक अनाथ, अजाण लहान मुलगा. तू देव होतास, पण मी भक्त होतो? **मी भक्त झालो, माझ्या देवाच्या, म्हणजे तुझ्या वागणुकीने. तू मला आई–वडिलांची माया दिलीस, मोठ्या भावासारखा आधार दिलास, मित्रासारखे प्रेम दिलेस, गुरुसारखे ज्ञान दिलेस. तू माझा सर्व काही होतास.**

मे १९६० ते मे १९६४ ही चार वर्षे माझ्या 'कायाकल्पाची' वर्षे. **या चार वर्षांत मला तू आकार दिलास, विचार दिलास, विश्वास दिलास आणि, जीवनाधारही दिलास. हा चार वर्षांचा काळ, खरं तर माझ्या आयुष्यातील खडतर काळ. पण मला स्वतःला तो माझा सुवर्णकाळ वाटतो. या चार वर्षांत मला तुझा जो सहवास लाभला, त्यामुळे मी स्वतःला धन्य मानतो.** या चार वर्षांच्या काळातील तुझ्या व माझ्या आयुष्यातील प्रत्येक बारीकसारीक प्रसंगाचा मी साक्षीदार आहे. माझ्या व तुझ्याही आयुष्याला कलाटणी देणारी ही वर्षे. **माझ्या आयुष्यास दिशा मिळाली तर तुझ्या कर्तृत्वास भरारी.** तुझी ती समर्पण वृत्ती, झोकून देण्याची वृत्ती, जीव तोडून काम करण्याची वृत्ती, शांत पण संयमी वृत्ती, दुसऱ्यास मदत करण्याची वृत्ती, भावनेपेक्षा कर्तव्य श्रेष्ठ मानण्याची वृत्ती, विवेकी वृत्ती आणि सर्वात महत्त्वाची मातृपितृभक्ती. तुझ्याकडून काय घेऊ आणि किती घेऊ अशी माझी अवस्था. 'रमणबागे'त भक्कम पाय रोवून तू उभा राहिलास आणि बघता–बघता सगळी 'रमणबाग' तुझी झाली. विद्यार्थी, सहकारी, वरिष्ठ, कनिष्ठ, सर्व तुझेच चाहते झाले. इतके चाहते की मी तुझा केवळ भाचा म्हणून रमणबागेत मलाही चाहते मिळाले. **विद्यार्थ्यांसाठी ज्ञानदान करताना निरपेक्ष वृत्तीने तू केलेली मदत मी पाहिली आहे. कित्येक विद्यार्थ्यांचीच नव्हेत तर सहकारी शिक्षकांची सुद्धा तुझ्यामुळे उभी राहिलेली आयुष्यं मी पाहिली आहेत.** सुभाष ठाकूरसारख्या हुशार पण गरीब विद्यार्थ्यासाठी तू केलेली धडपड मी पाहिली आहे. **शाळेची केवळ अभ्यासातच नव्हे तर खेळात, कलेतही प्रगती व्हावी म्हणून तू प्रचंड धडपड केलीस. एवढेच नव्हे तर सहकारी शिक्षकांचा 'पाठ'ही चांगला व्हावा म्हणून तू केलेली प्रचंड मेहनत मी पाहिली आहे** आणि म्हणूनच ज्या दिवशी तू रमणबागेच्या मुख्याध्यापकपदी आरूढ झालास त्या दिवशी रमणबागेच्या वास्तूलाही योग्य व्यक्तीला तो मान मिळाल्याचे समाधान मिळाले असेल. **लोकमान्य टिळक, आगरकर यासारख्या थोर व्यक्तींनी उभारलेल्या संस्थेच्या त्या 'खुर्चीत' तुझ्यासारखीच व्यक्ती शोभून दिसली.**

तुझा 'पाठ' पाहण्याचा योग कधी आला नाही. पण तुझ्या प्रतिभेची, वक्तृत्वाची, विचारांची मला फार जवळून ओळख होती. दोनच उदाहरणे सांगायची तर एकदा मी पुण्याला आलो असताना तू, मी व सौ. कुसुममामी, प्रभातमध्ये व्ही. शांतारामचा 'जल बिन मछली, नृत्य बिन बिजली' सिनेमा पाहायला गेलो होतो. पृथ्वीचे प्रेमगीत या कवी कुसुमाग्रजांच्या कवितेवर आधारलेल्या या सिनेमाचे, विशेषतः त्यातल्या नामांचे तू इतक्या सुंदर व समर्पक भाषेत व

समरसून रसग्रहण करीत होतास की क्षणभर व्ही. शांताराम यांच्याऐवजी तूच हा चित्रपट दिग्दर्शित केलेला नाहीस ना ? असे मला वाटले. दुसरे उदाहरण म्हणजे श्रीचे जेव्हा लग्न ठरवित होतो तेव्हा तू एक वाक्य उच्चारले होतेस ते वाक्य भरतवाक्यासारखे होते. तू म्हणाला होतास, 'लग्न ठरविताना मुलीच्या रूपाबरोबर कुळ, शील, संस्कार आणि आचरण बघावे, तर मुलाचे 'मन आणि मनगट' बघावे. तुझ्या या मताप्रमाणेच 'मन व मनगट' असलेले दोन्ही जावई, तसाच मुलगा व हवी अशीच सून व तशाच कर्तृत्ववान मुली तुला लाभल्या ही एक ईश्वरीकृपाच होय. पण सर्वात महत्त्वाची व्यक्ती म्हणजे तुझी पत्नी व माझी प्रिय मामी. तिच्या सहाय्यानेच तुला तुझा अश्वमेधाचा घोडा भारतभर उधळून परम पराक्रम व कीर्ती मिळवता आली. तुला अनुरूप-अजोड अशीच जीवनसाथी लाभली.

रमणबागेतून अत्युच्च स्थानावरून निवृत्त झाल्यावर तुझ्यातील समाज कार्यकर्ता आणखी जागृत झाला. आयुष्यभर जपलेल्या संघविचारांचे स्फुल्लिंग पेटविण्यासाठी तुला 'तरुण भारत'च्या संपादकपदी आरूढ व्हावे लागले. तुझ्यातील कलाप्रेम तुला संस्कारभारतीच्या उपाध्यक्षपदी घेऊन गेले. 'स्व'-रूपवर्धिनी तर तुझे स्वतःचेच अपत्य. कृतकृत्य, आदर्श जीवनाची ही यशोगाथा. तुझ्याकडे अभिमानाने पाहता ताठ होणारी मान. तुझ्यापुढे नतमस्तक होऊन म्हणते आहे. 'तुजसम तूच'. मामा, मी एवढा भाग्यवान की तुझ्याएवढेच प्रेम, किंबहुना थोडे जास्तच प्रेम व माया मला कुसुममामींकडूनही मिळाली, नव्हे अजूनही मिळत आहे.

नारदमुनींची अशी गोष्ट सांगतात, की त्यांच्या एकदा मनात आलं की, भगवंतांचा सर्वात लाडका-आवडता भक्त कोण असेल ? आपण तर अखंड नारायण-नारायण जप करतो म्हणजे बहुधा आपणच त्यांचे लाडके, प्रिय भक्त असू ! हा विचार मनात येताच त्यांनी ठरवलं की याचे उत्तर थेट भगवंतांनाच विचारू. त्यांनी तडक वैकुंठ गाठले. भगवंतासमोर हात जोडून उभे राहिले. सरळच विचारले, 'आपला सर्वात लाडका भक्त कोण ?' भगवंत हसून म्हणाले, 'खरंतर नारदा, हा प्रश्न तू मला विचारू नये आणि त्याचं उत्तर मी देऊ नये.' तेव्हा नारदांनी हट्टच धरला. ते म्हणाले, 'भगवंत, आज तुमच्याकडून ह्या प्रश्नाचे उत्तर घेतल्याशिवाय मी येथून हलणारच नाही.'

भगवंतांचा नाईलाजच झाला. ते म्हणाले, 'ठीक आहे, तुझा एवढा हट्टच आहे तर ऐक ! अमुक एका खेड्यात, अमुक-अमुक नावाचा एक शेतकरी राहतो. तो माझा सर्वात लाडका भक्त आहे.' नारद मनातून हिरमुसले. पण तसे न दाखवता भगवंतांना वंदन करून ते तडक त्या खेड्याकडे रवाना झाले. त्या शेतकऱ्याच्या घरासमोर ते दाखल झाले. ती पहाटेची वेळ होती. शेतकरी आपल्या झोपडीसमोर कांबळ्यावर झोपला होता. एवढ्यात कोंबडा आरवला. शेतकरी आपल्या अंथरुणात उठून बसला. त्याने डोळे मिटले, हात जोडले. तो देवाची प्रार्थना करून म्हणाला, 'देवा, तुझ्यामुळे काल रात्री छान झोप लागली. तुझ्याच कृपेने आजचा दिवसही चांगला जाऊं दे.' असं म्हणून तो उठला. सकाळची कर्मे उरकून, न्याहारी करून तो शेतावर गेला. दिवसभर शेतात राबून संध्याकाळी तो आपली गुरंढोरं घेऊन घरी आला. जनावरांना गोठ्यात बांधून, त्यांच्या दाण्या-पाण्याची व्यवस्था लावून, त्यांच्या पाठीवर प्रेमाने हात फिरवून तो झोपडीत गेला. मुलाबाळांबरोबर गप्पागोष्टी करून, जेवून तो अंथरुणावर येऊन बसला. परत हात जोडून, डोळे मिटून त्याने देवाची प्रार्थना केली. करुणा भाकली व तुझ्यामुळेच आजचा दिवस चांगला गेला, असे म्हणत मनोमनी प्रार्थना करीत तो अंथरुणावर पडला व क्षणार्धात झोपी गेला.

नारदमुनी लांबून हे सर्व पहात होते. ते पाहून मनोमनी ते समजले. त्यांनी शेतकऱ्याला नमस्कार केला व तेथून प्रयाण केलं. मामा, तुझ्या असंख्य चाहत्यांना, भक्तांना, शिष्यांना, सुहृदांना असेच वाटते की आपणच राजाभाऊंचे लाडके आहोत. पण मला खात्री आहे की, नारदांसारख्याच असलेल्या तुझ्या कोणी भक्तांनी हा प्रश्न तुला केला असता तर तू सांगितले असते की, 'डोंबिवली नगरीत MIDC विभागात, मिलापनगर वस्तीत, भारद्वाज नावाची एक कुटीर आहे. त्या कुटिरात, बापू पुराणिक नावाचा एक गरीब मनुष्य राहतो. तो माझा सर्वात लाडका आहे' आणि तुझ्या शेजारीच बसलेली मामीपण म्हणेल, 'हो ! माझाही तोच लाडका आहे.'

(कै. राजाभाऊंच्या अमृतमहोत्सवाच्या कार्यक्रमावेळी व्यक्त केलेल्या भावना त्यांच्याच शब्दात)

# एक आदर्श सेवाव्रती

**– नीलकंठ जोशी**

वेलिंगकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट ! माटुंगा ! वार्षिक पदवीदान समारंभाला संस्थेच्या प्रशस्त हॉलमध्ये बरीच मंडळी जमली आहेत. स्टेजवर दहाबारा मान्यवर बसले आहेत. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आणि वक्ते आहेत श्रीयुत कृष्णाजी गोविंद उर्फ राजाभाऊ लवळेकर ! सुरुवातीचं प्रास्ताविक झाल्यावर संस्थेच्या एका पदाधिकाऱ्याने लवळेकर सरांची ओळख करून द्यायला सुरुवात केली. 'आज आपल्याला प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले श्री. कृष्णाजी गोविंद उर्फ राजाभाऊ लवळेकर हे एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व आहे ! त्यांच्या कामगिरीचा आढावा घ्यायचा झाला तर – न्यू इंग्लिश स्कूल रमणबागचे प्रिन्सिपल, 'स्व'–रूपवर्धिनीचे संस्थापक–सभासद, संस्कारभारतीचे पश्चिम क्षेत्राचे अध्यक्ष, शिक्षण प्रसारक मंडळीचे मानद सदस्य, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पुणे महानगराचे कार्यवाह, ज्ञानदा प्रतिष्ठानचे अध्यक्ष अशा अनेक ठिकाणी ते कार्यरत आहेतच शिवाय इतर अनेक संस्थांचे संस्थापक–सभासद व मार्गदर्शक आहेत!' एवढ्या साऱ्या संस्थांवर कसं काम करत असतील हा प्रश्न पुष्कळांना पडला असला तरी टाळ्यांचा कडकडाट होत राहिला.

लवळेकर सर भाषणाला उभे राहिले. 'माझी ओळख करून देताना जरा जास्तच कौतुक झालंय ! त्यांनी बहुधा माझ्यावर मॅग्निफायिंग ग्लास धरली असावी ! माझं रूप त्यांना मोठं वाटलं असावं ते त्यामुळे !' एवढ्या संघटनांवर आणि संस्थांवर काम करत असतानाही सरांचा हा विनय पाहून पुन्हा टाळ्या कडकडल्या ! त्यांना ओळखणारे सारे गहिवरले ! माणूस किती मोठा आहे हे इतरांनी सांगावे, आणि मी किती लहान आहे हे त्याने सांगावे यातच त्यांच्या मोठेपणाची जाणीव झाली. आपल्या वक्तृत्वाने नंतर सरांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केलेच पण त्या दिवशी त्यांच्या हातून पदवी घेताना त्या विद्यार्थ्यांनाही धन्य वाटले असेल.

भाऊंचा आणि माझा संबंध १९६३ पासून आला. काही कारणामुळे मला मॅट्रीकनंतर मुंबईहून पुण्याला यावं लागलं ! भाऊंनीच बोलावलं ! तोपर्यंत माझा मुंबई–पुणे प्रवास 'मामाच्या गावाला जाऊ या' असा खेळकर होता. आता जबाबदारी आली. भाऊंच्या घरात त्यांच्यापैकी एक होऊन राहायचं, कॉलेज करायचं, शक्यतो मिळेल तेवढी मदत बाहेरून मिळवायची असं अर्जनाचं काम सुरू झालं. धडपड सुरू झाली. आयुष्याचा अर्थ कळायला ही लवकर सुरू होणारी धडपड फार उपयोगी पडते. भाऊंच्या ओळखीनं बृहन्महाराष्ट्र कॉमर्स कॉलेजात अॅडमिशन मिळाली. कॉलेज लांब ! कधी बस, कधी सायकल. तीही भाऊंचीच ! पुण्यात सायकल चालवणं हे कसब आहे हे दोनदा अपघात झाल्यावर कळलं. आपल्यामुळे भाऊंना चालत जावं लागलंय, दुरुस्तीचा खर्च येतोय हे कळत होतं पण विचार करायला वेळ नव्हता. दुसरीकडे रोज नवे अनुभव, आठवणी, प्रसंगाची भर पडत होती. एक नवं विश्व समोर आलं होतं. ४२४ शनिवार, मेहुणपुरा इथं भाऊ रहात होते. मीही तेथेच राहात होतो. त्या वाड्यात सुधीर फडके आलेले मी पाहिले. शेजारच्या वाड्यात राजा ठाकूर – प्रसिद्ध दिग्दर्शक–राहात होते. पं. महादेवशास्त्री जोशी यांच्या घरावरून जायचा–यायचा रस्ता होता. येता–जाता ते दिसतात का ते मी रोज पाहात असे. महामहोपाध्याय द. वा. पोतदार यांचं पगडीसकट दर्शन घडत असे. शिवाय भाऊंच्या घरी येणारी मंडळी होतीच. गदिमा, सुधीर फडके, यशवंत देव, गोळवलकर गुरुजी ही मंडळी मनात घर करू लागली होती. कॉलेजात खेळांची आवड निर्माण होत होती पण सकाळ–संध्याकाळ पार्टटाईम नोकरी असल्यानं तिकडे लक्ष देता येत नव्हतं ! कॉलेजात कुसुमाग्रज, शेक्सपिअर, गडकरी, बर्ट्रांड रसेल ही मंडळी भावनिक उंची वाढवत होती तर कॉलेजचं सहजीवन वेगवेगळी स्वप्नं डोळ्यांपुढे ठेवत होतं. भावविश्व समृद्ध करत होतं. भाऊंनी केवढं मोठं जग आपल्यासमोर उघडून ठेवलंय याची जाणीव होत होती. पुणं तेव्हा फार विस्तारलेलं नव्हतं. पेशवे पार्क पलीकडचा कॅनॉल ही हद्द ! तिथं अधूनमधून फिरायला जात असू !

हे सारं घट्ट आहे मनात ! दोन वर्षात मला मुंबईला परतावं लागलं. दोन वर्षातल्या किती सुंदर आठवणी, अनुभव मनात घर करून राहिल्या. **आज इतक्या वर्षांनी जाणवतंय – वयाच्या तिशीतच भाऊंच्यात एक सुंदर तटस्थता**

**आली होती. क्रोध, लोभ, मद, मोह, मत्सर या सर्वांच्या पलीकडलं एक सुंदर जग दाखवणारी ! माणसांच्या जवळ जायला शिकवणारी, माणसांना जवळ करायला खुणावणारी ! भाऊंचा सार्वजनिक संसार तेव्हापासूनच सुरू झाला होता.** माणसांचा राबता, बैठका, नोकरी याबरोबरच घरच्या जबाबदाऱ्याही त्यांनी समर्थपणे पेलल्या. लहानग्या प्रसादला मांडीवर घेऊन रात्री झोपवताना 'आकाशीच्या चंदा रे ये रे ये धावत, पुरवी लवकरी श्रीरामाचा हट्ट' ही त्यांनी स्वतः रचलेली अंगाई गात उशिरापर्यंत जागताना पाहिलं आहे. ती अंगाई आता सगळ्यांना पाठ आहे. घरातली नंतरची पिढीही तीच अंगाई ऐकत झोपी गेली आहे. चांदोबाच्या गोष्टी सांगून जेवढं मुलांना त्यांनी रिझवलं तेवढंच नात्यातल्या व नात्याबाहेरच्या अनेकांना हॉस्पिटलमध्ये रात्री जागून सोबत केली आहे, आधार दिला आहे.

**'चंबळेच्या पलीकडे' या स. ह. देसाई लिखित कादंबरीचं पुनर्लेखन त्यांनी केलं. कविताही त्यांनी लिहिल्या. पण साहित्यिक सन्मानाचा, कवी होण्याचा कुठलाही आग्रह त्यांनी धरला नाही.** घरच्या समारंभाच्या आमंत्रणाची, त्यांच्या वळणदार हस्ताक्षरातली पत्रे त्यांच्या साहित्यिक गुणांची झलक दाखवत. काही पत्रे मी अजून जपून ठेवली आहेत. साहित्याच्या क्षेत्रात मीही माझी होडी थोडीफार वल्हवली. पण लवकरच ती काठाला लागली. तथापि **माझ्या प्रत्येक यशस्वी प्रयत्नाला दाद देणारी त्यांची पत्रे अजून आठवतात. माझ्यासारख्या अनेकांना त्यांनी धीर दिला, कौतुक केलं, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण केला !** 'जगात काहीतरी करून दाखवा, मोठे व्हा, नाव कमवा' असा अलिखित पण वास्तववादी संदेश त्यांनी सदैव दिला. **अनेकांनी त्यांच्यावर भरभरून लिहिलंय, आपलं मनोगत वेगवेगळ्या प्रकारे व्यक्त केलंय, त्यावरून त्यांनी किती समया, निरांजनं, ज्योती पेटवल्या होत्या याची कल्पना येते. एक सुंदर स्नेहभाव सतत मनात ठेवून, माणसांशी संबंध ठेवायची मनाला ओढ असावी लागते. पुन्हा त्यात आपपर भाव नाही.** जेवढा घरचा प्रिय तेवढाच दारचा ! 'वसुधैव कुटुम्बकम्' सारे माझे कुटुंबीयच आहेत हा विश्वास प्रत्येकाला दिला.

आपल्यातल्या शिक्षकाला भाऊंनी जास्त मान दिला. मोठं केलं. त्यांच्या कर्तृत्वाला चारही दिशात सलाम होत होते. त्यांना जिथं जावंसं वाटलं असतं तिथं त्यांचं स्वागत झालं असतं. ऐहिक सुख, नावलौकिक, ऐश्वर्य यांचा उपभोग घेत शांत जीवन जगता आलं असतं. कोचिंग क्लास त्यांना सन्मानाने बोलवत होते. पण त्या वाटांच्या मर्यादा भाऊंना माहीत होत्या. भारतीय शिक्षण क्षेत्रातल्या ऋषींचा आदर्श त्यांच्या डोळ्यापुढे होता. आजन्म शिक्षणव्रती राहून या ऋषींचं ऋण फेडणाऱ्या भाऊंसारख्या सेवाव्रतींचा या ऋषींच्या मालिकेत अंतर्भाव करायला हवा. **समोर आलेल्या विद्यार्थ्याला घासून-पुसून, लख्ख करून बाहेरच्या जगात पाठवण्याची त्यांना ओढ होती. एका बाजूने ते कायम विद्यार्थीही होते. 'बालादपि सुभाषितं ग्राह्यम्' या उक्तीप्रमाणे कुणाकडून काही शिकण्यासारखं असलं तर ते घेत !** त्यांच्या अनेक विद्यार्थ्यांनी अनेक आठवणी सांगितल्या आहेत. सतीश आळेकरांनी, सरांनी वर्गात सांगितलेली 'पथेर पांचाली'ची गोष्ट त्यांच्यावर काय परिणाम करून गेली ते सांगितलं आहे. 'पृथ्वीचं प्रेमगीत' ही कुसुमाग्रजांची कविता सर शिकवत असताना आपण कसे वेगळ्या भावविश्वात गेलो होतो हे एका विद्यार्थ्यानं नमूद केलंय ! हे विद्यार्थी हीच त्यांची ऐहलोकिक संपत्ती ! त्यावर ना सरकारचा डोळा, ना कुणी वाटण्या मागण्याचं भय ! **भाऊंच्या वर्गात आपणही असायला हवं होतं असं मला राहूनराहून वाटतं. केवळ कविता किंवा धडाच त्यांनी शिकवला असं नाही; तर जगण्यातल्या छोट्या-छोट्या गोष्टीही डोळसपणे पाहायला शिकवलं !**

'या देशात जीवनाचे भाष्यकार फार, प्रत्यक्ष जीवन जगणारे कमी' असं पु. ल. एका ठिकाणी म्हणून गेलेत. जीवन समर्थपणे जगून दाखवून भाऊंनी एक आदर्श निर्माण केला. संस्था स्थापल्या, यशस्वीरीत्या चालवून दाखवल्या. आपले असंख्य विद्यार्थी, चाहते, शिष्य ही त्यांनी एका रात्रीत गोळा केलेली संपत्ती नाही. रात्रीबेरात्री अनेकांच्या मदतीला धावून

गेले आहेत ते. पेशंटकरता रात्ररात्र उशाशी बसून काढली आहे. अनेक लग्नांमध्ये, लग्नाच्या बैठकींमध्ये नारायणाची भूमिका पार पाडली आहे. कुठलंही काम हाती घेतलं की झोकून देण्याची वृत्ती ! समाजातल्या उपेक्षित घटकांकरताही काहीतरी करायची तळमळ होती. 'स्व'–रूपवर्धिनीचा जन्म त्यातून झाला. 'स्व'–रूपवर्धिनीच्या उभारणीपासून पुढे चालू झाल्यानंतर प्रत्येक बारीकसारीक गोष्टीत त्यांचं लक्ष होतं. 'स्व'–रूपवर्धिनीचे विद्यार्थी कुठल्याही बाबतीत कमी पडता कामा नयेत असा त्यांचा कटाक्ष होता. त्यांच्याकरता ते वेगळं शिबिर घेत असत. कितीतरी विद्यार्थी इथून, जगात जगण्यासाठी लागणारं आवश्यक ते व्यावसायिक व व्यावहारिक शिक्षण घेऊन बाहेर पडले आहेत. तळागाळातल्या समाजाबद्दल उगाच खोटे गळे काढणाऱ्या पुढाऱ्यांनी एकदा 'स्व'–रूपवर्धिनीला भेट द्यावीच ! दिलीही असेल. पण त्यांच्या चाकोरीत आणि हिशोबात इथली शिस्त, प्रगती आणि विकास बसत नसेल. 'स्व'–रूपवर्धिनीच्या उभारणीच्यावेळी एका आमदार महाशयांनी, 'या भागात असली कामं फार काळ नाय चालनार' म्हणून मनापासून शुभाशीर्वाद दिले होते. गीतेतसुद्धा भगवंतांनी 'यत्र योगेश्वर कृष्ण' तिथे विजयाची खात्री दिली होती. इथं तर – कृष्णाजी लक्ष्मण पटवर्धन आणि कृष्णाजी गोविंद लवळेकर असे दोन कृष्ण होते. संस्था नावारूपाला आली, यशस्वी झाली ! आमदार फार काळ टिकले नाहीत.

**माणूस काही देण्याकरिता उभा राहिला की सर्वात सुंदर दिसतो अशा अर्थाचं एक वचन आहे. आयुष्यभर भाऊ देत राहिले. घेणारे घेत राहिले.** बहुतेकांच्या मनात कोरलं गेलेलं त्यांचं रूप ही त्यांना भाऊंकडून काहीतरी मिळाल्याची पावती आहे. समाजात, कृष्णाकडे सैन्य मागणारे सारेच दुर्योधन नसतात. 'मला तू हवा आहेस, कृष्णा, मला तुझा सल्ला, पाठबळ हवं' म्हणणारेही पुष्कळ असतात. एक लाख लोकांच्या एक लाख समस्या जगात आहेत. त्या साऱ्या पैशाने, सोन्यानाण्याने सुटणाऱ्या नाहीत. शब्दांचा आधारही कितीदा समस्या चुटकीसरशी सोडवतो. मग ते शब्द मायेचे असतील, धीराचे असतील ! उभारीचे, साहण्याचे, सांत्वनाचेही असतील. कितीतरीजण आज भाऊंची आठवण काढतात. त्यांत डॉक्टर्स, इंजिनिअर्स, वकील, व्यावसायिक, कलाकार, विद्यार्थी सारे आहेत. यातल्या पुष्कळांना मिळाले आहेत ते भाऊंचे चार शब्द ! ही संपत्ती भाऊंनी मुक्तपणे वाटली. मला खात्री आहे. भाऊंचे अर्ध्याहून अधिक चाहते केवळ शब्दांवर उभे राहिलेत. 'इतिहास घडवतील शब्द मराठी माझे' – एक अलिखित इतिहास घडवला आहे भाऊंनी !

**कधीतरी वाटतं – भाऊंच्यामुळे आपल्यात आमूलाग्र बदल झाला आहे. त्वेषाच्या, द्वेषाच्या झेंड्याखाली जाण्यापासून भाऊंनी आम्हाला वाचवलं. आपल्या सुसंस्कृतपणाने, मृदू वाणीने आमच्या आत गुरकणाऱ्या प्राण्याला मारून टाकलं. चर्चेनं प्रश्न सुटतात हे स्वतः सिद्ध करून दाखवलं. जगात प्रगती हवी असेल तर भांडून फायदा नसतो. कलह तुम्हाला पुढे जाऊ देत नाही. 'अंतरीच्या सृष्टीला दृष्टी दिली योगेश्वरा' असा एक चरण आहे कवितेचा! आपल्या आत एक सुप्त जग असतं – आनंदी, खेळकर ! पण ते उलगडून दाखवावं लागतं. ते काम भाऊंनी केलं. कितीतरी लेखकांनी, कवींनी, द्रष्ट्यांनी केलेलं हेच काम भाऊंनी अनेकांसमोर उलगडून दाखवलं ! नतमस्तक व्हायला शिकवलं. आम्हाला डोकं ठेवायला पाय मिळाले.** आणीबाणीच्या वेळी पोलिसांच्या गाडीतून जाताना त्यांना पाहिलं, खूप वाईट वाटलं. पण आदर दुणावला. अशा माणसांनासुद्धा या देशात तुरुंगात जावं लागतं. किरकोळ त्याग केलेल्या गणा–गंपांनी आणि गुंडापुंडांनी सुद्धा आपल्या त्यागाचे चेक फुगवून वटवून घेतले. 'रंग माझा वेगळा' हे भाऊंनी सिद्ध केलं. अगतिक होण्याचे प्रसंग त्यांच्यावरही आले असतील, ते पण त्यांनी कधी जाणवू दिलं नाही. आम्ही अगतिक झालो की मात्र, आम्हाला समजावताना, मार्गदर्शन करताना, बळ देताना आमच्या मनगटात अदृश्य कडी घातली. जोर दिला. जगण्याची उमेद दिली, सैरभैर होण्यापासून वाचवलं ! आजही आमच्या आजूबाजूला ते कुठंतरी आहेत, हा विश्वास वाटतो.

शरीर थकत गेलं वयोमानानुसार ! त्यात डायबेटीस, बी.पी. ! रोज जेवणापूर्वी इन्शुलीनचं इंजेक्शन घ्यावं लागे. या

वयात माणसं एवढी त्रस्त आणि चिडचिडी झालेली मी पाहिली आहेत. भाऊ शांत ! शरीराला छळणाऱ्या व्याधी कधी चेहऱ्यावर दिसल्या नाहीत. वागणं पूर्वीसारखंच आर्जवी ! मी जेवायला येतोय म्हटल्यावर वेळेचं पथ्य असूनही माझ्याकरता दीड–दोन वाजेपर्यंत थांबत ! 'मामा आला ग' म्हणत ताईला वर्दी देतानाचा त्यांचा तो कापरा स्वर अजून आठवतो. मग चौकशी ! समोर एवढं मोठं व्यक्तिमत्त्व आहे, त्याच्याकडे ज्ञान आहे, बरीच माहिती आहे ती विचारायला हवी असं वाटे ! पण त्यांना बोलताना होणारा त्रास पाहवत नसे. मग जुन्या आठवणी उजळल्या जात. रणजित देसाईंनी मांडीवर डोकं ठेवून औरंगाबादपर्यंत कारनं कसा प्रवास केला ते ऐकायला मिळायचं ! पास होण्याची अजिबात आशा नसताना, बी.ए. फायनलची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर, ओंजळीनं भरभरून पेढे कसे वाटले हे दृश्य डोळ्यासमोर उभं राहायचं ! दम लागला की थोडा विश्राम ! रमणबागेतल्या मुख्याध्यापकांच्या बंगल्यात, अटलबिहारी वाजपेयी, विजयाराजे शिंदे, पु. ल. देशपांडे यांच्याशी काय बोलणं झालं असेल, 'ज्ञानिया' बंगल्यात बाळासाहेब देवरसांबरोबर कुठल्या विषयावर चर्चा झाली असेल ते मी अनेकदा कल्पना करून पाहिलं. तेवढं विचारायचं राहून गेलं. मग थोडं ताईशी बोलावं लागे. तिला पार्ल्यातल्या गोष्टीत रस ! 'दीक्षितीण बाईंकडे आत्ता कोण असतं' 'अण्णा साठे आहेत का रे' 'बागेच्या शेजारी चिक्केसरांचा बंगला होता – नलू शिनाड रहायची तिथे' म्हणत पार्ल्याच्या गल्लीबोळात हिंडणं होई. तेव्हा कान देऊन भाऊ आमची बोलणी ऐकत असतं. निघण्याची वेळ झाली की वाईट वाटे दोघांना – दारापर्यंत पोचवायला येत !

मग माझंही येणं कमी होत गेलं ! मुलगा, सून, जावई, मुली त्यांच्या सेवेत खंड पडू देत नव्हती. जे भाऊंनी केलं इतरांसाठी ते त्यांना परत मिळत होतं. त्यांच्या डॉक्टर विद्यार्थ्यांचे चौकशीचे फोन येत. डॉ. अशोक कुकडे अधूनमधून फेरी मारून प्रकृती पाहून जात. पुढे मग स्मृती अंधुक होत गेली. बोलणं थांबलं ! संपन्न जीवन जगलेलं, नवीन जग उभं केलेलं हे आयुष्य होता होईल तेवढं पाहून घेत होतो, डोळ्यात साठवत होतो.

बुधवारी सकाळी फोन आला. लगेच निघालो. जाताना रस्त्यात भाऊंची कितीतरी रूपे आठवत होती. नवीन मराठीच्या प्रांगणांतील चाफ्याची फुले आकडीने काढणारे भाऊ, प्रमुख पाहुणे म्हणून सभेला निघालेले भाऊ, 'स्व'–रूपवर्धिनी स्वतः हिंडून दाखवणारे, ताईबरोबर कधीतरी फिरायला बाहेर पडलेले– अनेक रूपे ! डोळ्यात टचूकन पाणी आलं – तांब्यांची कविता आठवली –

'भरोत भरतील नेत्र जरि रे, कळ पळभर मात्र खरे घर ते !'

भाऊंच्या पुण्यस्मृतीस शतशः प्रणाम !

– मो. ९८२०४०२८३९

❖❖❖

भाऊ, एक शिक्षक म्हणून – शिक्षणतज्ज्ञ म्हणून तुम्ही केलेले प्रयोग–विचार ऐकत असताना एखाद्याची मूस किती समृद्ध असू शकते याचा वारंवार प्रत्यय येत गेला.

**– सौ. अनघा**

सामाजिक कार्यकर्त्याने पैशांच्या काटेकोर हिशोबाबरोबरच हिशोब ठेवला पाहिजे वेळेचा अशी सातत्याने आठवण आपल्या दिनक्रमातून देणाऱ्या भाऊंची कामाची तळमळ आठवते.

**– शोभना भिडे – जोगळेकर**

# विचारांना योग्य दिशा देणारे माझे आजोबा

**– आलोक भागवत**

ती. भाऊंच्या स्मरणिकेसाठी काही लिहायला नुसती सुरुवात केली आणि एकदम पोटात गोळा आला. आपल्या जिव्हाळ्याचे कोणी 'आहे' आणि 'नाही' यांमध्ये इतका 'जिवघेणा' फरक असू शकतो हे अशा प्रसंगी खूप प्रकर्षाने जाणवते. कुठेतरी आपलीच मुळे थोडीशी सैल झाल्यासारखी भासतात आणि डोळे कधी पाणावतात कळतही नाही. भाऊ गेले याला आता एक वर्ष झाले. खरे तर शेवटचे काही दिवस भाऊंना शुद्ध होती, पण समज कमी झाली होती. पण भौतिकार्थाने ते तेव्हा 'होते' आणि आज 'नाहीत', हा फरक 'ज्ञानिया'मध्ये दर वेळेस गेलो की तीव्रतेने जाणवतो आणि थोडेसे अस्वस्थ करून जातो. पण विचार केला तर हेही तितकेच खरे आहे की अशा दुबळ्या क्षणांशिवाय रोजच्या दैनंदिनीमध्ये असे अनेक क्षण येतात जेव्हा भाऊंच्या आठवणींची, शिकवणींची सतत सोबत असते.

खरे तर 'भाऊ' हे संबोधन कोणा समवयस्क व्यक्तीसाठी वापरावे असे आहे. सर्वसामान्यांनी त्यांना 'भाऊ' म्हणून संबोधावे असे त्यांचे वय पण नव्हते आणि व्यक्तिमत्त्व पण. उंच शरीर, सावळा वर्ण, सतेज चेहरा, वागण्या-बोलण्यात सहज जाणवेल असा कमालीचा शिस्तबद्ध स्वभाव आणि कोणा ऋषीमुनींना शोभेल असे भाषेवर प्रभुत्व. पण यांच्यामागे दडलेला कष्टाळू, निश्चल, प्रेमळ 'माणूस' सर्वांनाच इतका आपला वाटत असे की सर्वच जण हक्काने त्यांना 'भाऊ' म्हणून हाक मारत... अगदी आम्ही नातवंडेसुद्धा !

रमणबाग असो किंवा पद्मावती, लहानपणापासूनच नशिबाने मला आणि वेदांगला कधी 'मामाच्या गावाला' जायला 'अगीनगाडी'ची गरज पडली नाही. आजी-भाऊंचे घर कायमच हाकेच्या अंतरावर होते आणि त्यामुळे त्यांचा खूप सहवासही लाभला. आई सांगते की मी अगदी तान्हा होतो तेव्हा रात्री झोपवायला मला भाऊच लागायचे. काही कामानिमित्त कधी भाऊंना घरी यायला उशीर झाला तर मी जागा राहत असे. लहान बाळांना हातावर अलगद झुलवून झोपवायची भाऊंची एक विशिष्ट पद्धत होती. भाऊ तसे झोपवेपर्यंत मी झोपतच नसे, आधी यावर विश्वास बसायचा नाही. पण नंतर जेव्हा पाहिले की छोट्या ईशाचे भाऊंशिवाय पान हालत नसे तेव्हा मात्र खात्री पटली की आई म्हणते तसेच माझ्या बाबतीतही होत असणार.

**भाऊंच्या आठवणींमध्ये कायम अग्रेसर राहील तो भाऊंच्या स्वभावातला साधेपणा. विचार साधे, पण किती श्रीमंत होते... सोपे मात्र अजिबात नव्हते !** भाऊंची अनेक वक्तृत्वं ऐकली, लिखाण वाचले... आश्चर्य वाटते की इतक्या विविध विषयांवर इतक्या प्रभुत्वाने कोणी कसं लिहू आणि बोलू शकले असेल ? आणि ते बोलणे म्हणजे नुसते भाषण नव्हे तर उदाहरणासकट स्पष्टीकरण आणि सोप्या भाषेत केलेली मुद्देसूद मांडणी असायची. म्हणून भाऊ बोलायचे तेव्हा ऐकत रहावेसे वाटायचे. **भारतीय संस्कृती, रूढी-परंपरा, सण, इतिहास, राजनीती, व्यक्तिमत्त्व विकास... यासारख्या असंख्य विषयांवर भाऊ बोलत, लिहीत ! त्यात त्यांचा फक्त अभ्यासच नव्हे तर चिंतन, आकलन आणि अनुसरण देखील जाणवायचे. जितके विचार समग्र तितकेच कर्तृत्व... शिक्षण, देशसेवा, संघ, कला, संस्कृती, संघटन... अशा वैविध्यपूर्ण क्षेत्रांत काम करून आपला ठसा उमटवणं हे सामान्य माणसाला एका जीवनप्रवासात अवघड आहे.**

**भाऊंकडून प्रत्येकाने शिकावे असे म्हणजे त्यांची माणसे जोडण्याची वृत्ती. आयुष्यभर भाऊंनी हजारो माणसे जोडली, त्यांच्या भल्यासाठी निरपेक्ष भावनेने भाऊंनी खूप काही केले.** कोणाला जाणूनबुजून दुखावतील असा त्यांचा स्वभावच नव्हता. उलट त्यांना कोणी दुखावले असेल तर त्या व्यक्तीस माफ करून जवळ केल्याची अनेक उदाहरणे आहेत. आजी-भाऊ दोघांनीही अनेक कठीण प्रसंगांना सक्षमपणे तोंड दिले. एकामागून एक परीक्षा येत गेल्या... अगदी माझ्या आठवणीत सांगायचे झाले तर भाऊंचा heart-attack, नंतरची अनेक दुखणी, आजीची आजारपणे, मामाचा अपघात, अनीशच्या जन्माच्या वेळेसची complications... पण या सगळ्यांमध्ये ज्या प्रमाणात

लोक पाठीशी उभे राहिले ते भाऊंच्या याच माणसे जोडण्याच्या वृत्तीमुळे ! आयुष्यभर भाऊंचे हात कायम 'द्यायलाच' पुढे झाले, घ्यायला कधीच नव्हे...

**भाऊंचा अजून एक स्वभावविशेष म्हणजे ते जे काही सांगत, शिकवत ते-ते सर्व भाऊ कायम स्वतः जगत होते. भाऊ जेव्हा रोजच्या दैनंदिनीमधले संस्कार शिकवत तेव्हा त्यांची स्वतःची रोजची यथासांग देवपूजा कधी चुकली नाही.** ज्या सणांबद्दल भाऊ कार्यक्रमांतून बोलत ते साजरे करायचा त्यांनी कधीच कंटाळा केला नाही. दसरा, दिवाळी, गौरी-गणपती पासून चैत्रगौर, नवरात्र, श्रावणातील मेहूण, अधिकमासाचे वाण सगळे तितक्याच तन्मयतेने मनापासून भाऊ दरवर्षी साजरे करत आले, अगदी शेवट-शेवटपर्यंत. **भाऊ जेव्हा कष्टाचे आणि संयमाचे महत्त्व सांगत तेव्हा ते ऐन सत्तरीमध्येसुद्धा रिक्षाने प्रवास करायची मौज न करता बसने प्रवास करत.**

**भाऊंचा संयम किती पराकोटीचा होता त्याची एक आठवण विसरणं अशक्य आहे.** भाऊंची पंचाहत्तरी झाली तेव्हा मी हैदराबादमध्ये राहात होतो. त्या सुमारास एक भाबडी इच्छा होती की नन्नी (बाबांची आई) आणि आजी-भाऊंचा हैदराबादला दौरा व्हावा, त्यांना विमान प्रवास घडावा, त्यांना श्रीशैल्य आणि तिरुपतीचे दर्शन व्हावे. उत्साहाच्या भरात त्यांच्या बरोबर भारती काकू-आजी आणि निमा आत्या-आजी यांनाही बरोबर येण्याचा आग्रह केला. सर्व काही ठरले. सगळे हैदराबादला आले. तिरुपती यात्रा, बालाजीचे दर्शन सुखरूप पार पडले आणि मग अकल्पित असे काहीतरी घडले. आम्ही रामोजी फिल्मसिटी बघायला निघालेलो असताना वाटेत आजीला त्रास झाला आणि तीव्र heart attack आला. देवाची कृपा आणि आजी-भाऊंची पुण्याई म्हणून वेळेत मदत मिळाली आणि आजीची तब्येत काही तासांनंतर स्थिर झाली. हे सगळे घडले तेव्हा भाऊ मात्र घरी होते आणि त्यांना याची काहीच कल्पना नव्हती. आई-बाबा आणि मामा तातडीने हैदराबादला आले आणि मग संध्याकाळी घरी गेलो तेव्हा भाऊंना सगळ्या घटना समजल्या. त्यांनी ते सर्व मोठ्या धीराने स्वीकारले. **मामा आणि आई-बाबांचे बोलणे झाले आणि असे ठरले की बाबा सर्व वयस्क लोकांना घेऊन पुण्याला घरी परत जातील आणि आई, मावशी आणि मामा आजीची प्रकृती प्रवास करण्याइतपत सुधारेपर्यंत हैदराबादलाच राहतील. यामध्ये भाऊंच्या मनाची काय घालमेल झाली असेल याचा विचार करणे अवघड आहे. त्यांना खूप वाटत असणार की आजीची प्रकृती सुधारत असताना तिच्या जवळ असावे. परंतु त्यांनी सारासार विचार केला आणि 'आपल्यामुळे इथे अजून काळजी नको' म्हणून या निर्णयाला लगेच संमती दिली.** निघायच्या आधी एकदा आजीला भेटायची इच्छा त्यांनी व्यक्त केली. **आजीला भेटून त्यांनी सांगितले की आता आपण पुण्याला भेटू ! भाऊंचा दाटलेला आवाज अजून आठवतो.** पण सर्वांचीच सोय लक्षात घेऊन त्यांनी पुण्याला जाण्याची तयारी दाखवली. **आजी हॉस्पिटलमध्ये असताना असे करताना भाऊंनी मनावर किती मोठा दगड ठेवला असेल !**

अशा आठवणीच लिहायच्या झाल्या तर लाखो आहेत. खरे तर आपण कोणीही भाऊंच्या आठवणी लिहायला बसलो तर अशी एक-एक अख्खी स्मरणिका प्रत्येकजण लिहू शकतो. एक आदर्श शिक्षक म्हणून, संघाचे तसेच अनेक संस्थांचे कार्यकर्ते म्हणून अनेकांच्या आयुष्यांवर भाऊंकडून झालेल्या सखोल परिणामांची अनेक उदाहरणे या स्मरणिकेमध्ये आढळतीलच. परंतु एक व्यक्ती म्हणून, एक कुटुंबप्रमुख म्हणून, 'आजोबा' म्हणून भाऊ किती साधे होते आणि त्यांच्या साध्या आणि सोप्या शिकवणींची दोन पिढ्यांपलीकडल्या नातवंडांवरही किती खोल छाप आहे याच्या दोनच ठराविक आठवणी जरूर सांगाव्याश्या वाटतात.

रोजच्या धकाधकीमध्ये मोठ्या वाटणाऱ्या गोष्टींच्या मागे धावताना आपण छोटे-छोटे पण मूलभूत आनंद कसे विसरतो ते भाऊंनी एका प्रसंगी पटवून दिले होते. सुमारे १०-११ वर्षांपूर्वीची घटना आहे. तेव्हा मी नुकताच MBA पूर्ण करून पुण्याला आलो होतो आणि आमच्या घराच्या नूतनीकरणाचे काम चालू असल्याकारणाने आम्ही काही महिने आजी-भाऊंकडे राहात होतो. तेव्हा मी Mutual Funds मध्ये काही किरकोळ गुंतवणूक करत असे. त्याबद्दल एक दिवस

भाऊंनी कुतूहलाने विचारले, 'काय असतं रे हे Mutual Fund'. आपल्या आजोबांना काहीतरी समजावण्याची दुर्मीळ संधी मिळतेय हा विचार करून नवा-नवा MBA उत्साहात आला. मग तांत्रिक terminology टाळून जमेल तितक्या सोप्या शब्दात stock market म्हणजे काय, securities काय असतात, Mutual Fund म्हणजे काय... या विषयावर गप्पा रंगल्या.

भाऊ : 'किती ही तांत्रिक शब्दांत मांडून दाखव. पण सोप्या भाषेत शेवटी सट्टाच ना हा ?'

मी : 'असं कसं म्हणता भाऊ, गुंतवणूक हे आता सर्वमान्य शास्त्र आहे...'

भाऊ : 'मला सांग, तू आज तुझ्या कष्टाचे पैसे गुंतवतो आहेस. उद्या तुलाच गरज पडली आणि तेव्हा नेमकं तुमचं market down असेल तर काय करायचं'

मी : 'भाऊ, ती risk तर आहे, पण risk आहे म्हणूनच जास्त returns मिळतात ना'

भाऊ : 'आणि **ते थोडेसे जास्त returns मिळवण्यासाठी तू सतत हा खेळ खेळत राहणार ? market वर जातंय का खाली येतंय हे तहान-भूक-झोप विसरून बघत राहणार ? कशासाठी ? थोडेसे जास्त returns मिळतात म्हणून ? अरे, त्यापेक्षा जास्त विधायक कामं आहेत ना करायला ? इतर काही नाही तर हा वेळ स्वत:साठी, आई-वडिलांसाठी का नाही देत ? आणि असे किती 'returns' मिळेल की तू थांबशील ?**'

मी : 'पण या returns चा पुढे जाऊन सगळ्यांनाच उपयोग होणार आहे ना ? आणि हे काही बेकायदेशीर नाही! पुढे जाऊन काही कमी पडू नये म्हणून ही तरतूद नाही का ? आणि त्यासाठी जास्तीत-जास्त returns मिळाले पाहिजेत असा विचार केला तर काय चुकले...'

भाऊ : 'तरतूद वगैरेची काळजी करण्यापेक्षा गरजांना थोडी शिस्त लावणं जास्त बरोबर नाही का रे ? माझं उदाहरण घे... एका शाळेत कारकून म्हणून कामाला सुरुवात केली आणि हळूहळू कष्टाने, संयमाने अनेक शिक्षण-संस्थांमध्ये वेगवेगळ्या स्तरांवर काम केले. घर बांधले, तीन मुलांना मोठे केले, त्यांना योग्य ते शिक्षण दिले, सक्षम बनवले आणि या सगळ्यानंतर मी निवृत्त झालो असलो तरी त्यांना गरज पडली तर तिघांचीही घरं चालवायला हातभार लावू शकतो इतकी योग्य गंगाजळी जमवली... आणि हे सगळं कोणत्याही 'returns' च्या मागे ना धावता. माणसांमध्ये गुंतवणूक केली. पैशांची फक्त बचत केली आणि एकदम समाधानी आहे मी. मग आता मला सांग, मला काय कमी पडलं. ...का मी कुठे कमी पडलो'

भाऊंच्या या तर्कावर माझ्याकडे खरे तर काही उत्तर नव्हते पण तरी मी उगाच मुद्दा लढवून धरला, 'भाऊ, तुमचा काळ वेगळा होता, आज स्पर्धा खूप आहे आणि गरजासुद्धा वाढल्या आहेत.'

भाऊंचे विचार मात्र ठाम होते, 'आता मला सांग तुझ्या अशा गरजा काय आहेत ? आजच्या असं नाही, पुढच्या अनेक वर्षांचा विचार करून सांग...'

मी आपली जुजबी यादी केली, 'घर, गाडी, भटकंती, चैनीच्या आणखी काही गोष्टी...'

भाऊ : 'तुला चांगली नोकरी आहे. तुला मिळतो तो पगार नीट नियोजन करून वापरलास तर हे सगळं काही वर्षांतच मिळवणं तुला शक्य नाही का ? मग अजून 'returns' साठी आपलं मानसिक स्वास्थ्य का घालवायचं ? ...बरं ते जाऊ देत, तू ही यादी केलीस आयुष्यात काय-काय मिळवायचं आहे त्याची. सगळं-सगळं मिळवायला किती पैसे जमवावे लागतील ?'

मी पुन्हा अंदाजे काही एक आकडा सांगितला असावा...

भाऊ : 'समजा ते सगळे पैसे तुला मिळाले आणि वर अजून काही लाख रुपये मी तुला दिले तर तू त्या वरच्या पैशांचा उपभोग कसा घेशील ?'

ज्या गोष्टींचे खरेच स्वप्न होते त्यांची यादी तर आधीच केली होती, मग आता आणखी काही पैसे मिळाले तर कसे

खर्च करावे हा विचार मी करायला लागलो आणि त्यात काही सेकंद गेली असतील.

भाऊ पटकन म्हणाले, 'इतका विचार करावा लागतो आहे तुला, याचाच अर्थ तुला यापेक्षा जास्त कशाची खरी गरज नाही. ती गरज तू ओढून-ताणून निर्माण करू पाहतो आहेस आणि ज्याची खरी गरज नाही त्याची तरतूद करण्यासाठी 'returns' ची संपूर्ण शाश्वती नसताना, risk घेऊन तू गुंतवणूक करणार आणि त्याची काळजी करत मनाची शांतता कमी करणार... कितपत योग्य आहे तूच ठरव. तू काय करावंस हे मी नाही सांगणार, ते तूच ठरवायचंस. पण काय करतो आहेस आणि का करतो आहेस याचं योग्य चिंतन करावंस आणि मग पावलं उचलावीस इतकंच माझं सांगणं आहे!'

**'काय करतो आहे आणि का करतो आहे'... हा प्रश्न तेव्हापासून वेळोवेळी मी स्वतःला विचारतो आणि मिळालेल्या उत्तरांना अनुसरून पुढची पावले उचलतो... ही भाऊंचीच शिकवण !**

विचारांची दिशा पूर्णपणे बदलणारा, किंबहुना असे म्हणूया की विचारांना योग्य दिशा देणारा अजून एक प्रसंग...

माझ्या लग्नानंतर दोन वर्षांत प्रज्ञा आणि मी, नोकरीसाठी हैदराबादला स्थलांतर केले. खरे तर हैदराबाद, शहर म्हणून नवे किंवा अपरिचित नव्हते. या आधीही काही वर्षे तिथे राहिलो होतो. त्यामुळे काही दिवसांतच भाड्याची एक छोटी जागा घेऊन नित्यक्रम सुरू झाला. काही दिवसांनी, एक शनिवार-रविवार पुण्याला येण्याचा योग आला आणि सवयीप्रमाणे मी आणि प्रज्ञा दोघे आजी-भाऊंना भेटायला गेलो. गप्पांमध्ये आजीने हैदराबादची विचारपूस केली...

'घर किती मोठे घेतलेत ?'

'किती खोल्या आहेत ?'

'ऑफिस किती लांब आहेत दोघांची ?'

'भाजी-मंडई, किराणा दुकान जवळ आहे ना ?'

'घरकाम, साफ-सफाई करायला कोणी मिळाले का ?'

अशा अनेक गोष्टी जाणून घ्यायची आजीला उत्सुकता होती.

भाऊ मात्र शेजारी बसून शांत ऐकत होते आणि हसत होते. आजीच्या प्रश्नांचा वेग कमी होताच हळूच भाऊ म्हणाले, 'हे तुझ्या आजीचे प्रश्न झाले, आता आजोबांचे प्रश्न विचारू का ?' आपल्या पुढे काय येणार आहे याचा काहीच अंदाज नव्हता, म्हणून सहज म्हणालो, 'विचारा की, त्यात काय'...

हळुवार पण खंबीर आवाजात भाऊंनी विचारले...

'लग्नानंतर प्रथमच घरटं जमवताय, कसं वाटतंय...'

**'दिवसभर काम करून थकवा आला, की संध्याकाळी घरी यावंसं वाटतं का...'**

**'घरी कोणी असेल म्हणून नव्हे, पण घरी कोणी नसले तरी तिन्हीसांजेला घराची ओढ लागते का...'**

**'सुट्टी असली तरी आज कुठे जायला नको, काम नको... मित्रमंडळी नकोत... घरीच थांबू... असं किती वेळा वाटतं...'**

**'घरात रात्री शांत झोप लागते का...' चार-पाच प्रश्न विचारून भाऊ थांबले. मी आणि प्रज्ञा मात्र निःशब्द होऊन एकमेकांकडे बघत होतो.** भाऊंच्या प्रश्नांचे उत्तर 'नाही' होते असे नाही. **खरे सांगायचे तर त्या प्रश्नांची सहज उत्तरेच आमच्याकडे नव्हती. कारण रोजच्या धावपळीमध्ये मुद्दाम वेळ काढून असा कधी विचारच केला नव्हता.** आजीच्या सोप्या, प्रेमळ प्रश्नांच्या नंतर **भाऊंच्या या मार्मिक प्रश्नांनी तो विचार करायला भाग पाडले.** त्या दिवशी भाऊंनी मुद्दा जास्त ताणला नाही आणि लगेचच विषय बदलला. पण राहत्या जागेमध्ये मधे, खोलीमध्ये ...नव्हे, चार भिंतींमध्ये आपले 'घर' कसे शोधावे, हे कुठलाही गहन आणि जड उपदेश न करता, फक्त चार-पाच सोपे (?) प्रश्न विचारून भाऊंनी लीलया शिकवून दिले होते.

आज साता समुद्रांपलीकडे एक छोटे घर घेऊ पाहतो आहे. परवा गंमतीत एक विचार येऊन गेला की इतर कोणाच्याही आधी भाऊंच्या नजरेने आपले घर बघितले आहे ! कारण घर निवडले ते भाऊंचे सर्व निकष लावूनच! 'शांत झोप लागते का' ...आपल्या घराची पारख आता या जन्मी तरी चुकणे अवघड आहे !

भौतिकार्थाने भाऊ आज आपल्यामध्ये नाहीत हे स्वीकारणे जरी थोडे जड जात असले तरी त्यांचे विचार आणि शिकवण अशा छोट्या-छोट्या प्रसंगांमधून आपल्यामध्ये निरंतर जिवंत राहणार, समर्पक राहणार, संबद्ध राहणार... यात काहीच शंका नाही.

– मो. : ८००८२७८९५१

❖❖❖

## शिक्षकेतरांचे आधारवड

**– विनायक कुलकर्णी**

१९७८ साली स्थापन झालेल्या शिक्षकेतर पतपेढीचे कार्यालय प्रथम नू. म. वि. हायस्कूल या शाळेत सुरू झाले. पुढील वर्षी हे कार्यालय अशोक विद्यालय, टिळक रोड या शाळेत सुरू झाले.

सभासदांच्या संख्येत वाढ व शाळेत येणारी वर्दळ तसेच लहान शाळा म्हणून अशोक विद्यालय याची जागा कमी पडू लागली. नुकतीच पतपेढीची स्थापना झाल्याने, शिक्षकेतर पतपेढीला भाड्याची किंवा स्वतःची जागा घेणे शक्य नसल्याने शाळा-शाळातूनच शिक्षकेतर पतपेढीचे कार्यालय सुरू होते. वाढणारी सभासदांची वर्दळ त्यामुळे पुन्हा दुसरी शाळा निवडण्याची परिस्थिती निर्माण झाली.

त्यावेळी न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग हायस्कूलचे मुख्याध्यापक राजाभाऊ लवळेकर होते. तसेच त्याच शाळेतील नाईक श्री. माधवराव गोगावले हे शिक्षकेतर पतपेढीचे अध्यक्ष होते. श्री. माधवराव गोगावले यांनी राजाभाऊ लवळेकर यांची भेट घेऊन शिक्षकेतर पतपेढीला किमान ३-४ वर्ष कार्यालयासाठी तात्पुरती जागा मिळावी अशी विनंती केली. त्यांनीही अगदी आत्मीयतेने संस्थेची परवानगी मिळवून 'तुम्हाला कार्यालयासाठी जागा देण्याचा प्रयत्न करतो' असे आश्वासन दिले.

एक संस्था दुसऱ्या संस्थेला जागा कशी देऊ शकेल असा प्रश्न संस्थेपुढे होता. परंतु माननीय मा. राजाभाऊ लवळेकर सरांनी ही पतपेढी शिक्षकेतरांची म्हणजेच शिपाई सेवकांसाठी असल्याने, तसेच ही पतपेढी स्थापन होऊन दोन तीन वर्षच झाली असल्याने ह्यांना भाड्याने किंवा स्वतःची जागा घेणे तूर्त शक्य होणारे नाही, अशा पद्धतीने संस्थेत आपला विचार मांडून शिक्षकेतर पतपेढीला न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग या शाळेत पतपेढीचे कार्यालय चालविण्यास परवानगी मिळाली.

कार्यालयासाठी जागा मिळणार होती पण ती कुठे आणि कशी या संभ्रमात होतो. कारण कार्यालय आले म्हणजे वर्दळ आलीच आणि ह्या वर्दळीमुळे शाळेत कोणत्याही प्रकारची अडचण येऊ नये म्हणून शाळेच्या आवारातच पण इमारतीपासून थोडे दूर एक पत्र्याची टपरी होती. त्या टपरीत सर्व अडगळीचे सामान होते. ते सर्व बाजूला करून दुरुस्ती करून लाईट व्यवस्थेसह शिक्षकेतर पतपेढीचे कार्यालय सुरू झाले. त्यांनी योग्य वेळी दिलेला आधार शिक्षकेतर कधीच विसरू शकणार नाहीत.

❖❖❖

# ‘‘माणसं जोडणारा माणूस’’

**– सदानंद चांदेकर**

‘हेमाचे’ (माझ्या मिसेस) मामा. श्री. राजाभाऊ लवळेकर ह्यांचा दबदबा मी हेमाच्याच तोंडून बऱ्याचवेळा ऐकला होता. रमणबाग न्यू इंग्लिश स्कूलचे हेडमास्तर म्हणून तर खूपच. आज त्यांच्या घरी जाण्याचा पहिलाच प्रसंग. कारण लग्न होऊन चार पाचच दिवस झाले होते. शाळेच्याच आवारात ते रहात होते. त्यांच्या घरी त्यांचे जावई व इतर नातलगही भरपूर आले होते.

मी कॉमेडीयन, नोकरी नाही, एका रुममध्येच राहणारा ह्या सर्व गोष्टी त्यांना माहीत होत्या. त्यामुळे त्यांच्या सर्व नातेवाईकांमध्ये जाण्यासंबंधी माझ्या मनात थोडा न्यूनगंडच होता. कारण त्यांच्याकडे सगळ्यांचेच बंगले होते.

सर्व घरात आनंदी उत्साही वातावरण. एक जावई भीमसेनजींची रागदारी गाऊन दाखवतोय, त्यांचा नातू ‘जाणता राजा’ ह्या भव्य नाट्यातले प्रसंग सांगतोय, राजाभाऊंच्या बहिणी भावगीते गातायेत. प्रत्येक जण आपली कला पेश करतोय. कलाकारांच्याच घरात आल्याचा आनंद मिळाला आणि माझा न्यूनगंड गेला.

हेमाच्या ह्याच मामांच्या सांगण्यावरून हेमाच्या वडिलांनी मला हेमाशी लग्न करायला परवानगी दिली होती. माझ्या परिस्थितीमुळे त्यांची मान्यता मिळेल की नाही ह्या शंकेतच मी खरं तर होतो. त्यांच्या ह्या ‘सधनतेच्या’ विश्वात माझ्याशी (हेमाला) लग्नाला कशी परवानगी दिली ? ही रुखरुख मला होतीच.

मामा मोकळेपणाने गप्पा मारणारे होते. आज आलोच आहोत तर ह्या विषयावर बोलावे म्हणून ‘‘हेमाला (त्यांच्या भाचीला) मला देताना माझ्याबद्दल आपण कोणता विचार केला ?’’ मी.

**‘मी जेव्हा तुम्हाला पहायला आलो, तेव्हा तुम्ही जी मला उत्तरं दिली त्यात सडेतोडपणा होता, तुमच्या उत्तरातूनच उत्कृष्ट विनोदवीर दिसत होता. आपल्यासारख्या कलाकारावर हेमा खूष झाली आणि हेमाही थोडी कलाकार असल्याने तुमची जोडी मला योग्य वाटली’** राजाभाऊ.

**‘‘मी शाळेत नुसतं शिकवत नाही विद्यार्थ्यांना घडविण्याचाही प्रयत्न करत असतो. प्रत्येक विद्यार्थ्याचं पुढचं आयुष्य चांगलं कसं जाईल ह्याचं मार्गदर्शन करतो. विद्यार्थ्याच्या आहे त्या बुद्धीत, त्याच्या कोणत्या आनंदात त्याला काम करता येईल ह्याच पद्धतीनं मार्गदर्शन करतो.** माझ्या दोन्ही मुलींचे जावई काय पैसेवाले होते ? दोघेही पूर्वी एका रुममध्येच रहात होते.’’

‘वडिलोपार्जित’ ह्या शब्दात जावई नव्हते. हेमीच्या बाबतीतसुद्धा तोच विचार मी केला. म्हणजेच तुमच्या बाबतीत. **मी जर विद्यार्थ्यांना मोठे व्हा, ध्येयवादी बना, समाजाला काही तरी द्या, समाजाकरता काहीतरी करा असं सांगत असेल किंवा शिकवत असेल तर मग आमच्या मुली आपल्यासारख्या ध्येयवादी मुलांच्या घरात का देऊ नयेत? ज्याच्या जगण्याला काही उद्दिष्ट आहेत त्याला काहीच कमी पडत नसतं.** माझ्या उद्दिष्टाला साथ केली ती मामीनं (कुसुममामी) मी समाजकार्याला वाहून घेतलं, ती घरच्या जबाबदाऱ्या छान पार पाडली, तसंच तुमचं होणार आहे, तुम्ही तुमच्या कलेत मग्न, असल्यावर हेमा घरच्या जबाबदाऱ्या सांभाळणार हे सत्य नाही का ?’’ राजाभाऊ. मामांच्या घरातून निघताना आम्ही दोघं मामामामींच्या पाया पडलो. ह्यावेळेस पाया पडताना माझे डोळे ओलावले. भाऊ मामा किती विचारी आहेत ? त्यांच्या ह्या वाक्यानं माझ्यातला न्यूनगंड गेला. **संतांच्या विचारात आणि मामांच्या विचारात काहीच फरक नव्हता. अप्रत्यक्षरित्या फार मोठी शक्ती मामांनी मला दिली. काहीही जवळ नसताना, उभं करण्यातच मजा असते.** भाऊमामांना काय म्हणावं ? मानसशास्त्रज्ञ ? उत्कृष्ट शिक्षक? कार्यकर्ता ? हेमाच्या घरातला मोठा ‘मामा’ ? माझे सासरे ?

नाही – तर, **‘माणसं ओळखणारा’ व प्रेमानं ‘‘माणसं जोडणारा माणूस.’’**

– मो. : ९४२२०३७९८०



# कार्यकर्ता, कुशल संघटक, मार्गदर्शक
# आणि
# पालक भूमिकेतील राजाभाऊ

# प.पू.डॉ. हेडगेवारांना अभिप्रेत असलेला आदर्श स्वयंसेवक

**– डॉ.अशोक कुकडे**

भाऊंविषयी आठवणी तशा अनेक आहेत. त्यातील काही निवडक आठवणींचा धांडोळा–ज्यातून भाऊ व्यक्ती म्हणून मला उमगले त्यांचा मी इथे घेतला आहे. मी १९५२ साली कसब्यातून नारायण पेठेत राहायला आलो. माझी प्रल्हाद शाखा हसबनिसांच्या बखळीत भरे. या शाखेत मी शाखास्तरावर काही पदे भूषवली. त्यावेळी भाऊ जवळच राहात असल्याने क्वचित त्यांच्या घरी शाखेच्या कामानिमित्त येणे जाणे होई. पण वयातले नऊ वर्षांचे अंतर आणि संघातील त्यांची वरिष्ठता त्यामुळे एकमेकांशी नातं हे केवळ 'परिचित' असंच होते.

पुढे विवेकानंद हॉस्पिटलमुळे माझे कार्यक्षेत्र लातूर झाले आणि राजाभाऊ पुण्यात शिक्षण क्षेत्रात. आम्ही दोघेही संघ कार्यकर्ते असल्याने कर्णोपकर्णी त्यांच्या कामाची माहिती होत असे. काही बैठकांनिमित्त भेटही होत असे. पण गाढ मैत्री अशी काही नव्हती. भाऊंनी शिक्षण क्षेत्रात क्लार्क म्हणून सुरुवात केली, पण पुढे शिक्षक, प्रिन्सिपाल आणि संस्था विश्वस्त अशी प्रगती केली. सेवानिवृत्त झाल्यावर बसून न राहाता त्यांनी आपलं लक्ष शिक्षण व समाजकार्यावर केंद्रित केले आणि निवृत्तीनंतर त्यांच्या कार्यास आणखीनच बहर आला. त्यांच्या कामाच्या कक्षा अधिक रुंदावल्या. लोकसंग्रह देखील प्रचंड वाढला आणि माझा त्यांच्याविषयी आदरभाव वाढू लागला.

माझी कन्या चि.अनघा उपवर झाल्यावर यशवंतराव लेल्यांनी राजाभाऊंचे चिरंजीव प्रसादचा प्रस्ताव सुचवला. राजाभाऊ लवळेकरांचे चिरंजीव म्हटल्यावर मी लगेच हो म्हटले. माझ्या दृष्टीने त्यात विचार तो काय करायचा? प्रसाद संघप्रचारक म्हणून अहमदनगर आणि संभाजीनगर (पूर्वीचे औरंगाबाद) इथे काम करू लागला, तेव्हा योगायोगाने मी व प्रसादने एकदा एकत्र प्रवास केला होता. या प्रवासात परिचय झाला आणि भाऊंविषयीच्या पूर्व आठवणींची देवाण-घेवाण झाली होती. पुढे यशवंतरावांनी मला अनघा-प्रसादच्या विवाहाचा प्रस्ताव दिला तसा तो भाऊंना देखील दिला. भाऊ म्हणाले 'माझी हरकत नाही, पण डॉ. अशोक कुकडे नावाजलेले शल्यचिकित्सक. मी साधा शिक्षक, शिवाय आर्थिक स्तर देखील वेगळा तर हा नातेसंबध कसा शक्य आहे?' यशवंतराव तो निरोप घेऊन माझ्याकडे आले. मी म्हणालो, 'मी सर्जन डॉक्टर असलो तरी उत्पन्न एखाद्या मुख्याध्यापकाइतकेच आहे आणि दुसरे म्हणजे समजा आर्थिक स्तर वेगळा आहे असे मानले, तरी विचारधन आणि संस्कारधन तर सारखेच आहे. आर्थिक स्तराचा विचार तो काय करायचा?' बहुधा माझे म्हणणे यशवंतरावांनी भाऊंपुढे तसेच्या तसे मांडले असावे. लग्न प्रस्तावाला राजाभाऊंकडून तत्काळ होकार आला. या **लग्नाचे वैशिष्ट्य म्हणजे दोन व्याह्यांनी एकमेकांना प्रथम पसंत केले होते.** मुलांनी अजून एकमेकांना भेटायचेच होते. तरी पण आधुनिक विचारसरणीनुसार दोघांना विचारस्वातंत्र्य होते. दोघांना एकमेकांना भेटण्यास सांगितले आणि मुलांनी एकमेकांच्या संमतीने नात्यावर शिक्कामोर्तब केले. **हे लग्न जुळवताना पत्रिकेतल्या गुणांचा विचार केला नाही तर, प्रत्यक्ष गुणांचा विचार केला गेला.** लग्नाच्या वाटाघाटी असे काही करण्याचा प्रश्नच आला नाही. कार्य सुरळीत पार पडावे यासाठीची चर्चादेखील माझ्या पत्नीनेच केली. मी त्यात नव्हतोच. आता आमची मुले गमतीने म्हणतात आमच्या सासऱ्यांनी एकमेकांना पसंत केले म्हणून आम्ही विवाहबंधनात अडकलो. तर असे हे आमचे व्याही-व्याही नाते तयार झाले. विवाह उत्तम पार पडला. दोन्ही बाजूला संघकार्याचा समान धागा असल्याने लग्नात अनेक समाईक परिचित उपस्थित होते. लग्न विधियुक्त करायचे ठरले तरी दोन्हीकडच्या गुरुजींनी प्रत्येक विधी स-अर्थ करावा याविषयी एकमत होते. दोन्ही कुटुंबांच्या दृष्टीने हा विवाह खऱ्या अर्थाने आनंद सोहळा झाला.

अनघा-प्रसादचा विवाह झाला. त्यानंतर भाऊंनी मला एक सुरेख पत्र लिहिले. त्यात त्यांच्या अनघाविषयीच्या भावना आणि अपेक्षा याचे उत्तम वर्णन केले होते. अतिशय सुंदर व वाचनीय असे हे पत्र मी अजूनही जपून ठेवले आहे. आपल्या समाजात आधीच असे मोकळेपणाने व्यक्त होणे दुर्मीळ आहे. किंबहुना व्यक्त होण्याचा विचार देखील मनाला शिवत नाही तर व्यक्त होणे दूरच. त्यातून सुनेविषयी सासऱ्यांनी असे मोकळेपणाने व्यक्त होणे म्हणजे फारच अवघड. पण

भाऊ फार निरागसतेने त्या पत्रात व्यक्त झाले आहेत. एक म्हणजे आपली एकुलती एक मुलगी सासरी जाणार ही प्रत्येक वधूपित्याची व्यथा असते आणि ती मलाही होतीच, पण भाऊंच्या त्या पत्राने इंग्रजीत ज्याला मला Rest assured असं म्हणता येईल अशी निश्चिंतता दिली होती.

कसोटीचा क्षण विवाह होऊन बरोबर एक महिन्यानी आला. प्रसादला मोठा अपघात झाला. दुचाकी वरून जात असताना एका गाडीने त्याला उडवले. परिस्थिती काहीशी गंभीर होती. त्यातून डॉक्टर या नात्याने मला परिस्थितीचे गांभीर्य जाणवले होते. अपघातानंतरचे आठ-दहा दिवस अत्यंत काळजीचे असणार होते. विलक्षण तणाव होता. मुलीचे लग्न होऊन एकच महिना झालेला त्यात जावयांना झालेला हा गंभीर अपघात. मी एक सर्जन, त्यामुळे वाईटात-वाईट काय होऊ शकते याची कल्पना होतीच. सर्जन असून देखील पिता या नात्याने मी मनातून हबकलोच होतो. पण भाऊ मात्र शांत होते. क्षणभरही विचलित नव्हते. त्याच दरम्यान त्यांच्या पुतणीचे (मंजूश्रीचे) लग्न ठरलेले. तिकडे देखील त्यांचे लक्ष होतेच. त्यांनीच मला, अनघाला आणि इतर सर्वांनाही सावरले. पुढे प्रसादवर शस्त्रक्रिया कराव्या लागल्या त्यातून तो सुखरूप बाहेर पडला. सर्व सुरळीत झाले. **गंभीर परिस्थितीत देखील शांत राहून मला आणि इतरांना त्यांनी धीर दिला.** त्या प्रसंगी कुठेही मुलीचा पायगुण वगैरे अशी चर्चादेखील झाली नाही. त्या काळात आपल्या समाजात अशा प्रकारची चर्चा सहज होत असे. **गंभीर प्रसंगात देखील अविचल राहण्याचा गुण त्यावेळी मला दिसून आला. या प्रसंगात त्यांच्या रूपाने मला वडील भावाचे नाते मिळाल्याची जाणीव झाली.**

लातूरहून पुण्यात बऱ्याच वेळा काही कामानिमित्त माझे येणे होत असे आणि माझा मुक्काम मोतीबागेत असे. राजाभाऊंशी नातेसंबध आल्यावर मोतीबागेत उतरण्यास त्यांनी मला पूर्ण मनाई केली. 'पुण्यात तुमच्या लेकीचे घर असताना मोतीबागेत कशाला ?' तेव्हापासून पुण्यातले त्यांचे घर आम्हा उभयतांचे हक्काचे घर झाले. अर्थात **त्यांच्या घरी मुक्काम म्हणजे भाऊंशी अनेक विषयांवर चर्चा करण्याची संधी असे. राजकारण, समाजकारण, शिक्षण, संघ, आरोग्य अशा अनेक विषयांवर गप्पांची मेजवानी मिळे. पुण्यातला त्यांचा सहवास केवळ आनंददायी नसे तर काहीतरी ज्ञानात भर पडणारा असे.** आमच्यात एक प्रकारचे मैत्रीचे नाते निर्माण झाले होते. वयाची दरी त्यात आड येत नसे.

साधारण २० वर्षांपूर्वी लातूर भागात फार मोठा भूकंप झाला. किल्लारीसारखी अनेक गावेच्या-गावे उद्ध्वस्त झाली. आम्ही कार्यकर्ते मदतीस धावलो. फारच भीषण परिस्थिती होती. अपार वित्त आणि मनुष्यहानी झाली होती. भूकंप पश्चात प्रश्न उभा राहिला तो अनाथ मुलांचा, ज्यांनी आपले आई-वडील गमावले होते. त्यांच्यासाठी लातूरमध्ये जनकल्याण समितीतर्फे एक निवासी शाळा काढायचे ठरले. समितीचा अध्यक्ष या नात्याने ही जबाबदारी माझ्यावर आली. शिक्षण क्षेत्रातील असल्याने अर्थातच राजाभाऊही या उपक्रमात सहभागी होते. निवासी शाळा सुरू करताना बऱ्याच जाणकारांचे मत होते की सरकारी मदतीविना शाळा चालवायची. सरकारी मदत म्हणजे डोकेदुखी अशी सर्वसाधारण भावना. राजाभाऊ त्या मीटिंगला हजर होते. ते तत्काळ म्हणाले, 'का नाही घ्यायची सरकारी मदत? आपण मदत अवश्य घेऊ. शाळा काही श्रीमंत मुलांसाठी नाही तर गरिबांसाठी आहे. पैशाअभावी सेवाकार्य मागे पडता कामा नये. सरकारी मदत मिळण्यासाठी जे काही करावे लागेल ते करूयात. त्यात अवघड काही नाही.' त्यांचा शिक्षणक्षेत्रातला अनुभव आणि आत्मविश्वास त्यावेळी बोलत होता. त्यांनी सरकारी मदतीसाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टीची पूर्तता करण्यास जे लागते त्याची घडी संस्थेत बसवली. संस्था आणि मदत सुरळीत सुरू झाली, जी आज मितीस देखील सुरू आहे. याच शाळेतला दुसरा प्रसंग. **मराठवाड्यात गणितासाठी चांगला शिक्षक मिळेना. अडचण भाऊंपर्यंत पोहचली. त्यांनी तत्काळ पुण्यातून माणके नावाचे शिक्षक लातूरला पाठवले. त्यांनी पुढे अनेक वर्षे लातूरला गणिताचे अध्यापन केले. त्यांच्या एका शब्दावर माणसे कुठेही काम करायला तयार होत असत. पुढे अनेक दिवस त्यांनी जनकल्याण शाळेचे अघोषित पालकत्व स्वीकारले होते.** शाळा स्थापनेपासून पुढे दहा

वर्षे ते लातूरला आले की, शाळेत भेट ठरलेली. शिक्षकांशी संवाद साधत नवीन उपक्रम सुरू करत, त्यांना मार्गदर्शन करत. त्यावेळी जो त्यांनी पाया घातला त्या पायावर आज जनकल्याण निवासी शाळा उभी आहे आणि नुसती उभी नाही तर एक आदर्श शाळा म्हणून ओळखली जाते. आता ह्या शाळेकडे रोल मॉडेल म्हणून बघितले जाते. जनकल्याणला आज राजमान्यता आणि समाजमान्यता आहे. त्यांच्यावरील आदर भावनेमुळे कार्यकर्ता त्यांनी सांगितलेले काम हिरिरीने करे. किंबहुना भाऊंनी काम सांगितले म्हणजे राजाभाऊंनी आपल्यावर विश्वास दाखवला अशी भावना कार्यकर्त्यांची असे. भाऊंचे व्यवस्थापकीय नेतृत्व इथे आम्हाला जाणवले. **आदर्श व्यवस्थापक आपल्या बरोबर इतरांना कार्यास उद्युक्त करतो, या कसोटीस ते पुरेपूर उतरत आणि हे सर्व मैत्रीच्या भावनेतून. हुकुमशाही नाही. अगदी शिपाई देखील त्यांनी काम सांगितले म्हणून उत्स्फूर्तपणे करणार.**

मी प्रांतसंघचालक झालो. त्यानिमित्त पुण्यात अनेक वेळा येत असे. पुण्यात आलो की मुक्काम त्यांच्या घरीच. पदामुळे मला अनेक क्षेत्रातले लोक भेटत, बैठका होत, त्यांचे फोन येत. यात संघाचे कार्यकर्ते, बँक, शिक्षण, राजकीय, सामाजिक अशा विविध प्रकारच्या लोकांचा समावेश असे. **भाऊ त्या वेळ चक्क माझे संघाच्या भाषेत 'प्रबंधक' (administrative assistant) म्हणून काम बघत. मग कुठे निरोप घेणे, निरोप देणे, फोन करणे, टिपण लिहीणे अशा गोष्टी ते उत्स्फूर्तपणे करत. त्यांचा हा आवेश देखील अगदी साधा असे. अगदी खालच्या स्तरावरील कार्यकर्ता अशी भूमिका त्यांनी घेतलेली असे, अगदी मनापासून. हे देखील एक वेगळे नाते असे. बरं, सगळे विषय माहीत असल्याने सल्लामसलत देखील होत असे आणि प्रबंधकाच्या भूमिकेतून मार्गदर्शकाच्या भूमिकेत ते अलगद शिरत.** त्या काळात त्यांनी माझे हे बॉसपण देखील आनंदाने स्वीकारले आणि निभावले होते.

सार्वजनिक जीवनात त्यांनी काही कटू आणि काही कसोटीचे क्षण देखील अनुभवले. उदा. **तत्त्वास मुरड न घातल्यामुळे शि.प्र.मंडळीच्या कार्यकारिणीवरून राजीनामा देऊन बाहेर पडावे लागले. एका अर्थाने असे बाहेर पडणे हे अन्यायकारक व अपमानकारक होते. मनस्ताप तर खूप झाला. पण भाऊंनी कोणाविषयी कोणतीही कटुता बाळगली नाही की आकस बाळगला नाही. जणू काही घडलेच नाही इतक्या स्थितप्रज्ञतेने घटना स्वीकारली.** असाच प्रसंग दै. तरुण भारतबाबत घडला. नागपूरहून आदेश आला की राजाभाऊंनी तरुण भारतमध्ये लक्ष घालावे. तरुण भारत आर्थिकदृष्ट्या कमकुवत झाले होते. आर्थिक तोटा सोसून वृत्तपत्र चालवणे अवघड झाले होते. भाऊंना वृत्तपत्रीय व्यवस्थापनाचा प्रत्यक्ष अनुभव नसताना ही जबाबदारी त्यांना देण्यात आली. एका बाजूला संस्थेची कमकुवत आर्थिक बाजू, दुसरीकडे कामगारांचे प्रश्न आणि त्यात सरकारी नियम अशा त्रिशंकू अवस्थेत हा प्रश्न सोडवायचा होता. संघ प्रशासनाचा यात लक्ष घालावे असा आदेश होता. भाऊंनी यात लक्ष घातले. साप भी मरे और लाठी भी न तूटे अशा रीतीने प्रश्न सोडवणे भाग होते. घाई करून चालणार नव्हते पण उशीर देखील होऊन चालणार नव्हता. कारण संस्था फार दिवस तग धरू शकणार नव्हती. **भाऊंचा मुत्सद्दीपणा पणाला लागला. संघाने दिलेल्या जबाबदारीला ते पूर्णपणे उतरले. तरुण भारत यशस्वीपणे बंद झाला, तो सर्वांसाठी WIN-WIN पद्धतीने. कोणतीही कटुता न येता प्रश्न सुटला. ते उत्तम समस्यानिवारक होते.**

मध्यंतरी भाऊंचे हार्नियाचे ऑपरेशन करावे लागले. लातूरला विवेकानंदमध्येच करायचे ठरले. मी स्वत:च ते केले. पाच-सहा दिवस विश्रांती घेण्यास ते तिथेच थांबले होते. एक-दोन दिवसांनी म्हटले चला आता चालू यात. तर, कुठे जायचे ? असे विचारून आमचा पेशंट एकदम तयार. खरे तर पेशंटला ऑपरेशननंतर चालावयास लावणे हा एक ट्रीटमेंटचा आवश्यक भाग असतो. पेशंट सहसा लवकर तयार होत नाही. भाऊ केवळ तयारच नाही तर दोन पाऊलं माझ्या पुढे ! तुम्ही इंजेक्शन द्या, औषध द्या, आढेवेढे न घेता तयार. शेवटची चार वर्षे त्यांना दिवसातून चार वेळा इन्सुलिन द्यावे लागे. पण कोणतीही तक्रार न करता, वेळा सांभाळून ते इन्सुलिन घेत असत. **पेशंट म्हणून देखील ते आदर्श होते.** हाच अनुभव त्यांची बायपास केली तेव्हा देखील आला.

**सर्वांना बरोबर घेऊन चला. सर्वांवर प्रेम करा. वैयक्तिक स्वार्थापलीकडे जाऊन समर्पित भावनेने कार्य करा आणि हे करताना आचरण शुद्ध ठेवा. कोणालाही शत्रू मानू नका. ही तत्त्वं डोळ्यासमोर ठेऊन डॉ. हेडगेवारांनी संघाची स्थापना केली. भाऊ या कसोट्यांना तंतोतंत उतरत.** एक आठवण सांगतो. भाऊ महानगर कार्यवाह होते. **यादरम्यान समाजवादी नेते श्री. नानासाहेब गोऱ्यांची पंचाहत्तरी होती आणि भाऊंनी मोतीबागेत त्यांचा सत्कार घडवून आणला.** आता तुम्ही मला सांगा. सानेगुरुजींचे शिष्य असलेले **नानासाहेब संघाचे कट्टर विरोधक. अनेक वेळा त्यांनी संघावर प्रखर टीका केली. पण भाऊंनी त्यांचा सत्कार घडवून आणला.** आम्ही आपापसात चर्चा देखील केली की, काय चाललंय हे आपल्या कट्टर विरोधकाचा सत्कार. **अनेक कार्यकर्ते दबक्या आवाजात आपली नाराजी बोलत होते. पण आज मागे वळून बघता भाऊ योग्य होते हेच खरे. नानासाहेब गोरे विरोधक होते, शत्रू नव्हते ही जाण भाऊंना होती.** एखाद्याचा विचार वेगळा असू शकतो तो देखील आपण समजून घेतला पाहिजे. ही भावना त्यामागे असणार. भाऊ स्वत: अजातशत्रू असल्याने नानासाहेबांना बोलवण्यामागे त्यांचा हेतू शुद्ध असणार यात शंकाच नाही. **आपल्या विचारधारा वेगळ्या आहेत म्हणजे शत्रुत्व नाही. ते देखील समर्पण भावनेतून काम करताहेत तर त्या भावनेचा आपण आदर केलाच पाहिजे ही भावना त्या सत्कारामागे होती.** विरोधकांचे विचारही आपल्या कार्यकर्त्यांनी ऐकले पाहिजेत, आपल्यावर का आणि कुठे टीका होते आहे ते समजून घेतले पाहिजे म्हणजे आपल्यात आवश्यक ती सुधारणा घडेल हा या मागचा विचार. **स्वयंसेवकाचे हेच वर्तन डॉ. हेडगेवारांना अभिप्रेत होते.** त्याचा एक दाखला तुम्हाला देतो. एकदा एक स्वयंसेवक डॉक्टरांकडे काही आर्थिक मदत मागण्यास आला. त्याची गरज खरी होती हे त्यांनी ताडलं. पण डॉक्टर स्वत: अकिंचन. एकादशीच्या घरी शिवरात्र असाच प्रकार. मदत देणार कशी? ते त्याला म्हणले, 'बस बघतो'. पलीकडच्या गल्लीत रामभाऊ रुईकर वकिलांकडे डॉक्टर गेले. **रुईकर वकील कम्युनिस्ट. राजकीय विरोधक. डॉक्टरांनी त्यांना पैशाची नड सांगितली. तुमची काय ती लिखापढी करा पण मला पैसे द्या. रुईकर वकील जरी कम्युनिस्ट असले तरी त्यांचा डॉक्टरांवर पूर्ण विश्वास. ते म्हणाले, 'काय डॉक्टर मला काय गाढव समजता काय? तुमच्याकडून लिखापढी शक्यच नाही. हे घ्या पैसे.'** ते पैसे घेऊन डॉक्टरांनी त्या स्वयंसेवकाची नड भागवली. आता तुम्ही सांगा या मैत्रीच्या नात्यात राजकीय मत कुठे आले. नानासाहेबांच्या सत्कारात भाऊंनी हेच केले.

किशोरजींनी भाऊंसारख्या समर्पित स्वयंसेवकाची अगदी यथार्थ व्याख्या केली आहे. **'स्वयंसेवक वही जो रुकते नहीं, थकते नहीं, भागते नहीं, डरते नहीं, बिगडते नहीं, पछताते नहीं.' भाऊ रा.स्व.संघाचे संस्थापक प.पू.डॉ.हेडगेवारांना अभिप्रेत असलेले आदर्श स्वयंसेवक तर होतेच, त्याच बरोबर ते एक परिपूर्ण असे व्यक्तिमत्त्व होते.** ज्या कोणत्या नात्याने तुम्ही त्यांच्याशी जोडलेले असाल, ते नाते ते जपत. तसं म्हटलं तर भाऊ वलयांकित कार्यकर्ते कधीच नव्हते. **ते संघाचा चेहरा नव्हते पण संघाचा आत्मा जरूर होते.** संघाची तत्त्वे त्यांनी अगदी जाणत्या वयापासून अंगी बाणवली होती, आचरणात आणली होती. थोडक्यात भाऊंनी स्वत:ला स्वयंसेवक म्हणून लहानपणापासून घडवले होते. हे त्यांचे मोठेपण आहे. **संघाने अशी समर्पित माणसे देशाच्या वेगवेगळ्या भागात निर्माण केली हे संघाचे वैशिष्ट्य आहे आणि म्हणून संघ आज इतकी वर्षे टिकला आहे आणि वाढला आहे.**

शरीराने आज राजाभाऊ आपल्यातून जाऊन एक वर्ष झाले. विचारांनी ते आपल्यातच आहेत अशी माझी पक्की धारणा आहे. राजाभाऊंच्या या प्रथम स्मृतीदिनानिमित्त माझी त्यांना विनम्र आदरांजली.

– शब्दांकन: श्रीकांत कुलकर्णी

मो. – डॉ. कुकडे – ९४२३७७५८९७

## मातृहृदयी वडील

**– सुहास हिरेमठ**

कै. राजाभाऊ लवळेकर यांच्या दु:खद निधनाची बातमी ऐकली. अतिशय वाईट वाटले व १९८४ ते १९९१ या काळात मी पुणे महानगर-प्रचारक असताना त्यांच्या सहवासात गेलेल्या स्वर्णिम कालातील आठवणी माझ्या मनात जागृत झाल्या. त्या कालात त्यांची विविध रूपे मला पाहायला मिळाली.

त्यापैकी एक म्हणजे त्यांचे वडिलकीचे वागणे. मला वाटते ते 'Born' वडील होते. ते माझ्यापेक्षा सुमारे २०-२२ वर्षांनी मोठे होते. मला वडिलांसारखे होते. त्यामुळे माझ्या मनात त्यांच्याविषयी आदरयुक्त भीती असे. **परंतु काही काळानंतर जे अनुभवले ते पाहून त्यांचे वर्णन करायचे तर माझ्यासाठी ते 'त्वमेव माता च पिता त्वमेव, त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव ।' असेच होते.** मी त्यांच्यापेक्षा केवळ वयानेच नव्हे तर ज्ञान, अनुभव, क्षमता, गुणवत्ता, कौशल्य इ. सर्वांनी खूप लहान होतो. माझ्या मर्यादाही ते जाणत होते. परंतु त्यांनी मला कधीही ते जाणवू दिले नाही. एक महानगर-प्रचारक म्हणून सन्मानाची वागणूक दिली. त्यांच्या घरात सर्व असेच होते. घरातील सर्वांवर हा संस्कार होता. त्यामुळे मला आईसमान असलेल्या वहिनींनी त्यावेळी मला माझ्या आईची उणीव भासू दिली नाही. त्यावेळी त्या BSNL मध्ये नोकरी करत होत्या. बाकीच्यांचे शिक्षण चालू होते. सर्व जण व्यस्त असत पण जेव्हा घरी जात असे तेव्हा सर्वजणच अगत्याने स्वागत करत. नंतर प्रांताची जबाबदारी आल्यावर माझे केंद्र संभाजी नगर (औरंगाबाद) झाले. त्यावेळी राजाभाऊंची लहान कन्या सौ. संजू (संजीवनी) तेथे होती. तिचे यजमान श्री. हेजीब स्टेट बँकेत तेथे अधिकारी होते. त्यावेळी संघावर बंदी (१९९२) होती. मी काही दिवस त्यांच्या घरी राहिलो होतो. त्यावेळी मला पोटाचा त्रास होता. त्या काळात तिने माझी जी काळजी घेतली, जे प्रेम मला दिले ते सख्ख्या बहिणीसारखेच होते. तिच्याकडे पाहताना जाणवत असे की तिच्यामध्ये भाऊंचे वरील सर्व गुण उतरले आहेत. प्रारंभी राजाभाऊ महानगर सहकार्यवाह होते. श्री. गोपालजी ठक्करांच्या निधनानंतर ते महानगर कार्यवाह झाले. त्याचवेळी न्यू इंग्लिश स्कूल रमणबागचे मुख्याध्यापक झाले. दोन्ही जबाबदाऱ्या समान महत्त्वाच्या होत्या. त्यांनी दोन्ही जबाबदाऱ्यांना समान न्याय दिला. शाळेव्यतिरिक्त अधिकतम वेळ संघकार्यासाठी देत असत. **एकूण त्यांची क्षमता, गुणवत्ता व अध्ययन अतिशय उच्च दर्जाचे असल्याने त्यांच्यावर आणखी जबाबदाऱ्या येत गेल्या. त्याच काळात 'स्व-रूपवर्धिनी'चे कार्य वाढत होते. त्यामध्ये राजाभाऊ, श्री. किशाभाऊ पटवर्धनांचे प्रमुख सहकारी झाले.** त्याचवेळी संस्कार भारतीच्या अ.भा.कार्यकर्त्यांचे लक्ष त्यांच्याकडे गेले. त्यामुळे **संस्कार भारतीच्या महानगरस्तरापासून क्षेत्रापर्यंत जबाबदाऱ्या त्यांच्यावर येत गेल्या.** त्याच काळात 'पुणे तरुण भारत' अडचणीत आला होता. ते पाहून **मा. मोरोपंत पिंगळे यांच्या अपेक्षेनुसार ते तरुण भारतच्या कामात उतरले.** काही काळ संपादकपदाची जबाबदारीही सांभाळली. याशिवाय पुण्यातील **अनेक संस्थांच्या कार्यकर्त्यांना त्यांनी सहकार्य केले. अनेक कार्यकर्त्यांना त्यांचा मोठा आधार वाटत असे. सर्वच विषयातील त्यांची उंची मोठी असल्यामुळे अशा प्रकारच्या अनेक विषयांना ते न्याय देऊ शकत होते. या सर्व क्षेत्रातील त्या काळातील पुण्यातील अनेक विद्वान, कर्तृत्ववान मंडळींना त्यांनी आपल्या विद्वत्तेबरोबर नम्रतेने जिंकले. त्यांचा तो आवाका पाहून त्यावेळी आश्चर्य वाटत असे, तर आज विचार करताना महदाश्चर्य वाटते.**

पुणे महानगर कार्यवाह असताना (माझ्यासहित) सर्व प्रकारच्या कार्यकर्त्यांना सांभाळण्याचे फार मोठे कौशल्य त्यांनी दाखविले. बैठकीत अनेकवेळा माझा संयम जायचा, धैर्य (patience) संपायचे. परंतु त्यांचे धैर्य व संयम विलक्षण होता. बैठकीत कितीही चित्र-विचित्र चर्चा झाली, एखाद्या कार्यकर्त्याने अस्वस्थ होऊन एखादी कटू प्रतिक्रिया व्यक्त केली तरी राजाभाऊ त्या प्रतिक्रियेला सौम्य (dilute) करून वातावरण पूर्ववत प्रसन्न ठेवायचे व त्या कार्यकर्त्याला

सांभाळून घेऊन कौशल्याने विषयाला योग्य दिशेने घेऊन जायचे. मातृहृदयी राहून वडिलांसारखे वागत. अशा वेळी व्यक्तीविशेषामुळे निर्माण होणाऱ्या समस्या विरून जात असत. हे करण्यासाठी ते चतुराईचा उपयोग करत नसत. कारण **पु.ल.च्या रावसाहेबांसारखे ते अगदी अंतर्बाह्य पारदर्शीच होते.** त्यांचे अध्ययन खूप होते. प्रभावी वक्ते होते, त्यामुळे बैठकीत कधी–कधी ते बोलायला लागले की ऐकत राहावे असे सर्वांना वाटे. पण ऐकणाऱ्यांचे लक्ष घड्याळाकडे असायचे. त्यामुळे त्यांच्या पोटात गोळा येई. मग कोणाला तरी त्यांना घड्याळाची आठवण द्यावी लागत असे. हे सर्वही आनंद देणारेच असे. म्हणूनच मला रावसाहेबांची आठवण झाली.

मी सात वर्ष महानगर प्रचारक होतो. त्यानंतर दहा वर्ष प्रांत स्तरावर विविध जबाबदाऱ्या घेऊन एकत्रित महाराष्ट्र प्रांतात प्रवास केला व त्यानंतर गेली सुमारे दहा वर्ष संपूर्ण देशात प्रवास करत आहे. त्यात काही प्रांतात विस्तृत (सर्व जिल्ह्यापर्यंत) प्रवास झाला. देशातील काही मोठ्या महानगरांचे काम जवळून पाहायला मिळाले. हे सर्व पाहताना मला एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे 'पुणे महानगर–कार्यवाह' पद सांभाळणे ही एक तारेवरची कसरत आहे. असे वाटते की परमेश्वराने सृष्टीतील चांगले–वाईट गुण जेवढ्या प्रमाणात पुण्याच्या मातीत मिसळले असतील तेवढे भारतातील अन्य कुठल्या महानगरात नसतील. (आयुर्वेद असे सांगतो की त्या–त्या भागातील आजारांवर उपाय असलेल्या औषधी त्या–त्या भागातच सापडतात.) मी जेवढ्या पुणे महानगर–कार्यवाहांना जवळून पाहिले त्या सर्वांचे हेच वैशिष्ट्य राहिले आहे व पुढेही राहील. आज राजाभाऊंचे स्मरण करत असताना हे जाणवते. असो. राजाभाऊंचे अनेक विषयांचे, समस्यांचे सखोल अध्ययन होते. ते अतिशय संवेदनशील होते. संघामध्ये घडणाऱ्या अनेक घडामोडींबाबत त्यांची संवेदनशीलता जाणवायची. बहुधा १९८६–८७ चे वर्ष असावे. मा. यादवराव जोशींचा प्रांतात प्रवास होता. त्यामध्ये महाराष्ट्र प्रांतातील विभाग व त्यावरील स्तराच्या सुमारे ७०–८० कार्यकर्त्यांची मुंबईला दोन दिवस बैठक होती. विशेष म्हणजे या बैठकीला कोणतीही पूर्व–नियोजित विषय सूची (agenda) नव्हती. दोन दिवस मा. यादवराव जोशी यांच्याबरोबर मुक्त प्रश्नोत्तरांचा कार्यक्रम होता. उपस्थित कार्यकर्ते विविध प्रकारचे प्रश्न विचारत होते. मा. यादवरावजी त्यांना उत्तरे देत होते. त्या काळात विवेकानंद केंद्र व संघ यामधे किंचित दुरावा आला होता. राजाभाऊंच्या मनात याबद्दल वेदना होती. त्यामुळे त्यांनी त्यासंबंधात एक प्रश्न विचारला. यादवरावांकडे त्यावेळी दक्षिण क्षेत्राची जबाबदारी होती. त्यांना त्या विषयाची पूर्ण माहिती होती. त्यात त्यांची भूमिकाही होती. त्यांनी राजाभाऊंना उत्तर दिले, परंतु राजाभाऊंचे समाधान झाले नाही. त्यांनी पुन्हा प्रश्न विचारला, पुन्हा उत्तर दिले गेले. पुन्हा असमाधान, पुन्हा प्रश्न पुन्हा उत्तर;असे तीन वेळा झाले. प्रश्न विचारत असताना राजाभाऊंच्या मनातील वेदना सर्वांना जाणवत होती. यादवरावांनी सर्व जाणले. ते म्हणाले, 'राजाभाऊ, तुम्ही या समस्येने फारच चिंतित दिसता, पण तुम्ही निश्चिंत राहा, यातून मार्ग निघेल, सर्व काही ठीक होईल. सर्व प्रश्न सुटतील व संबंध पूर्ववत होतील. (आज ते प्रत्यक्ष पाहायला मिळत आहे).' मला मात्र आजही राजाभाऊंच्या मनातील ती चिंता व त्यांच्या चेहऱ्यावरील ती तळमळ डोळ्यासमोर उभी राहते. किती तरी आठवणी लिहायला लागले की आठवत जातात. पण वाचकांचाही विचार केला पाहिजे म्हणून थांबतो.

**त्या सात वर्षांच्या काळात राजाभाऊंसारख्या देवमाणसानी जे मला दिले, आपल्या आचरणातून जो संघ दाखविला, जे मौन मार्गदर्शन केले ते माझ्या उर्वरित आयुष्यासाठी नंदादीपाप्रमाणेच मार्गदर्शक ठरेल.** त्यांना श्रद्धांजली वाहण्याची कल्पना कशी तरी वाटते. पण सत्य स्वीकारून मी त्यांना विनम्र श्रद्धांजली अर्पण करतो.

– मो. : ९४२२५०५१७८

❖❖❖

## ऐसी कळवळ्याची जाती...

**– (कै.) किशाभाऊ पटवर्धन**

श्री. राजाभाऊंच्या बाबतीत आठवणींना खरी सुरुवात झाली ती १९७९ च्या जानेवारीत. त्यांच्यासंबंधी आधीपासूनच माझ्या मनात आदर वसत होता. जानेवारी १९७९ मध्ये मी सेवानिवृत्त झालो. त्यानंतर लगेचच 'स्व'–रूपवर्धिनीच्या कामाचा विचार करण्यासाठी आम्ही माझ्या एका विद्यार्थ्याच्या दुकानात बसत असू. मी आणि राजाभाऊ दर आठवड्याला जमत असू. **राजाभाऊंचा स्वभावच असा होता की, एकदा त्यांनी शब्द दिला की कसोशीने पाळल्याशिवाय ते स्वस्थ बसूच शकत नव्हते.**

आम्ही जे जमत असू ते मुख्यतः सध्याच्या शिक्षण पद्धतीत जी न्यूनता किंवा कमीपणा आहे त्याचा विचार करण्यासाठी. प्रेरणाजागृती (Motivational Training) च्या अभावामुळे देशाची सर्वच बाबतीत घसरण होत आहे. याबाबतीत नुसती वेदना किंवा हळहळ व्यक्त करून उपयोगाचे नाही. त्या वेदनेवर काही उपचार करता आला पाहिजे आणि त्यासाठी काहीतरी व्यावहारिक कार्यक्रम मुलांना देता आला पाहिजे. याचाच प्रामुख्याने विचार या भेटींमध्ये व्हायचा. सुदैवाने १९७९ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय बालक वर्ष' म्हणून सबंध जगभरात पाळले गेले होते. त्यासाठी अनेकांनी अनेक प्रकारचे उपक्रम चालू केले. पण सातत्याने काम केल्याशिवाय ईप्सित साध्य होणार नाही याबाबतीत आमचे दोघांचेही एकमत होते. असा कार्यक्रम काय द्यावा याचा सुमारे ४–५ महिने सतत विचार आणि चिंतन चालू होते. त्या विचार चिंतनातून 'स्व'–रूपवर्धिनी संस्थेचा जन्म झाला.

'स्व'–रूपवर्धिनीची सुरुवात झाली व हळूहळू वाढ होत गेली. रोज नवनव्या अडचणी येत गेल्या. त्यावर दोघांच्या विचारांनी, आम्ही उत्तरे शोधून काढली आणि वर्धिनीच्या वाटचालीत हळूहळू किंचित–किंचित यश मिळत गेले. गाठायचा पल्ला, पाहिलेली स्वप्ने, केलेले विचार प्रत्यक्षात आणण्यासाठी मेहनतीचे डोंगर उभे करावे लागतील याची पूर्ण कल्पना त्याही वेळी होती आणि भविष्यकाळातही हाच मेहनतीचा नारा लावावा लागेल. सुरुवात तर चांगली झाली. प्रारंभी राजाभाऊंनी पुष्कळ मेहनत घेतली. सहविचारांनी सर्व करीत होतो. **अनेक अडचणींच्या प्रसंगी राजाभाऊंचा सल्ला हा मोलाचा ठरला.** पुढे काही व्यावहारिक अडचणींमुळे, नोकरीच्या बदलीमुळे, प्रकृती अस्वास्थ्यामुळे, संघाने अंगावर दिलेल्या मोठमोठ्या जबाबदारींमुळे त्यांची इच्छा, कामाची हौस, आवड आणि लगन असूनही तेवढा वेळ त्यांना वर्धिनीसाठी देता आला नाही. परंतु त्यांची तळमळ कधीही लपत नसे. त्याही व्यस्त कालावधीत शक्य असेल तेवढी शिकस्तीची मदत ते करीतही असत. श्री. सु. म. जोशी, श्री. भसे, श्री. त्र्यंबकराव आपटे इत्यादी अनेक शिक्षक व सौ. देव, सौ. पाळंदे अशा अनेक शिक्षक–शिक्षिकांना वर्धिनीच्या कामाशी जोडण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता.

'स्व'–रूपवर्धिनीची प्रार्थना करताना अनेक वेळा त्यांच्याशी चर्चा करून वर्धिनीच्या प्रार्थनेतील विचार निश्चित करण्यात आला. वर्धिनीच्या प्रार्थनेतील

'प्रभो तू चिदानंदरूपी असोनी ।<br>
अणू–रेणू ब्रह्मांड तू व्यापिले ।।<br>
तुझे अंश आम्ही तुझ्या पूजनाचे ।<br>
पहा दिव्य हे ध्येय स्वीकारले ।।

**हा विचार मूलतः राजाभाऊंचा आणि त्याला कवितेत बांधले सौ. देव यांनी. तसेच आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे संस्थेला राजाभाऊंनी 'स्व'–रूपवर्धिनी हे अतिशय अर्थपूर्ण नाव दिले.** या नावाचे पुढे अनेक वेळा, अनेक प्रसंगी, अनेकांनी तोंड भरून कौतुक केले आहे. याचे सर्व श्रेय अर्थातच राजाभाऊंनाच जाते.

अगदी पहिल्या दिवसापासून 'स्व'–रूपवर्धिनीचे ध्येयधोरण हे संघापासून काही वेगळे नव्हते. पण या कामाला उठाव येण्यासाठी संघाचा पाठिंबा असलाच पाहिजे ही आमची दोघांचीही धारणा होती. पण हे स्वप्न राजाभाऊंमुळेच

सत्यात आले. त्यांनी एका समन्वय समितीमध्ये संघाच्या व्यासपीठावर 'स्व'–रूपवर्धिनी बसवली, चढविली. त्यामुळे अपेक्षेप्रमाणे हळूहळू संघाचीही मानमान्यता मिळू लागली. त्याचा अर्थातच वर्धिनीच्या कार्यवृद्धीला खूपच फायदा झाला. **काही लोकांचा 'स्व'–रूपवर्धिनीच्या कामाबद्दलचा असलेला गैरसमज राजाभाऊंनी हळुवारपणे आणि कौशल्यपूर्ण बोलण्याने दूर केला.** मी स्वतः अनेक कारणांसाठी म्हणजे शारीरिक दौर्बल्य, त्यामुळे मानसिक कमकुवतपणा या सर्वांमुळे वर्धिनीच्या कामातून मुक्त होण्यासाठी राजाभाऊंनाच 'माझी जबाबदारी तुम्ही घ्या' असे म्हटले व त्यांनीही स्वतःच्या अस्वस्थ प्रकृतीकडे पूर्ण दुर्लक्ष करून माझ्या मनःस्थितीचा, शारीरिक स्थितीचा विचार करून माझ्या म्हणण्याला होकार दिला. हाही त्यांच्या मनाचा मोठेपणाच होता. **प्रकृती अस्वास्थ्य असूनही आणि घरच्यांचा प्रेमाचा विरोध असताना सुद्धा कार्याध्यक्ष म्हणून त्यांनी जे काम केले ते विसरण्यासारखे नाही. त्या कालावधीत त्यांनी अधिकार आणि जबाबदाऱ्या यांची जी एक उतरंड तयार केली त्यामुळे रेखीव आणि घोटीव अशी संघटना बांधली गेली.**

**वर्धिनीच्या आर्थिक हिशेबाच्या बाबतीतही त्यांनी लावलेली शिस्त, हिशेबातला चोखपणा, खर्चांवरची विचारपूर्वक बंधने ही सुद्धा त्यांची अनुकरणीय बाब म्हटली पाहिजे.**

निर्णय करणारी एक व्यक्ती असता उपयोगी नाही. **सहविचारांनीच निर्णय झाला पाहिजे असा त्यांचा आग्रह असायचा.** 'आली लहर की केला कार्यक्रम' हा कोणाचाही ठेका त्यांनी चालू दिला नाही. **पण हे करताना देखील त्यांना अपरंपार मानसिक ताण सहन करावा लागला पण, आलेल्या रागामुळे कधी कडक शब्द वापरून त्यांनी लोकांची मने दुखावली नाहीत,** त्याच वेळेला **आपला मूळ मुद्दा न सोडता, गोड बोलून समजुतदारपणाने पटवून देणे हेही त्यांना फारच छान जमायचे.** यासाठी संयम, प्रदीर्घ अनुभव आणि वाणीतला गोडवा याचा त्यांनी वापर केला. माणसांना सांभाळून घेऊन हव्या त्या गोष्टी घडवून आणण्यासाठी त्यांनी शिस्त लावली. हे सर्व करताना त्यांना काहीच वेदना झाल्या नसतील किंवा मनाविरोधी गोष्टी घडल्या नसतील असे नाही. पण हे सर्व शांतपणाने, विचाराचा पक्केपणा असल्यामुळे त्यांनी हे सर्व सहन करून घडवून आणले. या **त्यांच्या कार्यपद्धतीमुळेच आज वर्धिनीच्या कामात सहविचाराने निर्णय करण्याची प्रक्रिया रुजली आहे.**

'ऐसी कळवळ्याची जाती । करी लाभाविण प्रीती'

याचा नेमका अर्थ राजाभाऊंच्या सहवासात आलेल्या प्रत्येकानेच अनुभवला आहे.

('स्व'–रूपवर्धिनीचे संस्थापक कै. किशाभाऊ पटवर्धन यांनी राजाभाऊ लवळेकर या आपल्या सहकारी मित्राविषयी त्यांच्या पंचाहत्तरीच्या निमित्ताने शब्दबद्ध केलेल्या भावना सदर लेखाद्वारे व्यक्त केल्या होत्या.)

❖❖❖

रमणबागेतील राजाभाऊंचं सुंदर हस्ताक्षरातलं, निरनिराळ्या रंगांच्या खडूंनी सजवलेलं, अत्यंत आकर्षक संस्कार फलक लेखन रोज नित्यनूतन रूप घेऊन येत असे. हे लेखन म्हणजे एक सुंदर कलात्मक आविष्कार असे.

**– जयंत कवठेकर**

## संस्कार भारतीची स्थापना ! राजाभाऊंचे योगदान

**– सुहास कुलकर्णी**

प्रान्तप्रचारक मा. वसंतराव केळकर यांचे आज्ञेनुसार नोव्हें. ८५ मध्ये दिल्लीला संस्कार भारतीच्या अखिल भारतीय कार्यकारिणी बैठकीस गेलो. मा. नानाजी देशमुख यांनी संस्कार भारतीची स्थापना व कला क्षेत्रात संघविचार ह्याबाबत मार्गदर्शन केले, तर राजमाता विजयाराजे सिंदिया यांनी संस्कारभारतीची आवश्यकता हा विषय कार्यकर्त्यांसमोर मांडला.

पुण्यात आल्यावर मा. वसंतराव केळकरांच्या सहीचे एक पत्रक तयार करून आणि आपापल्या जिल्ह्यातील कला क्षेत्रातील रुची असलेल्या संघसंबंधित कार्यकर्त्यांना मोतीबागेत बैठकीला पाठविण्यासंबंधी जिल्हा–कार्यवाहांना पत्र पाठविले.

पुण्यामध्ये संस्कारभारतीचे कार्य सुरू व्हावे म्हणून पुणे शहराचे संघ–कार्यवाह मा. राजाभाऊ लवळेकर यांची गाठ घेतली. संस्कार भारतीच्या स्थापनेचे उद्दिष्ट लक्षात घेऊन त्यांनी पुणे शहरातील कलाक्षेत्रात रुची असणाऱ्या ७–८ कार्यकर्त्यांची नावे दिली. मा. राजाभाऊंनी त्यावेळी दिलेला उत्साह व आधार आजही लक्षात आहे.

मा. राजाभाऊ रमणबाग शाळेचे मुख्याध्यापक होते. तसेच पुणे महानगर संघ–कार्यवाह होते. सर्व कामांतून मा. राजाभाऊ वेळ काढून संस्कार भारतीच्या शाखा स्थापनेच्या कामात अधिक वेळ देऊ लागले. फेब्रुवारी १९८६ मध्ये संध्याकाळी त्यांच्याच घरी पुण्यातील १४–१५ कार्यकर्त्यांची पहिली बैठक झाली. राजाभाऊंच्या दिवसभराच्या कामामध्ये दररोज दोन–तीन तास संस्कार भारतीसाठी मिळू लागले.

दुसऱ्या दिवसापासून सोयीच्या वेळी पुणे शहरातील प्रथितयश संपादन केलेल्या कलाकारांच्या गाठीभेटी घेणे सुरू केले. मा. राजाभाऊ त्या कलाकारांना संस्कार भारतीच्या शहर कार्यकारिणीमध्ये काम करण्यासंबंधी विनंती करीत असत व त्यांचा होकार घेऊनच आम्ही त्यांच्याकडून निघत असू.

महाराष्ट्र नाट्य परिषदेचे अध्यक्ष, नाट्यतपस्वी मा. चित्तरंजन कोल्हटकर, साहित्यिक मा.द.मा.मिरासदार, संगीतकार राम कदम, मा. बाबासाहेब पुरंदरे अशा अनेक दिग्गजांची भेट घेतली. प्रसिद्ध चित्रकार श्री. भैय्यासाहेब ओंकार यांची गाठ घेऊन तेथूनच श्रीमती डॉ. सरोजिनी बाबर यांचेकडे गेलो. मा. राजाभाऊंनी त्यांना वाकून नमस्कार केला. डॉ. सौ. सरोजिनी बाबर फारच भारावून गेल्याचे जाणवले. त्यानंतर सुचेता भिडे–चाफेकर यांनी पण संस्कार भारतीच्या कार्यात सहभागी होण्यास मान्यता दिली. सर्वात शेवटी प्रसिद्ध साहित्यिक डॉ. रा. शं. वाळिंबे यांची भेट घेतली. एक आठवड्यात सर्वांच्या गाठीभेटी पूर्ण करून मा. राजाभाऊंनी सर्व कार्यकर्त्यांचा उत्साह वाढविला. संस्कार भारतीच्या पुण्याच्या कार्यकारिणीमध्ये कोणाकोणाला घ्यावयाचे हे ठरले. पण पुणे शहराच्या संस्कार भारतीचे अध्यक्ष कोण असावे ह्याबाबत निर्णय होत नव्हता. मा. गोपाळजी ठक्कर यांनी नाव सुचविले. पंडित जितेंद्र अभिषेकी यांचे. पंडित जितेंद्र अभिषेकी नुकतेच पुण्यात स्थाईक झाले होते.

दुसऱ्याच दिवशी मी व राजाभाऊ, गोपाळजी ठक्कर यांचे बरोबर पंडित जितेंद्र अभिषेकी यांच्या बंगल्यावर भेट घेण्यासाठी गेलो. राजाभाऊंनी पंडितजींना सर्व विषय समजून सांगितला. गोपाळजींनी पंडित जितेंद्र अभिषेकी यांना पुणे संस्कार भारतीचे अध्यक्ष होण्याची विनंती केली. पंडितजींनी थोड्या दिवसांनी संस्कार भारतीच्या पुणे शाखेचे अध्यक्ष होण्यास मान्यता दिली.

प्रथितयश संपादन केलेल्या कलाकारांची व साहित्यिकांची कार्यकारिणी तयार झाली. दर रविवारी दुपारी दोन ते चार अशी कार्यकर्त्यांची बैठक मा. राजाभाऊंच्या घरी सुरू झाली. २०–२५ कला क्षेत्रातील कार्यकर्ते बैठकीला उपस्थित राहू लागले. कामाला वेग आला. बैठकीत पुढील दिशा ठरू लागल्या. प्रत्यक्ष पुणे संस्कारभारतीच्या शाखेचे उद्घाटन दि. २३ मे १९८६ शुक्रवार बुद्धपौर्णिमेच्या दिवशी करावयाचे ठरले. तयारीला एक महिनाच होता. त्याच

उद्घाटन कार्यक्रमात एका विशेषांकाचे प्रकाशन करावे असेही ठरले. विशेषांकासाठी जाहिराती मिळवाव्या, त्यामुळे थोडेफार पैसेही संस्कार भारतीकडे उभे राहतील असा कार्यकर्त्यांचा विचार नक्की झाला तसेच संस्कार भारतीच्या कामासाठी एखादे कार्यालय असावे असे सर्वांना वाटले. श्री. किशोर देसाई यांनी आपल्या जंगलीमहाराज रोडवरील कंपनीमधील एक खोली संस्कारभारतीचे कार्यालय म्हणून वापरण्याची अनुमती दिली आणि दि. १० एप्रिल १९८६ रोजी डॉ. रा. शं. वाळिंबे यांचे हस्ते कार्यालयाचे उद्घाटन झाले. त्यावेळी संघाचे मा. प्रल्हादजी अभ्यंकर कार्यक्रमांस उपस्थित होते. डॉ. रा. शं. वाळिंबे यांनी व मा. प्रल्हादजी अभ्यंकरांनी कलाक्षेत्रात राष्ट्रप्रेमी संघटन कसे आवश्यक आहे ह्याबद्दल मार्गदर्शन केले.

संस्कार भारती, पुणे शाखेचा उद्घाटन दिवस ठरला. रोज संध्याकाळी कार्यकर्ते कार्यालयात जमू लागले. मा. राजाभाऊ सुद्धा रोज कार्यालयात येऊन कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवित होते.

आता पुणे शाखेच्या उद्घाटनास कोणास पाचारण करावे यासंबंधी मा. राजाभाऊंशी विचारविनिमिय सुरू होता. 'इप्टा' संघटनेच्या प्रमुखांपैकी कोणाला तरी उद्घाटनासाठी आणावे अशा विचारातून मा. राज कपूर यांच्या नावाचा विचार सुरू झाला. राज कपूरांना कसे भेटावे ह्यावर चर्चा सुरू झाली आणि लक्षात असे आले की मा. राज कपूर दर आठ-दहा दिवसांनी पुण्याजवळ लोणी येथे त्यांचा बंगला आहे, तेथे येतात. तेव्हा लोणी येथे त्यांना भेटता येईल. तसेच लोणीचे जे सरपंच आहेत त्यांची व मा. राज कपूर यांची दोस्ती आहे असेही समजले. त्यामुळे लोणीचे सरपंच श्री. शालिवाहन काळभोर यांना भेटून मा. राज कपूर यांच्याकडे जाण्याचे ठरले.

संघाचे एक ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. दादा गोगावले महसूल खात्यात नोकरी करत असल्याने त्यांची हवेली तालुक्यातील सर्व सरपंचांशी चांगली ओळख होती. श्री. दादा गोगावले यांनी सांगितले की लोणी येथील सरपंच श्री. शालिवाहन काळभोर हे त्यांचे मित्र आहेत. दुसऱ्या दिवशी श्री. दादा गोगावले यांच्याबरोबर श्री. शालिवाहन काळभोर यांची गाठ घेण्यासाठी गेलो. श्री. शालिवाहन काळभोर आम्हाला लोणी येथील राजबागेत मा. राज कपूर यांच्या भेटीसाठी घेऊन गेले. मा. राजाभाऊंनी संस्कार भारती हा विषय राज कपूरना सांगितला. मा. राज कपूरांनी सर्व ऐकले व म्हणाले, 'मुंबईला गेल्यावर कळवतो.' पुढे काही दिवसातच मा. राज कपूर यांची तब्बेत बिघडली व ते येऊ शकणार नाहीत असे कळले. म्हणून इप्टा संघटनेचे दुसरे प्रमुख कलाकार मनमोहन कृष्ण यांचे नाव संस्कार भारती पुण्याच्या शाखेचे उद्घाटन करण्यासाठी म्हणून नक्की केले.

बुद्धपौर्णिमेच्या दिवशी, दि. २३ मे १९८६ रोजी संध्याकाळी सहा वा. टिळक स्मारक मंदिरमध्ये मा. मनमोहन कृष्ण यांनी पुणे संस्कार भारती शाखेचे उद्घाटन केले. तसेच विशेषांकाचे प्रकाशन पण केले. या विशेषांकाचे संपादन मा. राजाभाऊ लवळेकरांनीच केले होते. चार-पाच महिन्यांच्या अथक परिश्रमाचे सार्थक झाले. **मा. राजाभाऊंचे कष्ट, माणूस जोडण्याची कला, नियोजन आणि कार्यकर्त्यांना उत्साह देऊन कार्यप्रवृत्त करण्याचे कसब अवर्णनीय होते** ह्यात शंका नाही. मा. राजाभाऊ प्रथम पुणे संस्कारभारतीचे उपाध्यक्ष झाले त्यानंतर प्रान्ताचे पण काम त्यांच्याकडे आले व त्यानंतर क्षेत्राचे अध्यक्ष म्हणूनही त्यांच्याकडे जबाबदारी आली. **संस्कारभारतीच्या कार्यवाढीत मा. राजाभाऊंचा सिंहाचा वाटा होता.** अशा राजाभाऊ लवळेकरांना त्रिवार वंदन!

– मो. : ९९२३२०६८३१

❖❖❖

पदावर कोणीही असो, शाळा चालविली जात असे ती राजाभाऊंमुळेच

**– श्री. यशवंत लेले**

## ज्योतीने तेजाची आरती

**– श्रीधर देव**

श्री. कृष्णाजी गोविंद तथा राजाभाऊ लवळेकर. आज दिवंगत होऊन एक वर्ष झाले. पण त्यांच्या आठवणी मनात कायम रेंगाळत राहिल्या. 'अशी माणसे येती। अन् स्मृती ठेवुनी जाती।।' हेच खरे. नाहीतर मनाला हे पटत असते की, 'अद्य वा अब्दशतान्ते वा, मृत्युर्वै प्राणिनां ध्रुवः' पण 'अब्दशतान्ते' सुद्धा ज्यांच्या आठवणी मनात तरंगत राहतात अशी माणसे मात्र विरळाच !

माझा आणि श्री. राजाभाऊ ह्यांचा संबंध १९६४ पासून आला. मी रमणबाग शाळेत शिक्षक म्हणून सेवेला प्रारंभ केला. एका ध्येयवादाने प्रेरित होऊनच मी शाळेत गेलो. 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया' येथील सेवा सोडून मी ठरवून शाळेत प्रवेश केला. जवळच्या सगळ्यांची नाराजी स्वीकारून मी हा निर्णय घेतला. संघकार्य करता यावे हा यामागील हेतू होता. अशा वेळी कोणाकडे पाहून यशस्वी शिक्षक होण्यासाठी प्रयत्न करावा हा विचार मनात होताच. श्री. यशवंतराव लेले व (कै.) राजाभाऊ लवळेकर ह्या दोन उत्तुंग व्यक्तिमत्त्वांचे मार्गदर्शन आणि तत्कालीन मुख्याध्यापक (कै.) प्राध्यापक प्र.शं. जोशी ह्यांची पाठीवर पडणारी प्रेमळ थाप, त्यातून माझा मार्ग सुकर, सुंदर झाला.

*** 'न खरो न च भूयसा मृदुः'**

**श्री. राजाभाऊंचे वागणे हे असे होते. त्यामुळे त्यांचा नैतिक दरारा आणि अकृत्रिम कौटुंबिक जिव्हाळा ह्यातून माणसे घडत गेली.** योग्य वेळी, फार नाही पण थोडेसे कठोर व योग्य वेळी फार मऊ न वागता त्यांनी माणसे घडवली; एवढेच नव्हे तर सोनाराच्या मृदू हातोडीने घाव घालून त्यांनी योग्य असे पैलू पाडून माणसातून कार्यकर्ते साकारले.

*** 'लोकसंग्रहमेवापि संपश्यन्, कर्तुमर्हसि।'**

**भगवान श्रीकृष्णांच्या ह्या सांगणीनुसार त्यांनी प्रचंड मोठा लोकसंग्रह केला.** त्यात गरीब–श्रीमंत, लहान–थोर, वर्ण–जात, स्त्री–पुरुष असा **कोणताही भेदभाव न मानता त्यांनी माणसे जोडली. कायमच बेरजेचे संबंध जोडून लोक आपलेसे केले. त्यामुळे कित्येकांना वाटे की, राजाभाऊंचा सर्वांत जवळचा मित्र 'मीच' आहे.**

संघाच्या मुशीतून तयार झालेल्या राजाभाऊंनी अनेकांना संघकार्याची प्रेरणा दिली.

*** 'एकोऽहं बहु स्याम् प्रजायेय इति।'**

संघात महानगर कार्यवाह होते. 'स्व'–रूपवर्धिनीत कै. किशाभाऊ पटवर्धन ह्यांच्या खांद्याला–खांदा लावून ते कार्य करीत. 'संस्कार भारती' ह्या संस्थेचे ते अध्यक्ष होते. 'ज्ञानदा' ह्या संस्थेची उभारणी करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. 'तरुण भारत'मध्ये अध्यक्ष व मुख्य संपादकही होते. 'शिक्षण प्रसारक मंडळींचे' उपाध्यक्षपदही त्यांनी भूषविले होते. पुणे शहर शिक्षकसंघाचे ते मार्गदर्शक होते. रमणबाग प्रशालेच्या सुवर्णमहोत्सव समितीचे ते कार्यवाह होते. 'आदर्श मित्र मंडळ' ह्या अभ्यासिकेचे ते अनभिषिक्त राजे होते. त्यांच्या वास्तूच्या सहकारी गृह रचना संस्थेचे ते कार्यवाह व अध्यक्ष होते. एवढेच नव्हे तर रमणबाग माजी विद्यार्थी संघटनेकडून 'रमणबाग भूषण' ह्या पदाचे सर्वप्रथम मानकरी म्हणून त्यांना गौरविण्यात आले.

आणीबाणीच्या काळात ते एक सत्याग्रही होते व त्यासाठी त्यांनी तुरुंगवासही भोगला. तसेच ५२ दिवसांच्या संपात त्यांनी येरवडा कारागृहात काही काळ शिक्षाही भोगली. **जेथे–जेथे अन्याय तेथे–तेथे तो मोडून काढण्यासाठी ते प्रयत्नशील असत.**

शिक्षक कसा असावा ह्याचा धडा त्यांनी स्व–आचरणातून घालून दिला. पाठ्यपुस्तके, फळा–खडू ह्यांचा वापर त्यांनी केला पण त्याचबरोबर त्यांनी विद्यार्थ्यांच्या हृदयालाही हात घातला. कष्ट करून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना ते आधार देत. त्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप देत असत. नाराज आणि निराश विद्यार्थ्यांच्या मनात ते आशेचे किरण

दाखवीत असत.

ज्यांना घरी अभ्यासास जागा नाही, विजेचा दिवा नाही, अशांच्या अभ्यासासाठी त्यांनी रमणबागेत 'आदर्श मित्र मंडळ' फुलविले. अशा मुलांना रात्री अभ्यासासाठी रमणबागेतील वर्ग देवविले, तेथे विजेची सोय केली. त्यासाठी आम्हा तरुण शिक्षकांना प्रेरणा दिली. मला आठवते मी स्वत: - श्री. भा. देवी व - श्री. विजय हरी वाडेकर व श्री. त्र्यंबकराव आपटे रोज रात्री शाळेत अकरा-साडेअकरापर्यंत बसत असू. शिवाय त्यात शाळेतीलच तज्ज्ञ शिक्षकांची इंग्रजी, मराठी, संस्कृत, शास्त्र व गणित ह्या विषयांवर मार्गदर्शक व्याख्यानेही आम्ही ठेवत असू. राजाभाऊंचे नाव घेतल्यावर कोणीही नाही म्हणत नसत.

*** 'असू आम्ही सुखाने पत्थर पायातील'**

१९६७-६८ चे वर्ष असावे. पूजनीय सरसंघचालकांच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन अनेकजण नोकरीत रजा घेऊन, कामधंदा दूर ठेऊन संघकार्यासाठी बाहेर पडले. माझ्याही डोक्यात तो विचार होताच. कै. मा. प्र. शं. जोशी ह्यांच्या सहकार्याने मला एक वर्ष 'Leave without pay' अशी रजा मिळाली. **मी संघकार्यासाठी बाहेर पडणार हे कळल्यावर रमणबाग शिक्षक-संघाने मला निरोप देण्याचा व सत्कार करण्याचा कार्यक्रम आखला. राजाभाऊंना हे कळले. त्यांनी मला सल्ला दिला. 'देव, संघकार्यकर्त्याने असे कधीही सत्कार स्वीकारू नये व निरोप समारंभात भाग घेऊ नये'. राजाभाऊंचा सल्ला मी ऐकलाच, कारण त्यांनी मला वरील पंक्ती ऐकवली.**

*** 'सर्वांच्या जिव्हाळ्याचे राजाभाऊ'**

राजाभाऊंनी सत्याग्रह केला. आणीबाणीच्या काळात हसत-हसत कारावास स्वीकारला. या वेळी त्यांनी शिक्षक सहकारी पतपेढीचे कर्ज काढले होते. शिक्षकांना ह्याची माहिती मी करून दिली. कोणालाही आग्रह न करता शिक्षकांनी आपण होऊन वर्गणी गोळा करून त्यांचे त्या-त्या वेळचे कर्जाचे हप्ते भरले. ह्याचे कारण सर्वच जण त्यांना आपले म्हणत, त्यातूनच त्यांनी जिव्हाळ्याच्या नात्याने त्यांचे कर्जहप्ते भरले.

*** 'घेता-घेता एक दिवस देणाऱ्याचे हात घ्यावे.'**

राजाभाऊ ७६ वर्षांचे झाले. अमृतमहोत्सव साजरा झाला. राजाभाऊ काही श्रीमंत नव्हते, पैसेवाले नव्हते. सामान्यच होते. पण समाजाप्रत आपले काही कर्तव्य असते, ह्या जाणिवेतून त्यांनी विविध संस्थांना देणग्या दिल्या. खारीचा वाटा म्हणा फार तर; पण त्यांनी एकूण रुपये ७५,०००/- रकमेच्या देणग्या दिल्या. बिनबोभाटपणे, प्रसिद्धी न करता. ह्याला म्हणतात 'निस्पृह कार्यकर्ता!'

*** 'वसुधैव कुटुम्बकम्।'**

भेटल्यावर प्रत्येक वेळी राजाभाऊ माझी चौकशी करत असत. माझ्या पत्नीची, मुलाची, सुनेची, नातवंडांची, एवढंच नव्हे तर वीस वर्षांपूर्वी विवाह झालेल्या माझ्या मुलीची सुद्धा विचारपूस करीत असत. एवढी कुटुंबं जोडलेली पण प्रत्येक कुटुंबात त्यांचे स्थान असे व त्यांची ते विचारपूस करीत असत. एवढंच नव्हे तर एका माजी विद्यार्थ्याला त्यांनी फारच मोलाचा सल्ला दिला. 'तुला आंतरजातीय विवाहाला तुझ्या घरच्यांची अनुमती नाही. पण मुलीला आणि मुलीच्या घरच्यांना जर विवाह पसंत असेल तर थांबतोस कशाला ? तशीच वेळ आली तर तू तिच्याशी विवाह कर ! मी तुझ्या निर्णयाच्या पाठीशी राहीन.' सामाजिक समरसतेचे दुसरे काय उदाहरण असू शकेल? आज त्या मुलाला व त्यांच्या पत्नीला जर राजाभाऊंविषयी ऋण वाटत नसेल तरच नवल! तो केव्हाही भेटला तरी ही आठवण सांगून राजाभाऊंविषयी कृतज्ञता व्यक्त करतो.

वयाच्या ८७ व्या वर्षी त्यांची प्राणज्योत मालवली खरी, पण त्यांची ज्ञानज्योत मात्र सदैव तेवत राहून तिने अनेकांच्या जीवनांना उजळवले.

'आनेवाला कल जानेवाला है'। पण त्यांच्या जीवनातील 'कल' चिरकाल रहनेवाला है। इति शम्।

# सार्वजनिक संस्थांचा आधारवड

**– प्रा. संजय विष्णू तांबट**

संत तुकाराम महाराजांनी संतांचे वर्णन 'ऐसी कळवळ्याची जाती । करी लाभाविण प्रीती।।' असे केले आहे. व्यावहारिक जगात जो-तो आपल्या स्वार्थासाठी धडपडत असताना इतरांवर निरपेक्षपणे मायेची पाखर धरणारेही आपल्या अवतीभवती असतात. राजाभाऊ लवळेकर हे त्यातीलच एक.

पुण्यातल्या काही ध्येयवेड्या शिक्षकांनी अडतीस वर्षांपूर्वी एकत्र येऊन एक संस्था सुरू केली. तीही पुण्याच्या पूर्व भागात. आधी काम सुरू झाले आणि मग तिला नाव मिळाले 'स्व'-रूपवर्धिनी. हे नाव आणि त्याचा अर्थ ज्यांनी आमच्या मनात खोलवर रुजवला त्यात राजाभाऊ अग्रभागी होते. वर्धिनीत प्रारंभीच्या काळात ज्यांची घडण झाली, ती आम्ही सारीच मुले भाग्यवान ठरलो. **आम्हाला एका नव्हे; तर दोन कृष्णांचे मार्गदर्शन मिळाले. कृष्णाजी लक्ष्मण पटवर्धन उर्फ किशाभाऊ आणि दुसरे कृष्णाजी गोविंद लवळेकर उर्फ राजाभाऊ. किशाभाऊंनी आम्हाला शिक्षणाच्या वाटेवर पुढे नेताना व्यावहारिक जगाचे भान दिले, तर राजाभाऊंनी जगाकडे पाहण्याची नवी दृष्टी दिली.**

राजाभाऊ विद्यार्थीप्रिय शिक्षक होते. पिंपरीतल्या हिंदुस्थान अँटिबायोटिक्सच्या शाळेत ते शिक्षक होते. नंतर न्यू इंग्लिश स्कूल, रमणबाग प्रशालेचे ते मुख्याध्यापक झाले. किशाभाऊंचा व त्यांचा आधीपासूनच परिचय होता. वर्धिनीत येणारी आम्ही मुले वेगवेगळ्या शाळांमध्ये शिकणारी होतो. **वर्धिनीच्या आमच्या पहिल्या तुकडीसाठी दहावीचे मार्गदर्शन-शिबिर रमणबाग शाळेत झाले. तेव्हा राजाभाऊंनी घेतलेला मराठीचा तास अजूनही स्मरणात आहे. कुसुमाग्रजांची 'पृथ्वीचे प्रेमगीत' ही कविता ते शिकवत होते. रूपकांचे-शब्दांचे अर्थ उलगडताना त्यांनी आम्हाला वेगळ्याच भावविश्वात नेले. त्यांच्याकडून आम्ही केवळ कवितेचा 'रसास्वाद' शिकलो नाही, तर जगण्यातल्या साध्यासुध्या गोष्टीही तरलतेने पाहायला शिकलो.**

राजाभाऊंची रसाळ वाणी त्यानंतरही अनेकदा कानी पडली. स्वच्छ उच्चार आणि शब्दांचे अलगद हात धरून येणारे तितकेच स्पष्ट विचार. संतांच्या वचनांची-विशेषतः तुकोबारायांच्या अभंगांची त्यात पखरण असायची. **'अणुरणिया थोकडा, तुका आकाशाएवढा' हे इतक्या वेळा आणि इतक्या संदर्भात त्यांच्याकडून ऐकले की, आपणही तुकोबा व्हावे ही ऊर्मी मनात दाटून यायची. गोपाळ गणेश आगरकरांचे समाजसुधारणेचे विचार पहिल्यांदा त्यांच्याकडूनच ऐकले. 'विचारकलहाला का भिता ?' हे सूत्र त्यांच्यामुळेच मनावर पक्के ठसले.**

'सहवासातून शिक्षण आणि शिक्षणातून संस्कार', हे वर्धिनीच्या कामाचे एक मध्यवर्ती सूत्र आहे. किशाभाऊ, राजाभाऊ व इतर जाणत्या शिक्षकांच्या सहवासातूनच वर्धिनीच्या कार्यकर्त्यांची घडण झाली. राजाभाऊंची भाषणे ऐकण्याबरोबरच त्यांच्याशी मनमोकळ्या गप्पांचा आनंदही मोठा होता. वर्धिनीच्या स्थापनेआधीची एक गोष्ट राजाभाऊ नेहमी सांगायचे. पुण्याच्या पूर्व भागामधल्या पेठा आणि उपेक्षित वस्त्यांमधील गुणवान विद्यार्थ्यांसाठी वर्धिनी सुरू करण्यासंबंधी किशाभाऊ व त्यांचे सहकारी अनेकांशी विचारविनिमय करत होते. त्यावेळी तु. ना. माताडे हे एक शिक्षक आमदार होते. 'पूर्व भागात तुम्ही फार काळ काम करू शकणार नाही', असे माताडे त्यांना म्हणाले. तेव्हा किशाभाऊ आणि सहकाऱ्यांनी ते आव्हान म्हणून कसे स्वीकारले, हा किस्सा राजाभाऊ आवर्जून सांगत. राजाभाऊंमुळे रमणबागेतले इतरही अनेक शिक्षक वर्धिनीत शिकवायला येत. भारत हायस्कूलसारख्या इतर शाळांमधले शिक्षकही त्यात सहभागी होते. सुरुवातीच्या काळात या प्रेमळ आणि ध्येयवादी शिक्षकांचे बळ लाभल्यानेच वर्धिनीच्या कामाचे रोपटे जोम धरू शकले, हे इथे नम्रपणे नमूद करायला हवे.

**'कोणत्याही संस्थेचा विकास होत असताना त्याला स्वत:ची एक स्वाभाविक गती आणि दिशा असते',**

**असे राजाभाऊ नेहमी सांगायचे. त्याला ते 'क्रमशः विकास' असे म्हणायचे.** त्यामुळे कार्यकर्त्यांनी घाई करून उपयोगाची नाही; संस्था मोठी होत जाते तसे त्या टप्प्यावर पुढचे उपक्रम दिसू लागतात, असा त्यांचा कायम सल्ला असे. त्याचबरोबर **वर्धिनीसारख्या संस्थांचे काम समाजातली सज्जन शक्ती जागवण्याचे आणि संघटित करण्याचे आहे, असे ते आवर्जून सांगत.** लोक अनेकदा मोठे विचार सांगतात; पण त्यांचा व्यवहार मात्र तसा नसतो. राजाभाऊ त्याला अपवाद होते. संपर्कात येणाऱ्या सर्व विद्यार्थी, शिक्षक, कार्यकर्त्यांशी त्यांचे बोलणे अतिशय आपुलकीचे आणि सलगी देणारे असे. **सार्वजनिक संस्था-संघटनांमध्ये काम करणाऱ्यांना केव्हाही भेटता येईल आणि मोकळेपणाने बोलता येईल, अशी एखादी व्यक्ती हवी असते. राजाभाऊ आमच्यासाठी असे हक्काचे स्थान होते. केव्हाही अस्वस्थ वाटायला लागले की, राजाभाऊंकडे जावे आणि पुढच्या कामासाठी नवी उभारी घेऊन बाहेर पडावे, असे अनेकदा झाले आहे.** किशाभाऊंनी वयोमानामुळे कार्याध्यक्ष पदाची सूत्रे खाली ठेवली, तेव्हा वर्धिनीच्या जुन्या-नव्या कार्यकर्त्यांना नेणते मार्गदर्शन करणारे राजाभाऊच होते.

**मित्र, तत्त्वज्ञ आणि वाटाड्या अशी 'मितवा'ची ही भूमिका राजाभाऊंनी केवळ वर्धिनीसाठी नव्हे, तर अनेक संस्थांसाठी बजावली.** 'सार्वजनिक संस्थांचा आधारवड' असे त्यांचे वर्णन सार्थ ठरावे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पुणे महानगराचे कार्यवाह म्हणून हजारो स्वयंसेवकांचे ते आधार बनले. संघाच्या प्रेरणेतून 'संस्कार भारती'चे काम नव्याने सुरू झाले, तेव्हा पश्चिम क्षेत्राची जबाबदारी राजाभाऊंकडे होती. कलाक्षेत्रात नवी संस्था उभारण्याचे आणि अनेक कलाकार तिला जोडण्याचे काम राजाभाऊंनी सहजतेने केले. भारतीय दृष्टिकोनातून कलेकडे कसे पाहायचे, याची वैचारिक मांडणी त्यांनी समर्थपणे केली. पुण्यातल्या दैनिक तरुण भारतचे संपादक म्हणून त्यांनी काही काळ काम केले. हे वृत्तपत्र केव्हाही बंद पडेल अशा स्थितीत असताना राजाभाऊंनी संघाने सांगितले म्हणून ही जबाबदारी स्वीकारली. संपादकपदाची धुरा तर त्यांनी समर्थपणे सांभाळली; पण तरुण भारत बंद झाल्यावरही नंतर अनेक वर्षे त्यासंबंधीचे दावे आणि कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडवण्यात त्यांची मोठी शक्ती खर्च झाली. शिक्षण प्रसारक मंडळीच्या नियामक मंडळाचे सदस्य म्हणूनही राजाभाऊंचा एक प्रकारचा नैतिक धाक होता. कर्वेनगरमधल्या ज्ञानदा प्रशालेच्या स्थापनेत आणि विकासातही त्यांचा महत्त्वाचा सहभाग होता.

बाहेर अनेकांचे असे आधार होताना, राजाभाऊंचा घरातला वावरही तितकाच कुटुंबवत्सल होता. त्यांचे संपूर्ण घरच संघाच्या कामाला-सार्वजनिक कार्याला-वाहिलेले असल्यासारखी स्थिती होती आणि आजही आहे. गेल्या काही वर्षांत वयोमानाप्रमाणे राजाभाऊंचे शरीर थकले. मधुमेहामुळे हालचालींवर मर्यादा आली. ऐकणे-दिसणेही कमी झाले. शरपंजरी पडलेल्या भीष्मासारखीच जणू त्यांची स्थिती झाली होती; तरीही त्यांचे मन अर्जुनाचे सारथ्य करणाऱ्या कृष्णासारखे कार्यकर्त्यांशी बोलण्यासाठी आसुसलेले असे. **त्यांच्या नजरेतून आणि स्पर्शातून कामाविषयीची तळमळ-त्यांच्याच भाषेत सांगायचे, तर- 'ये हृदयीचे ते हृदयी' झिरपत असे. राजाभाऊंची ही तळमळ आणि कार्यकर्त्यांविषयीचा अकृत्रिम जिव्हाळा आपल्या सर्वांच्या हृदयात असाच चिरकाल पाझरत राहावा आणि पुढच्या पिढ्यांकडे 'हृदयांतरित' होत रहावा, हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.**

- मो. : ९८८१०९८१०७

❖❖❖

निर्णय घेताना आणि निर्णय देताना भाऊ तुमचा मानसिक समतोल पदोपदी दिशा देत राहतो.

**- सौ. भाग्यश्री**

# आनंद स्वर्गीय सुखाचा !!

**– शरद तथा बापूराव घाटपांडे**

१९९० चे दशक होते ते. राजाभाऊ पुणे शहर (तोपर्यंत महानगर झाले नव्हते) कार्यवाह होते. मला सहकार्यवाहपदाची जबाबदारी दिली होती. शहराचे काम कसे करावे हे मी त्यांच्याकडून समजावून घेत होतो. शहरातील प्रवासाबरोबरच अनेक बैठकांमधून मी ते धडे घेत होतो. पण त्यापूर्वीचेही राजाभाऊ माझ्या डोळ्यासमोर येतात.

माझे घर मोतीबाग कार्यालयाला लागूनच होते. राजाभाऊही शनिवार पेठेतच हसबनीस बखळीशेजारी राहात होते. भाऊंनी मला एके दिवशी हाक मारली, मी बाहेर आलो. राजाभाऊंचे ते स्वरूप माझ्या डोळ्यासमोर कायमच राहिले आहे. सायकलवर एक पाय टाकलेला, पांढरी हाफ पँट, निळा सदरा आणि पिशवी गळ्यात अडकवलेली. शेजारी उभे होते, शरदराव थिटे आणि बोलणे चालू होते शाखांसंबंधीचे.

भाऊंची भेट केव्हाही होवो. त्यांचे बोलणे नेहमीच गंभीर वाटावे असे, अगदी कळकळीचे. जणू 'चिंता करितो विश्वाची' वाटावे असे. विषय अनेक असले तरी संघशाखांचा विषय त्यात प्राधान्याचा. एकेका कार्यकर्त्याचा उल्लेख आदराने असायचा. त्याकाळी घरी फोन नव्हते. 'स्कूटर' युग सुरू झाले नव्हते. टी.व्ही नव्हता. मोबाईलची तर कल्पनाही नव्हती. सांगायचे कारण म्हणजे कोणाशीही संपर्क करायचा म्हणजे प्रत्यक्ष घरी जायचे. घरच्या सर्वांचा परिचय ही स्वाभाविकच गोष्ट होती. **राजाभाऊ एकेका कार्यकर्त्याच्या घरी जात. संघशाखेसाठी वेळ काढण्याचे व संघकाम वाढविण्यासाठीचे तळमळीचे बोलणे करायचे. एकेकाला पक्का कार्यकर्ता बनविण्याचे हे कार्य नित्य चालू असायचे. त्याची अडचण असेल ती जाणून घ्यायची. त्यातून मार्ग काढून द्यायचा त्याला. त्यांच्या कृतीतूनच इतरांना शिक्षण मिळत असे.**

**मातृहृदयाचा साक्षात्कार...!**

माझे भाग्य असे की माझ्या माध्यमिक शिक्षकी जीवनाच्या प्रारंभीच्या शैक्षणिक वर्षातच (१९६०-६१) मला राजाभाऊंचे सान्निध्य लाभले. त्या एका वर्षातील अनुभव मला आयुष्यभरासाठी मार्गदर्शक ठरले. ते एक वर्षभर मी रमणबाग शाळेत शिक्षक होतो.

त्यावर्षी शालेय कामकाजातील शारीरिक शिक्षणापैकी सूर्यनमस्कार स्पर्धांसाठी विद्यार्थ्यांची तयारी करून घेण्याची जबाबदारी मला देण्यात आली होती. मला त्या विषयात थोडा अनुभव नक्की होता. मी माझ्या कुवतीप्रमाणे तयारी करूनही घेतली. प्रत्यक्ष आंतरशालेय स्पर्धा झाल्या. त्या दिवशी मला धीर देण्यासाठी व विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी राजाभाऊ जातीने उपस्थित राहिले. खरं म्हणजे तो त्यांच्या ड्यूटीतील भाग नव्हताच. मग का बरं भाऊ तिथं आले असतील? नक्कीच आपल्या नव्या सहकाऱ्याला धीर देण्यासाठीच !

या विषयासाठी शाळेतून मिळणारे मानधन स्वीकारण्याच्या स्थितीत मी नव्हतो. अनेक दिवस उलटून गेले. तरी ते मी घेतले नव्हते. एक दिवस भाऊंनी मला बाजूला घेतले. माझी समजूत घातली. म्हणाले, 'मानधन म्हणून घ्यायचे की नाही ते तुम्ही ठरवा. पण घेतलेत तर तुमचे गुरुदक्षिणा समर्पण वाढू शकेल. बघा विचार करा.'

त्याच वर्षांत भाऊंनी त्यांच्या वर्गांची (बहुधा इयत्ता नववी) सायकलवरून थोड्या अंतरावरची मुक्कामाची सहल काढली होती.

मीही सहशिक्षक म्हणून सहलीत बरोबर गेलो होतो. रात्री जेवणानंतर मुलांचे करमणुकीचे कार्यक्रम झाले. सारेजण झोपण्यास गेले आणि **नंतर तासभराने भाऊ फेरी मारण्यास निघाले. कोणाला झोप येत नसेल तर त्याच्या पाठीवरून हात फिरवून त्याला झोपवायचे, कोणाच्या अंगावरील पांघरूण सरकले असेल तर त्याला पांघरूण घालायचे असे करीत-करीत सर्वांमधून एक फेरी मारून मगच सर्वांत शेवटी भाऊ स्वत: झोपण्यास गेले आणि पहाटे सर्वांच्या आधी उठून सर्वांचा चहा स्टोव्हवर ठेवला. मातृहृदय म्हणजे वेगळे काय असते ?**

**खरा आनंद**

'आजच्या कार्यक्रमामुळे मला स्वर्गीय सुखाचा आनंद मिळाला.' हे उद्गार होते, राजाभाऊ लवळेकरांचे. तसा तो एक नेहमीसारखाच कार्यक्रम होता. दर महिन्याच्या तिसऱ्या बुधवारी सकाळी एक तासभर पुणे महानगरातील जुने-जुने स्वयंसेवक मोतीबाग संघ कार्यालयात एकत्र येत असतात. आणीबाणीपूर्व काळात ज्यांनी आपली शक्ती खर्च करून संघशाखा वाढविल्या असे कार्यकर्ते येत; तर असे काहीजण या बैठकींना येत की ज्यांनी संघप्रेरणेने चालणाऱ्या अनेक संस्था-संघटनांची जबाबदारी अनेक वर्षे समर्थपणे सांभाळली होती.

अशा या मासिक नियमित बैठकीत श्री. भाऊंना मुद्दाम निमंत्रित केले होते. कारण स्पष्टच होते की एकेकाळी अशा जुन्या-जुन्या स्वयंसेवकांसमवेत काम केलेले भाऊ एक कार्यकर्ते होते. आत्ताच्या वृद्धापकाळातील त्यांच्या शारीरिक स्थितीमुळे ते दरवेळच्या बैठकीला येऊ शकत नव्हते. पण बैठकीला येणारे बहुधा सर्वच जण त्यांना सुपरिचित होते. म्हणूनच त्या दिवशीच्या बैठकीत नेहमीचे काही कार्यक्रम बाजूला सारून केवळ भाऊंच्या उपस्थितीलाच प्राधान्य होते. बैठक प्रमुखाने तो उद्देश स्पष्ट करून सांगितला नि पुढे घडले ते असे-

एक-एक कार्यकर्ता आपल्या जागेवरून उठे. राजाभाऊंच्या खुर्चीजवळ येई. आपला हात राजाभाऊंच्या हातात देई आणि सांगे 'मी नाना क्षीरसागर'. त्या स्पर्शातून परस्परांच्या संवेदना दोघांच्या हृदयापर्यंत पोहोचत. राजाभाऊंचे स्मरण पक्के होते. ते विचारीत, 'आपल्या प्रिन्सिपलबाई (सौ. वहिनी) बऱ्या आहेत ना! आणि डॉक्टर कन्या काय म्हणतात (डॉ. प्राची साठे), आणि थोडा वेळ हातात-हात घेऊनच परस्परात संवाद होई. मग नाना विनम्रतेने हात सोडवून घेऊन एका अद्भुत आनंदात जागेवर येऊन बसत. असेच सुरू झाले. 'मी प्रभाकर आपटे'; 'मी हरि लोकगादीवार (तुमचा छबू)' 'मी बाळू (परचुरे)', की राजाभाऊ अधिक विनम्र होत. एक-एक करीत सर्वांचा क्रम झाला. कोणाच्या मुलामुलींची तर कोणाच्या पत्नींची (वहिनी) नावे घेऊन राजाभाऊ विचारपूस करीत होते. सारेजण आप्तेष्टच होते. परस्परांच्या चेहऱ्यावर आनंद व समाधान प्रकटत होते. राजाभाऊंचा चेहरा आनंद भरून पावल्यासारखा दिसत होता.

तासाभराच्या कार्यक्रमाच्या शेवटी ध्वजारोहण व संघप्रार्थना झाली. सर्वांचे चहापान झाले. घरी जाण्याची वेळ आली. प्रसाद (मुलगा) पुढे आला. **भाऊंनी माझा हात हातात घेतला. म्हणाले 'बापू, आज सर्वांच्या भेटी खूप खूप दिवसांनी झाल्या. मला स्वर्गसुखाचा आनंद झाला.'**

**खरेच होते ते. 'शुद्ध सात्त्विक प्रेम अपने कार्य का आधार है' या मंत्राचे जणू दर्शनीय रूपच अनुभवास मिळाले होते.** भाऊ महानगराचे कार्यवाह राहिले होते. दै. तरुण भारत वृत्तपत्राचा संसारही त्यांनी शिरावर घेतला होता. स्वरूपवर्धिनी तर त्यांचीच होती म्हणाना! या व अशापैकी अनेकांच्या भेटीचे स्पर्शसुख त्यांना अनुभवायला मिळाले. **संघकार्य संघस्थानापुरते राहात नसते, तर घराघरातील सर्व व्यक्ती त्यात सहजपणे सामावल्या जातात.**

**स्वर्गसुखाचा आनंद म्हणजे हेच तर असेल! नव्हे का!**

– मो. : ९८५०५६०२८०

❖❖❖

कुणाला दुखावतील असा भाऊंचा स्वभावच नव्हता. उलट जर कुणी त्यांना दुखावलं असेल तर सगळं विसरून जाऊन ते दुखावणाऱ्यालाच केव्हा जवळ करीत असत ते त्यालाही कळत नसे.

**– आलोक भागवत**

## वाचेचा रसाळ – मनाचा मवाळ

**– प्रा. अनिरुद्ध देशपांडे**

**एखादे व्यक्तिमत्त्वच असे असते की त्याच्या सात्त्विकतेची जाणीव अगदी प्रथमदर्शनीच होते. राजाभाऊ लवळेकरांचे व्यक्तिमत्त्व असे होते.** माझा त्यांचा परिचय संघकार्यामुळे झाला. एका संघशिक्षावर्गात रात्रीच्या सत्रात राजाभाऊंनी खण्डो बल्लाळाची कथा सांगितली. कथाकथनाची शैली आणि सर्वांना गुंगवून टाकीत ओघवत्या वाणीचा प्रभाव माझ्या कायमचा लक्षात राहिला.

राजाभाऊंचे स्मरण संघ संदर्भाशिवाय पूर्ण होणे शक्य नाही. गृहस्थी जीवन जगत असतानाही आणि शिक्षकी व्रताचे मनापासून पालन करीत असतानाही त्यांनी आपल्या जीवनात संघकार्यास सर्वप्रथम स्थान दिले होते. राजाभाऊंनी अनेक जबाबदाऱ्या सांभाळल्या. ते ज्या कालखण्डात पुणे महानगराचे कार्यवाह होते त्यातील काही कालखण्डात मी त्यांचा सहकारी होतो. मी पुणे महानगराचा तेव्हा सहकार्यवाह होतो. प्रत्येकच कामात मी बरोबर राहिलो. त्यापूर्वीचा माझा बराच काळ विद्यार्थी–परिषदेच्या कामात गेल्यामुळे संघकार्यातील अनेक तपशील मला नवीन होते. मी अशा वेळी राजाभाऊंशी बोलत असे. **थोरल्या भावाने समजावून सांगावे तसे ते मला समजावून देत असत. सर्वात जाणवणारी गोष्ट आठवते म्हणजे त्यांचा समन्वयवादी स्वभाव.** समस्या असतच. कार्यकर्त्यांबाबत काही कडू–गोडही असे. मोकळ्या वेळात मी त्यांच्याशी बोलत असे. **स्वभावातील सरळपणा आणि संबंधिताच्या अनुपस्थितीत अवास्तव टीका चुकूनही न करण्याची त्यांची कार्यपद्धती मला खूप काही शिकवून जात असे.** हा कालखण्ड फार मोठा नव्हता पण माझ्या मात्र कायम लक्षात राहणारा होता. दिवसभराची शाळा आटोपून, संध्याकाळी एखाद्या शाखेवर जाऊन आणि बहुतेक वेळा तसेच बैठकीला बसून राजाभाऊ रात्री घरी परतत असत. मोपेड वाहनावरून पद्मावतीपर्यंतचा त्यांचा प्रवास असे. अशा त्रासाला त्यांनी कधी त्रास मानले नाही. **अत्यंत संवेदनशील असणारे राजाभाऊ वाचेचे रसाळ होते.** त्यांच्या बोलण्यात कटुता तर नव्हतीच **किंबहुना रसाळ वाचेतून व्यक्त होणारे भाव कार्यपूर्तीचीच हमी देत असत.** हे पहात–पहात शिकण्याचा मी प्रयत्न करीत असे.

संघकार्याचा विस्तार आणि विकास विविध आयामांच्या माध्यमातून व्यक्त होतो. स्त्री–शक्ती जागरणाचे कार्य हा असाच एक आयाम आहे. १९७५–७७ च्या आणीबाणीनंतर सामाजिक समरसतेच्या कार्याने जसा वेग घेतला तसेच स्त्री–शक्ती जागरणाच्या आयामानेही गती घेतली. स्वर्गीय नाना ढोबळे त्याचे प्रवर्तक होते. नानांनी राजाभाऊंना या कार्यात सहभागी होण्यास सांगितले. मलाही त्यात काहीसे काम करण्याची संधी मिळाली. समाजजीवनाच्या विविध क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढावयास हवा यासाठी योजनांना सुरुवात झाली. प्रथमतः संघाची भूमिका स्पष्ट करण्याचेच महत्त्वाचे काम होते. संघशाखेत नसल्या तरी स्थापनेपासूनच महिलांचा संघात सहभाग आहे हे समजावून सांगण्याची राजाभाऊंची शैली मी अनुभवली. मातृशक्ती जागरण आणि स्त्री–पुरुष भेद विरहित दृष्टिकोन यांची मांडणी स्व. नाना आणि स्व. दामुअण्णा दाते यांचे बरोबर राजाभाऊही करीत असत. या परिश्रमांचे फलित आज आपल्याला अनुभवण्यास मिळत आहे.

स्व. किशाभाऊ पटवर्धनांनी 'स्व'–रूपवर्धिनीची कल्पना मांडली. एका नव्या शैक्षणिक–सामाजिक (Socio-Educational) प्रतिमानाची (Model) ती कल्पना होती. आज ती किती विकसित झाली आहे ते आपण पहात आहोत. उपेक्षित, वंचित आणि अभागी समाजाचे साहित्यातील वर्णन आणि कृतिशून्य भाषणे याचा समाजास अनुभव येत असतानाच एक विधायक प्रतिमान साकार होत होते. शिरीष पटवर्धन सारख्या कर्तृत्ववान तरुणाची या कामासाठी निवड हे त्यातील दूरदृष्टीचे प्रतीक होते. अशा **उपेक्षित आणि वंचितांना संधीच्या उपलब्धतेबरोबरच प्रखर राष्ट्रवादाचे शिक्षण दिले जाते. राजाभाऊ या कार्यातील स्थापनेचे एक शिल्पकार होते.** या विद्यार्थ्यांच्या घरच्या परिस्थितीचे वर्णन मी अनेकवेळा राजाभाऊंकडून ऐकले आहे. संवेदनशीलतेचा संस्कार कालातीत असतो याचा प्रत्यय मला त्यातून

येत असे. मंगळवार पेठेतील आपले काम संपवून राजाभाऊ रात्री उशीरा घरी परतत असत. ही संवेदनशीलता राजाभाऊंच्या मवाळ मनाची साक्ष होती. **जाती-पातीच्या पार पलीकडे जाऊन सामाजिकतेचे भान परिस्थितीच्या प्रतिकूलतेतही प्रभावीपणे उत्पन्न करता येते, हे 'स्व'-रूपवर्धिनीचे आजचे वैशिष्ट्य ज्यांच्या कार्यातून आणि प्रेरणेतून साकार झाले, त्यांतील राजाभाऊ एक प्रमुख होते.** असेच काहीसे कार्य पुण्याच्या पश्चिम भागात असणाऱ्या, परंतु उपेक्षित मुलांची म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ज्ञानदा प्रशाळेच्या रूपाने उभे राहिले. राजाभाऊंच्या तेथील सहभागाचाही उल्लेख मला करावासा वाटतो.

आणखी एका आगळ्या सहवासाचा मला आवर्जून उल्लेख करावयाचा आहे. राजाभाऊ डे.ए.सोसायटीच्या रमणबाग प्रशालेचे मुख्याध्यापक होते. अतिशय विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून त्यांची ख्याती होती. विद्यार्थ्यांच्या अनेक पिढ्या त्यांनी शब्दशः घडवल्या. **क्रमिक पाठ्यक्रमाशिवाय राजाभाऊंची रसाळ वाचा आणि मवाळ मन याचे संस्कार विद्यार्थ्यांचे जीवन घडवणारे होते हे मी जाणून होतो.** मी डेक्कन एज्युकेशन सोसायटीचा आजीव सभासद होतो. आमच्या कार्यपद्धतीनुसार आमच्यापैकी प्रत्येकालाच कोणत्या ना कोणत्या संस्थेच्या व्यवस्थापन मंडळावर चेअरमनपद घ्यावे लागत असल्याने अधिकारी म्हणून काम करावे लागत असे. मी रमणबाग प्रशालेच्या व्यवस्थापन मंडळावर या दोन्ही भूमिकांमध्ये काही वर्षेहोतो. काही समस्याही पुढे येत असत. राजाभाऊंच्या प्रशासनाचा मी अनुभव घेतला. आवश्यक त्या ठिकाणी त्यांच्या भूमिकेतील निश्चलतेचाही मी अनुभव घेतला. मी काही काळ अध्यक्ष होतो. बैठका औपचारिक असायच्या म्हणून अध्यक्षांचे आसनही निश्चित असायचे. राजाभाऊ आणि अरविंदराव हर्षे ही दोन्ही व्यक्तिमत्त्वे अशी होती की मी कधीही अध्यक्षपदाच्या खुर्चीत त्यांचेसमोर बसलो नाही. अतिशय स्वाभाविकपणे ते होत असे. स्वतः राजाभाऊ आग्रह करीत असत पण मी माझ्या भावनेत चूक केली नाही. यात माझा अहंभाव मुळीच नाही. राजाभाऊंच्या व्यक्तिमत्त्वाचा तो अत्यंत स्वाभाविक प्रभाव होता.

आणखी बऱ्याच छोट्या-मोठ्या गोष्टी आठवत आहेत. त्या सांगायच्या म्हटले तर 'मी' म्हणून त्यात उल्लेख ओघाने येईल. माझ्या वरील निवेदनात तो आला आहेच. आधिक्य होऊ नये म्हणून ते करण्याचे मी टाळतो. एक आठवण उद्धृत करण्याचा मोह होत आहे. बौद्ध भिख्खु भदन्त सदानंद कानिटकर रमणबाग प्रशालेत एकदा सुटीतील संस्कारवर्ग चालवत होते. त्यांचा राजाभाऊंशी झालेला एक संवाद मला आठवतो. सदानंदजी राजाभाऊंना विचारत होते की 'शिक्षकाने विद्यार्थ्याला मारावे का ? शिक्षा देत असताना बऱ्याच वेळा मारले जाते.' राजाभाऊंचे उत्तर म्हणजे त्यांचे विद्यार्थ्याप्रती असलेल्या भावनेचे प्रतीक होते. राजाभाऊ म्हणाले, 'आवश्यकच असेल तर मारावे पण आईच्या ममतेने मारावे.' या त्यांच्या उत्तरात बरेच काही सामावलेले होते.

राजाभाऊंच्या तब्येतीला नंतरच्या काळात बराच त्रास झाला हे मी पाहिले. कदाचित् कष्टांच्या प्रभावानेही ते घडले असेल. आपल्या घरात संघ असावा असे प्रत्येक स्वयंसेवकाला वाटत असतेच. परंतु सगळीकडे ते साध्य होतेच असे नाही आणि त्यात काही अस्वाभाविकही नाही. राजाभाऊंच्या कुटुंबात संघपणाचा अनुभव नेहमी येतो. आजही त्याचा अनुभव यत्किंचितही कमी झालेला नाही. विद्यार्थी परिषदेची पूर्णवेळ कार्यकर्ती सौ. शोभना भिडे पुण्यात होती. राजाभाऊंकडेच रहात होती. आपल्याच घरासारख्या वातावरणाचा अनुभव तर तिला मिळत होताच पण पूर्णकालिक कार्यकर्ता कसा असावा, कार्याचा विकास कसा असावा, कोणत्या पथ्यांचे पालन करावे हे राजाभाऊ अतिशय हळुवारपणे तिला सांगत असत हे मी जाणतो.

राजाभाऊंच्या निधनाने आपल्यातील ज्येष्ठ सुहृद आपल्यात नाही ही जाणीव तीव्रतेची आहे. **'वाचेचा रसाळ-मनाचा मवाळ' या संयुक्ताची आठवण झाली ती समर्थ रामदासांच्या एका श्लोकामुळे -**

**दीनाचा दयाळू - मनाचा मवाळू । स्नेहाळू कृपाळू जनी दास पाळू ।**
**तया अंतरी क्रोध संताप कैंचा । जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।**

- मो. : ९८९०३५९३४२

# स्वयंसेवकांचे पालक

**– विनायक डंबीर**

कृष्णवर्ण, सहा फूट उंची, रुबाबदार व्यक्तिमत्त्व असलेल्या राजाभाऊंशी गेल्या ५० वर्षांचा असलेला ऋणानुबंध ८ जून २०१६ रोजी त्यांच्या दु:खद निधनामुळे संपला. न्यू इंग्लिश स्कूल रमणबागेत शिक्षक, पर्यवेक्षक, मुख्याध्यापक असलेल्या राजाभाऊंचे व्यक्तिमत्त्व प्रभावी होते. आरंभी ते नवीन मराठी शाळेत लेखनिक होते.

M.A., B.T. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर रमणबाग प्रशालेत त्यांनी शिक्षक ते मुख्याध्यापक असे काम केले. ते मनापासून पोटतिडकीने शिकविणारे, विद्यार्थिप्रिय शिक्षक होते. त्यांच्या वागण्याचा, आचरणाचा, व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव शाळेत प्रकटपणे जाणवायचा. विद्यार्थ्यांना त्यांच्याविषयी आदरयुक्त धाक वाटायचा. शाळेतील शिक्षकांशी राजाभाऊंचा वैयक्तिक, घरगुती परिचय असे. कोणाच्याही अडीअडचणीत ते मदतीला कायम तत्पर असत. विद्यार्थ्यांशी त्यांचे वागणे जवळकीचे, सहानुभूतिपूर्ण असे. शाळेत ते आदर्श विद्यार्थी मंडळ चालवायचे. **१९७० साली अकरावीच्या वर्गात मराठीच्या तासाला पसायदान, गीत रामायणातील 'पराधीन आहे जगती..' या कवितांचे त्यांनी केलेले विश्लेषण आजही आठवते.** शाळेतील सर्व उपक्रमांत त्यांचा सक्रिय सहभाग असे. **कार्यक्रम उत्तम व प्रभावशाली होण्यासाठी राजाभाऊ स्वत:ला झोकून देत असत.**

शिक्षक म्हणून असलेले शाळेतील दायित्व सांभाळत असताना त्यांनी संघकामातही कधी कसूर केली नाही. शाळेव्यतिरिक्त उरलेला सर्व वेळ संघाचे काम, शाखा संपर्क सातत्याने सुरू असायचे. **स्वयंसेवक म्हणून त्यांचे पहिले दर्शन झाले ते त्यांच्या घराजवळील शनिवार पेठेत असलेल्या हसबनीस बखळीत भरणाऱ्या हरिहरेश्वर शाखेच्या संघस्थानावर. ते स्वत: फावडे, घमेले घेऊन संघस्थान स्वच्छ करीत होते. प्रथमत: विश्वासच बसेना. हेच का ते रमणबागेत शिक्षक असणारे राजाभाऊ? पण ते राजाभाऊच होते. एक स्वयंसेवक म्हणून जे करणे आवश्यक ते सर्व करणारे राजाभाऊ.**

मंडल, तालुका कार्यकर्ता, महानगर सहकार्यवाह, महानगर कार्यवाह असे सर्व दायित्व, झोकून देऊन सहजपणे पार पाडणारे राजाभाऊ मुंढवा-हडपसर या ठिकाणी रोज संध्याकाळी शाखा घ्यायला जायचे. शाखेनंतर संपर्क, भेटीगाठी करून रात्री उशिरा घरी परतायचे.

**राजाभाऊ म्हणजे एका अर्थाने संघशरण, निष्ठावान स्वयंसेवक कार्यकर्ता असे व्यक्तिमत्त्व होते.** मात्र शाखेबरोबरच स्वरूपवर्धिनी, ज्ञानदा प्रतिष्ठानचे संस्थापक सदस्य, शि. प्र. मंडळीचे संचालक, संस्कार भारतीचे पश्चिम क्षेत्राचे अध्यक्ष, एकता मासिकाचे व्यवस्थापक, दै. तरुण भारतचे संपादक, हिंदुस्थान जागरणचे काम करणारे, मुकुंदराव कुलकर्णी व तुकाराम माताडे यांचे शिक्षक, यांच्यासमवेत शिक्षक संघटनेसाठी काम करणारे राजाभाऊ अशी त्यांची विविध रूपे आहेत.

तसे पाहिले, तर त्यांची घरची सांसारिक स्थिती खूप चांगली नव्हती. भावडांमध्ये ते ज्येष्ठ होते. त्यामुळे घरातही सर्व प्रकारच्या जबाबदाऱ्या होत्या. धाकट्या बहिणीचे लग्न, आई-वडिलांची सेवा, दोन मुली व एक मुलगा यांचे शिक्षण या सर्व जबाबदाऱ्या त्यांनी शनिवार पेठेतील दोन खोल्यांमध्ये थाटलेल्या संसारात हसतमुखाने पार पाडल्या. आलेल्यांचे आदरातिथ्य करणे, येणाऱ्या प्रत्येकाच्या हातावर काहीतरी खायला देणे ही त्यांच्या घरची रीत होती. शनिवार पेठेतून पद्मावती येथे स्वत:चे घर बांधल्यानंतरही सुरुवातीला काही काळ राजाभाऊ सायकलवरून शाळेत यायचे. शाळेनंतर संघाचे काम, गाठीभेटी, संपर्क करूनच रात्री उशिरा घरी परतायचे. राजाभाऊ उत्तम वक्ते होते. अत्यंत प्रभावी, अंत:करणापासून बोलायचे. आणीबाणीच्या कालावधीत संघावर बंदी आली तेव्हा त्यांनी सत्याग्रह केला. त्याआधी अनेकांनी सत्याग्रहात सहभागी व्हावे म्हणून बैठका घेतल्या. 'सत्याग्रहामुळे नोकरी गेली तरी चिंता नाही,

भाजी विकण्याचा व्यवसाय करेन' असे म्हणायचे. त्यांच्या बोलण्याने प्रभावित होऊन त्या वेळी अनेक स्वयंसेवकांनी सत्याग्रहाचा निर्णय घेतला.

केवळ आणीबाणी नाही, तर इतर अनेक प्रसंगात, अनेक विषयांवरील त्यांचे बोलणे अभ्यासपूर्ण असे. हिंदू सण व व्रतवैकल्ये यामागील विचार, विज्ञान, परंपरा अतिशय उत्तम पद्धतीने विषय मांडत असत. अनेक कार्यकर्त्यांची, अधिकाऱ्याची जीवन-चरित्रे प्रभावीपणे मांडत असत.

**संघाचे सर्व प्रकारचे काम करताना स्वयंसेवकांना ते आधार वाटायचे. राजाभाऊ आपले पालक आहेत, असे वाटायचे. असा त्यांचा सर्वांशी व्यवहार असायचा.** अनेक घरांशी व्यक्तिगत संपर्क, घरातील प्रत्येकाचा परिचय, सखोल माहिती त्यांना होती. अनेकांच्या घरातील निर्णय राजाभाऊंच्या सल्ल्यानेच होत. अनेक स्वयंसेवकांच्या घरातील विवाह ठरविण्याच्या बैठकीस राजाभाऊंची उपस्थिती आवर्जून असायची. अनेक स्वयंसेवकांच्या व्यक्तिगत समस्या सोडवणे, त्यांना समोरासमोर बसवून पहाटेपर्यंत चर्चा करून, समजावून सांगून त्या योग्य पद्धतीने सोडवणे हेही त्यांनी केले आहे. स्वयंसेवकांच्या घरातील वातावरणासंबंधी स्वयंसेवकांशी चर्चा, चौकशी करत. बदलाची गरज वाटत असेल तर त्यासाठी आग्रह धरत. अनेक स्वयंसेवकांच्या घरातील वातावरणात झालेल्या बदलाच्या मागे राजाभाऊच असायचे. एक कार्यकर्ता पदवीधर होण्याआधी नोकरीला लागला. त्याचे पदवीधर होणे हे राजाभाऊंना आवश्यक वाटत होते. त्याचे महिनाभर दोन वेळचे जेवण, चहा, न्याहरी त्यांच्या घरीच होत असे. ते जातीने त्याच्या अभ्यासाची चौकशी करत. केवळ राजाभाऊंमुळेच तो पदवीधर झाला. त्यांच्या कुटुंबातला तो पहिला पदवीधर होता. त्याच्या वडिलांच्या चेहऱ्यावरील समाधान, आनंद केवळ राजाभाऊंमुळेच पाहायला मिळाला.

एकदा एका कार्यकर्त्याला राजाभाऊंनी भेटावयास बोलावले. एकताचे कार्यालय ते पद्मावतीचे घर तो कार्यकर्ता व राजाभाऊ दोघेही सायकली हातात घेऊन चालत- घरगुती गप्पा - चौकशी करत, पद्मावतीच्या त्यांच्या घरापर्यंत गेले. पद्मावतीच्या घरी गेल्यावर त्याला घरात बोलावून चहा देऊन मगच त्याला घरी पाठवले. त्या दिवशीच्या बोलण्यानंतर तो कार्यकर्ता आजही संघकामात सक्रिय आहे तो राजाभाऊंमुळेच. राजाभाऊ अशा अनेकानेक स्वयंसेवकांचे पालक होते, त्यांचा आधार हेते.

हे सर्व करत असताना जो कमी वेळ शिल्लक राहायचा, त्या वेळेत त्यांनी स्वत:च्या घरातील वातावरणही उत्तम ठेवले होते. सर्व घर उच्चविद्याविभूषित, सुसंस्कारित, अगत्यशील, वहिनीही बी.एस.एन.एल. मध्ये नोकरी करत. नोकरी आणि घरच्या सर्व जबाबदाऱ्या सांभाळत, त्याही आलेल्या सर्वांचे मनापासून स्वागत करत. घरी होणाऱ्या बैठका, त्यातील कार्यकर्त्यांचे भोजन, न्याहरी इ. व्यवस्था मनापासून करत असत. घराचे नावही त्यांनी 'ज्ञानिया' ठेवले. यातही राजाभाऊंचे वेगळेपण, सुसंस्कारित मन, चांगल्या गोष्टींची सुरुवात स्वत:पासून करणे, हे लक्षात येते.

राजाभाऊंचे असे बहुआयामी, आदर्श, संघशरण व्यक्तिमत्त्व होते. त्यांचे जीवन-व्यवहार समोर ठेवून संघकार्यात सातत्याने सक्रिय राहाण्याचा संकल्प करणे ही राजाभाऊंना खऱ्या अर्थाने श्रद्धांजली! विनम्र अभिवादन!

- मो. : ७५८८६०१२६०

❖❖❖

गायत्री मंत्रातल्या 'ॐ सत्यम्' सारखं गुरुचं स्थान असतं हे मला भाऊंनी शिकवलं.

**- आलोक भागवत**

भाऊ, सर्व नातेसंबंधात पुरेपूर आस्था बाळगूनही अलिप्त कसं राहायचं हे कुणीही तुमच्याकडून शिकावं.

**- सौ. अनघा**

## तव स्मरण सतत स्फूर्तीदायी आम्हा घडो !...

**– डॉ. गो. बं. देगलूरकर**

साधारण १९९५–९६ चा काळ असावा. मी संस्कार भारतीने आयोजित केलेल्या एका कार्यक्रमास वक्ता म्हणून उपस्थित होतो, **तेव्हा संस्कार भारतीची आणि श्री. राजाभाऊंची ओळख झाली. हे सांगण्याचे कारण असे की या दोहोंचे एवढे तादात्म्य झाले होते.** पुढे संस्कार भारतीने वेरुळची सहल आयोजित केली असता, 'वेरुळ दर्शन' घडविण्याचे काम मजकडे आले. तेव्हा कैलास लेणीपुढील हिरवळीवर सर्वजण बसलो असता **श्री. राजाभाऊंच्या सांगण्यावरून मी लेणी, त्यांची रचना, त्यांचे वैशिष्ट्य, राष्ट्रकूट राजघराण्याचा इतिहास या संबंधीचे प्रास्ताविक केले आणि नंतर कैलास लेणीचे शिल्पवैभव, भावोत्कट प्रसंग, त्यांचे सांस्कृतिक महत्त्व, भारतीय शिल्पकलेचे अनोखेपण इत्यादी संबंधी बोललो ते राजाभाऊंना इतकं भावलं की संस्कारभारतीत जशी चित्र, नृत्य, साहित्य, रंगावली इत्यादींची साधना होत असे, त्याचप्रमाणे प्राचीन कलेचीही व्हायला हवीच असे त्यांना वाटले. एवढेच नव्हे तर अखिल भारतीय प्रबंध कार्यकारिणीच्या बैठकीत त्यांनी इतरांना हे पटवून दिले आणि 'प्राचीन कला विद्या' हिचा संस्कार भारतीत समावेश झाला आणि माझा संस्कार भारतीत.** मानवी जीवनातील कलेचे महत्त्व आणि त्यामुळे समृद्ध होणारी संस्कृती, आणि म्हणूनच तिच्या जपणुकीची आवश्यकता या गोष्टी संस्कार भारतीच्या कार्यकर्त्यांपुढे आल्या. **राजाभाऊ गुणग्राहक तर होतेच, त्याचप्रमाणे आपल्याकडे आलेले उत्तरदायित्व संपन्न करण्याचे कौशल्यही त्यांच्यात होते.**

**श्री. राजाभाऊंचे व्यक्तिमत्त्व त्यांच्या सहवासात येणाऱ्यांची दृष्टी निकोप आणि चौफेर करणारे होते** याचा अनुभव मी घेत गेलो. **आपल्या मतांशी सहमत न होणारेही राजाभाऊंकडे मार्गदर्शनासाठी विश्वासाने येत आणि तेही अशांना आपपरभाव न मानता त्यांच्या हिताचा मार्ग सांगत असत.** अशी मंडळी दुर्मिळ असतात असा आपला अनुभव असतो. **लोकांना सहानुभूतीने आणि उदार मनाने समजावून घेण्याची विशेष हातोटी त्यांना लाभलेली होती.** चुकीचा विचार मांडणाऱ्या कार्यकर्त्यास बैठकीतच समजावून देऊन, **योग्य काय ते शांतपणे सांगणारे भाऊ मी पाहिले आहेत आणि इतरांचे विचार हसण्यावारी नेणाऱ्या कार्यकर्त्यास खडसावणारे राजाभाऊही मी पाहिले आहेत. पूर्वयोजनेशिवाय मोठी उडी अभिप्रेत असणाऱ्याला जमिनीवर उतरविण्याचे कसबही त्यांच्यात होते, तेही हळुवारपणे, भावना न दुखविता. निर्णय घेण्याची वेळ आली तर मात्र कोणाचाही मुलाहिजा न ठेवता तो घेतला गेला पाहिजे, हे त्यांच्याकडून शिकण्यासारखे होते.**

पुढे–पुढे राजाभाऊ वृद्धत्वामुळे देहाने थकले, पण त्यांचे मन उल्हसित होते, उत्साह उणावला नव्हता. अधूनमधून मी, रवी देव, सतीश कुलकर्णी, श्याम जोशी त्यांच्या भेटीला जात राहिलो. त्यांनी मोकळ्या मनाने केलेले स्वागत, वहिनींनी केलेले आतिथ्य आपुलकीचे असे. **इतरांच्या सुखाने आनंद होणारी आणि अडचणीने, दुःखाने भावविभोर होणारी माणसे थोडीच असतात. त्यावेळी मला जाणवे की माणसं पैशामुळे मोठी होत नसतात, शहाणी ठरत नसतात, तर अन्यांनी मोठं व्हावं यासाठी साहाय्य करणारी माणसं खरी मोठी असतात.** राजाभाऊंच्या शब्दाला म्हणून मान असायचा. डॉ. रा. शं. वाळिंबे यांच्यासारखे विद्वान आणि पं. जितेन्द्र अभिषेकींसारखे ज्येष्ठ कलाकारही त्यांच्या शब्दाला फार मानत असत हे मला माहीत आहे. वितुष्ट आलेल्यांमध्ये मनोमीलन घडवून आणणे राजाभाऊंना सहज जमे. **कारण अशा प्रसंगी स्वतः पडते घेऊन, निरहंकारीपणे व्यवहार साधायचा कसा, हे माणसाच्या मनाचा विलक्षण अभ्यास असलेल्या भाऊंना सहज जमत असे.**

माझे आयुष्य समृद्ध करणाऱ्या राजाभाऊंची आठवण सतत येत राहाते, आणि ती अजरपणे येत राहावी म्हणून म्हणायचे 'तव स्मरण सतत स्फूर्तिदायी आम्हा घडो।'

–मो. : ९४२३५८२६५९

# राजाभाऊ आणि तरुण भारत

**– मनोहर कुलकर्णी**

पत्रकारितेच्या क्षेत्रात जवळपास साडेतीन दशके काम करण्याचा माझा अनुभव. त्यापैकी निम्म्याहून अधिक म्हणजे तेवीस वर्षे मला या क्षेत्रातील सर्वोच्च अशा संपादकपदी काम करण्याची संधी मिळाली. अर्थात या संधीची दारे किलकिली करून देण्याचे पूर्ण श्रेय जाते ते पुण्याच्या 'तरुण भारत' ला. १९८०-९० च्या दशकातील मराठी पत्रकारितेचा काळ वेगळाच होता. पुण्यासह बहुतेक सर्वच प्रतिष्ठित दैनिकांच्या संपादकपदी वयाने आणि अर्थात अनुभवाने ज्येष्ठ-श्रेष्ठ व्यक्तींनाच प्राधान्य दिले जात होते. अशा काळात पुण्यातील 'तरुण भारत' च्या संपादकपदी माझ्यासारख्या अवघ्या ३६ वर्षे वयाच्या पत्रकाराची निवड संचालक-मंडळाने करून सर्वांनाच धक्का दिला होता. दूरदर्शन-आकाशवाणीवरून बातमी प्रसारित करून या बदलाची तेव्हा नोंद घेण्यात आली होती. सर्वश्री ग. वि. केतकर, बापूसाहेब तथा चं. प. भिशीकर, वि.ना. देवधर, वसंतराव गीत तथा चित्तरंजन पंडित या प्रथितयश संपादकांच्या मांदियाळीत सहभागी होण्याचे भाग्य मला लाभले. हा बदल घडवून आणण्यात महत्त्वाची भूमिका होती ती कै. राजाभाऊ लवळेकर यांची. त्यावेळी ते राष्ट्रीय विचार-प्रसारक मंडळाचे प्रमुख होते.

मला अजूनही तो संपादकपदासाठीच्या मुलाखतीचा प्रसंग  ठळकपणे आठवतो. मी आणि माझे अन्य दोन सहकारी यांची नावे या पदासाठी 'शॉर्टलिस्ट' करण्यात आली होती. मुलाखत घेणाऱ्या पॅनेलमध्ये खुद्द राजाभाऊंसह डॉ. वि. रा. करंदीकर आणि डॉ. श्रीपती शास्त्री होते. मुलाखतीची सर्व सूत्रे डॉ. करंदीकर यांच्याचकडे असल्याने ते अधिक प्रश्न विचारीत होते आणि माझ्या उत्तरावर मतप्रदर्शनही करीत होते. डॉ. शास्त्री राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय घडामोडींवर अधूनमधून प्रश्न विचारीत होते. त्यामानाने राजाभाऊ गप्प राहून माझ्या बोलण्याचे निरीक्षण करीत होते. इकडच्या-तिकडच्या प्रश्नांवरील चर्चा झाल्यानंतर विषय निघाला तो 'तरुण भारत' चा अंक सुधारणेसंदर्भात. 'तरुण भारत' ची नेमकी बलस्थाने आणि उणिवा कुठल्या त्यावर चर्चा सुरू झाली. मी माझ्या परीने माझी निरीक्षणे नमूद केली. पण त्यावर राजाभाऊंचे काही समाधान झालेले दिसले नाही. ते म्हणाले, 'उणिवा सांगून झाल्या. त्यातील अडचणीही बोलून झाल्या. पण त्यात सुधारणा करण्याबाबत तुमच्या काही कल्पना आहेत का?' थोडक्यात यावरचा 'ॲक्शन प्लॅन' त्यांना हवा होता. त्या परिस्थितीत मला सुचलेल्या कल्पना मी बोलून दाखविल्या. त्या त्यांना कितपत पटल्या हे समजायला मार्ग नव्हता. परंतु 'तरुण भारत' च्या विकासाबद्दल माझ्या मनात तळमळ आणि आस्था आहे हा विचार त्यांच्यापर्यंत पोहोचविण्यात मी यशस्वी झालो, हे त्यांच्या चेहऱ्यावरून स्पष्ट जाणवत होते.

दि. १ ऑगस्ट १९८७ ला मी संपादक पदाची सूत्रे हाती घेतली आणि माझ्या व्यक्तिगत जीवनातील एका नव्या पर्वाचा प्रारंभ झाला. राजाभाऊ 'तरुण भारत'मध्ये येण्यापूर्वीपासून माझा त्यांचा परिचय होता. परंतु 'तरुण भारत' मध्ये कामाच्या निमित्ताने राजाभाऊ यांच्यासोबतचा संवाद, संपर्क वाढला आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील नवनव्या आयामाचा परिचय झाला. **अत्यंत नम्र, निगर्वी, शांत, योग्य तेवढे मोजके बोलणारे, त्या-त्या पदाची स्वत: होऊन सन्मान-प्रतिष्ठा राखणारे, शिस्तीचे भोक्ते, प्रसंगी कठोर निर्णय घेण्याची क्षमता असणारा कार्यकर्तारूपी प्रशासक अशी त्यांची ओळख होती. त्यांच्या प्रत्येक वागण्या-बोलण्यात त्यांच्यातील सहृदय शिक्षक, भला माणूस डोकवायचा. म्हणूनच ते एका संस्थेचे प्रमुख असूनही सर्वांना जवळचे वाटायचे. त्यांच्याबद्दल धाक होता पण तो आदरयुक्त.** अनेकदा ते माझ्या केबिनमधे कामानिमित्त यायचे. येण्यापूर्वी इंटरकॉमवरून निरोप द्यायचे. कधी एखाद्या वाचकाचे बातमीतील चुकीच्या तपशीलाबद्दलचे पत्र, तर कधी एखाद्या वार्ताहराबद्दल त्या परिसरातील परिचितांचा तक्रारीचा सूर व्यक्त करणारे पत्र, कधी अंकाला उशीर होत

असल्याबद्दलची एजंटांची ओरड–असे एक ना अनेक विषय ते घेऊन यायचे. त्याबाबत साधक–बाधक चर्चा व्हायची. त्याचा शेवट मात्र व्हावयाचा तो 'हा विषय तुमचा आहे. तुम्ही निर्णय करायचा' या त्यांच्या वाक्याने. एक तर, या साऱ्या व्यवहारात त्यांचे स्वत: उठून माझ्याकडे येणे मला अस्वस्थ करायचे. एक तर ते संस्थेचे अध्यक्ष व वयानेही ज्येष्ठ. त्यामुळे त्यांनी मला त्यांच्याकडे बोलावून घेतले असते तर त्यात मला काही वावगे वाटले नसते. तसे मी त्यांना एक–दोनदा बोलूनही पाहिले. त्यावर हसून ते उत्तर टाळायचे. पण त्यातील **त्यांचा नम्रपणा आणि एखाद्या पदाची प्रतिष्ठा–मान सांभाळण्याचे भान नकळत बोलून जायचे. एखाद्या क्षेत्रात आपण नवखे असू तर ते काम समजून घ्यायचा विद्यार्थीभाव त्यांच्या वागण्यात हमखास दिसे.**

प्रत्येक दैनिकात त्या–त्या आठवड्याच्या अंकाच्या कामाचा आढावा घेण्यासाठी संपादक–विभागाची साप्ताहिक बैठक होत असते. त्याला संपादकीय विभागातील सहकारी उपस्थित राहायचे आणि संपादक किंवा संपादकीय ज्येष्ठ सहकाऱ्याने ती बैठक घ्यायची अशी त्यावेळी पद्धत होती. व्यवस्थापन किंवा अन्य विभागाशी निगडित असे काही प्रश्न, तक्रारी, सूचना असतील तर त्यानंतर सर्व विभागप्रमुखांच्या एकत्रित समन्वय समितीच्या बैठकीत मांडणे अपेक्षित असायचे. परंतु संपादकीय विभागाच्या बैठकीला व्यवस्थापनाचे कुणी प्रतिनिधी अपेक्षित नसायचे. अशा परिस्थितीत या साऱ्या संकेतांना फाटा देत स्वत: राजाभाऊंनी एकदा या बैठकीला येण्याची इच्छा व्यक्त केली. संस्थेचे अध्यक्ष येणार असतील तर हरकत घेण्याचा प्रश्नच नव्हता आणि या बैठकीचे सोवळेपण जपावे असे त्यात काही नसायचे त्यामुळे मी त्यांच्या येण्याचे स्वागतच केले. पण काहींना हा निर्णय रुचला नाही. त्यावर खाजगीत चर्चाही रंगल्या. पण राजाभाऊ त्या बैठकीला आले. नेहमीप्रमाणे अंकाचा लेखाजोखा घेतला गेला. बरे–वाईट काय घडले याची चर्चा झाली. पुढील आठवड्यात कुठले विषय घ्यायचे यावरही विचार झाला. **या सर्व बैठकीत राजाभाऊ एखाद्या निरीक्षकाप्रमाणे सहभागी झाले होते. आपल्या वहीत चर्चेतील मुद्दे ते लिहून घेत होते. एखादी संपादकीय तांत्रिक संकल्पना न समजल्यास तेवढ्यापुरता ते प्रश्न विचारीत. कुठेही मतप्रदर्शन नाही किंवा अध्यक्ष म्हणून अधिकार गाजविण्याचा आग्रह नाही. कुठलाही विषय मुळातून समजून घेण्याच्या त्यांच्या या स्वभावामुळे अनेकांची भीड चेपली व ते त्यांच्या अधिक जवळ गेले.**

जेमतेम दीड ते दोन वर्षच मी पुण्याच्या 'तरुण भारत' संपादकपदी राहिलो. मराठवाड्यात 'देवगिरी तरुण भारत' सुरू करण्याच्या जोरदार हालचाली या दरम्यान सुरू झाल्या. मी मूळचा मराठवाड्यातील असल्याने आणि अनुभवी या नात्याने तेथील संचालक–मंडळाने नव्या दैनिकाच्या उभारणीसाठी संपादक म्हणून माझी निवड केली आणि मला पुण्याचा निरोप घ्यावा लागला. याआधी सोलापूर 'तरुण भारत'ची नवीन आवृत्ती सुरू करून देण्याचा, तसेच मुंबई 'तरुण भारत' आवृत्ती उभारणीत काहीसे योगदान देण्याचा अनुभव गाठीशी असल्याने 'देवगिरी तरुण भारत' उभारणीत त्याचा निश्चितच उपयोग झाला. अल्पकाळ का होईना 'पुणे तरुण भारत'चे नेतृत्व करण्याची संधी मिळाल्याने तोही अनुभव कामी आला. त्यामुळे पुढे चालून 'देवगिरी तरुण भारत' बरोबरच नगर, नाशिक आणि जळगाव 'तरुण भारत'च्या नव्या आवृत्त्या सुरू करून विस्ताराचे कार्य करणे असेल किंवा 'देवगिरी समाचार' या सारख्या हिंदी आवृत्तीच्या संपादकपदाची काही काळ जबाबदारी स्वीकारणे सुकर झाले. एवढेच नव्हे तर ह्या शिदोरीचा 'लोकमत'सारख्या एका यशस्वी व्यावसायिक वृत्तपत्र समूहातही चांगलाच उपयोग झाला. पुढे नाही म्हटले तरी राजाभाऊंच्या नियमित नव्हे पण अधूनमधून बैठका किंवा अन्य कामाच्या निमित्ताने भेटी होत. एकदा ते औरंगाबादला 'देवगिरी तरुण भारत' कार्यालयात मला खास भेटायला आले होते. तेथील कार्यालय, अन्य व्यवस्था आणि अंकाची वाढती लोकप्रियता पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. अंकातील संपादकीय प्रयोगशीलतेवर ते खूश झाले होते. तेथील संचालकांसमवेत बोलताना आम्ही दिलेला संपादक, आमचा संपादक असा कौतुकाने ते उल्लेख

करीत होते. **एखाद्या सहकाऱ्याचे चांगले काम छोटेही असेल पण त्याला प्रोत्साहन कसे द्यायचे हेही राजाभाऊंकडून शिकावे असे होते.**

दुर्दैवाने याच कालावधीत 'पुणे तरुण भारत' चा रथ चिखलात खोल-खोल रुतत असताना दिसत होता. आर्थिक परिस्थिती खालावत चालली होती. कर्जाचा बोजा वाढत होता. मुंबई, सोलापूर आणि आता मराठवाड्यात 'तरुण भारत'च्या स्वतंत्र आवृत्त्या सुरू झाल्यामुळे पुणे 'तरुण भारत' चे कार्यक्षेत्र घटत गेले खप कमी होत गेला आणि महसूलही घटला. कठीण आर्थिक परिस्थितीमुळे 'तरुण भारत' चे प्रकाशन थांबविण्याचा कटू निर्णय संचालक मंडळाला १९९० मध्ये घ्यावा लागला. त्याची प्रक्रिया आधीच सुरू झाली होती आणि दुर्दैवाने त्याचे नेतृत्व राजाभाऊंना करावे लागले. माझ्यानंतर संचालक-मंडळाने वेगळा संपादकही नेमला नाही. ती धुराही नाईलाजास्तव राजाभाऊंना सांभाळावी लागली. संपादकपदी असतानाही त्यांच्या केबिनमधे मी राजाभाऊंना भेटलो आहे. त्यांच्या बोलण्यातही घालमेल समजत होती. **'बुडती नाव' समजून अनेक सहकारी 'तरुण भारत' सोडून जात होते. जे होते त्यांना 'तरुण भारत' बंद पडल्यावर आम्हाला आमचे हक्काचे पैसे मिळणार का याची विवंचना होती. कामगार, अन्य कर्मचारी यांचा आग्रह पर्यायी रोजगाराच्या हमीचा होता. म्हटली तर अत्यंत नाजूक आणि म्हटली तर स्फोटक परिस्थिती होती आणि ही परिस्थिती अत्यंत शांत डोक्याने, समंजसपणाने, संयमाने आणि तेवढ्याच कौशल्याने त्यांनी हाताळली. त्यांच्या जागी अन्य कोणी असते तर काय घडले असते हे सांगणे अवघड आहे.**

**अशा परिस्थितीतही राजाभाऊंनी 'तरुण भारत' कर्मचाऱ्यांच्या विश्वासाला तडा जाऊ दिला नाही.** त्यातील जास्तीत-जास्त कर्मचाऱ्यांना परिवारातील अन्य संस्थांमधून पर्यायी रोजगार मिळेल यासाठी मनापासून प्रयत्न केले. **कामगारांचा विश्वास संपादन करण्यासाठी वेळोवेळी सभा-बैठका घेतल्या. अखंड संवाद चालू ठेवला. परिणामी 'तरुण भारत' बंद पडला तरी कुठे कटुता आली नाही. एकाच वेळी संस्थेचे हित, प्रतिष्ठा जपताना कामगारांच्या विश्वासाला तडा जाणार नाही याची काळजी घेण्याची अवघड कसरत, प्रसंगी किमया, राजाभाऊंनी साकारली.** हा निर्णय घेताना किंवा एकूणच ही परिस्थिती हाताळताना त्यांना किती शारीरिक, मानसिक त्रास झाला असेल याची कल्पनाही करवत नाही. एखाद्या यशस्वी कार्याचे श्रेय घेण्यास सारेच पुढे येतात, पण अपश्रेयाची जबाबदारी घेण्यास सहसा पुढे कुणी येत नाही, हा सार्वत्रिक अनुभव आहे. पण अशा परिस्थितीतही खंबीरपणाने उभे राहून त्यातल्या-त्यात अधिक बरे काय करता येईल याचा विचार आणि प्रत्यक्ष कृती करणारे राजाभाऊंसारखे विरळाच म्हणता येईल. यशस्वी नेतृत्व-गुणाची ही देखील अनोखी कसोटी ठरावी आणि त्यात राजाभाऊ पुरेपूर उतरले असे म्हटले तर वावगे ठरू नये. पुण्याच्या 'तरुण भारत' मध्ये अनेक जमेच्या बाजू असूनही तो बंद का पडला हा एक संशोधनाचा विषय ठरावा. त्याची चर्चा येथे अपेक्षित नाही. परंतु 'तरुण भारत' च्या अखेरच्या पर्वात त्याची नेतृत्वधुरा राजाभाऊंकडे सोपविण्याचा ज्यांनी कुणी निर्णय घेतला असेल त्याची कारणे तेच सांगू शकतील. परंतु तो असाच अपघाताने घेतलेला निर्णय होता का राजाभाऊंच्या सर्वसमावेशक, शांत, संयमी आणि विशालहृदयी शिक्षकी व्यक्तिमत्त्वाकडे पाहून, साधक-बाधक विचार करून घेतलेला निर्णय होता असा मात्र प्रश्न पडतो आणि त्यात दुसरी शक्यताच अधिक वाटते आणि राजाभाऊंनी ही 'थँकलेस' जबाबदारी तेवढ्याच सहजपणाने स्वीकारली हा त्यांच्या मनाचा मोठेपणा म्हटला पाहिजे. राजाभाऊंच्या विविध क्षेत्रातील अफाट कार्याचे विविध पैलू असतील. पण 'तरुण भारत' पर्वातील त्यांच्या कार्याचा हा आंबट-गोड वेगळाच पैलू असून तो तितकाच महत्त्वाचा मानला पाहिजे. त्यातून त्यांचे मोठेपण आणखी ठसठशीतपणे जाणवते, हेच खरे.

- मो. : ९८५०३११४११

## संघसमर्पित राजाभाऊ : माझे एक पालक!

**– आनंद हर्डीकर**

राजाभाऊ लवळेकरांची माझी पहिली भेट झाली 'एकता' मासिकाच्या कार्यालयात. १९७३ साली डिसेंबर महिन्यात. मी त्यावेळी दैनिक 'तरुण भारत'च्या संपादकीय विभागात काम करीत होतो आणि 'एकता' मासिकातून वेळोवेळी लिहितही होतो. त्या मासिकाचे तत्कालीन संपादक रामदासजी कळसकर, त्यांचे सहकारी वसंतराव तांबे, मनोहरपंत वर्तक या सर्वांशी गप्पा मारण्यासाठी त्यांच्या कार्यालयात अधूनमधून मी जात असे. त्यावेळी अशीच केव्हातरी रामदासजींनी माझी राजाभाऊंशी ओळख करून दिलेली आठवते. त्यांच्याशी खूप गप्पा मारलेल्या आठवत नाहीत, पण आपली शिक्षकाची नोकरी सांभाळून ते संघाचे काम म्हणून 'एकता' मासिकाच्या कार्यालयीन कामात मदत करण्यासाठी दर आठवड्याला येत असातात, असे त्यांच्याबद्दल रामदासजींनी प्रेमाने सांगितल्याचे मात्र चांगले स्मरणात आहे.

नंतरच्या काळात कधीकधी राजाभाऊंची व माझी 'मंदार प्रेस' मध्येही भेट होत असे. ज्ञानेश्वर आगाशे यांच्या त्या मुद्रणालयातर्फे 'राजस' नावाचे मासिक प्रकाशित केले जात असे. त्या मासिकाचे संपादक माझे ज्येष्ठ स्नेही विजय हरि वाडेकर हे त्यांचे विद्यार्थी. **विजयची चौकशी करायला म्हणून आलेले राजाभाऊ अगदी थोड्या वेळात अशी प्रसन्न, मनमोकळी चर्चा घडवून आणत की, त्यांचे चौफेर वाचन, तरुण पिढीविषयीची आस्था, सकस साहित्याबद्दलची जाण सारे काही स्पष्टपणे जाणवत असे. त्यांच्या संपर्कात आलेला प्रत्येकजण प्रभावित झाल्याखेरीज राहात नसे. तसा मीही झालो होतो.**

मला राजाभाऊंचे एक स्वभाववैशिष्ट्य ठळकपणे जाणवले होते आणि ते म्हणजे **त्यांची दृष्टी विशाल होती, समावेशक होती.** ते रा. स्व. संघाचे कार्यकर्ते होते, संघसमर्पित होते. पण **अनेक कार्यकर्त्यांचे असतात तसे त्यांचे विचार साचेबंद वा झापडबंद नव्हते. माझ्या सद्भाग्याने त्यांच्या या स्वभाववैशिष्ट्यांचा मला माझ्या आयुष्यात अनेकदा अनुभव घेता आला.** त्यांतला अगदी आरंभीचा एक अनुभव सागंण्यासाखा आहे. १९७७ नंतर जनता सरकारच्या राजवटीत अटलबिहारी वाजपेयी परराष्ट्रमंत्री झाले होते. नेहरूप्रणीत परराष्ट्रधोरणातील अत्यावश्यक सूत्रे पुढे तशीच चालू ठेवायची, परंतु राष्ट्रहिताला प्राधान्य देणारे काही नवे उपायही योजायचे, असे धोरण अनुसरायचे त्यांनी ठरविले होते. त्यानुसार साम्यवादी चीनला भेट देऊन उभय देशांमधील सीमावादावर तोडगा काढण्याचा हेतू मनात ठेवून, ह्या देशाच्या दौऱ्यावर जायचे त्यांनी ठरविले. त्यांच्या ह्या नियोजित दौऱ्याचे वृत्त वाचल्यावर माझ्या मनात चीनबद्दल विविधांगी माहिती देणारा एखादा विशेषांक काढावा, असा विचार तरळला. मी तो विजय हरि वाडेकर यांच्याजवळ बोलून दाखवला. त्यांनी तो लगेच उचलून धरला. अवघ्या दोन महिन्याच्या अल्पावधीत मी त्या विशेषांकासाठी आवश्यक ते सारे लेखन केले. कन्फ्यूशियसपासून माओ त्से–तुंगपर्यंतच्या चिनी तत्त्वज्ञानाचा परिचय, माओच्या कविता, चिनी साहित्यात गाजलेल्या लोककथा, काही मान्यवर चिनी लेखकांच्या कथा–कादंबऱ्यांचे संपादित अंश आणि त्या देशाच्या अर्थव्यवस्थेने दिलेली आव्हाने... अशा विविध प्रकारचे साहित्य मी संकलित, अनुवादित केले आणि तो विशेषांक सिद्ध केला. 'चायनीज लिटरेचर' या इंग्रजी मासिकाच्या माझ्या संग्रही असलेल्या विविध अंकांचा मी उपयोग केला होता. चीनबद्दलचे प्रेम उफाळून आले म्हणून मी तो खटाटोप केला नव्हता; तर प्रतिस्पर्धी देशावर निव्वळ भीमदेवी थाटातली टीका करण्यापेक्षा त्याचा सर्वांगीण अभ्यास करणे किती आवश्यक आहे, हे स्पष्ट करण्याचा माझा आणि संपादक वाडेकरांचा हेतू होता.

आमच्या त्या प्रयत्नाचे वाचकांकडून चांगले स्वागत झाले. आश्चर्याची गोष्ट ही होती की, संघवर्तुळातील **असंख्य परिचितांकडून मात्र टीकेचा सूर उमटला होता. काही मित्रांनी तर राष्ट्रवादाची कास सोडून मी मार्क्सवादाच्या आहारी जातो आहे, असा अर्थ लावला होता. त्या पार्श्वभूमीवर मला चांगल्या, प्रोत्साहक**

**प्रतिक्रिया फक्त दोघांकडूनच ऐकायला मिळाल्या होत्या. एक होती खा. राजाभाऊ म्हाळगींची आणि दुसरी होती, राजाभाऊ लवळेकरांची. नुसती वरवरची तोंडपुजेपणाने दिलेली नाही, तर त्या एकहाती प्रयत्नामागची अस्सल राष्ट्रीय भूमिका अगदी योग्य आहे असे मोकळेपणाने सांगणारी.** त्या दोन्ही प्रतिक्रिया मला आणि वाडेकरांना-आम्हाला दोघांनाही-खूप मानसिक व बौद्धिक समाधान देणाऱ्या ठरल्या होत्या.

तो विशेषांक प्रसिद्ध झाला, तेव्हा आणि नंतरही पुढे बरीच वर्षे मी विमुक्त पत्रकारिता करीत होतो. भिन्न-भिन्न प्रकृतीच्या नियतकालिकांचे वा विविध स्मरणिकांचे संपादन करण्यापासून ते औद्योगिक कंपनीच्या गृहपत्रिकेचे संपादन करण्यापर्यंत आणि के. आर. मलकानींच्या 'दि आर. एस. एस. स्टोरी' चा मराठी अनुवाद करण्यापासून ते आबासाहेब गरवारे या विख्यात उद्योगपतींच्या विश्वस्त निधीच्या कार्याची प्रसिद्ध करण्यापर्यंत वेगवेगळी जबाबदारी मी पार पाडीत होतो. त्या काळात राजाभाऊंशी वारंवार भेटीगांठी होत नसत. परंतु **जेव्हा केव्हा ते भेटत, तेव्हा ते इतक्या आत्मीयतेने विचारपूस करीत की ते आपले खरेखुरे हितचिंतक आहेत, याची खात्री पटे.** तथापि त्यावेळी मला कधीही कल्पनेतही वाटले नाही, असे पालकत्वाचे नाते पुढे योगायोगाने जुळले.

माझ्या आयुष्यातल्या एका वळणावर १९८५ साली माझी 'एकता' मासिकाच्या संपादकपदावर नियुक्ती झाली. माझे मित्र पंडित करमरकर यांनी सुचविल्यामुळे आणि डॉ. श्रीपती शास्त्री यांच्यासारख्या ज्येष्ठ संघ-अधिकाऱ्यांनी शिफारस केल्यामुळे मला ते पद मिळाले होते. रामदासजी कळसकरांच्या दु:खद निधनाची पार्श्वभूमी होती, तथापि पत्रकारितेत मानसिक -बौद्धिक समाधान मिळवून देणारी ती जबाबदारी होती. त्या निमित्ताने संघ परिवारातील विविध संस्था-संघटनांचे कार्यकर्ते वारंवार भेटत होते. समन्वय-समितीच्या बैठकीतील चर्चेमध्ये कधी दिशा मिळत असे, तर कधी प्रश्न उपस्थित होत असत. त्यांची उत्तरे शोधूनही सापडत नसत. अशा वेळी राजाभाऊंचा फार मोठा आधार वाटे. **मनातले सारे काही बोलता येईल, अडीअडचणी सांगता येतील, तक्रारी करता येथील असे ते हक्काचे श्रद्धास्थान वाटे.** संघविचाराची नव्या काळाशी सुसंगत अशी मांडणी करण्याबाबतच्या समन्वय-समितीतील माझ्या काही सूचना ऐकून १९८८-८९ मध्ये राजाभाऊंना असे वाटले की, मला 'एकता' मासिकाच्या मंचापेक्षा अधिक मोठा मंच मिळायला हवा. माझे वृत्तपत्रीय वाचन, ग्रंथवाचन लक्षात घेता मासिकाच्या मर्यादेत व्यक्त होताना माझी कोंडी होते आहे, हे त्यांनी ओळखले आणि पुणे 'तरुण भारत'च्या संपादक विभागात माझा पुन:प्रवेश व्हावा, यासाठी माझी तयारी असल्याची खात्री करून घेतली. त्यांनी प्रथम विचारले, तेव्हा मी होकार तर दिला, परंतु त्यांच्या प्रयत्नांना यश मिळेल की नाही याबद्दलची शंकाही बोलून दाखविली. पूर्वी वि वा. ऊर्फ विसूभाऊ देवधर यांनी तसा प्रयत्न करून पाहिला होता आणि पूर्वीची सेवाज्येष्ठता विसरून नव्याने भरती झालेला उपसंपादक म्हणून रुजू व्हायचीही मी तयारी दर्शविली तर तो प्रयत्न यशस्वी होईल असे त्यांना वाटले होते. प्रत्यक्षात मात्र संचालक मंडळाने त्यांचा तो प्रस्ताव अमान्य केला होता. हा पूर्वेतिहास मी राजाभाऊंना सांगितला आणि तरीही संचालक-संपादक या नात्याने त्याबाबत पुन्हा एकदा प्रयत्न करून पाहायचे त्यांनी ठरवले.

माझ्या अंदाजाप्रमाणे राजाभाऊंनाही नकारच मिळाला. तथापि यावेळी परिस्थिती वेगळी होती. राजाभाऊंनी त्या नकाराची कारणे विचारली तेव्हा त्यांना सांगण्यात आले की, 'पूर्वी १९७४ साली हर्डीकर आपल्या विरोधात कामगार न्यायालयात गेले होते. आपल्या विरुद्ध अशी कोर्ट कचेरी करणाऱ्याला परत कशासाठी घ्यायचे?' राजाभाऊ त्या बैठकीत गप्प राहिले, पण नंतर त्यांनी मला विश्वासात घेऊन ती चर्चा सांगितली. मला आश्चर्याचा धक्का बसला. कारण राजाभाऊंना जे सांगण्यात आले, ते धादांत खोटे होते. १९७४ साली 'तरुण भारत'च्या संपादक विभागातून ज्या पद्धतीने मला काढून टाकण्यात आले होते, ती गोष्ट माझ्यावर अन्याय करणारी होती. त्याविरुद्ध दाद मागणे माझ्या दृष्टीने अत्यावश्यक होते आणि त्यासाठी कामगार न्यायालयात मला दाद मागता येऊ शकेल, असा पत्रकार संघाच्या

पदाधिकाऱ्यांनी मला सल्ला दिलाही होता. तथापि 'महाराष्ट्र टाईम्स'चे विख्यात वृत्तसंपादक दि. वि. उर्फ बंडोपंत गोखले यांनी मला दिलेला वेगळा सल्ला मी त्यावेळी मानला होता. 'संघाच्या ज्येष्ठ अधिकाऱ्यांपैकी जर कुणाशी याबाबत बोलता येणार असेल, तर तसे बोल; ते निश्चित मार्ग काढतील,' असे बंडोपंत मला म्हणाले होते. 'मी मोरोपंतांशी याबद्दल बोलू शकतो,' असे मी सांगितल्यावर त्यांनी मला मोरोपंत पिंगळे यांच्याशी त्वरित संपर्क साधायला सांगितले होते. पुढे प्रत्यक्ष मा. मोरोपंतांशी मोतीबागेत भेट झाल्यावर त्यांना मी माझी बाजू तर सांगितली होतीच, पण त्या संदर्भात माझ्याकडे असणारे कागदोपत्री पुरावेही दाखवले होते. नंतर त्यांनी व्यवस्थापनाची बाजूही ऐकून घेतली होती. 'आता मी पुढच्या प्रवासाला निघतो आहे. प्रवासामध्ये रामभाऊ गोडबोले मला भेटतील. आम्ही चर्चा करून काय ते ठरवू आणि ते जेव्हा पुण्यात येतील, तेव्हा तुला सांगतील,' असे मला मोरोपंतांनी सांगितले. जे व्यवस्थापन मला एका महिन्याचा पगार द्यायलाही नकार देत होते, त्या व्यवस्थापनाचे मुख्य प्रतिनिधी दत्तोपंत पत्की यांनी मला घरी येऊन तीन महिन्यांचा पगार +एका महिन्याचा बोनस अशा रकमेचा धनादेश दिला होता. पंधरा दिवसांनी रामभाऊ गोडबोले हे पुण्यात आले, त्यांच्यासमोर पुन्हा एकदा उजळणी झाली आणि निर्णय झाला. म्हणजे मी माझ्यावरच्या अन्यायाविरूद्ध दाद मागितली होती, पण ती कामगार न्यायालयात नव्हे, तर रा. स्व. संघाच्या अंतर्गत रचनेत. संघटनेच्या चौकटीत राहून मिळवलेला न्याय ही वस्तुस्थिती होती आणि मध्यंतरी जवळजवळ पंधरा वर्षांचा कालावधी लोटला असूनही मी 'ते' ऐतिहासिक पुरावे जपून ठेवले असल्यामुळे राजाभाऊंनाही दाखवू शकलो होतो. शिवाय त्यांनी १९७४ च्या घटनाचक्राचे साक्षीदार असणाऱ्या विजय हरि वाडेकरांना विचारून वाटल्यास खातरजमा करून घ्यावी, असेही मी सुचविले होते.

राजाभाऊंची मनोमन खात्री पटली आणि म्हणूनच त्यांनी मला 'तरुण भारत'मध्ये संपादक विभागात घ्यायचे पक्के केले. संचालक मंडळातल्या दोघातिघांना बरोबर घेऊन इतर काही कामे घेऊन मोरोपंतांकडे गेले असताना त्यांनी खुबीने माझा विषय काढला, माझी बाजू सत्याची असल्याचे खुद्द मोरोपंतांकडून काढून घेतले आणि त्या संचालकांचा विरोध मावळला. **संघाचा एखादा अधिकारी मनात आणेल, तर संघटनेच्या चौकटीत राहून एखाद्या गंभीर तक्रारीचे कसे पुरते निवारण करू शकतो, याचा राजाभाऊंच्या त्या ठाम पावित्र्याने मला पुन्हा एकदा सुखद अनुभव आला.**

मग ठरल्याप्रमाणे मी 'एकता' मासिकाच्या संपादकाचा राजीनामा देऊन 'तरुण भारत'मध्ये रुजू झालो. प्रथम सहा-आठ महिने राजाभाऊंना मदत म्हणून मी अग्रलेखाच्या पानाचे संपादन पाहावे, आठवड्यातून किमान दोन वेळा अग्रलेख लिहावेत, रविवार पुरवणीची दोन पानेही सांभाळावीत आणि मग संपादकपदाची धुरा स्वीकारावी, असे गणित राजाभाऊंनी मांडले. अत्यंत असाधारण स्थितीत त्यांना संपादक व्हावे लागले होते. त्यांचा प्रदीर्घ अनुभव पणाला लावून ते ती जबाबदारी जरी पेलून धरत असले, तरी दीर्घकालीन विचार करता मूळची पत्रकार असणारी व्यक्तीच त्या खुर्चीत बसायला हवी, असे त्यांना वाटत होते आणि त्यांनी त्यांच्या परीने माझी त्यासाठी निवडही केली होती. त्या दृष्टीने आम्ही दोघेही कामाला लागलो. योजना कागदावर उतरवू लागलो. साधकबाधक विचार करून त्यातल्या काही अंमलातही आणू लागलो.

त्यातलीच एक होती, संदर्भविभाग व्यवस्थित सुरू करण्याची. संपादकीय विभागाला विशेष प्रसंगांचे वार्तांकन करताना, विविध विषयांवरील संपादकीय भाष्ये लिहिताना, काही दिवसांपूर्वीची किंवा काही महिन्यांपूर्वीची माहिती आवश्यक असते. बातम्यांच्या केंद्रस्थानी असणाऱ्या व्यक्तींची वा संस्थांची छायाचित्रे हवी असतात. असे सर्व संदर्भ सहजासहजी उपलब्ध करून देणारी ग्रंथालयसेवा प्रतिस्पर्धी वृत्तपत्रांनी वर्षानुवर्षे विकसित केली होती. 'तरुण भारत'च्या सर्व संपादकांनी त्याची गरज वारंवार सांगूनही संचालकांनी ती दुर्लक्षितच ठेवली होती. राजाभाऊंनी हा प्रश्न मार्गी लावायचे ठरवले होते. कार्यालयात येणाऱ्या इंग्रजी वृत्तपत्रांची कात्रणे काढून त्यांची विषयवार पिशव्यांमध्ये विभागणी करण्यास सुरुवातही झाली होती. त्या काळात राजाभाऊंशी माध्यमांच्या प्रभावी वापराबद्दल माझी अनेकदा चर्चा झाली.

**त्यांची स्वागतशील वृत्ती त्या वेळी प्रत्ययास आली.**

दुर्दैवाने तो कालखंड अत्यल्प ठरला. मी संपादक विभागात दाखल होऊन जेमतेम चार महिने झाले असतानाच विचित्र पेचप्रसंग उद्भवला आणि पुण्यातील 'तरुण भारत'चे प्रकाशनच बंद करण्याचा निर्णय घेणे संचालक मंडळाला भाग पडले. **मी तर उन्मळून पडलो. दारुण निराशा पदरी पडली. भवितव्याचा प्रश्न उभा राहिला. तथापि त्या साऱ्या संकटप्रसंगी राजाभाऊ माझ्या पाठीशी एखाद्या पालकाप्रमाणे ठामपणे उभे राहिले. दिलासा देत राहिले. मला आणि माझ्या पत्नीला आर्थिक स्थैर्य लाभावे, यासाठी राजाभाऊंनी त्या काळात ज्या आत्मीयतेने वणवण केली, तिला तोड नाही.** कौटुंबिक व आर्थिक आघाडीवर मी निर्धास्त व्हायला पुढची तीन-चार वर्षे लागली, **परंतु त्या काळात आणि नंतरही राजाभाऊंचे पितृतुल्य मायाछत्र मला कायम लाभले.**

काही काळ संघपरिवारातील प्रकाशन-क्षेत्राशी संबंधित अशा काही जबाबदाऱ्या मी सांभाळल्या. काही काळ 'प्रज्ञा भारती' आणि 'संस्कार भारती' या दोन संघटनांशी निगडित लहान-मोठ्या जबाबदाऱ्या पार पाडल्या. कधी राजाभाऊंच्याच प्रोत्साहनामुळे मा. दत्तोपंत ठेंगडी यांनी इंग्रजीत लिहिलेल्या 'Hindu View Of Arts : Why Sanskar Bharati?' या पुस्तिकेचा मराठी अनुवाद केला, तर कधी संघाची वैचारिक भूमिका मांडणारे कार्यकर्ते-लेखक - वक्ते संघटित करता यावेत म्हणून सुरू असणाऱ्या प्रयत्नांना हातभार लावला. हे सारे करीत असताना **मला जे प्रश्न पडत किंवा माझे जे मुद्दे असत, ते राजाभाऊंसमोर मांडताना मला कधी संकोच वाटला नाही.** वर्धमान संघटनेच्या शीर्षस्थ नेत्यांनी वैचारिक व व्यावहारिक स्वायत्तता द्यायला हवी, उत्सवासाठी आमंत्रित प्रमुख पाहुण्यांचे वेगळे विचार ऐकताना दाखवली जाणारी सहिष्णुता 'वैचारिक चौकटीत राहूनच पण काहीशी वेगळी मांडणी करणाऱ्या समविचारी वा सहप्रवासी व्यक्तींबद्दलही दाखवायला हवी; वैचारिक मांडणी करताना त्या क्षेत्रातील रूढ शिस्त पाळायलाच हवी; आपले म्हणणे साधार व सप्रमाण मांडायला हवे... वगैरे मुद्दे किंवा परिवारातील सर्व संघटनांना उपयुक्त ठरू शकेल, असे समृद्ध संदर्भ-ग्रंथालय उभारण्याची गरज मी त्यांच्यासमोर वेगवेगळ्या प्रसंगी उदाहरणांसह मांडत असे. प्रत्येक वेळी ते अंतिम निर्णय देऊ शकणार नाहीत, हे माहीत असतानाही ते निदान आपली तक्रार, आपली खंत, आपली व्यथा नीट समजून घेतील, याची खात्री वाटत असे आणि कधीकधी त्याचे प्रत्यंतरही येत असे.

अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान असतानाची गोष्ट. पाकिस्तानचे लष्करशहा जनरल परवेझ मुशर्रफ यांना, ते भारतभेटीवर आलेले असताना सदिच्छादर्शक भेट म्हणून एक चित्र द्यायचे होते. राजनैतिक शिष्टाचाराचे पालन म्हणून तसे चित्र द्यायचे होते. त्यासाठी सरकारने एम.एफ. हुसेन यांना विनंती केली होती व त्यांनी बरेच आढेवेढे घेत एक चित्र काढून दिले होते. तेच चित्र अटलजींतर्फे मुशर्रफना दिले गेले होते...

हे वृत्त वाचल्यानंतर मला वाईट वाटले होते आणि रागही आला होता.

**सरस्वतीचे विकृत चित्र काढल्याबद्दल ज्या चित्रकारावर 'संस्कार भारती'सारखी परिवार संघटना जाहीर टीका करते, त्याच विवाद्य चित्रकाराकडून 'आपले' सरकार चित्र काढून घेते, हे औचित्यपूर्ण नाही... असे मत 'संस्कार भारती'च्या एका बैठकीतील माझ्या भाषणात मी मांडले होते. त्या बैठकीनंतर तीन महिन्यांनी माझी ती तक्रार मा. प्रा. राजेंद्रसिंहजी ऊर्फ रज्जूभैया यांच्यापर्यंत आपण पोहोचवली असल्याचे व सर्वोच्च पातळीवर तिची पूर्वीच दखल घेतली गेल्याचे मला राजाभाऊंनी सांगितले होते. असे काही घडले की, मोठा दिलासा मिळत असे.**

आता राजाभाऊ नाहीत, पण असे असंख्य प्रसंग आठवतात... ते कायम आठवत राहतील आणि एका संघसमर्पित व्यक्तिमत्त्वाचे पूर्ण विकसित झालेले, सुसंस्कारांनी विभूषित रूप कसे असते, याचा सर्वांना प्रत्यय येत राहील, यात शंका नाही.

- मो. : ९१५८६३४२१३

## चतुरस्र राजाभाऊ...

**– रवींद्र देव**

मला माझ्या घरातील तो प्रसंग आजही आठवला की लक्षात येतं एखाद्या हाडाच्या शिक्षकाचा, कार्यकर्त्याचा समाजावर काय प्रभाव असतो ! सकाळी ११ वा. आमच्या घरी माझ्या वडिलांकडे बँकेचे अधिकारी, कर्मचारी आले होते. मी आत होतो. दारावरची बेल वाजली. मी दरवाजा उघडला. मा. राजाभाऊ दारात उभे होते. आम्ही दोघेही मुंबईला संस्कार भारती प्रांताच्या बैठकीला चाललो होतो. राजाभाऊ घरात आले. **हॉलमध्ये बसलेली सगळी बँकेची लोकं राजाभाऊंना बघून एकदम उभी राहिली आणि एकेकजण भाऊंच्या पाया पडायला लागला. हे दृश्य आजही माझ्या अंगावर शहारे उभं करतं. सर्वांच्या बरोबर राजाभाऊ बसले. भाऊंच्या नेहमीच्याच सवयीप्रमाणे प्रत्येकाची अत्यंत आत्मीयतेने चौकशी केली.** काही जणांच्या घरातील व्यक्तींचीही चौकशी केली. आम्ही घरातून मुंबईला जायला निघालो तसे भाऊ उठले. बँकेचे सर्वजणही उठले.

**भाऊंबद्दलचा कमालीचा आदर मी या सर्वांच्या चेहऱ्यावर पाहिला. मलाही एका क्षणी वाटलं की मी भाग्यवान आहे अशा थोर व्यक्तीचा मला अनेक वर्ष सहवास मिळाला. त्यांचे चिंतन, विचार आणि दृष्टी मला अगदी जवळून अनुभवायला मिळाली.**

**राजाभाऊंचं आणि माझं नातं...**

आळंदी येथे झालेल्या विश्व हिंदू परिषदेच्या संमेलनानंतर माझा संस्कार भारतीत प्रवेश झाला. अनेक कार्यक्रमांत, बैठकांमधून भाऊंचा परिचय होत गेला. कधी भाषणातून, तर कधी गप्पागोष्टींमधून. त्यांच्या घरात अनेक बैठका होत. त्यात मी जात असे. **त्यांच्यातील कार्यकर्त्यांबरोबरची वागण्यातील सहजता, साधेपणा, समोरच्याला समजून घेणे, त्याचे म्हणणे नीट ऐकणे, समजून सांगणे, पारिवारिक चौकशी या सर्वाचा संस्कार माझ्यावर एवढा झाला की आजही तो मला काम करताना उपयोगी पडतो.** राजाभाऊंच्या पत्नी कुसुमताई, चिरंजीव, सून, नातवंडं, भाऊंच्या दोनही मुली, जावई या सर्वांशी परिचय होत गेला. ह्या सर्वच मंडळींचे वागणे पाहिल्यानंतर असं लक्षात आलं की राजाभाऊंच्या विचारांचा, आचरणाचा केवढा परिणाम आहे. त्यांच्या मनातील भाऊंबद्दलचा कमालीचा आदर मी पाहिला आहे. अनेकांसारखा मीही अगदी त्यांच्या कुटुंबातीलच एक होऊन गेलो.

**प्रांतभर प्रवास**

१९८६ साली बुद्धपौर्णिमेला संस्कार भारतीची स्थापना सर्वप्रथम महाराष्ट्रात पुण्यात झाली. त्यावेळी पुणे महानगराच्या कार्यकारिणीचे अध्यक्ष पं. जितेंद्र अभिषेकी आणि मा. राजाभाऊ उपाध्यक्ष होते. त्यानंतर भाऊंकडे प्रांताची जबाबदारी आली. राजाभाऊंनी बैठकांव्यतिरिक्त प्रांतात अनेक समित्यांमधून प्रवास केला. **त्यांच्या बरोबर प्रवास करायचा म्हणजे आमची पर्वणीच असायची. या प्रवासात बैठकांमधून ते अनेक विषयांची मांडणी करत. कार्यकर्ता, सहा उत्सव, संस्कार भारतीची सैद्धांतिक भूमिका, कला, संस्कार व समाज, कलावंताची सामाजिक जाणीव, संस्कार भारती आणि संघ असे किती तरी वेगवेगळे विषय भाऊंनी मांडले.** अनेकवेळा प्रांताच्या बैठकीतील प्रश्नोत्तरे या सत्रात त्यांचे मार्गदर्शन लाभले आहे. समित्यांमधील असो किंवा कार्यकर्त्यांमधील वादविवादात असो, दोनही बाजू अत्यंत शांतपणे ऐकून घेऊन कोणालाही न दुखविता संयम राखून, संस्थेच्या ध्येयाशी, तत्त्वांशी तडजोड न करता अनेक समस्या भाऊंनी सोडविल्या.

सुरुवातीच्या काळात संस्कार भारतीचे काम म्हणजे नेमके काय करायचे हा प्रश्न सर्व कार्यकर्त्यांसमोर असायचा. राजाभाऊ अत्यंत साध्या शब्दात उत्तर द्यायचे, 'कार्यक्रम करत रहा त्यातूनच आपल्याला कार्याची दिशा मिळेल.' कार्यकर्त्यांशी वैयक्तिक, अनौपचारिक बोलणे, गावातील अनेकांच्या भेटीगाठी घेणे, कलावंताशी कार्यक्रमातील

रसिकांशी चर्चा करणे, हे नेहमीच होत असे. हे करत असताना भाऊंच्या मधील विद्यार्थी त्यांनी सतत जागा ठेवला. त्यांच्या मनातील अनेक शंका, प्रश्न, उत्सुकता काम करणाऱ्या सामान्य कार्यकर्त्यांना ते विचारत व समजून घेत. त्या चर्चेत एखादी माहिती मिळाली की पुढील भाषणात अतिशय छान पद्धतीने ते मांडत.

**संस्कार भारती, पश्चिम क्षेत्र अध्यक्ष....**

पुणे महानगर, महाराष्ट्र प्रांत आणि पश्चिम क्षेत्राची अध्यक्ष म्हणून जबाबदारी आल्यामुळे सहा प्रांतात राजाभाऊंनी प्रवास केला. क्षेत्रीय अध्यक्ष झाल्यामुळे आणि त्यांच्या बरोबर माझ्याकडेही केंद्रात जबाबदारी दिली गेल्यामुळे वर्षातून होणाऱ्या केंद्रीय बैठकीलाही आम्ही एकत्रित जायला लागलो. **प्रवासात भाऊंबरोबर डॉ. देगलूरकर, श्री. सुहासराव, श्री. इंदुरकर, नटवर्य श्री. चित्तरंजन कोल्हटकर (पूर्व प्रांत अध्यक्ष) असल्यामुळे अशा प्रवासात मला पर्वणीच असायची. विविध विषय, एखाद्या विषयावर सखोल चर्चा, जुने अनुभव, प्रसंग, गंमती–जंमती ऐकायला मिळायच्या. तिथे होणाऱ्या अखिल भारतीय बैठकीतून मिळणारे पाथेय जितके महत्त्वाचे असायचे तितकेच अनौपचारिक अशा सगळ्या प्रवासातील गप्पागोष्टींमधून मिळणारा विचार, दिशा, मनातील प्रश्नांना नकळतपणे मिळणारी उत्तरं अशा कितीतरी गोष्टी यांमधून साध्य व्हायच्या.** एकदा मध्य प्रदेशच्या रेल्वे प्रवासात या देशाची सांस्कृतिक रीती, नीति काय असावी? विषयावर संपूर्ण २८ प्रश्नांची प्रश्नावली तयार झाली. प्रत्येक प्रश्नावर भाऊंनी विस्तृत प्रकाश टाकला आणि ह्या प्रश्नांची उत्तरे महाराष्ट्रातील अनेक कलावंत, चिंतकांकडून भरून घेतली. पुढील सहा महिने हा उपक्रम राबविला गेला आणि केंद्र सरकारकडे ती प्रश्नावली पाठवून देण्यात आली.

**'थिंक टँक'**

महाराष्ट्रातून अखिल भारतीय कलासाधक संगम, जयपूर येथे २०० तर अ.भा. कलासाधक संगम नागपूर येथे ५०० कलासाधक भाऊंच्या नेतृत्वाखाली नेलेले आठवितात. त्या व्यतिरिक्त महाराष्ट्र प्रांताचे कलासाधक संगम जे झाले ते वेगळेच. या सर्व मोठ्या कार्यक्रमांमध्ये राजाभाऊंचे अतिशय मोलाचे मार्गदर्शन मिळे. हे मार्गदर्शन कधीही क्लिष्ट वाटले नाही. कारण भाऊ या सर्व प्रक्रियेतून अनेक वर्ष गेले असल्यामुळेच त्यामागे त्यांचा मोठा अनुभव होता. **अखिल भारतीय बैठकीतही कित्येकदा कलेसंबंधी, कार्यपद्धतीसंबंधी, धोरणांबद्दल अनेक महत्त्वाचे प्रश्न त्यांनी उपस्थित केले, त्यावर चर्चा घडवून आणली. अनेक वेगवेगळे विषय त्यांनी सर्वांसमोर मांडले.** उदा. कलाक्षेत्रात अनेक संस्था आपल्या आधीपासून काम करत आहेत. मग संस्कार भारतीचे वेगळेपण काय?' **संस्कार भारतीचे एक अखिल भारतीय पत्रक असावे असा केंद्रीय बैठकीत निर्णय झाला. राष्ट्रीय संघटनमंत्री मा. बांकेलालजींनी एकच नाव सुचविले ते म्हणजे राजाभाऊंचे.** पुण्यात बांकेलालजी त्यासाठी आठ दिवस ठाण मांडून होते. आम्ही रोज भाऊंकडे जात होतो. ते आठ दिवस आम्ही विसरूच शकत नाही, कारण भाऊ बोलत होते आणि मी लिहीत होतो. त्यानंतर जे पत्रक झाले ते आजही देशाभर मार्गदर्शक म्हणून सर्वांना उपयोगी पडत आहे. **खरंच राजाभाऊ एक चतुरस्र व्यक्तिमत्त्व' आणि संस्कार भारतीचेच नाही तर अनेक संस्थांचे ते 'थिंक टँक'च होते.**

**संकटांवर कुशलतेने मात...**

संघ जीवनात अनेक कठीण प्रसंगाना त्यांना तोंड द्यावे लागले आहे. प्रवासात मी जे प्रसंग ऐकले त्यापैकी पुणे तरुण भारत, शि.प्र. मंडळी यांसारख्या मोठ्या संस्था, संस्कार भारतीतही कार्यपद्धतीपासून कार्यकर्त्यांच्या व्यवहारापर्यंत समस्या असतील त्या कशा समजून घ्यायच्या, त्यातील कोणा–कोणाशी बोलयचे, केव्हा बोलायचे, व्यक्तिगत केव्हा, एकत्रित केव्हा याचे पक्के नियोजन असायचे. या समस्या सोडविताना संघ अधिकाऱ्यांशी बोलणं करणे, संघाला अभिप्रेत असलेल्या विचारांना कोणतीही बगल न देता नेमकेपणे समस्या निर्णयापर्यंत नेणे हे त्यांचं वैशिष्ट्य होतं. त्यासाठी प्रसंगी स्वत:ला वाईटपणा घ्यावा लागला तरी चालेल, संस्था बदनाम होता कामा नये व कार्यकर्ता तुटता व दुखवता कामा नये

याची ते पूर्णपणे काळजी घ्यायचे.

मला आठवतंय पुण्यात संस्कार भारतीची अखिल भारतीय कलाविधा कार्यशाळा होती. देशभरातून १५० कलासाधक यासाठी येणार होते. त्यानिमित्त निधी-संकलनासाठी गायक श्री. अनुप जलोटांचा कार्यक्रम नक्की केला. ५००० लोकांपर्यंत तिकिट विक्री झाली. गणेश कला-क्रीडा सारख्या भव्य संकुलात कार्यक्रम करायचं नियोजन झालं आणि दोनच दिवस आधी अनुप जलोटांनी अचानक जमत नाही म्हणून फोनवरूनच सांगितले. कारणे अगदी फालतू होती. परंतु राजाभाऊंनी प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक बोलविली. नेमकं काय झालं ते समजून घेतलं. त्यावेळी संस्कार भारतीची आर्थिक परिस्थिती खूप काही चांगली नव्हती. ६५ हजार रुपयांना फटका बसला. बैठकीची सुरुवातच भाऊंनी दहा हजाराचा स्वत:चा चेक देऊन केली. 'लोकांचे पैसे आधी परत करून टाका. अजून पैसे पाहिजे असल्यास सांगा, आपण व्यवस्था करू' असे सांगितले. बैठकीत भाऊंनी कार्यकर्त्यांचं म्हणणं शांतपणे ऐकून घेतलं. **सर्वांची मतं ऐकल्यानंतर राजाभाऊंनी सांगितले की संस्कार भारतीने कठोर भूमिका घ्यावी व वृत्तपत्रात कलाकाराच्या असहकार्यामुळे कार्यक्रम रद्द करावा लागला अशी बातमी प्रसिद्ध करावी. बातमी आल्यानंतर खूप जणांचे फोन आले. आपण भूमिका योग्य घेतलीत. दुसरे भाऊंनी सांगितले की कार्यक्रमाच्या दिवशी कार्यकर्त्यांनी गणेश कला-क्रीडा संकुलाच्या बाहेर उभे राहून रसिकांना सामोरे जावे. हेही आमचं नकळत प्रशिक्षण होतं. लोकांवर त्याचा मोठा परिणाम झाला. आलेली अनेक रसिक मंडळी म्हणाली की संस्थेचे कार्यकर्तेआम्हाला इथे भेटतील असं वाटलं नाही.** त्यांना वाटले की बाहेर कार्यक्रम रद्द झाल्याचा फलक असेल. ते बघून लोक जातील. परंतु **अशा छोट्या-छोट्या कृतीतून कार्यकर्त्यांवर फार मोठा संस्कार, आत्मविश्वास आणि संस्थेचा समाजाविषयी दृष्टिकोन हे भाऊंनी घडवून आणले.**

**संगीत प्रशिक्षण वर्गातील प्रसंग...**

संस्कार भारती पुणे महानगराच्या वतीने एक दिवसीय संगीत प्रशिक्षण वर्गाचे आयोजन केले होते. १५० जण किमान १० वर्ष संगीतातले साधक असलेले उपस्थित होते. समारोपाचे सत्र चर्चेमधून होणार होते. पं. जितेंद्र अभिषेकी व डॉ. रा. शं. वाळिंबे यांची चर्चा सुरू झाली. चर्चेच्या ओघात राग गाताना त्या प्रहरातच गावा का? असा विषय आला. डॉ. वाळिंबेंनी संदर्भ देत राग हा त्या-त्या प्रहरातच गायला पाहिजे असे सांगितले. परंतु पं. अभिषेकींनी ज्यावेळी चर्चेला सुरुवात केली त्यावेळी त्यांनी सांगितले की आज सकाळच्या प्रहराचा राग जो प्रसारित केला, तो मी काल आकाशवाणीला रात्री १२ वाजता गाऊन रेकॉर्डिंग करून आलो. प्रहराचा इथ प्रश्नच येत नाही. वगैरे... झालं! या चर्चेला वेगळेच वळण लागायला लागले. वादविवाद सुरु झाले. राजाभाऊंच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी व्यासपीठावर पं. जितेंद्र अभिषेकींना चिठ्ठी पाठविली की वेळ संपली आहे. आपण ही चर्चा इथेच थांबवू. कार्यक्रम संपला. सगळे आपापल्या घरी गेले. रात्री ११ वा. भाऊंना फोन आला. 'मी वाळिंबे बोलतोय.' प्रचंड चिडलेले होते. 'राजाभाऊ, आजपासून माझ्यासाठी तुम्ही मला मेलात आणि संस्कार भारतीही मेली,' खाडकन फोन ठेवून दिला. राजाभाऊंनी कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही. पुढच्या आठवड्यात डॉ. वाळिंबेंची पंचाहत्तरी होती. राजाभाऊंनी पंडितजी म्हणजे अभिषेकींना फोन केला. विद्याताई अभिषेकी, तुम्ही व मी आपण वाळिंबेंच्या घरी जाऊन त्यांना शुभेच्छा देऊयात. सायंकाळी राजाभाऊ, पंडितजी व विद्याताई रिक्षेने गेले. समोरून हे तिघेही येताना डॉ. वाळिंबेंनी बघितले. बुवांच्या हातात पुष्पगुच्छ होता. वाळिंबेंनी पत्नीला आतून बोलविले. 'कोण आलंय बघ आज आपल्याकडे.' **बुवांनी त्यांना पुष्पगुच्छ दिला आणि त्यांच्या पाया पडले. तसे वाळिंबेंच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले. त्यांच्या पत्नीला ते एकच वाक्य म्हणाले- 'अग ह्याला म्हणतात 'संस्कार भारती'.**

**हे ज्यांनी घडवून आणलं त्या भाऊंनी कसा विचार केला ? शिबिरात घडलेली घटना व्यक्तिगत न घेता, ही दोघंही कलावंत मंडळी थोर चिंतक आहेत. एखाद्या छोट्याशा घडलेल्या प्रसंगावरून यांचे नाते खराब**

**होऊ नये. त्यांना परत एकत्र आणण्याचं मोठं काम राजाभाऊंनी इतक्या सहजपणे केले. हे उदाहरण आम्हाला खूप काही शिकवून गेलंय.**

**सहजता...**

राजाभाऊंच्या पचाहत्तरीनिमित्त घरच्यांनी नातेवाईक, भाऊंचे ज्या संस्थांशी संबंध होते त्या कार्यकर्त्यांनाही बोलविले होते. आम्ही व्यासपीठावर ती. काकूंना व भाऊंना भेटायला गेलो. जाताना भाऊंनी हातात एक पाकीट दिलं. मला वाटलं काहीतरी बैठकीसंबंधी असेल म्हणून घरी गेल्यावरच बघू. घरी गेल्यावर पाकीट उघडल्यावर छानसे एक पत्र व त्यात रु. दहा हजाराचा धनादेश संस्कार भारतीसाठी दिलेला होता. माझ्या बरोबर डॉ. देगलूरकरही होते. मी प्रसादला फोन केला आणि दिलेल्या धनादेशासंबंधी सांगितले. त्यावेळी प्रसाद म्हणाला, 'भाऊंनी यानिमित्ताने १० संस्थांना असे १ लाख रुपये निधी दिला आहे, कुठंही वाच्यता, प्रसिद्धी न करता अत्यंत शांतपणे त्यांनी हा कार्यक्रम केला. असे अनेक प्रसंग आहेत की त्यातून आम्हाला कार्यासाठी दिशा मिळाली.

**बैठक-कार्यकर्ता-कार्यपद्धती आणि त्रिसूत्री**

**भाऊ नेहमी म्हणायचे की 'कार्यकर्ता बैठकीतून आला की तो अस्वस्थ होऊन आला पाहिजे. तरच तो कामाला लागेल- याचा अर्थ उमगेना. जसे-जसे आम्ही सातत्याने भाऊंबरोबर काम करू लागलो तसा-तसा अर्थ कळू लागला. बैठक ही नुसती मांडी घालून बसण्याची नाही तर ती कार्यकर्त्यांच्या विचारांची, मनाची बैठक असते. कार्यकर्ता बैठकीतून घडत असतो. सामूहिक निर्णय, अनुशासन, संस्थेची कार्यपद्धती, त्याची संस्थात्मक समज, सामाजिक भान या सर्व गोष्टी अशा बैठकांमधून दिसतात, त्याचा दृष्टिकोन व्यापक होत असतो.**

**ती भेट...शेवटची भेट ठरली...**

नेहमीप्रमाणे राजाभाऊंना भेटायला मी व माझी पत्नी सौ. स्वाती गेलो होतो. भाऊ वयोमानाप्रमाणे थकलेले होते, ऐकू कमी येत होते, दृष्टी क्षीण झाली होती. पण... मेंदू अजूनही तल्लख होता... सून सौ. अनघाने भाऊंच्या कानात सांगितले रवी-स्वाती भेटायला आलेत... आणि बोलता-बोलता अनघाताई म्हणाल्या 'ते आता माणसं ओळखत नाहीत. अगदी घरातल्यांनासुद्धा.' **मी त्यांचा हात हातात घेतला आणि काहीतरी बोलणार तेवढ्यात काय आश्चर्य, भाऊंनी एकदम बोलायला सुरुवातच केली. 'काय म्हणतोस रवी, स्वाती कसे आहात ? आई बाबा बरे आहेत का?, कन्या आर्याची चौकशी केली. भाऊंच्या घरातील सर्वांनाच एकदम आश्चर्याचा धक्का बसला. आम्ही सगळेच अवाक् झालो. घरातले सगळेच खूश झाले.** चार दिवसांनी अनघाताईंचा फोन आला, भाऊ सकाळीच गेले. भाऊंचं जीवन कृतार्थ झालं पण अनेकांची जीवनं राजाभाऊंच्या सहवासाने समृद्ध आणि कृतार्थ झाली. ही देवमाणसं आमच्या सारख्या सामान्य कार्यकर्त्यांच्या जीवनात यावीत हे आमचं भाग्यच आहे. आज राजाभाऊ आपल्यात नाहीत, पण त्यांचे विचार व चिंतन कार्य करत असताना आमच्या बरोबर आयुष्यभर राहणार आहे.

– मो. ९८२२०९८०५३

❖❖❖

माणूस म्हणून कसं जगावं आणि माणुसकी कशी असावी याचं मूर्तिमंत उदाहरण म्हणजे राजाभाऊ लवळेकर सरांचं व्यक्तिमत्त्व.

**– प्रा. राघव अष्टेकर**

# एक संन्यस्त पारिजात

**– जयंत कवठेकर**

१९९१ ची विजयादशमी असावी ती. पथसंचलन संपून परत निघत होतो. परतताना मा. राजाभाऊंची अचानक भेट झाली. नेहमीच्याच अगत्यानं त्यांनी सहज–संवाद सुरू केला. सेवानिवृत्तीला अजून २–२।। वर्षांचा अवधी होता. पण स्वेच्छानिवृत्तीचा विचार मनात घोळत होता. मित्रांशी आणि ज्येष्ठांशी त्याबाबत बोलत होतो आणि आता अकल्पितपणे मा. राजाभाऊंच्या रूपाने मार्गदर्शक 'परिस'च लाभला होता. त्यांनी 'स्व'–रूपवर्धिनीला प्राधान्यक्रम देऊन दोन–तीन पर्याय समोर ठेवले. वर्धिनीचा पर्याय नक्की झाला. अर्थातच या अंतिम निर्णयात मोठा वाटा होता मा. राजाभाऊंच्या आणि मा. किशाभाऊंच्या आश्वासक मांडणीचा.

१९५१–५२ पासून राजाभाऊंच्या घराशेजारच्या शाखेत जात होतो व तेव्हापासूनची ओळख. पण शाळेतले एक शिक्षक म्हणून राजाभाऊंचा खराखुरा 'शिक्षक–संस्कार' माझ्यावर झाला तो १९६३ मध्ये. त्यावेळी मी रमणबागेत S.T.C. करत होतो.

त्यावेळचे राजाभाऊ माझ्यासमोर अजून उभे राहतात. आत्ताच्या रमणबागेच्या प्रांगणात प्रवेश केला की समोरच्या बाजूला रमणबागेच्या इमारतीची दुमजली बाजू येते. तेवढीच त्यावेळची मुख्य इमारत होती. डाव्या बाजूच्या जिन्याजवळ मोठा, रुंद फलक होता. **राजाभाऊंचं सुंदर हस्ताक्षरातलं, निरनिराळ्या रंगांच्या खडूंनी सजवलेलं अत्यंत आकर्षक फलक–लेखन रोज नित्यनूतन रूप घेऊन उभं असे. काय नसे त्या लेखनात ? त्यात सुंदर सुभाषिते असत. उद्बोधक विचार असत, प्रेरणादायी दिनविशेष असत. मनोवेधक काव्यपंक्ती असत आणि विशेष म्हणजे या लेखनात केव्हाही एकसुरी रटाळपणा नसे. खरं म्हणजे हे लेखन हा एक सुंदर कलात्मक आविष्कार असे.** सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे अनेक वेळा हे प्रेक्षणीय लेखन–काम भोवतालच्या छोट्या प्रेक्षकांच्या गर्दीत चालत असे. शाळेतल्या छोट्या विद्यार्थ्यांप्रमाणेच S.T.C. च्या  वर्गातल्या आम्हा **मोठ्या विद्यार्थ्यांनाही हे संस्कारी फलक–लेखन खिळवून ठेवत असे.** अतिशयोक्ती नाही. पण रोजचं वर्तमानपत्र जेवढ्या उत्सुक कुतूहलानं आपण हातात घ्यायला धावतो तितक्या उत्सुकतेनं आम्ही काही जण तास संपताच 'त्या' फलकाकडे धावत असू.

पुढे मुख्याध्यापक झाल्यावर आपणही फलक लेखनात तरी किमान 'राजाभाऊ' व्हावं म्हणून मी क्षीण प्रयत्न करत होतो. **लक्षात येत होतं की रोज सादर करायचं, अवघं एक स्वलिखित 'संस्कार–पृष्ठ' 'ही शिवधनुष्य पेलण्यापेक्षाही' अवघड गोष्ट आहे. लक्षात आलं की या एका बाबतीतही 'राजाभाऊ' होणं हे फार अवघड आहे आणि राजाभाऊंच्या प्रमाणे हे लेखनव्रत अखंड–अविरत अनेक वर्ष चालवणं हे तर खूप–खूप अवघड आहे.**

पुन्हा निवृत्तीनंतरच्या माझ्या परिपक्व वयात, राजाभाऊंचा सहवास मला लाभला आणि न कळलेले राजाभाऊ अजून खूप बाकी आहेत हे लक्षात आलं. या काळात एक मात्र कळले की 'स्कूटर' हे सुद्धा एक उत्तम संस्कार–साधन आहे आणि मी त्याबाबतीत खरंच भाग्यवान होतो. कारण आदरणीय बापूराव दात्ये, किशाभाऊ आणि राजाभाऊ अशा महारथींचं माझ्या स्कूटरवर 'सारथ्य' करताना मला 'जे' मिळालं आहे त्याचं मोल कुठेच करता येणार नाही. संघात आल्यावर पुनर्जन्मावरचा विश्वास पक्का होतो. कारण पूर्व–सुकृताची काही जोड असल्याशिवाय अशा संस्कारी–परिसांचा स्पर्श, लाभ अनायासे होणं शक्यच नाही.

**राजाभाऊंना वर्धिनीतून घरी घेऊन जाणं ही एक सुखद–सुंदर यात्राच असे. या यात्रेतले विषय, त्यावरती राजाभाऊंची भाष्ये, त्यामागचे त्यांचे चिंतन आणि व्यासंग, विशेष म्हणजे त्या मांडणीतला त्यांचा टोकदार मार्मिक, नेमकेपणा माझ्या विचारांना खूप काही चालना देणारा असे.** संघ स्वयंसेवक म्हणजे 'झापड लावलेले'

असं काही जणांनी करून घेतलेलं गोंडस मत असतं. त्यांनी प्रामाणिकपणे राजाभाऊंशी संवाद साधला असता आणि आपला प्रामाणिकपणा कायम ठेवला असता तर नक्कीच त्यांना त्यांच्या गोंडस मतांना छेद द्यावा लागला असता. राजाभाऊंना सत्यजित राय आणि त्यांचा 'पथेर पांचाली' मनापासून आवडत होता. (अगदी माझ्याचसारखा). त्यांचा विद्यार्थी असलेल्या एका ज्येष्ठ 'New Wave' दिग्दर्शकानं, राजाभाऊंनी लोणावळ्याच्या सहलीत केलेल्या 'पथेर पांचाली'च्या कथाकथनाचा, आपल्या कथनात आवर्जून उल्लेख केला आहे. उत्तम साहित्यकृतींचे ते उत्तम जाणकार होते. **कै. श्री. अ. ज. प्रभू, त्यांनी प्रकाशित केलेल्या एका गाजलेल्या साहित्यकृतीतील राजाभाऊंच्या मोलाच्या योगदानाबद्दल, कृतज्ञतापूर्वक उल्लेख करत असत.**

अनेक वेळा काही यक्षप्रश्न माझ्या परिपक्व वयातही उभे रहात. कधी वैयक्तिक-खाजगी. कधी कामातले. कधी वैचारिक गोंधळातून स्वतःच निर्माण करून घेतलेले. **अशा वेळी स्थिरबुद्धीच्या आणि निकटच्या 'युधिष्ठिरा'ची आवश्यकता असे. याबाबतीत मी भाग्यवान होतो. राजाभाऊंच्या रूपाने असा 'युधिष्ठिर' मला वेळोवेळी लाभला.** माझा थोरला भाऊ आणि राजाभाऊ समवयस्क स्वयंसेवक बंधू होते. हाही त्यांच्या आणि माझ्या जवळिकीचा एक धागा होता.

'स्व'-रूपवर्धिनीचे कार्याध्यक्ष असलेले 'राजाभाऊ' हाही एक 'प्रेरणादायी परिचय' आहे. **सहचिंतन बैठकीतली त्यांची भाष्ये, त्यांचे निर्णय, त्यांची प्रास्ताविके, त्यांचे समारोप आणि शब्दाशब्दातून प्रकटणारी त्यांची तळमळ हे सारे कार्यकर्त्यांना कार्यरत करणारे 'टॉनिक'च असे.** त्यात डॉ. जयंत नारळीकरांनी सांगितलेली 'कौत्साची गुरुदक्षिणेची कथा' डॉ. नारळीकरांच्या भाष्यासह येई. वर्धिनीच्या आचार-विचारांचा गाभाच जणू अशी 'स'-काराने प्रारंभ झालेली 'संस्कार-सप्तपदी' येई. मा. राजाभाऊ कार्यकर्त्यांच्या बैठकात फार सुंदर रीतीनं ही सकारात्मक सप्तपदी मांडत असत. **'संपर्क-सान्निध्य-सहवास-संवाद-सहानुभूती-समर्पण-सातत्य' अशी ती प्रेरणादायी सप्तपदी असे.** संघटना कशी बांधावी, किती सजगतेनं परिश्रम करावेत आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे त्यात सातत्य कसं ठेवावं हे ते सांगत. तसंच संपर्क हा प्रारंभ पाया आणि समर्पण हे अंतिम साध्य असा त्यांचा उद्योग असे. शाखेत येणाऱ्या प्रत्येकाला असे घडवायचे असं ते तळमळीने मांडत.

बैठकीत वेगवेगळे विचार मांडले जात. काहीवेळा परस्पर विरोधी मतेही मांडली जात. विरोधी मत मांडताना, मा. राजाभाऊ समोर असल्यानं काही जण संकोचत. अशा वेळी मा. राजाभाऊ समाजसुधारक आगरकरांचं वाक्य समोर ठेवत की, 'विचारकलहाला कधीही घाबरू नका'. पुढे ते म्हणत 'सर्वांगीण विचार होण्याकरिता सर्व बाजू पुढे येणं आवश्यक असतं. चर्चा करताना स्पष्टपणे बोलावे. मात्र सर्व अंगांचा विचार करून निर्णय मात्र एकमतानं घ्यावा.' यावेळी ते संघाच्या एका ज्येष्ठ अधिकाऱ्याचे उदाहरण देत. केंद्रीय प्रतिनिधी सभेत एकदा एका विषयावर या ज्येष्ठ अधिकारी व्यक्तीचे सर्वांपेक्षा भिन्न मत होतं. त्यांनी ते आग्रहानं मांडलं. ठराव पारित होताना मात्र तो एकमतानं पारित व्हावा म्हणून आपलं व्यक्तिगत मत बाजूला ठेवून ते ठरावाच्या बाजूने उभे राहिले. वर्धिनीचे निर्णय कसे व्हावेत याकरिता ते हा मानदंड पुढे ठेवत.

मा. राजाभाऊ प्रसंगाचं तारतम्य राखून, विवेकानं कसा निर्णय घेत याचं एक उदाहरण आहे. भावे कन्या विद्यालय येथे आजोळचे शिबिर चालू होतं. शिबिराच्या समारोपाचा प्रसंग. सुप्रसिद्ध व्यंगचित्रकार श्री. मंगेश तेंडुलकर हे प्रमुख पाहुणे होते. ते मुलांच्या समोर खूप सुंदर बोलले. विषयमांडणी अत्यंत प्रेरणादायी आणि प्रभावी होती. आजोळच्या सर्व मुला-मुलींना त्यांचं भाषण खूप आवडलं. समारोपाच्या भाषणाकरिता मा. राजाभाऊ उभे राहिले. ते काय बोलणार याविषयी माझ्याही मनात कुतूहल होतं. मा. राजाभाऊ म्हणाले, 'श्री. मंगेश तेंडुलकर खूपच छान आणि नेमकेपणानं बोलले आहेत. माझ्यासकट आपण सर्वजण त्यांचे विचारधन आपल्याबरोबर घेऊन जाऊयात. हे विचार वर्धिनीचेच विचार आहेत. मी आणखी वेगळा समारोप काय करू ?' असे म्हणून मा. राजाभाऊ खाली बसले. श्री. मंगेश

तेंडुलकरांचं वर्धिनीशी अनौपचारिक नातं तेव्हापासून कायमचं जोडलं गेलं.

वर्धिनीत राजाभाऊ एक चिकित्सक आणि प्रसंगी कठोर प्रशासक असत, तर कधी आपल्यामुळे कुणी कार्यकर्ता दुखावू नये म्हणून तगमगणारे वत्सल कुटुंबप्रमुखही असत.

राजाभाऊंचे घर, त्या घरातले त्यांचे वत्सल पिता म्हणून वागणं, आणि वहिनी, प्रसाद आणि सौ. अनघा या सर्वांचे अगत्य हाही एक आनंदमय अनुभव आहे.

**खरंच ! 'राजाभाऊ म्हणजे एक अखंड बहरलेला संस्कार-पारिजात होता. कुसुमाग्रजांनी शब्दबद्ध केलेला, पायाशी माणिकमोत्यांची बरसात घालून बसलेला एक 'संन्यस्त पारिजात' होता.'**

– मो. : ९४०४२३१८७२

❖❖❖

---

## एक चालतं-बोलतं प्रशिक्षण केंद्र !

**– सौ. स्वाती रवींद्र देव**

संस्कार भारतीमध्ये काम करत असताना संगीत विभागातर्फे देशभक्तीपर गीतांची ऑडिओ कॅसेट करायची ठरलं. बैठकांमधून, कार्यक्रमांतून काही गीतं गाण्याव्यतिरिक्त कॅसेट निर्मितीचा कोणताही विशेष अनुभव मला नव्हता. मग संघाच्या स्वयंसेवकांकडून वेगवेगळी पद्यं संकलित करणे, त्यांच्या चाली समजून घेणे सुरू झाले. अर्थात नेहमीप्रमाणे गीतांची निवड करण्याचं पूर्ण स्वातंत्र्य आम्हाला दिलं गेलं होतं. शेवटी आम्ही आमच्या मतीप्रमाणे काही गीतं निश्चित केली. बहुतेक सर्वच चाली रागांमध्ये बांधलेल्या होत्या. मात्र काही गीतांमध्ये कडवीही बरीच होती आणि सर्वच कडव्यांची चाल एकसारखी होती. तेव्हा काही कडवी गाळावी अथवा चालीमध्ये काही बदल करावा असा विचार मनात आला. पण हा थोडा संवेदनशील मुद्दा होता.

'श्रेयाचा मज नको लेशही, निर्माल्यात विरावे' या उक्तीप्रमाणे असंख्य अज्ञात कवी आणि संगीतकार – ज्यांनी या गीतांमध्ये प्राण ओतला आणि संघकार्य करत असताना सतत प्रेरणा आणि स्फूर्ती देणारी, वर्षानुवर्षे गायली जात असलेली अशी ही गीतं, त्यामध्ये काही बदल करणं जरा अवघडच वाटत होतं. एक-दोघा ज्येष्ठ अशा कार्यकर्त्यांशी बोललो असता तेही विशेष अनुकूल दिसले नाहीत. शेवटी या बाबतीत प्रत्यक्ष मा. राजाभाऊंशीच बोलावे या विचाराने दोघे तिघेजण त्यांना भेटायला गेलो. त्यांनी नेहमीच्या शांतपणे आमचं बोलणं ऐकून घेतलं आणि तत्काळ म्हणाले, 'का नाही, मूळ गीताच्या आशयाला धक्का लागत नसेल तर आवश्यक ते बदल जरूर करा.' खरंच त्या क्षणापासून राजाभाऊंकडे बघण्याची माझी दृष्टीच बदलून गेली.

**पुढील काळात संस्कार भारतीच्या कामात अनेक चढ-उताराचे प्रसंग येत-जात राहिले. पण प्रत्येक वेळी राजाभाऊ आता काय विचार मांडतील हे जाणून घेण्याची उत्सुकता असायची आणि प्रत्येक वेळी त्यांचा व्यापक दृष्टिकोन पाहून चकित व्हायला झालं. एखादा बदल इतका सहज अलगद स्वीकारला जाणं, काम करत असताना एखाद्या उपक्रमाच्या जबाबदारीबरोबरच निर्णय घेण्याचेही पूर्ण स्वातंत्र्य असणं, कार्यकर्त्याने सुचवलेला विचार पुरेशा गांभीर्याने ऐकून घेतला जाणं याचा खूप सकारात्मक परिणाम पुढील अनेक उपक्रम करताना तसेच विविध कॅसेट-निर्मिती करताना आमच्यावर झाला.**

– मो. : ९८५०९७२५२६

❖❖❖

# ज्ञानाचे सदावर्त – राजाभाऊ लवळेकर

**– प्रा. श्याम जोशी**

**– ते दिवस...**

मला आठवतात राजाभाऊंसोबतचे ते दिवस १९९० च्या दरम्यानचे. संस्कार भारतीच्या नाट्यविधीसाठीचा काही कार्यक्रम निश्चित करण्याची संकल्पना होती, त्याची चर्चा करण्यासाठी एक दिवस सुहास कुलकर्णी व उदयन इंदूरकर यांच्यासोबत राजाभाऊ आमच्या घरी आले. पहिल्याच भेटीत राजाभाऊंच्या मृदू व्यक्तिमत्त्वाचा विलक्षण प्रभाव जाणवला. कुटुंबातील प्रत्येकाची त्यांनी आस्थेने चौकशी केली. **त्यांची प्रत्येक कृती सुख–संवादाकडे नेणारी, एक जवळचं नातं प्रस्थापित करणारी होती.** संस्कार भारतीच्या कार्याचे स्वरूप त्यांनी सहज, सुंदर स्वरूपात समजावून सांगितलं... त्यांचा पिंड हाडाच्या शिक्षकाचा होता. **त्यांच्या व्यक्तिमत्त्वाभोवती ज्ञानाचं एक तेजोवलय होतं.** माणसं जोडण्याची एक विलक्षण कला त्यांना अवगत होती. या पहिल्याच भेटीत माझं त्यांच्याशी जिव्हाळ्याचं नातं जोडलं गेलं. त्या नंतरच्या पंचवीस वर्षांच्या कालावधीत असंख्य वेळा आम्ही सर्व कार्यकर्ते सातत्याने त्यांना भेटत राहिलो. त्यांच्या घराचं नाव 'ज्ञानिया' आणि हे ज्ञानियांचा 'राजा'. हे स्थान आम्हा सर्वांसाठी आश्रम–शाळेसारखं होतं. संस्कार भारतीच्या विस्तारीकरणाचे सारे धडे आम्ही याच शाळेत गिरविले. आदरणीय राजाभाऊंचे सारे जीवन हे इतके अनुभवसमृद्ध होते की त्यांनी सातत्याने नवनवीन देत राहावे व घेणाऱ्याने सतत काही ना काही घेत राहावे – अशी ही सतत चालणारी प्रक्रिया होती. त्यांना भेटलेली माणसे, त्यांनी पाहिलेले प्रसंग, त्यांनी तोंड दिलेल्या समस्या, त्यांनी समजावून घेतलेले प्रश्न, माणसा–माणसातल्या नाजूक स्नेहसंबंधांची त्यांची हाताळणी आणि एका निश्चित ध्येयसाधनेसाठी त्यांनी केलेले अथक प्रयत्न – हा सारा प्रपंच एवढा मोठा आहे की या साऱ्यांची केवळ नोंद करावयाची म्हटली तरी एका सुरस–ग्रंथमालेची निर्मिती होऊ शकेल.

**– सावध–साधक....**

**कोणतेही संघटन आकारास येऊ लागले की संघटनात्मक रचना, कार्याची रीती–नीती आणि अर्थकारण अशा त्रिकोणीय आयामाचा विचार व त्यानुसार प्रत्यक्ष कृती आवश्यक ठरते.** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे समर्पित स्वयंसेवक असल्याने **राजाभाऊंच्या चिंतन–प्रक्रियेत या मूलभूत घटकांची प्रतिमा अत्यंत स्वच्छ व स्पष्ट होती.** ललित व प्रायोगिक कलांच्या माध्यमातून भारतातील कलासाधकांचे राष्ट्रकार्यासाठी संघटन निर्माण करण्याचे महत्कार्य संस्कार भारतीने स्वीकारले आहे. संस्कार भारतीच्या कार्यासाठी आवश्यक असणाऱ्या रीती–नीती संबंधीचा मूलगामी विचार मा. राजाभाऊंनी केला होता. या संबंधीचे त्यांचे चिंतन मर्मभेदी होते. **विविध स्तरांवरील प्रत्येक बैठकीत त्यांचे वक्तव्य दिशादर्शन देणारे होते. अनेक सांस्कृतिक संकल्पनांचं तर्कशुद्ध व शास्त्रीय विवरण करणारे ते एक सावध–साधक होते.** सौंदर्य हे बाहेर नसून बघणाऱ्याच्याच अंतरात्म्यात वसलेले असते. या सुंदर आत्म्याचे प्रकटीकरण म्हणजे कला. सर्व जीवनाला सुबक वळण देणे हे कलेचे प्रमुख कार्य आहे असे ते सातत्याने सांगत. **सुगम तत्त्वज्ञान, सुगम साधना, सुगम आचारधर्म या त्रिसूत्रीत राजाभाऊंचे साधकत्व दडलेले होते. शांत, धीरोदात्त व अवघड वाटांतून मार्ग दाखविणारे ते समर्पित साधक होते.** कार्यकर्ता हेरण्याची विशेष कला व निरीक्षणशक्ती कुशलतेने वापरून त्यांनी सजग कार्यकर्त्यांची अभेद्य साखळी निर्माण केली. एका आठवणीची नोंद करणे अनिवार्य आहे. हृदयाची शस्त्रक्रिया आवश्यक वाटल्याने मा. राजाभाऊंना पुण्यातल्या एका प्रसिद्ध इस्पितळात ठेवले होते. रक्ताची आवश्यकता भासल्यास ते वेळीच उपलब्ध व्हावे या हेतूने कार्यकर्त्यांची एक मोठी रांग, पहाट–वेळेपासून इस्पितळात हजर होती. एवढी मोठी रांग पाहून इस्पितळात कुजबूज सुरू झाली. सर्जनने मा. राजाभाऊंना विचारले, 'केवळ एका निरोपाच्या आधारावर हे एवढे रक्तदाते तुमच्यासाठी शांतपणे तासन्तास ताटकळत उभे आहेत, हे नेमके

काय आहे ?' राजाभाऊ शांतपणे म्हणाले, 'त्यांचे व माझे, रक्ताच्या पलीकडचे, कार्यसंस्कृतीचे नाते आहे.' सर्जन साहेबांच्या व्यावहारिक गणितात हे बसण्यासारखे नव्हते, परंतु हृदयाचे ऑपरेशन करणाऱ्या सर्जनच्या हृदयात हळुवारपणे प्रवेश करून राजाभाऊंनी संस्कार भारतीची नाम-मुद्रा केव्हा उमटविली हे सर्जन साहेबांनाही कळले नाही! 'ये हृदयींचे तें हृदयी' सहजपणे संक्रमित करणाऱ्या ज्येष्ठ सावध-साधकाचे नांव 'कृष्णाजी' असावे, हे नियतीचेच विधान असले पाहिजे ! अशा अनेक आठवणींचा कल्लोळ दाटून येतो. किती आणि काय काय सांगावे ?

**- ज्ञानयोगी...**

वंदनीय राजाभाऊ हा एक 'ज्ञानयोगी' म्हटला पाहिजे. **मन, बुद्धी, चित्त यांचं संतुलन साधून अहंकारापासून दूर राहणारा हा प्रज्ञावंत प्रत्यक्षात मात्र भक्तियोग जगला.** संस्कार भारतीचे कार्य हा राष्ट्रासाठी समर्पित होण्याचा भक्तियोगच म्हटला पाहिजे. केवळ अंतःकरणाची भाषा बोलणारा व उत्कृष्ट श्रवण-कौशल्य साध्य केलेला हा ज्येष्ठ बंधुवर, माझ्या वैयक्तिक जीवनात सुगंध निर्माण करून गेला. त्यांचा प्रत्येक शब्द, त्यांचं लोभस रूप, त्यांचा आश्वासक स्पर्श हे सारं, आजही हवंहवंसं वाटतं. 'व्यथा बोलावी, ती तर कोणिया पाशी ?' असा प्रश्न अनुत्तरितच राहतो.

आदरणीय राजाभाऊ बहुश्रुत होते. अत्युत्कृष्ट वक्ता होते. रा. स्व. संघ, 'स्व'-रूपवर्धिनी किंवा संस्कार भारतीचे जे-जे दायित्व त्यांच्याकडे होते त्या प्रत्येकाचा निर्वाह निरपेक्ष वृत्तीने, अभ्यासपूर्ण रीतीने त्यांनी केला. त्यांचे वाचन अफाट होते, वृत्ती शोधकाची होती, अनेक भाषांवर प्रभुत्व होते. नित्य, नूतन काही जाणून घेण्याची आस होती. कार्यकर्त्याला माणुसकीच्या भावनेतून समजावून घेण्याची प्रक्रिया त्यांना अत्यंत महत्त्वाची वाटत असे. **माणूस त्याच्या गुण-दोषांसहित स्वीकारता आला पाहिजे असा त्यांचा आग्रह असे.** कार्यकर्त्याच्या जीवनात कष्ट करताना सुद्धा, सुखाचे मूलमंत्र ते त्यांच्या अभ्यासपूर्ण वक्तव्यातून सोदाहरण विशद करीत. दैनिक तरुण भारतच्या संपादकपदी असताना ज्या-ज्या जटिल प्रश्नांची सोडवणूक राजाभाऊंनी केली त्यावरून ते किती कुशल संघटक होते याचे दर्शन होते. दै. तरुण भारत मध्ये १९ फेब्रु. ते २६ फेब्रु. १९९० या काळात माझी राजकीय विषयावरील एक लेखमाला ओळीने आठ दिवस प्रसिद्ध झाली. हे काम केवळ राजाभाऊंच्या प्रोत्साहनामुळे घडले. या लेखमालेने महाराष्ट्रभर खळबळ उडवून दिली होती. माझ्या अनेक व्याख्यान-विषयांची अभ्यासपूर्ण चर्चा राजाभाऊंच्या समवेत झाली आहे. **या ज्ञानयोगी व्यक्तिमत्त्वाचे मोलाचे मार्गदर्शन लाभल्याने मला लेखनाची एक नवी दृष्टी प्राप्त झाली हे आवर्जून सांगितलेच पाहिजे.** एवढा निगर्वी, शांत, स्थिरचित्त, निश्चयी मार्गदर्शक मला लाभला हे परम भाग्यच. हे सुख अवर्णनीय आहे. चिरस्थायी आहे.

संस्कार भारतीचे सहा अनिवार्य कार्यक्रम, भू-अलंकरण कलेतील सांस्कृतिक चिन्हे व विविध सांस्कृतिक विषयांचे अचूक अन्वयार्थ या ज्ञानराजाने हजारो कार्यकर्त्यांसमोर उलगडून दाखविले व संस्कार भारतीच्या यशाचा सोपान प्रशस्त केला. त्यांच्या वक्तव्यांतून कुठून-कुठून आनंदाचे अनामिक झरे फुलत राहिले, जिवाला आर्द्र करीत राहिले. त्यांच्या पाऊलखुणांवर सजगतेने चालत राहिल्यास कलासाधकांचे एक मजबूत संघटन सुरेख आकार घेऊ शकते असा विश्वास दृढ होतो.

**- प्रवास...**

पायाला भिंगरी असलेला हा साधक कार्यसाफल्यासाठी आयुष्यभर प्रवास करीत राहिला. प्रवास-संपर्क-सहवास हे राजाभाऊंचे जीवन सूत्र होते. **त्यांच्या बरोबर देशभर, संस्कार भारतीच्या विस्तार कार्यासाठी जाता येणे ही आम्हा कार्यकर्त्यांना पर्वणीच होती. सर्वांच्या समवेत रेल्वेच्या साध्या डब्यातून प्रवास असे. प्रवासात विशेष व्यवस्थेचा आग्रह त्यांनी कधी धरला नाही. काही असुविधा, आनंदाने सोसून स्मित हास्य करीत, साऱ्यांना न्याहाळत, ते हास्य विनोदात सामील होत असत.** दूरदूरचे प्रवास असल्याने एकामागून एक अशा अनेक विषयांचा ऊहापोह होत असे. संस्कार भारतीच्या कार्यशैलीच्या अनेक रूपरेषा या प्रवासांदरम्यान आरेखित होत असत.

प्रत्येक प्रवासात राजाभाऊंकडून प्राप्त झालेले पाथेय सुवर्णाहून अधिक मोलाचे आहे. **राजाभाऊंच्या सामानात एक भरगच्च अशी शबनम बॅग असे. त्यात घरून वहिनींनी भरून दिलेल्या तहान लाडू, भूकलाडूची यथेच्छ सुविधा असे. हा चालता–बोलता साधुपुरुष प्रत्येकाची किती प्रेमाने, किती जिव्हाळ्याने वास्तपुस्त ठेवी याला खरेच तुळणा नाही.** प्रवासातील संवादात त्यांनी उच्चारलेली काही निरीक्षणे अंतरात्म्यात घट्ट रुतून बसली आहेत.

**कलेविषयी बोलताना एकदा ते म्हणाले, 'कला ही नेहमीच सर्व जीवन व्यापून टाकते. तान्ह्या मुलाला झोपवताना म्हटल्या जाणाऱ्या अंगाई गीतात, संवादातील विनोदात, नाना प्रकारच्या नकला करण्यात, शृंगारलेल्या घरांत, मंदिरांतील विविध महोत्सवांत, शेतकऱ्याच्या भलरी गीतात, गायी वासरांच्या हंबरण्यात कला प्रकट होत राहते. कलेत जसं हंसू उठून दिसतं, तसं रडूही शोभून दिसतं. जसा आनंद, तशीच आसवं ही कलेला सजवतात. सौंदर्याला जेवढं, तेवढंच कुरूपतेलाही कलेत स्थान आहे. उसासे, चीत्कार, जल्लोष, वात्सल्य अशा सर्व भावरूपांना कलेत स्वतःचं असं स्थान असतं. कलेची ही रूपे पाहण्याची दृष्टी समाजाला देता येणं हे आपलं कार्य असलं पाहिजे.'**

आणखी एका प्रवासात त्यांची रेल्वेगाडीच्या लयीत ब्रह्मानंदी टाळी लागली आणि ते बोलते झाले. म्हणाले, **'संस्कृती म्हणजे प्रत्येकाच्या अंतरंगात वसत असलेले 'श्वापद–गुणधर्म' संपविणे आणि हे करण्यात कलांचा फार मोठा वाटा असला पाहिजे.** समाजजीवनातल्या कृती आणि विकृतींतून, समाजासाठी विधायक असेल तेवढंच निवडता येण्याचा संस्कार रुजविण्याचा आपला प्रयत्न असला पाहिजे.'

या सत्पुरुषाच्या सहवासात कार्यकर्त्यांची रसिकता व कार्याची जाण समंजस आणि प्रगल्भ होत राहिली. एवढी न संपणारी शिदोरी सर्वांना देऊन हा आनंदयात्री ८ जून २०१६ या दिवशी अनंतात विलीन झाला. **त्यांना आदरांजली वाहताना, कवयित्री शांता शेळके यांच्या चार ओळी आठवतात – 'किती साहिल्या वेदना तू, तरीही । कुठे शब्द नाही कुडावाकुडा । किती थोर कारुण्य, कैशी तितिक्षा–। उमाळा तुझ्या अंतरी केवढा !'**

– मो. : ९८२२८८७५६५

❖❖❖

राजाभाऊ लवळेकर सर हे जनकल्याण विद्यालय, हरंगुळचे एका अर्थाने पालकच होते. लातूरला आल्यावर हरंगुळला शाळेत त्यांची भेट आणि शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्याशी त्यांचा होणारा अनौपचारिक वार्तालाप हा कार्यक्रम ठरलेला असायचाच. कारण सर्वांनाच राजाभाऊंशी बोलायला आवडायचे. अशाच एका भेटीत राजाभाऊंची जेवणाची व्यवस्था नव्याने शाळेत रुजू झालेल्या एका शिक्षकाच्या घरी केली होती. त्या घरातील माऊलीने पाहुणे येणार म्हणून त्यांच्या हातचा खास पदार्थ म्हणजे कडक भाकरी आणि मसालेदार आमटी असा बेत केला होता. खरं म्हणजे भाऊंना कडक भाकरी चावताना आणि मसालेदार तिखट आमटीचाही खाताना त्रास होत होता. परंतु राजाभाऊंच्या चेहऱ्यावर मात्र याचा लवलेशही नव्हता.त्या माऊलीच्या स्वयंपाकाचे कौतुक करत त्यांनी भोजनाचा आस्वाद घेतला.

बाहेर पडल्यावर मला मात्र राहावले नाही आणि मी म्हटले, 'भाऊ, निरोप देताना माझ्याकडून गडबड झाली. त्यामुळे तुम्हाला मात्र त्रास झाला.' पाठीवर थाप देत राजाभाऊ म्हणाले, 'इतक्या आत्मीयतेने बनविलेल्या स्वयंपाकाचा त्रास कसा होईल ?' माणूस जपण्यासाठी ही मोठी माणसं कसं आचरण करतात याचा वस्तुपाठ यानिमित्ताने मला मिळाला.

**– श्री. मोहन कुलकर्णी**

## माझ्या स्मरणातील कै. राजाभाऊ लवळेकर

**– राज चौधरी**

मा. दादासाहेब बेंद्रे (मा. महानगर संघचालक), कै. गोपालजी ठक्कर (महानगर कार्यवाह) आणि कै. राजाभाऊ लवळेकर (महानगर सहकार्यवाह) यांच्याबरोबर महानगर सहकार्यवाह म्हणून काम करण्याचे भाग्य मला प्राप्त झाले होते. या तिघांचे वय, समाजातील प्रतिष्ठा, संघाचा अनुभव लक्षात घेता मी खूप लहान होतो. माझा बुजरेपणा कै. राजाभाऊंच्या लक्षात आल्यावर त्यांनी अनेक वेळा सहज गप्पांसाठी मला रमणबागेतील बंगल्यावर बोलावले होते. माझ्या घरीही सहज येत असत. **संघाच्या घरातील वातावरण कसे असते हे मला कै. राजाभाऊंच्याकडे बघायला मिळाले. सहज गप्पांचा विषय काय असावा ? कधी बदलावा ? आपल्या कामाचे भान कसे करून द्यायचे ? याची शिकवणीच मला मिळाली होती.**

ज्या काळात या महारथींबरोबर काम करत होतो तो काळ आणीबाणीनंतरचा होता. अनेक कार्यकर्ते पोलिसांच्या कारवाईमुळे, भवितव्य आणि भविष्याच्या चिंतेमुळे दबून काम करत होते. आंदोलक आणि भूमिगत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा उत्साह इ. अशा संमिश्र परिस्थितीत काम चालू होते. सरकार बदलले आणि खूप जण कामाला आले. सरकार अठरा महिन्यात गेल्यावर पुन्हा कार्यकर्त्यांची कमी भासू लागली. अशा काळात **सक्षम व संयमी नेतृत्व कसे असते ते कै. राजाभाऊंच्या स्वरूपात पाहायला मिळाले. प्रत्येक कार्यकर्त्याचे म्हणणे शांतपणे ऐकून झाल्यावरच ते बोलायचे. कार्यकर्त्याचे बोलणे मधे तोडायचे नाही असा स्वभाव होता.** पण सर्वांनी संघाला अपेक्षितच काम केले पाहिजे यासाठी निर्णय घ्यायला ते मागेपुढे बघत नसत. परंतु आपल्या निर्णयामुळे कुणाचाही अपमान होणार नाही, कोणीही संघापासून तुटणार नाही याची ते काळजी घेत असत.

संघाचे काम करताना काय-काय केले पाहिजे ? असे त्यांना मी विचारले होते. शांत मुद्रेने परंतु करारी आवाजात ते म्हणाले होते, 'संघाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी सर्व काही केले पाहिजे.' शारीरिक, बौद्धिक याचबरोबर अनेक कामे वरचेवर निघत असतात ती आपल्यालाच करायची असतात. यानंतर कै. राजाभाऊंच्या जीवनात मी जास्त डोकावू लागलो. ज्ञान प्रबोधिनीसाठी हुशार मुलांच्या विशेष वर्गाचे ते शिक्षक होते, तर 'स्व'-रूपवर्धिनीच्या स्थापनेमध्ये सक्रिय सहभाग घेऊन संस्था स्वबळावर चालविण्याचा प्रयत्न निःश्रेयस भावनेतून केला. म्हणजे तळागाळातील गोरगरीबांपासून श्रीमंतांपर्यंत सर्वांसाठी काम. शिक्षण प्रसारक मंडळीमध्ये सुयोग्य व्यवस्थापनासाठी प्रयत्न, शाळेतील वर्गांमध्ये शिकवणे, विद्यार्थीप्रिय असणे, सर्व ठिकाणी कै. राजाभाऊ असत. वर्ग, बैठकी, शाखाभेट, बौद्धिक वर्ग, संपर्क, सर्व ठिकाणी उपस्थित. सकाळपासून रात्रीपर्यंतचा दिनक्रम मी प्रत्यक्ष पाहात असे. त्यामध्ये काम केल्याचे, उपकाराचे असे भाव त्यांच्या चेहऱ्यावरही येत नसत. **त्यांच्या दिवसभरातील हालचालींकडे पाहात मीही संघाशिवाय अन्य सामाजिक गोष्टींकडे आकर्षित झालो.**

**सर्वांचे ऐकून झाल्यावर आपलेही काही मत होऊन जाते. परंतु ते सार्वजनिक होता कामा नये. योग्य त्या अधिकाऱ्यांसमोर ते मांडले पाहिजे, हे कै. राजाभाऊंच्या सहवासातून शिकलो.** झाले असे होते – कै. वसंतराव भागवत पुण्याच्या प्रवासात होते. महानगर कार्यवाह, सहकार्यवाह इ. संच त्यांच्याबरोबर बसणार होतो. कै. राजाभाऊंनी रमणबागेतील घरी बोलावले होते. एवढ्या थोर लोकांसमोर माझी भूमिका बघ्याची व ऐकायची होती. विषय कसबा विधानसभा मतदारसंघावर चालला होता. मोर्चेबांधणी झालेली होती. कार्यकर्त्यांचे काय मत आहे हे कै. राजाभाऊंनी स्पष्टपणे सांगितले होते. साधक-बाधक चर्चेत आणीबाणीतील सर्व दिवस समोर उभे राहिले. कोणी-कोणी काय-काय केले होते त्या गोष्टींचा ऊहापोह होऊ लागला होता. मुद्दा होता तो योजनेचा. 'एखाद्या कार्यकर्त्याला योजनेतून एखादे पद बहाल केले असेल तर त्याचा उपयोग संघटनेला झाला पाहिजे. त्याचा उपभोग घेता कामा नये. कार्यकर्त्यांनी कितीही आग्रह केला तरी ज्याने पदाचा उपभोग घेतला त्याला योग्य धडा शिकवला पाहिजे. त्यासाठी कितीही नुकसान झाले तरी

चालेल.' कै. वसंतरावांचे बोलणे चालू होते. 'पुण्याचे उपमहापौर म्हणून त्या कार्यकर्त्याला सत्याग्रह करायला सांगितले होते. त्याची आखणीही केली होती. पण त्यांनी दुर्लक्ष केले. सत्याग्रह केला नाही. योजनेची ज्याने चेष्टा केली त्याला आपण कोण माफ करणार ? त्यांची गाडी चुकली समजा आणि पुढचा विचार आपण करूया.' कै. वसंतराव भागवतांच्या या बोलाने आम्ही स्तिमित झालो होतो. बैठकीच्या शेवटी कै. राजाभाऊंनी निर्धार सांगितला. 'आपण ठरवू तसेच पुण्यात घडवू.' मला हे सर्व नवीन होते. संघाच्या व्यूहरचनेत कै. राजाभाऊंनी त्यावेळी घेतलेले कठोर निर्णय आणि यश सगळ्यांनी अनुभवलेच आहे.

महानगर कार्यकारिणीचा संच एकजीव असावा त्यासाठी कै. राजाभाऊंचे खूप प्रयत्न असायचे. **आम्हा सगळ्यांना बैठकीसाठी मुंबईला जायचे होते. रात्रीच्या पॅसेंजरने मुंबईला जायचे होते. रात्री बारानंतर गाडी होती. आपण सर्वांनी अलंकार सिनेमामध्ये जाऊन सिनेमा बघू या. अशा सूचनेनंतर सगळ्यांच्या नजरा कै. राजाभाऊंच्याकडे खिळल्या. आमच्या सगळ्यांकडे बघत त्यांनी स्मितहास्य केले आणि आम्ही सगळे सिनेमागृहात गेलो.** सत्यम्-शिवम्-सुंदरम् पाहून बाहेर आल्यावर कै. राजाभाऊंची प्रतिक्रिया लक्षात राहील अशीच होती. 'शीर्षक छान होते पण कथानक फालतू मांडले होते.' आम्ही सारे चूप बसलो. **गप्पांच्या ओघात कळले की कार्यकर्त्यांच्या आग्रहासाठी त्यांनी मनाविरुद्ध निर्णय घेतला होता.**

कै. राजाभाऊंच्या कामाची पावती स्मरणरूपाने अजूनही मुंढवा परिसरात मिळते. त्यांच्या अखेरीच्या काळात मला एका पहाटे त्यांची आठवण आली. सकाळी अकराच्या सुमारास मी घरी धडकलो. घरात गणपती प्राणप्रतिष्ठा चालू होती. कोणीतरी त्यांना सांगितले राज चौधरी आलेत. राज आलाय का ? आम्ही गप्पा मारत बसलो. त्यांना अत्यल्प दिसत होते. पेपरही वाचता येत नव्हता. पण आवाज अजूनही करारी होता. मी मुंढव्याबद्दल गप्पा काढल्याबरोबर इतके खूष झाले की बस ! कै. मामा हजारे, पवार, भंडारी इ. कार्यकर्ते, त्यांच्या स्वभाव वैशिष्ट्याचे वर्णन, हिंदू तरुण मंडळ इ. इ. १९६२ च्या पुरानंतरचे पुणे-सभोवतालच्या गावांमध्ये संघकार्याच्या विस्तारासाठी पुण्यातून जाणारे कार्यकर्ते-तत्कालीन रस्ते इ. चे वर्णन ऐकत राहावेसे वाटत होते. मुंढव्याला जाताना दिवसा-उजेडी जायचे. परत येताना सायकल-सायकलला रॉकेलचा दिवा - सोसाट्याचा वारा - रात्री उशीरा घरी पोहचणे इ. काय कठीण काम होते त्याकाळी ! कै. राजाभाऊ मुंढव्याचे मंडल-प्रमुख. त्यांनी जीव ओतून काम केले. म्हणून मुंढव्याच्या शाखेतून कबड्डीची टीम उभी राहिली. तरुणांचा ढोल लेझीमचा संच उभा राहिला. या पायाभरणीमुळेच मुंढव्यात भारतीय जनसंघ वाढला आणि कै. मामा हजारेंसारखे ग्रामीण नेतृत्व पुण्याला मिळाले होते.

कै. राजाभाऊंबद्दल आणखी खूप-खूप लिहिले जाऊ शकते. त्यांच्या संयमी, सामाजिक नेतृत्वाचा स्वीकार मी केला होता. म्हणून बरेच काही करू शकलो. माझ्या घरातील अडचणींचा घरात बसून विचार करायचे. व्यक्तिगत जीवनातही त्यांनी मोलाचा सहयोग दिला होता. कै. राजाभाऊ लवळेकरांना कोटी-कोटी प्रणाम !

- मो. : ९३७३९७०००१

❖❖❖

अत्यंत श्रद्धेने ईश्वराची शोडषोपचारे पूजा करतानाही कर्मकाण्डाच्या आहारी भाऊ तुम्ही कधीच गेला नाहीत आणि दुसऱ्यांच्या या बाबतीतील 'वेगळ्या' मतांचा कधी अनादरही केला नाहीत.

**- सौ. अनघा**

# संस्थावत्सल राजाभाऊ

**– सतीश कुलकर्णी**

आजच्या काळात विनम्रतेने वाकून नमस्कार करावा अशी माणसं दुर्मीळ झाली आहेत. अशा व्यक्तिमत्त्वांची संख्या फारच मोजकी असेल. विद्वत्ता प्राप्त केलेले विद्वान कमी नाहीत. समाजात मान मिळवणारेही कमी नाहीत. हे सगळं असताना चारित्र्यसंपन्नता व विनम्रता हे गुण या दोन्ही गुणांबरोबर क्वचितच आढळतात. **मनापासून नमस्कार करावा वाटला असं व्यक्तिमत्त्व माझ्या सामाजिक जीवनात आलं. ते म्हणजे स्व. राजाभाऊ लवळेकर, हे ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व.** प्रथम पाहताक्षणी समोरच्यावर छाप पडावी, भारून जावं, असं राजाभाऊंकडे काही नव्हतं. ना झगमगाट, ना सौंदर्याचा देखणेपणा. **पण अंतरंगात डोकावल्यानंतर राजाभाऊंची प्रगल्भता, विनम्रता, वात्सल्य आणि कठोरता अनुभवता आली.**

संस्कार भारती हे कलाक्षेत्रातलं अखिल भारतीय संघटन. स्व. राजाभाऊ पुणे महानगराचे उपाध्यक्ष व नंतर अध्यक्षही होते. पुढे काही वर्षे पश्चिम क्षेत्राचे अध्यक्ष म्हणून राजाभाऊंचे मार्गदर्शन लाभले. संघाच्या रचनेतून अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळल्यानंतर संस्कार भारतीच्या कार्यात स्थापनेपासून संस्था, संघटन म्हणून मौलिक मार्गदर्शन राजाभाऊंनी केले. **कार्य नवीन असताना, संकल्पना रुजवताना, तत्त्व ठरवताना, अनुशासन–वीण घट्ट बसवताना तारेवरची कसरत असे. अशा काळात भाऊंचे मार्गदर्शन संस्कार भारतीची संकल्पना स्पष्ट करणारे असे असायचे. त्यांनी बोलत राहावे... सर्वांनी मंत्रमुग्ध होऊन ऐकत राहावे. दीर्घ अनुभवाचे बोल असायचे. अनेक वेळा अखेरचा शब्दही असायचा. म्हणजे मार्गदर्शक निर्णय.**

जसे संस्था म्हणून, संघटन म्हणून त्यांचे विचार अतुल्य होते तसे व्यक्तिशः जडणघडणीमध्येही राजाभाऊंचे व्यक्तिमत्त्व त्यांचे विचार आदर्शवत ठरलेले आहेत. कार्यकर्ता जीवनात तर मौल्यवानच आहेत. मी व्यक्तिशः त्यांचा अत्यंत ऋणी आहे. **कार्यकर्त्यांचे अचूक मूल्यांकन हा राजाभाऊंचा व्यक्तिविशेष गुण होता, याचा प्रत्यय कार्यात अनेक वेळा आला आहे.**

कोणतेही सामाजिक कार्य उभे करत असताना सुरुवातीच्या काळात संस्थेला वा संघटनेला स्वतःचा असा चेहरा नसतो. संस्थापकांच्या, पदाधिकाऱ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा, संस्कारांचा प्रभावच संघटनेवर असतो व त्यांच्या जीवनवर्तनातूनच संस्थेचा, संघटनेचा चेहरा जन्माला येत असतो असे मला वाटते.

आपली मातृसंघटना राष्ट्रीय स्वयंसेवक संघ स्थापनेच्या वेळी किंवा सुरुवातीचे काही दिवस पूजनीय डॉक्टर व पूजनीय श्रीगुरुजी यांची व्यक्तिमत्त्वे हीच संघटनेचा चेहरा होती. त्यांच्या जीवनव्यवहाराच्या आधारावर, विश्वासार्हतेवर संघ विश्वासास पात्र ठरला व पिढ्यान् पिढ्या राष्ट्रनिष्ठ व्यक्तिमत्त्वे उभी राहत गेली. आज तर अनेक स्वयंसेवकांनी पूजनीय डॉक्टरांना व गुरुजींना प्रत्यक्ष पाहिलेले देखील नाही. परंतु त्यांची जीवनचरित्रे व संघटनेची विचारधारा अनुभवत नवीन पिढ्यांतील स्वयंसेवक घडत आहेत. विविध क्षेत्रांत संघकार्य विस्ताराला अपेक्षित कार्य करत आहेत.

**संस्कार भारतीच्या कार्यात राजाभाऊंचे व्यक्तिमत्त्व असेच महत्त्वाचे ठरलेले आहे. संस्कार भारतीला चेहरा देण्याचे, समाजात ओळख निर्माण करून देण्याचे कार्य राजाभाऊंनी केले असे म्हणावे लागेल. संघटनेची उद्दिष्टे साध्य करताना विचारांची व्यापकता, दूरदृष्टी, नव्या पिढीला बरोबर घेऊन जाण्याची सहजता, क्षमता राजाभाऊंबरोबर आम्ही अनुभवली.** राजाभाऊंचा सहवास हवाहवासा वाटणारा होता. कार्यकर्त्यांचं अचूक मूल्यांकन, व्यक्तिमत्त्वाची पारख करणं, असा हा संघटन क्षेत्रात अत्यंत आवश्यक असणारा गुण त्यांच्यामध्ये होता. **प्रेम, जिव्हाळा, वात्सल्य, आत्मीयता या गोष्टी त्यांच्याकडून जोपासल्या जातच होत्या. पण प्रसंगी संघटनेला बाधक ठरणारी वर्तणूक करणाऱ्या कार्यकर्त्यांविषयी कठोर निर्णय घेण्यासही ते कधी**

**कचरले नाहीत.** अशा प्रसंगी संघटना हेच मुख्य आणि महत्त्वाचं सूत्र त्यांच्या समोर असे. मग समोरचा कार्यकर्ता, कलाकार कितीही मोठा असेल त्यांनी योग्य ते निर्णय वेळोवेळी घेतलेले आहेत.

मी १९९० पासून संस्कार भारतीच्या कार्यात रुळत गेलो. बॅचलर होतो. सिंहगड रोडवर फ्लॅट भाड्याने घेऊन भावंडांना घेऊन राहत असे. असलेली ऊर्जा वापरून अनेक मित्रपरिवार संस्कार भारतीच्या प्रवाहात आणला होता. राजाभाऊ अधून-मधून साप्ताहिक बैठकीला येत असत. एक दिवस माझ्या घरी भेट देण्याची इच्छा त्यांनी बोलून दाखवली व श्री. रवी देवसह राजाभाऊ आमच्या ब्रह्मचारी आश्रमाला भेट द्यायला आले. त्याकाळी आम्ही सर्व स्वहस्ते स्वयंपाक करून जेवण घेत असू. राजाभाऊंसाठी मी स्वतः चहा व नाश्ता बनवला होता. सर्वांचा परिचय, परिवाराची चौकशी, गप्पा झाल्या. सर्व भावंडांना घेऊन व्यवसाय करत, सर्व जबाबदाऱ्या सांभाळत, सामाजिक कार्यासाठी वेळ देत असल्याचे कौतुक करताना, असाच कार्यासाठी वेळ काढला पाहिजे हे सहजतेने ते सांगून गेले. इतक्या सहजतेने माझ्यासारख्याकडे राजाभाऊंनी प्रवास करणे ही मला अधिक कार्यरत करणारी ऊर्जा ठरली होती.

स्व. राजाभाऊंचं घर कधी परकं वाटलं नाही. भाऊऋषींच्या यज्ञकार्यांत सर्व कुटुंबियांचा सहभाग त्यांनी मिळवलेला होता. घरातला प्रत्येक घटक सामाजिक कार्यात वाहून घेतलेला असल्या कारणानं येणाऱ्या-जाणाऱ्या कार्यकर्त्यांशी सर्वांचा संवाद असायचा, जो आजही आहे. लवळेकर काकूही आत्मीयतेनं कार्यकर्त्यांची चौकशी करत असत. संस्थेचे विषय बोलून झाल्यावर सौ. दीपा काय करतेय ? मुलांची शैक्षणिक प्रगती काय आहे, वडिलांची प्रकृती कशी आहे, आई बरी आहे का ? या चौकशीशिवाय भेट कधीच पूर्ण झाली नाही. हा स्नेह, ही आत्मीयताच जणू कार्याला बळ देत गेली आणि आम्ही संघटनेचे पाईक होत गेलो.

संघटनेत कितीही मोठी संकटे येवोत, आम्ही राजाभाऊंकडे जाऊन बसावे आणि राजाभाऊंनी संकटातून बाहेर पडण्याचं बळ देऊनच पाठवावं. त्यांच्या जगण्यातला साधेपणाही खूप उंची दर्शवणारा होता. समोरच्या कार्यकर्त्याची पात्रता त्यांनी ओळखलेली असायची. त्या क्षमतेने त्याला मार्गदर्शन होत असे. संस्कार भारतीची सैद्धांतिक भूमिका अनेकवेळा राजाभाऊंनी स्पष्ट केली. संघटनेच्या नीतीमूल्यांपलीकडे कोणी कलाकार नाही, कार्यकर्ता नाही याची शिकवण राजाभाऊंनी दिली. पाहताक्षणी नतमस्तक व्हावं असं हे व्यक्तिमत्त्व खूप प्रसंग आहेत.

एखाद्या कलाकृतीचं रसग्रहण राजाभाऊंनी करावं. श्रोत्यांसाठी ती पर्वणीच असायची. **संस्कार भारतीच्या कार्याची व्यापकता, कल्पकता दर्शवणारे अनेक उपक्रम राजाभाऊंनी सुचवले, घडवून आणण्यासाठी मार्गदर्शन केले. त्याची महती स्पष्ट केली. त्यामुळे कार्यात नाविन्य आले. सर्व कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन लेणी, प्राचीन मंदिरांना भेट द्यावी, शिल्पं पहावीत, त्यातील तत्त्वज्ञान समजून घ्यावं. एखादा चांगला सिनेमा पहावा, नाटक पहावे त्यावर साधक-बाधक चर्चा करावी, रसग्रहण करावे.** कलाक्षेत्रातील सहलींविषयी तर त्यांचा उत्साह वाखाणण्याजोगा असायचा. 'हे राम', 'हम आपके है कौन?', 'वीर सावरकर' सारखे चित्रपट सर्व कार्यकर्त्यांनी एकत्र पाहण्याचे प्रयोग त्याकाळी केले गेले. 'पथेर पांचाली', 'गीत गाया पत्थरोंने' या जुन्या चित्रपटांच्या कलात्मकतेविषयीही ते भरभरून बोलत असत.

कार्यकर्त्यांसाठीचं मार्गदर्शन तर नेहमी प्रेरकच असायचं. पण कलाक्षेत्र म्हणून संस्कार भारतीच्या कार्याची व्यापकता त्यांनी नेहमी फार अचूकपणे विशद केली. प्रामुख्याने संस्कार भारतीचे सहा अनिवार्य कार्यक्रम. हा अखिल भारतीय स्तरावरून देण्यात आलेला कार्यक्रम. यासंबंधी राजाभाऊंचे मार्गदर्शन खूपच महत्त्वाचे वाटले. नववर्षाभिनंदन, भरतमुनीजयंती, कृष्णजन्माष्टमी, भारतमातापूजन, दिवाळी परिवार मेळावा, नटराज पूजन हे दिनविशेष आपण का साजरे करायचे, यामागचा सामाजिक व वैज्ञानिक दृष्टिकोन त्यांनी मांडला व कलाक्षेत्राच्या माध्यमातून ही परंपरा आपण समाजात कशी रुजवू शकतो याचे प्रबोधन त्यांनी केले.

संस्कार भारतीच्या कार्यात अखिल भारतीय, प्रांतीय बैठकांसाठी किंवा कलासाधक संगमाच्या निमित्त

राजाभाऊंसोबत होणारे रेल्वेतील निवांत प्रवास तर भाऊंबरोबर संवादाची, गप्पांची पर्वणीच असायची. मोठ्या कलावंतांचे, साहित्यिकांचे अनुभव, विचार, किस्से त्यांच्या चर्चेतून ऐकायला मिळायचे. त्यातूनही शिकण्यासारखं, बोध घेण्यासारखं, अनुभवसंपन्न होण्यासारखं खूप काही असायचं. संस्कार भारतीच्या कार्यात मान्यवर कलावंतांना जोडण्याचं महान कार्य राजाभाऊंच्या प्रतिभेमुळे साध्य झालेलं आहे असे मला वाटते. कितीही मोठ्या कलावंताबरोबर भेट असेल, संवाद असेल आणि राजाभाऊ बरोबर असले की एक प्रकारचा आत्मविश्वास असायचा. वेळोवेळी तो भाऊंनी सार्थही ठरवलेला आम्ही अनुभवला आहे. होत असलेली दिग्गजांची चर्चा वेगवेगळ्या वळणावर गेल्यावर तिला नियंत्रित करण्याचे काम राजाभाऊंचे असायचे.

अनेक वेळेला संस्कार भारतीच्या कार्यात कलाकारांना (बिदागी) मानधन द्यावे की न द्यावे यावरून खल होत असत. **कार्य तर वाढले पाहिजे, कलाकार तर जोडले पाहिजेत आणि केवळ मानधन या विषयावरून कलाकार दूर जात असतील तर यातून मार्ग काढताना राजाभाऊंनी समतोल मार्गदर्शन केलेले आहे.** केवळ मानधन देऊन कार्यक्रम  करणे संस्कार भारतीचे जसे उद्दिष्ट होऊ शकत नाही, तसे एखाद्या अडचणीप्रसंगी चर्चेविना कलाकाराची अडचण सोडवून मार्ग काढून मोकळे झाले पाहिजे हे देखील त्यांनी सुचवलेले आहे. सर्व संच उभा आहे पण तबलजीला नाममात्र मानधन देणे आवश्यक आहे, त्यावरच त्याची उपजीविका आहे अशा वेळी तेवढ्यापुरता मार्ग काढायला हवा, टोकाची भूमिका असू नये, ती त्या कलासाधकाची अडचण आहे. मनस्थिती नाही. तेव्हा माणूस महत्त्वाचा आहे हा त्यांचा विचार असायचा. पण केवळ व्यावसायिक दृष्टिकोनातून संस्कार भारतीच्या उपक्रमाकडे व कार्यक्रमाकडे पाहून चालणार नाही असे मत त्यांनी मांडल्याचे आठवते. उत्तम निर्मितीसाठी कलाक्षेत्रात काही विषयांत ही तडजोड आवश्यक आहे. रेकॉर्डिंग स्टुडिओचे भाडे आपण भरतोच ना ? मग कलाकाराची अडचण असेल तर ती समजून घ्यायला हवी हा त्यांचा दृष्टिकोन. कार्यक्रमाची निर्मिती यासाठी थांबता कामा नये.

पुणे महानगराच्या एका प्रदीर्घ निवासी बैठकीला ते दोन दिवस पूर्ण उपस्थित राहिले होते. 'मी फक्त श्रोत्याची भूमिका पार पाडणार आहे' असं त्यांनी सांगितलं होतं. दोन दिवसात ते व्यासपीठावरही आले नाहीत. निरोपाच्या वेळी बैठकीविषयी प्रतिक्रिया देताना म्हणाले, 'या सारखा आनंद नाही. आपल्यासमोर संस्थेतली नवी पिढी तेवढ्याच उत्साहानं आणि ताकदीनं कार्य पुढे नेते आहे आणि आपण ते समोर बसून अनुभवू शकतो.' सामाजिक जीवनात हे मोठेपण खूप कमी मान्यवरांमध्ये पाहायला मिळते.

अखेरच्या दिवसात राजाभाऊंची प्रकृती साथ देत नव्हती. दिसायला, ऐकायला कमी येऊ लागल्यानंतर बाहेर प्रवास थांबले होते. कार्यकर्ते घरी भेटल्याचा खूप आनंद त्यांना होत असे. अगदी शेवटपर्यंत त्यांच्याकडे अधिकृत जबाबदारी नसताना देखील, संस्थेची व संस्थेतील कार्यकर्त्यांची आस्थेने चौकशी व्हायची. अखिल भारतीय स्तरावर काय चालू आहे ? क्षेत्ररचना मार्गी लागली का ? प्रांतात कोण प्रवास करतेय ? सर्व चौकशा असायच्या. शेवटपर्यंत या सर्व गोष्टींची माहिती घेत असत. **दैनंदिनी (डायरी) देण्याच्या निमित्ताने माझा निश्चित प्रवास भाऊंकडे व्हायचाच. मी तो स्वतःकडे राखूनच ठेवत असे. त्या दैनंदिनीचं मूल्यांकन त्यांच्याकडून ऐकायला मिळे. ते ज्या गोष्टी सांगायचे त्याचा कित्येक वेळा आम्ही विचारही केलेला नसायचा. त्यावरून त्यांच्या प्रगल्भतेची जाणीव होत असे. राजाभाऊंचा अभिप्राय अतिशय उत्साह वाढवणारा असायचा.** भेटायला गेल्यावर भेट होऊनही अतृप्तीच असायची. निरोप घेताना दारापर्यंत येऊन 'थोडं निवांत या म्हणजे बोलता येईल' असं हातातला-हात न सोडवता त्यांचं निरोप देणं तर मनावर कोरलं गेलंय.

व्यक्तिजीवनात संस्कारांची शिदोरी मिळाल्यास समाजजीवन समृद्ध होण्यास मदत होते. अशी अनेक साधकांची जीवने स्वर्गीय राजाभाऊंनी समृद्ध केली आहेत. साधकांना साधनेसाठी एकत्र करून, प्रवृत्त करून राष्ट्रजीवनाचे संस्कार सहजतेने या प्रवासात राजाभाऊंनी केले. असे व्यक्तिमत्त्वाचा विकास साधणारे साधक राष्ट्रजीवनामध्ये अनेक

कलासाधकांना सहभागी करू शकले, उभे करू शकले म्हणून कलासाधनेतला संस्कार भारती नावाचा यज्ञ आजही त्याच क्षमतेने सुरू आहे. स्व. राजाभाऊंना विनम्र आदरांजली !

– मो. : ९८२२३७३६३७

❖❖❖

## माझ्या गुरुंमधील शिक्षणक्षेत्रातील एक गुरु

**– मोहन अळवणी**

गेल्या अनेक वर्षांपासून माझा राजाभाऊंशी संबंध. म्हणजे ते रा. स्व. संघाचे पुणे शहराचे नगर–कार्यवाह असताना एका शाखेचा मी मुख्य शिक्षक असण्यापासूनचा. हा संबंध दृढ होत जाऊन तो एका गुरुपर्यंत येऊन माझ्या मार्गदर्शकांपर्यंत येऊन पोहोचण्याचा.

मी पुण्यातील संभाजीनगरचा कार्यवाह असताना आमच्या भागातील ज्ञानदा प्रतिष्ठानच्या शाळेचे उद्‌घाटन प.पू. सरसंघचालक मा. बाळासाहेब देवरसांच्या हस्ते झाले होते. त्यावेळच्या संघकार्यकर्त्यांच्या तत्कालीन अडचणींमुळे व अपुऱ्या प्रयत्नांमुळे शाळेची अवस्था एका दयनीय अवस्थेपर्यंत पोचली होती.

त्यावेळी मी संभाजीनगर कार्यवाह होतो. संभाजीनगराचे नगराधिकारी कै. मा. नारायणराव कानडे आणि कै. मा. राजाभाऊ लवळेकर यांचेबरोबर माझी अनेक वेळा चर्चामसलत होत असे. मा. सरसंघचालकांच्या हस्ते उद्‌घाटन झालेल्या शाळेची दयनीय अवस्था आम्हा सर्वांना बेचैन करीत होती. त्याचवेळी मी माझा बांधकाम–व्यवसाय बंद करून पूर्ण वेळ संघ सांगेल ते काम करण्याचा मानस व्यक्त केला होता. मग प्रांतप्रचारक कै. दामूआण्णा दाते यांच्या सांगण्यावरून ती जबाबदारी माझ्याकडे सोपवायचे ठरले.

पण शिक्षणक्षेत्राशी अनभिज्ञ असूनसुद्धा हे ईश्वरी कार्य आणि संघाने सांगितले म्हणून मी कामाला सुरुवात केली आणि तेव्हापासून मा. राजाभाऊंचा आणि माझा दैनंदिन सहवास घडत गेला. ते डे.एज्यु. सोसायटीतून मुख्याध्यापक पदावरून निवृत्त झालेले. एक गणमान्य आदर्श शिक्षक म्हणून, तसेच एक संघशरण स्वयंसेवक म्हणून, उत्तम गुरु म्हणून मला लाभले हेही एक विधिलिखित होते असे म्हणावे लागेल.

ज्ञानदा प्रतिष्ठानची शाळा चालविताना मला अनेक अडचणी आल्या. मुलांना संस्कारित करून त्यांना आपल्या स्वतंत्र देशाचे भवितव्य उज्ज्वल करण्यासाठी उत्तम नागरिक बनविण्यासाठी खूप मेहनत घ्यावी लागेल हे जाणवत गेले. त्यासाठी अनंत उपक्रम हातात घ्यावे लागतील. अशा **अनेक उपक्रमांची संकल्पना मांडणे, त्यांची कार्यवाही करणे, त्या उपक्रमांचे निष्कर्ष काढणे इ. एक ना अनेक गोष्टींमध्ये मा. राजाभाऊंचे उत्कृष्ट मार्गदर्शन होत असे. हे मार्गदर्शन माझ्या पुढील आयुष्यासाठी अतिशय उपयुक्त ठरले आहे. ज्ञानदा प्रतिष्ठानच्या कामातून माझ्याकडे महाराष्ट्र प्रांताच्या विद्याभारतीच्या कामाचीही जबाबदारी देण्यात आली. ही जबाबदारी सांभाळतानासुद्धा मा. राजाभाऊंचे मार्गदर्शन मला उपयुक्त ठरले.**

तेव्हा हे संघसमर्पित ईश्वरी कार्य करण्याचे भाग्य मला मिळाले आणि माझ्या शक्तीनुसार मी ते पार पाडण्याचे सामर्थ्य ज्या गुरुमुळे प्राप्त झाले त्या माझे गुरुस्थानी असलेल्या मा. राजाभाऊंच्या चरणांना मनापासून वंदन करतो.

– मो. : ९८२२९८४४०९

❖❖❖

## श्री. राजाभाऊ लवळेकर – सामान्यातून असामान्यत्व

**– श्रीमती अर्चना नलावडे**

श्री. कृ. गो. तथा राजाभाऊ लवळेकर – एक सामान्यातील असामान्य व्यक्तिमत्त्व. नावच – राजाभाऊ – मनाची आणि नात्यांची श्रीमंती. शिक्षकी पेशा, त्यामुळे प्रामाणिकपणा, जिद्द, कष्ट करण्याची तयारी हे गुण आपोआपच आले. **शिस्त, क्षमता व कळकळ या गुणांचा मिलाफ म्हणजेच आमचे सर राजाभाऊ लवळेकर.**

सरांच्या निधनाची बातमी समजली अन् मन सैरभैर झालं. सगळा मागचा इतिहास डोळ्यापुढून तरळून गेला. माझा व सरांचा परिचय जवळजवळ ३५ ते ३७ वर्षांचा ! आमच्या ज्ञानदा प्रतिष्ठान संस्थेची स्थापना १९७९ साली झाली व १९८३ पासून राजाभाऊ संस्थेत काम पाहू लागले. संस्था नवीन, शाळा दोन मुलांवर सुरू झालेली, त्यामुळे सतत सरांचे मार्गदर्शन लागत असे. त्यावेळी सर रमणबाग प्रशालेत मुख्याध्यापक पदावर काम करीत होते. एवढ्या मोठ्या शाळेच्या कामाचा व्याप सांभाळत सर आम्हाला मार्गदर्शन व मदत करीत असत.

सन १९८४ साली १ ली ते ४ थी असे आमचे वर्ग नवसह्याद्री सोसायटी–कर्वेनगर येथे भरत असत. संस्था रजिस्टर्ड पण विना अनुदान, विना परवानगी वर्ग सुरू होते. इतर मान्यताप्राप्त शाळांमधून आम्ही विद्यार्थ्यांना परीक्षेला बसवायचो. त्याचवेळी थोरात कॉलनी 'कर्वे रोड' येथील श्रीमती कुलकर्णी यांची १ ली ते ४ थीची शाळा – अनुदानित – 'ज्ञानदा'ने आपल्याकडे हस्तांतर करून घेतली. आता नवसह्याद्री सोसायटीत ज्ञानदाचा प्राथमिक शासनमान्य विभाग सुरू झाला. ह्या कामी राजाभाऊंची खूपच मदत झाली. **शालेय प्रशासन, शिक्षक मान्यता, वेळोवेळी सभा घेणे व इतर बाबींची पूर्तता ह्या सर्व गोष्टी सरांच्या मोलाच्या मदतीने पूर्ण झाल्या.** त्यावेळी श्री. कुमार जोशी, श्री. सप्रे यांना सरांची साथ लाभली व मोठ्या उत्साहाने हे नवीन युनिट सुरू झाले. **सरांच्या मोलाच्या सल्ल्यामुळे शासकीय कामे विनासायास पार पडली.**

**नुकत्याच जन्मलेल्या ज्ञानदाला, शिक्षणक्षेत्रातील जाणते म्हणून राजाभाऊंचा मोठा आधार होता. उच्च विचार, प्रत्येक प्रश्नाचा सांगोपांग विचार करून निर्णय घेणे, परिस्थितीचे भान ठेवणे यामुळे ज्ञानदा शाळा बाळसे धरू लागली.** पुढे नैसर्गिक वाढीनुसार ५ वी ते १० वी चे वर्ग वाढून स्वतंत्र माध्यमिक विभाग अर्थात 'ज्ञानदा प्रशाला' काम करू लागली. शालेय व्यवस्थापनात सरांची वेळोवेळी मदत होत असे.

सन १९८९ मध्ये १० वीचा वर्ग सुरू झाला. वर्गात १५ च विद्यार्थी. विद्यार्थ्यांच्या विज्ञान–विषयाच्या प्रयोग परीक्षांचा प्रश्न आला. कारण **ज्ञानदाला स्वतंत्र प्रयोगशाळा नव्हती. विज्ञान साहित्यही अपुरे होते. राजाभाऊ तत्परतेने मदतीला धावले व रमणबाग प्रशालेत विद्यार्थ्यांच्या प्रयोग परीक्षा सुरू झाल्या. राजाभाऊंच्या सांगण्यावरून शाळेतील विज्ञान शिक्षकाच्या मदतीने बोर्डाची विज्ञान प्रयोग–परीक्षा उत्तम रीतीने पार पडली. बरं, हे सर्व करताना सरांचा कोठेही अहंपणाचा भाव नाही.**

याच दरम्यान सर शाळा समितीचे अध्यक्ष व ज्ञानदा प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष म्हणून काम पाहू लागले. त्याचवेळेस शाळेच्या अनुदानाचे काम सुरू झाले. विनाअनुदान तत्त्वावर इ. ८ वी, ९ वी व १० वी चे वर्ग सुरू होते. त्यांच्या परवानगीचे काम सरांच्या मार्गदर्शनाखाली सुरू होते. **शालासमितीचे अध्यक्ष असल्याने प्रत्येक विषयाचा साकल्याने विचार करून निर्णय घेणे ह्या गोष्टी सरांनी मला चांगल्या प्रकारे शिकवल्या. प्रसंगी रागावून, प्रसंगी प्रेमाने. माझ्या दृष्टीने ते आमचे बाबा होते.**

या सर्वांचा परिपाक म्हणजे १९९३ साली शाळेला १००% अनुदान मिळाले. शिक्षक–वेतन, वेतनेतर अनुदान सुरू झाले. त्याचवेळी संस्थेत आलेले श्री. पी. ई. कुलकर्णी यांचीही मोलाची मदत झाली. राजाभाऊ व पी. ई. दोघेही शिक्षणक्षेत्रातले दिग्गज. त्यामुळे त्यांच्या ज्ञानाचा, अनुभवाचा आम्हाला फायदा झाला. अनुदान मिळाले तेव्हा

राजाभाऊंना खूप बरे वाटले. 'बाई, केलेल्या कष्टाचे चीज झाले.' एवढेच वाक्य सर बोलले. कारण **आनंद व्यक्त करण्याची त्यांची पद्धतही वेगळी होती. यशाने हुरळून जायचे नाही तर आपले काम चोख करायचे, शाळेला लाभलेली परंपरा सांभाळायची हेच त्यांचे तत्त्व होते.**

**छोट्या-छोट्या प्रसंगातून मार्गदर्शन करून सर जीवनाचे एखादे तत्त्व सांगून जायचे.** सण, उत्सव, समारंभ या सांस्कृतिक कार्यक्रमातून सरांनी व्यक्त केलेले विचार हे त्याचे द्योतक होते. अगदी घटस्थापना हा विषय असो - मग तो घट कशाचे प्रतीक - धान्य कशाचे प्रतीक - हे ते साध्या सरळ सोप्या भाषेत सांगत. **विद्यार्थ्यांपुढे बोलताना सर वेगळेच असायचे, तर शिक्षकांपुढे बोलताना, मार्गदर्शन करताना सरांचा बाज वेगळाच भासे.**

ज्ञानदा प्रतिष्ठानच्या जडणघडणीत सरांचा मोलाचा वाटा होता. ज्ञानदाच्या २५ वर्षांच्या इतिहासाचेही सर साक्षीदार होते. सुरुवातीपासून ज्ञानदाच्या कारकीर्दीच्या काळात सरांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले होते. ज्ञानदा स्थिर होईपर्यंत सरांचे मार्गदर्शन लाभत होते. पुढेपुढे प्रकृती अस्वास्थ्यामुळे सर हळूहळू बाजूला झाले. परंतु ज्ञानदासोबत असलेली, जोडली गेलेली नाळ कधीच तुटली नाही. शेवटपर्यंत स्वतःच्या व्यासंगपूर्ण अनुभवांचा लाभ संस्थेस देत गेले.

सरांना बरे नव्हते म्हणून आम्ही भेटायला गेलो तेव्हा बोलतानाही सरांना त्रास होत होता. परंतु आस्थेने सर्वांची चौकशी केली. असे आमचे आदरणीय व्यक्तिमत्त्व जून २०१६ मध्ये अनंतात विलीन झाले. असे व्यक्तिमत्त्व पुन्हा होणे नाही. त्यांना भावपूर्ण आदरांजली.

सर आज आमच्यात नाही असे म्हणताच येणार नाही. कारण आपल्या विचारांच्या रूपाने सर सदैव आमच्यात आहेत, राहतील. शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते की, 'जीवन जगताना आनंदी राहावे, शिक्षकी पेशाला जीवन द्यावे, सेवा करता करता अमर व्हावे.'

- मो. : ९०९६२०५०८९

❖❖❖

---

## आठवणी दाटतात...

**- कै. हरिभाऊ कुलकर्णी**

मला माझ्या जीवनात अनेक व्यक्ती भेटल्या. १९४२-४३ साली श्री. राजाभाऊ लवळेकर चऱ्होलीहून हायस्कूलच्या शिक्षणाकरिता पुण्यात आले. एकाच शाखेवर आमचा प्रथम परिचय झाला आणि तेव्हापासून आम्ही एकमेकांचे झालो. श्री. राजाभाऊंचे शालेय शिक्षण चालू होते. 'कमवा आणि शिका' या उक्तीचे पालनही होत होते. नोकरीही चालू होती. त्याबरोबरच संघाचे काम, संसार, घरची जबाबदारी पेलणेही चालू होते. १९४८ साली आम्ही दोघं एकत्र जेलमध्ये होतो. जेलमधून बाहेर पडताच अभ्यासाला सुरुवात झाली. राजाभाऊ S.S.C. पास झाला. मी मात्र पास होऊ शकलो नाही. नोकरी व संघकार्य चालूच होते. श्री. राजाभाऊंनी कॉलेजचे शिक्षण पुरे केले आणि त्यांनी शिक्षणक्षेत्रात पदार्पण केलं. त्यातच शनिवार पेठेतील हसबनीस बखळीतील शाखेची जबाबदारी त्यांचेवर आली आणि आम्ही दोघांनी ती समर्थपणे पेलली.

श्री. राजाभाऊंवर काम सोपवावं आणि निश्चिंत व्हावं असा अनुभव मलाही आला. श्री. राजाभाऊंचा पुणे शहरातील व प्रांतातील संघपरिवारामध्ये भरपूर परिचय होता. याशिवाय शिक्षणक्षेत्र, लेखक, कवी, राजकीय पुढारी

यांचा अगदी जवळून परिचय होता. संघ स्वयंसेवकांच्या घरी तर नित्य येणे-जाणे चालू होते. बैठकी, चर्चासत्र होत होती. बौद्धिकं चालली होती. माझ्या घरी श्री. राजाभाऊंचा सर्वांशी परिचय होता. श्री. आप्पाचा मुलगा प्रसाद नेहमीच श्री. राजाभाऊंशी विचारविनिमय, सल्लामसलत करीत असे आणि राजाभाऊही अगदी स्वतःच्या मुलाप्रमाणे त्यांच्याशी चर्चा करताना मग्न होऊन जात असत. आज प्रसाद अमेरिकेत आहे व मुलगी सौ. गौरी ही कतारमध्ये आहे.

**श्री. राजाभाऊंकडे शिक्षण प्रसारक मंडळी, तसेच संघाचे पुणे शहर कार्यवाह याही जबाबदाऱ्या होत्या. संघ अधिकाऱ्याच्या सांगण्यावरून त्यांना 'तरुण भारत' या दैनिकाच्या संपादक पदाची धुराही सांभाळावी लागली आणि राजाभाऊंनी ती समर्थपणे पेलली, लोहपुरुषासारखी.** या व्यतिरिक्त श्री. किशाभाऊ पटवर्धन यांनी 'स्व'-रूपवर्धिनीची जबाबदारीही सोपविली. या सर्व जबाबदाऱ्यांचे रूपांतर धावपळीतच झाले आणि धावपळींमुळे पुढे व्हायचे तेच झाले. श्री. राजाभाऊ हृदयविकाराने आजारी पडले, बायपास करावी लागली. आणि नंतर तर दवाखानाच मागे लागला. मधुमेहाची वंशपरंपरेची मिळालेली देणगीही बळावली व पायाला मोठी जखम झाली. त्यातून तो बाहेर पडतो तोच श्री. प्रसादचा झालेला मोठा अपघात. जणू काही सर्व गोष्टी हात धुवून मागे लागल्या होत्या. पण राजाभाऊ अगदी शांतपणे सर्व गोष्टींना सामोरे गेले. संस्कारभारतीच्या माध्यमातून सर्व ६४ कला विकसित करण्यासाठी त्यांनी खूप परिश्रम घेतले.

१९५६ मध्ये श्री. राजाभाऊंचा विवाह झाला. सौ. वहिनी नोकरी करून त्याला साथ देत होत्या आणि त्याच्या कार्याला प्रेरणा देत होत्या आणि म्हणूनच राजाभाऊ सर्व गोष्टी करू शकले, सामाजिक जबाबदाऱ्या कृतार्थपणे पार पडू शकले. विवाह होऊनसुद्धा तो संसारात गुरफटून न राहता संघकामात कार्यरत राहिला. कित्येक गोष्टींच्या आठवणी आहेत, सर्व सांगणं मात्र कठीण आहे.

एक आठवण जरूर देत आहे. १९९५ साली मी सहकारनगरमध्ये कै. नाना कुलकर्णी यांचे बंगल्यात राहात होतो. माझी पत्नी गुडघ्याच्या दुखण्याने जर्जर होती. श्री. राजाभाऊ व सौ. वहिनी, माझे घर पाहण्यास आले. आम्ही रात्री खालीच गादी टाकून झोपावयास तयार होतो. श्री. राजाभाऊंनी हे पाहिले आणि घरी गेल्यावर माझ्या पत्नीसाठी एक लोखंडी पलंग व जेवणाचे टेबल पाठविले. माझा विवाह झाला त्यावेळी माझी पत्नी SSC झाली नव्हती. श्री. राजाभाऊने तिला SSC केले आणि पास झाल्यावर STC ही पास करावयास मार्गदर्शन केले. **राजाभाऊंच्या आठवणी लिहावयास लागलो तर एक कादंबरी होईल. पण तरीही इथेच थांबतो.**

(रा. स्व. संघातील असंख्य सहकाऱ्यांपैकी एक अशा कै. हरिभाऊ कुलकर्णी यांनी कै. राजाभाऊंच्या अमृत महोत्सवानिमित्त व्यक्त केलेली भावना त्यांच्याच शब्दात दिली आहे.)

❖❖❖

भाऊ गेल्यानंतर एक दिवस दारावरची बेल वाजली. दार उघडले तर त्या भागात येणारा कात्री-सुरीला धार लावायचे काम करणारी व्यक्ती दारात उभी होती. भाऊ गेल्याचं समजलं म्हणून ते भेटायला आले होते. भाऊंविषयी थोडं त्यांनी विचारलं आणि भाऊ गेल्याचं ऐकून खूप वाईट वाटलं असे ते म्हणाले. आम्हाला समजत नव्हतं की भाऊंचा आणि याचा असा किती संपर्क आला असणार ? गप्पा मारता मारता मात्र समजलं की त्याच्या मुलाची फी भाऊंनी भरली होती आणि त्यामुळे त्या मुलाचे शिक्षणाचे वर्ष वाचले होते.

भाऊंनी अशा किती जणांना आणि कशा प्रकारे मदत केली असेल याची कल्पनाच नाही. भाऊंचं मोठेपण अशा घटनांमधून मात्र पदोपदी पुढे जाणवत राहिलं आणि राहील.

# एक कुशल कार्यकर्ता आणि आदर्श शिक्षक

**– अनिल माणकीकर**

१९७५ साली सत्याग्रह करून आठ डिसेंबरला रात्री येरवडा कारागृहातील सर्कल नंबर तीन, बरॅक चारमध्ये दाखल झाल्यानंतर एक-दोन दिवसांतच राजाभाऊंशी पहिली दृष्टभेट झाली. राजाभाऊ तेव्हा अत्यंत कडक शिस्तीचे आणि करारी दिसत होते आणि अर्थातच त्याची गरजही होती. आमच्यातले बरेचजण रोजच्या स्नानाला दांडी मारत. कारणही स्वाभाविक होते – बरॅकच्या बाहेर असणाऱ्या लांबलचक टबसारख्या नालीमध्ये पाणी साठवून ठेवलेले असायचे. त्यातूनच १०-१२ मग थंडगार पाणी अंगावर घ्यायचे आणि आंघोळ झाली असे घोषित करायचे हीच पद्धत होती. प्रत्येकाला एक सतरंजी (दरी), एक ब्लँकेट, ताट-वाटी, टमरेल (मग) दिलेले होते. सत्याग्रही असल्यामुळे कोणतेही काम नव्हते. पण एक-दोन दिवसांतच राजाभाऊंनी सर्व पद्धत बसवली. सर्वांनीच रोज पहाटे उठून आवरून किमान १००-१५० जोर मारून आणि इतर व्यायाम करून मगच पुढच्या कामाला लागायचे. गिनती घेण्यासाठी, न्याहारी-वाटप, भोजन-वाटप ह्यासाठी राजाभाऊ आणि अन्य ज्येष्ठ कार्यकर्ते तुरुंगाधिकाऱ्यांना मदत करायचे. विद्यार्थ्यांनी सकाळी किमान तीन तास एका जागी बसून अभ्यास करायचाच असा अघोषित नियम होता. दिनक्रमही निश्चित ठरवून दिलेला होता. जणू काही सरकारी खर्चाने चाललेला संघ-शिक्षा वर्गच !

ह्या सर्वांमुळेच फेब्रुवारी ७६ मध्ये तुरुंगातून बाहेर आल्यावर लगेचच दिलेल्या विद्यापीठाच्या परीक्षेतही आम्ही बहुतेकजण व्यवस्थितपणे उत्तीर्ण झालो.

१९८२ मध्ये माझी राजाभाऊंशी पुन्हा भेट झाली ती सहाय्यक शिक्षक ह्या नात्याने. पिंपरीजवळील एच.ए. कंपनीच्या कॉलनीच्या आवारात डे. ए. सोसायटीच्या एच.ए. स्कूलमध्ये जून ८२ मध्ये मी विज्ञान-गणित शिक्षक ह्या नात्याने रुजू झालो. शाळेतील कामकाजातही राजाभाऊंचा शिस्तशीरपणा वेळोवेळी अनुभवायला मिळाला. टीचर्स डायरी वेळच्या-वेळी जमा करणे, गृहपाठ-निबंध वह्या वेळच्या-वेळी जमा करणे ह्यावर त्यांचा कटाक्ष असायचा. शाळा सुटल्यावर चालत कंपनीच्या गेटपर्यंत जातानाच काय त्या अन्य गप्पा व्हायच्या. ह्यामधूनच खूप साऱ्या गोष्टी शिकायला मिळाल्या.

कॉलनीच्या आवारात शाळा असल्यामुळे तिथली टवाळ पोरं शाळेच्या मधल्या सुटीत आवारात घुसून दंगा करणे, मुलींची छेड काढणे इत्यादी चाळे करायची. आम्ही सर्व नवीन शिक्षकांनी (भालचंद्र पुरंदरे सर, प्रकाश माळी सर, मी आणि इतरही दोघे-तिघे) काहीतरी कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी राजाभाऊंशी चर्चा केली आणि प्लॅन ठरला. शाळेतील सेवकांच्या मदतीने सर्व नियोजन केले. ठरलेल्या दिवशी, दुपारी ती कार्टी आवारात घुसल्यावर, शाळेची सर्व शटर्स बंद केली आणि त्यांना यथेच्छ धोपटून काढले. शाळेतील घुंगुरकाठ्या, छड्या ह्यांचा अक्षरश: भडिमार केला आणि शाळा सुटल्यानंतर सर्व सीनिअर शिक्षकांच्या मदतीने पिंपरी पोलीस ठाण्यात त्या मुलांबद्दल तक्रारही दाखल केली. त्यानंतर वर्षभरातील सर्व अभ्यासेतर उपक्रम निर्विघ्नपणे पार पडले. त्याचा परिणाम इतका भारी झाला की अगदी आजतागायत कोणाही टारगट पोराची शाळेच्या आवारात येण्याची हिंमत झालेली नाही.

**संघाचा एक ज्येष्ठ कार्यकर्ता म्हणून राजाभाऊंची वागणूक आणि एक जागरूक प्रशासक म्हणून वागणूक ह्यामध्ये एक अंधुकशी रेषा होती. ह्या दोन भूमिका ते मिसळू द्यायचे नाहीत. पण तरीही त्यांच्याबद्दल कधीही राग यायचा नाही. उलट त्यांच्याबद्दलचा आदर द्विगुणित होत गेला.**

– मो. : ९४२३५८५९४४

❖❖❖

# लेखकांचा अल्प परिचय

**स्मरणांजली – ॲड. मुरलीधर बेंद्रे** –ज्येष्ठ विधिज्ञ. पुणे महानगराचे पूर्व संघचालक. अधिवक्ता परिषदेचे विद्यमान अखिल भारतीय उपाध्यक्ष आणि महाराष्ट्र प्रांत अध्यक्ष.

**१) संजय पुरंदरे –** रमणबाग शाळेचे निवृत्त मुख्याध्यापक आणि कै. राजाभाऊ लवळेकर सरांचे याच शाळेतील विद्यार्थी. प्रेरणादायी अनेक शैक्षणिक प्रयोग घडवून आणणारे शिक्षक मुख्याध्यापक. जाणता राजा या विख्यात ऐतिहासिक नाटकाचा शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक, सेवक व मुलांच्या पालकांचा सहभाग घेऊन एक विक्रमी प्रयोग घडवून आणणारा मुख्याध्यापक. विद्याभारती या शैक्षणिक क्षेत्रातील संस्थेच्या कामात कार्यरत.

**२) डॉ. शरद कुंटे –** डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे विद्यमान अध्यक्ष. विद्याभारती पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे पदाधिकारी.

**३) डॉ. सतीश आळेकर –** विख्यात नाट्य व सिने दिग्दर्शक व अभिनेते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ललित कला केंद्राचे निवृत्त अधिकारी.

**४) डॉ. प्रदीप आगाशे –** शिक्षण क्षेत्रातील एक चालते बोलते विद्यापीठ. स्वयम प्रेरणेने शिक्षण क्षेत्रात चांगले काम व्हावे म्हणून धडपडणारे, नवे नवे प्रयोग करणारे कार्यकर्ते. विज्ञान गणित यासारख्या विषयांशी मुलांनी मैत्री करावी यासाठी कीर्तन, लावणी, भारुड अशा माध्यमांचाही चपखल उपयोग करणारे प्रयोगशील शिक्षक. 'स्व'–रूपवर्धिनीचे कार्यकर्ते.

**५) शैला ब्रह्मे –** न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग या शाळेतील कै. राजाभाऊ लवळेकर यांच्या सहकारी शिक्षिका.

**६) डॉ. शरद आगरखेडकर –** कै. राजाभाऊ लवळेकर यांचे विद्यार्थी व प्रतिथयश डॉक्टर.

**७) प्रसाद सुर्वे –** कै. राजाभाऊ लवळेकर यांचे विद्यार्थी व संघ कार्यकर्ते.

**८) डॉ. राजा दांडेकर –** दापोली तालुक्यातील चिखलगावसारख्या छोट्या गावात प्रेरणादायी शिक्षणाचे स्वप्न मुलांमध्ये पेरणारा एक प्रेरक शिक्षक. ते स्वतः आणि पत्नी सौ. रेणूताई दांडेकर यांनी काळ्या कातळावर कोरलेले शिक्षण विद्यापीठ जाऊन प्रत्यक्ष अनुभवावे असे आहे. अशी घडली माणसे, रानगोष्टी अशा पुस्तकांचेही लेखन डॉ. राजा दांडेकर यांनी केले आहे.

**९) सूर्यकांत पाठक –** रा. स्व. संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते. ग्राहक पेठचे कार्यकारी संचालक. ग्राहक हिताला अनुकूल अशा अनेक विषयावर विपुल लेखन. ग्राहक चळवळीतील त्यांच्या योगदानाबद्दल राष्ट्रपती पुरस्काराने सन्मानित.

**१०) शोभना भिडे –** आनंद विद्यालय, नाशिक या प्रयोगशील शाळेतील प्रयोगशील अध्यापिका. अ. भा. विद्यार्थी परिषदेच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या. धृव एज्युकेशनल ॲण्ड रिसर्च फाऊंडेशनच्या विद्यमान उपकार्याध्यक्ष.

**११) सौ. सुषमा शरद ओक –** एच. ए. हायस्कूल पिंपरी या शाळेतील कै. राजाभाऊ लवळेकर यांच्या सहकारी शिक्षिका.

**१२) सौ. सविता काजरेकर –** विमलाबाई गरवारे विद्यालयाच्या विद्यमान मुख्याध्यापिका. अ. भा. विद्यार्थी परिषदेच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या.

**१३) श्री. मिलिंद सबनीस –** रमणबाग शाळेत कला शिक्षक म्हणून कार्यरत. वंदेमातरम या विषयातील देशातील ज्येष्ठ अभ्यासक. वंदेमातरम एक शोध या पुस्तकाचे लेखक तसेच वंदेमातरम या विषयावरील दोन अभ्यासपूर्ण खंडांचे निर्माते. वंदेमातरम या गीताला १२५ वर्षेझाली त्या निमित्ताने ११००० शालेय विद्यार्थ्यांच्या सामुहिक गायनाचा कार्यक्रम घडवून आणण्यात पुढाकार.

**१४) श्री. ज. गं. फगरे –** निवृत्त शिक्षक व शिक्षक संघटनेतील कै. राजाभाऊ लवळेकर यांचे सहकारी.

**१५) श्री. रवींद्र कानडे –** न्यू इंग्लीश स्कूल रमणबाग शाळेचे निवृत्त उपमुख्याध्यापक, 'स्व'–रूपवर्धिनीचे कार्यकर्ते.

**१६) सौ. अंजली शिंदीकर –** कै. राजाभाऊ लवळेकर यांच्या मानसकन्या.

**१७) श्री. प्रकाश माळी –** एच. ए. हायस्कूल पिंपरी या शाळेतील कै. राजाभाऊ लवळेकर यांचे सहकारी शिक्षक.

**१८) श्री. बद्री मूर्ती –** खाजगी कंपनीतील निवृत्त अधिकारी, म. ए. सोसायटी या प्रतिथयश शिक्षण संस्थेचे माजी कार्यकारी अध्यक्ष तसेच संघ कार्यातील कै. राजाभाऊ लवळेकर यांचे सहकारी.

**१९) सौ. विजया बोकील –** न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग या शाळेतील कै. राजाभाऊ लवळेकर यांच्या सहकारी शिक्षिका.

**२०) डॉ. अरविंद भोमे –** रमणबाग शाळेचे माजी विद्यार्थी. ॲलर्जीतज्ज्ञ. माध्यमिक शालांत परीक्षेत राम गणेश गडकरी

शिष्यवृत्ती विजेते.

**२१) श्री. नंदकुमार कानडे –** ‘प्रबोध उद्योग’चे संचालक, ज्ञानप्रबोधिनीचे कार्यकर्ते.

**२२) श्री. अजय पराड –** रमणबाग शाळेत संगीत शिक्षक म्हणून काम केले. प्रयोगशील संगीतकार. वंदेमातरम या राष्ट्रीय गीताला नवीन सामुहिक चाल बांधून ११००० शालेय विद्यार्थ्यांच्या सामुहिक गायनाचा एक अनोखा यशस्वी प्रयोग साकार केला.

**२३) श्रीमती कुसुम कृष्णाजी लवळेकर –** कै. राजाभाऊ लवळेकर यांच्या पत्नी. भारतीय टेलिफोन खात्यातून अधिकारी पदावरून निवृत्त.

**२४) सौ. उषा रा. असनीकर –** कै. राजाभाऊ लवळेकर यांच्या भगिनी.

**२५) सौ. भाग्यश्री भागवत –** कै. राजाभाऊ लवळेकर यांच्या ज्येष्ठ कन्या. स्वतंत्र व्यवसाय. कौशल्यवर्धन फाऊंडेशनच्या संचालिका.

**२६) श्रीमती अपर्णा कानेटकर –** कै. राजाभाऊ लवळेकर यांच्या भगिनी. म.न.पा.विद्यालयाच्या निवृत्त मुख्याध्यापिका/केंद्रप्रमुख.

**२७) डॉ. अनघा लवळेकर –** कै. राजाभाऊ लवळेकर यांच्या स्नुषा. ज्ञानप्रबोधिनी संस्थेच्या प्रज्ञामानस विभागप्रमुख आणि संशोधिका.

**२८) सौ. प्रज्ञा जोशी–भागवत –** कै. राजाभाऊ लवळेकर यांची नातसून.

**२९) श्री. रवींद्र हेजीब –** निवृत्त बँक अधिकारी आणि कै. राजाभाऊ लवळेकर यांचे जावई.

**३०) श्री. दत्ता जोशी –** निवृत्त सरकारी अधिकारी, कै. राजाभाऊ लवळेकर यांचा आतेभाऊ आणि बालपणीचे सवंगडी.

**३१) श्री. विवेक जोशी –** जनता सहकारी बँकेत अधिकारी आणि कै. राजाभाऊ लवळेकर यांचा पुतण्या.

**३२) श्रीमती अनुराधा कुलकर्णी –** कै. राजाभाऊ लवळेकर यांच्या भगिनी. म.न.पा.विद्यालयाच्या निवृत्त मुख्याध्यापिका.

**३३) श्री. राजेंद्र कानेटकर –** कै. राजाभाऊ लवळेकर यांचा भाचा आणि दैनिक प्रभातमध्ये उपसंपादक.

**३४) श्री. प्रसाद लवळेकर –** कै. राजाभाऊ लवळेकर यांचे सुपुत्र. खाजगी कंपनीत अधिकारी आणि रा. स्व. संघ पुणे महानगराचे अधिकारी.

**३५) कै. अच्युत पारखी –** कै. राजाभाऊ लवळेकर यांचे मावसभाऊ. निवृत्त मुख्य अभियंता. बालपणीचे सवंगडी आणि संघस्थानावरील सहकारी.

**३६) कै. प्रकाश पुराणिक –** कै. राजाभाऊ लवळेकर यांचा भाचा.

**३७) श्री. नीलकंठ जोशी –** कै. राजाभाऊ लवळेकर यांचे मेव्हणे.

**३८) श्री. आलोक भागवत –** कै. राजाभाऊ लवळेकर यांचा नातू. संगणक अभियंता.

**३९) श्री. विनायक कुलकर्णी –** शिक्षण क्षेत्रातील कै. राजाभाऊ लवळेकर यांचे सहकारी

**४०) डॉ. अशोक कुकडे –** ख्यातनाम सर्जन. रा. स्व. संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते. लातूरच्या स्वामी विवेकानंद रुग्णालयाचे तसेच हरंगुळ (लातूर) येथील ख्यातनाम जनकल्याण निवासी विद्यालयाचे संस्थापक.

**४१) श्री. सुहासराव हिरेमठ –** रा. स्व. संघाचे ज्येष्ठ प्रचारक. त्यांनी काही वर्षेपुणे महानगराचे प्रचारक म्हणून काम पाहिले. गेल्या अनेक वर्षांपासून रा. स्व. संघाची अ. भा. सेवा विभाग प्रमुख म्हणून जबाबदारी. आता या विभागाचे पालक म्हणून तर केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य म्हणून जबाबदारी.

**४२) कै. कृ. ल. पटवर्धन –** कै. राजाभाऊ लवळेकरांचे शिक्षण क्षेत्रातील सहकारी. या दोघांनी अन्य समविचारी मित्रांच्या सहाय्याने ‘स्व’–रूपवर्धिनी संस्थेची स्थापना केली. राजाभाऊ लवळेकर यांच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने त्यावेळी त्यांनी व्यक्त केलेल्या भावना त्यांच्याच शब्दात.

**४३) श्री. सुहास कुलकर्णी –** संस्कार भारतीचे ज्येष्ठ पदाधिकारी आणि कार्यकर्ते.

**४४) श्री. श्रीधर देव –** निवृत्त अध्यापक आणि रमणबाग शाळेतील कै. राजाभाऊ लवळेकर सरांचे सहकारी.

**४५) प्रा. संजय तांबट** – 'स्व'–रूपवर्धिनीची स्थापना झाल्यावर ज्या १२ मुलांना निवडून संस्थेचे काम सुरू झाले त्या तुकडीतील एक वर्धक. सध्या पुणे विद्यापीठाच्या वृत्तविद्या विभागाचा विभागप्रमुख म्हणून कार्यरत. 'स्व'–रूपवर्धिनीच्या सहकार्याध्यक्ष पदाची जबाबदारी.

**४६) श्री. शरद तथा बापूराव घाटपांडे** – निवृत्त अध्यापक. सूर्यनमस्कार या व्यायाम प्रकारातील एक ज्येष्ठ तज्ज्ञ मार्गदर्शक. लहानपणापासून संघ स्वयंसेवक. काही वर्षेरा.स्व.संघ जनकल्याण समितीची प्रांत कार्यवाह म्हणून तसेच काही वर्षेपुणे महानगराचे संघचालक म्हणून काम पाहिले.

**४७) प्राचार्य श्री. अनिरुद्ध देशपांडे** – बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयाचे निवृत्त प्राचार्य, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे ज्येष्ठ कार्यकर्ते. रा. स्व. संघाचे विद्यमान अखिल भारतीय संपर्क प्रमुख.

**४८) श्री. विनायक डंबीर** – न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग शाळेतील राजाभाऊंचे विद्यार्थी. लहानपणापासून रा. स्व. संघाचे स्वयंसेवक. पुणे महानगराची काही वर्षेमहानगर कार्यवाह म्हणून जबाबदारी. सध्या रा. स्व. संघ. जनकल्याण समितीचे प्रांत पदाधिकारी.

**४९) डॉ. गो. बं. देगलूरकर** – डेक्कन कॉलेज या ख्यातनाम संस्थेत अनेक वर्षेकार्यरत. देशातील शिल्पकला या विषयातील तज्ज्ञ अभ्यासक. संस्कार भारतीचे ज्येष्ठ पदाधिकारी आणि कार्यकर्ते.

**५०) श्री. मनोहर कुलकर्णी** – ज्येष्ठ पत्रकार. दैनिक तरुण भारतच्या विविध आवृत्तीचे तसेच काही वर्षेदैनिक लोकमतचे संपादक म्हणून कार्यरत.

**५१) श्री. आनंद हर्डीकर** – लेखक आणि पत्रकारिता क्षेत्रातील एक ज्येष्ठ आणि अभ्यासू पत्रकार. राजहंस प्रकाशन या ख्यातनाम प्रकाशन संस्थेत कार्यरत.

**५२) श्री. रवींद्र देव** – संस्कार भारतीचे अखिल भारतीय पदाधिकारी. कमर्शिअल आर्टिस्ट.

**५३) श्री. जयंत कवठेकर** – निवृत्त अध्यापक. सूर्यनमस्कार या व्यायाम प्रकारातील एक ज्येष्ठ तज्ज्ञ मार्गदर्शक. लहानपणापासून संघ स्वयंसेवक. 'स्व'–रूपवर्धिनीचे एक ज्येष्ठ कार्यकर्ते. सहकारनगर भागातील योगी अरविंद सांस्कृतिक मंचाच्या कामात कार्यरत.

**५४) सौ. स्वाती देव** – संस्कार भारतीच्या कार्यकर्त्या.

**५५) प्रा. श्री. श्याम जोशी** – निवृत्त प्राध्यापक. संस्कार भारतीच्या पश्चिम प्रांताचे विद्यमान कार्याध्यक्ष

**५६) श्री. राज चौधरी** – रा. स्व. संघाचे कार्यकर्तेआणि क्रीडाभारती या संस्थेचे ज्येष्ठ पदाधिकारी

**५७) श्री. सतीश कुलकर्णी** – संस्कार भारतीचे ज्येष्ठ पदाधिकारी आणि कार्यकर्ते. कमर्शिअल आर्टिस्ट.

**५८) श्री. मोहन अळवणी** – लहानपणापासून संघ स्वयंसेवक. खाजगी व्यवसायातून निवृत्त झाल्यावर ज्ञानदा संस्थेच्या कामाची धुरा कार्यवाह या नात्याने अनेक वर्षेसांभाळली. व्यवस्थापकीय कामाबरोबरच शाळेतील विद्यार्थ्यांच्या प्रेरणादायी शिक्षणासाठी अनेक उपक्रम सुरू केले. वंदेमातरम या राष्ट्रीय गीताच्या १२५ व्या जयंतीच्या निमित्ताने अनेक उपक्रम घडवून आणण्यात पुढाकार घेतला. ज्ञानदाच्या कामातून निवृत्तीनंतर काही वर्षेविद्याभारतीच्या कामाची जबाबदारी सांभाळली.

**५९) श्रीमती अर्चना नलावडे** – ज्ञानदा प्रशालेच्या निवृत्त मुख्याध्यापिका. व्यवस्थापकीय कामाबरोबरच शाळेतील विद्यार्थ्यांच्या प्रेरणादायी शिक्षणासाठी तसेच शिक्षक सहकाऱ्यांसाठी अनेक उपक्रम सुरू केले.

**६०) कै. हरिभाऊ कुलकर्णी** – कै. राजाभाऊ लवळेकरांचे रा. स्व. संघातील एक ज्येष्ठ सहकारी. राजाभाऊ लवळेकर यांच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने त्यावेळी त्यांनी व्यक्त केलेल्या भावना त्यांच्याच शब्दात.

**६१) श्री. अनिल माणकीकर** – काही वर्षे विज्ञान विषयाचे अध्यापन. कर्वेस्त्री शिक्षण संस्थेचे विद्यमान उपाध्यक्ष.

**६२) श्री. सदानंद चांदेकर** – कै. राजाभाऊ लवळेकर यांचे भाचेजावई. चित्रकार आणि हास्य कलाकार.

**६३) श्री. सदानंद भागवत** – निवृत्त बँक अधिकारी, रा. स्व. संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते.

❖❖❖

**NESPA**
New English School Pune Associates
345, Shaniwar Peth, Pune 411 030.

**नेस्पा**
न्यू इंग्लिश स्कूल पुणे असोसिएटस्,
३४५, शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०.

नेस्पा संस्थापक

## गुरुवर्य श्री. एल. के. तथा बाबुकाका गोडबोले

## स्मृति-पुरस्कार

अपार कष्ट सोसणारा, स्वीकारलेले नियम सदैव पाळणारा,आदर्श स्वयंसेवक,
'संघ'कार्यात सातत्याने अग्रेसर, अमोघ वक्तृत्व, विलक्षण लोकसंग्रह,
मूल्यांची निश्चयपूर्वक जपणूक करणारा आणि करवून घेणारा,
कणखर नेता, समचित्त संपादक, लढाऊ लेखक,
साहस आणि संरक्षण यांचे कौशल्याने धडे देणारा मार्गदर्शक,
आदराने नतमस्तक व्हावे असा विश्वस्त

## श्री.कृष्णाजी गोविंद तथा राजाभाऊ लवळेकर

आनंदी शिक्षणाचा वस्तुपाठ देणारे,
नित्य नूतनतेचा शोध घेणारे आणि त्याची शैक्षणिक उपयुक्तता पारखणारे,
उत्तमाचा ध्यास घ्यायला शिकवणारे, अगणित अध्ययनार्थींना हृदयस्थ प्रेमाने सहजतेने घडविणारे
रमणबागेचे आपले

## 'लवळेकर सर'

आपल्या कर्तृत्वाला, निष्ठेला आणि विद्यार्थ्यांप्रति असलेल्या प्रेमाला हार्दिक अभिवादन!

गुढीपाडवा
२३ मार्च, २०१२

डॉ. दीपक टिळक
अध्यक्ष,नेस्पा



प्रार्थना

हे प्रभो! तू ज्ञानरूपे कल्पवृक्षा लाविले।
बहरल्या शाखा तयांच्या चिंतनी मन रंगले॥
विश्व हे सामावले ॥धृ॥

या पदासी आकळीली सूर्य-चंद्राची प्रभा।
मोजुनी ग्रह-गोल-तारे भेदिले अवघ्या नभा।
मंथुनीया सप्त सिंधू गगन तेजे व्यापिले॥
विश्व हे सामावले ॥१॥

संस्कृती गंगौघ वाहे, त्यामधे अवगाहुनी।
शोधण्या शिव-सत्य-सुंदर दिव्य श्रध्दा घेऊनी -
-चालले पथ साधनेचा गुरुपदा ते पावले॥
विश्व हे सामावले ॥२॥

ज्ञान-रूपा! हे विराटा !! अणुअणुत तुज पाहु दे।
शक्ति, युक्ति, नम्रता दे, शील, शुभ संकल्प दे॥
आत्म-ज्ञाने, निश्चये, मन चेतनामय जाहले।
विश्व हे सामावले ॥३॥

१४।७।८३

राजाभाऊंची कविता त्यांच्या हस्ताक्षरात...